२९५३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं. ९६७

हिंद एजन्सी आवृत्ति ५

विविध-विषय ग्रंथ माला.

पुष्प १ लें.

हेच योग्य !


(सामाजिक बोधपर कादंबरी.)



सन १९१४.

किंमत
१। रुपया.

लेखक-
श्रीयुत द. दा. निमकर.



का. ८४

हिंद एजन्सी विविध-विषय ग्रंथ माला.

पुष्प १ लें.

ग्रंथ प्रत

हेंच योग्य !

(सामाजिक बोधपर कादंबरी.)

लेखक,

श्रीयुत दत्तात्रय वासुदेव निमकर.

प्रकाशक-हिंद एजन्सी,

बुकसेलर्स अँन्ड पब्लिशर्स, मुंबई.

१९१३.

(सर्व हक्क स्वाधीन.)

किंमत १। रुपया.

सर्व हक्क हिंद एजन्सीनें आपणाकडे
ठेविले आहेत.

मुद्रक—रा. चिं. स. देवळे, 'मुंबईवैभव' प्रेस, सर्व्हंट्स ऑफ इंडिया
सोसायटीज् होम, मुंबई.

प्रकाशक—श्रीयुत **नारायण नरसो केतकर**, व्यवस्थापक,
हिंद एजन्सी, माधवबाग—मुंबई.

प्रकाशकांचे दोन शब्द.

आजपर्यंत ' **हिंद एजन्सी** ' ह्या संस्थेनें निरनिराळ्या धोरणाचीं बरींच पुस्तकें प्रसिद्ध केलीं. परंतु तीं व्यवस्थित पद्धतीनें प्रसिद्ध करीत जाऊन त्याचा फायदा आपल्या आश्रयदात्यांस मिळावा या हेतुनें आम्हीं मालेच्या रूपानें पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें ठरविलें व या ग्रंथमालेस " **हिंद एजन्सी विविध-विषय ग्रंथमाला** " असें नांव देऊन या मालेंतील पहिलें पुष्प विजयादशमीचे सुमुहूर्तावर बाहेर पडेल असें जाहिर केलें. त्याप्रमाणें आम्हीं आपल्या नवीन मालेचें हें प्रथम पुष्प आपल्या प्रिय वाचकांस सादर करीत आहों. या नवीन मालेस महाराष्ट्र वाचकवर्गाकडून जर योग्य लोकाश्रय मिळत गेला तर या मालेंतून नवीन नवीन चांगल्या कसलेल्या लेखकाचीं बोधपर पुस्तकें आम्हीं आपल्या वाचकवर्गास सादर करीत जाऊं.

प्रस्तुतचें हें मालेचें प्रथम पुष्प श्रीयुत दत्तात्रय वासुदेव निमकर, कोल्हापूर यांनीं गुंफिलें आहे. अलीकडे महाराष्ट्र वाचक वर्गाचा ओढा कांदबरीकडे फार असल्या कारणानें पहिलें पुष्प आम्हीं कादंबरी रूपानेंच गुंफिलें आहे. ही कादंबरी अगदीं स्वतंत्र असून ती परभाषेंतील कोणत्याही पुस्तकाचें रूपांतर अगर भाषांतर नाहीं. आमच्या मालेचें हें पहिलेंच पुष्प असल्यामुळें या कांदबरीस प्रस्तावना लिहिण्याचें महत्वाचें काम आमचे परमस्नेही श्रीयुत " नाथ माधव " यांनीं आपल्या शिरावर मोठ्या प्रेमानें घेतलें होतें. परंतु ऐनवेळीं ते आजारी पडल्यामुळें व हें पुष्प बाहेर पडण्याची वेळ टळत असल्यामुळें नाइलाजास्तव हें पुष्प त्यांच्या प्रस्तावने शिवायच आम्हाला प्रसिद्ध करावें लागत आहे.

परंतु आमच्या प्रियवाचकवर्गास या कादंबरी संबंधें थोडी बहुत ओळख करून देऊन आम्हीं आपले हे दोन शब्द पुरे करतों. श्रीयुत निमकर यांनीं सदर कादंबरींत आपल्या देशाच्या सद्यःस्थितींत योग्य ती सुधारणा केली असतां देशाची मरभराट कशी होईल हें दाखविण्याचा आपल्या मतिनुसार

प्रयत्न केला आहे. आमच्या समाजांतील जुनी मंडळी फक्त तात्पुरत्या होणाऱ्या फायद्याकडे लक्ष देऊन तरुण होतकरू मंडळीस कशी नाउमेद करते, प्रेमाचें-सात्विक प्रेमाचें खरें लक्षण काय, पूर्वजांनीं मोठ्या परिश्रमानें संचय करून ठेवलेली संपत्ती, तरुण मंडळीच्या हातांत येतांच निरनिराळ्या व्यसनाधीन होऊन मागचा पुढचा विचार न करतां ते कशी उधळून टाकतात, मुंबईस उच्च शिक्षण संपादनार्थ आलेले श्रीमंत तरुण, लबाड लोकांच्या नादीं लागून कसे फसतात, धनिक लोकांचें मुख्य कर्तव्य कोणतें, तरुण मंडळीस ध्येय काय असावें वगैरे बऱ्याच मुद्याचें विवेचन रा. निमकर यांनीं या कादंबरींत यथामति केलें आहे. हा प्रयत्न रा. निमकर यांचा कसा साधला आहे याचा विचार आमचे सुज्ञ वाचक करून रा. निमकर यांच्या ज्या कांहीं थोड्याबहुत चुका झाल्या असतील त्यांकडे दुर्लक्ष करून त्यांस योग्य त्या सूचना करून त्यांच्या ह्या प्रथम कृतीचें चीज मोठ्या प्रेमानें करतील अशी आशा आम्ही बाळगतों.

आमच्या मालेंतील दुसरें पुष्प येत्या संक्रातीस बाहेर पडेल. ही आमची माला चिरायु होण्यास आमच्या वाचक वर्गाकडून या मालेस योग्य तो लोकाश्रय देण्याची सुबुद्धि तो जगच्चालक परमेश्वर आमच्या वर्गास देवो अशी अनन्यभावें प्रार्थना करून हे दोन शब्द पुरे करतों.

विजया दशमी,
शके १८३५
मुंबई.

आपला नम्र,

व्यवस्थापक-हिंद एजन्सी.

म. धों. कु

श्रीरामसमर्थ.

प्रस्तुतची कादंबरी ही माझी पहिलीच कृति आहे. माझी कृति पहिलीच व मी लेखकहि नवीन असें असतां, तिच्या बऱ्यावाईट गुणांच्या निरीक्षणासाठीं ती जनतेपुढें आणण्याचें काम हिंदुएजन्सीचे उत्साही चालक रा. रा. नारायणराव केतकर यांनीं हातीं घेतलें याबद्दल मी त्यांचा व माझ्या इतर समानशील मित्र मंडळींचा–त्यांतल्यात्यांत रा. रा. नारायणराव आपटे यांचा, त्यांनीं केलेल्या सूचनाबद्दल फार आभारी आहें. ह्या कादंबरीचीं प्रूफें तपासण्याचें काम मजकडून व्हावयास पाहिजे होतें परंतु मी आणि प्रेस यांमध्यें पुष्कळ अंतर असल्यामुळें या पुस्तकाचीं प्रुफें तपासण्याचें काम माझ्याकडून झालें नाहीं. त्यामुळें पुस्तकांत जीं अशुद्धें राहिलीं असतील त्याबद्दल माझे सहृदय वाचक मला क्षमा करतील अशी आशा आहे.

कोल्हापूर, मंगळवार पेठ,
४ आक्टोबर १९१३.

दत्तात्रय वासुदेव निमकर.

समर्पण.

मातें देउनि जन्म त्या शिशुपणीं
सप्रेम संगोपिलें ।
झालों योग्य, विलोकुनी, पितृकरीं
विद्याजनीं ओपिलें ॥
'विद्येचें फळ चाखवील सुत हा'
आशा मनीं राहिली ।
स्वर्गस्था मम माउलीस कृति ही
चिंतून मी वाहिली ॥ १ ॥

तुझा नम्र बालक,

दत्तात्रय.

अनुक्रमणिका.

प्रकरण		पृष्ठ.
१	मित्रद्वय.	१
२	माधव कोण !	८
३	दिव्य शक्ति कोणची !	१५
४	चहा घेतल्यानंतर.	२४
५	संविधानकांतील कांहीं पात्रें.	३१
६	पुढें चालू.	३६
७	बिल्हिकचा डाव.	४३
८	मित्रांचा वाद.	४९
९	वडिलांची अखेरची इच्छा.	५५
१०	बंदरावर.	६०
११	मानसिक अस्वस्थता.	६७
१२	जाण्याचें खरें कारण.	७१
१३	नोकरी ह्मणजे पराधीनता.	७७
१४	विनायकाचे विचार.	८३
१५	लक्ष्मीचा निश्चय.	८९
१६	घर सोडलें.	९३
१७	शेवटीं निश्चय ठरला.	९७
१८	विमला देवी.	१०१
१९	नवीन मित्राची जोड.	१०६
२०	विमला देवीचें अंगीकृत कार्य.	११०
२१	चिंतामणरावांचा राग.	११७
२२	लग्नाला संमत्ती.	१२२
२३	भिंतीला कान.	१२८
२४	कमलेची शंका.	१३४

प्रकरण		पृष्ठ.
२५	गोविंदरावांचा विरस....	१३८
२६	नानासाहेबांचें कपटजाल.	१४२
२७	मालचंद्राचा निश्चय.	१४६
२८	गोविंदरावांचें वजन.	१५०
२९	विनायकाची कामगिरी.	१५५
३०	दिल–जान.	१६०
३१	चिंतामणराव शांत झाले.	१६४
३२	पाऊल भलतीकडे पडलें.	१६९
३३	मालचंद्राचें पत्र.	१७३
३४	पुनः प्रेम–जागृति.	१७९
३५	प्रवास.	१८५
३६	चिंतामणरावांचा मृत्यु.	१८९
३७	कमलेच्या लग्नाचा विचार.	१९५
३८	हृदय–स्फोट....	२०१
३९	चोर सण.	२०५
४०	बिघाड कोणी पाडला ?	२१०
४१	कारस्थान–परिस्फोट.	२१६
४२	कागद काय झाला !	२२१
४३	पुन्हां जाव्यांत !	२२४
४४	तार आली.	२२७
४५	कृष्णस्वरूप बाहेर आलें.	२३१
४६	मृत्यु नंतर.	२३४
४७	डाव फसला.	२३९
४८	नानासाहेबांचा कबुली जवाब	२४४
४९	आनंदी आनंद	२४९
५०	मालचंद्राचें व्याख्यान	२५४
५१	उपसंहार	२६०

हँच योग्य !

प्रकरण १ लें.

मित्रद्वय.

न व्हेंबर महिन्यांतील वऱ्हाडची गुलाबी थंडी. अशावेळीं पहाटेच्या सुमारास नेहेमींच्या सवयीप्रमाणें विनायक व भालचंद्र हे दोघेहि फिरावयास निघालेले होते. परिक्षा व तिच्या पूर्वीच्या अभ्यासाचा त्रास ह्यांनीं शिणलेलीं त्यांचीं मनें आतां चांगलीं उल्हासित झालेलीं होतीं. व त्यांचा परिणाम त्यांच्या त्या उत्साही चेहऱ्यावरून चांगला दिसत होता. मामुलीप्रमाणें त्यांच्या गप्पागोष्टी चालल्या होत्या; पण त्या विशेष महत्वाच्या नव्हत्या. होतां होतां गप्पांचें रूपांतर ' स्वतः पुढें कसें करावयाचें ? ' याची वाटाघाट करण्यांत झालें !

" भालचंद्र, तूं आतां जोरानें ह्मणतो आहेस खरा, पण वेळ आली ह्मणजे मागें घेशील. मला नाहीं वाटत, प्रभाकरराव तुझ्या ह्मण्यास रुकार देतीलसें ! "

" मला त्यांच्या रुकाराची तेवढी जरूर नाहीं समजलास ! त्यांच्या उसन्या जोरापेक्षां मानसिक स्फूर्तीच्या नैसर्गिक जोराची मला जोड आहे. " हातांतील काठीनें रस्त्यावरील दगड उडवित तो ह्मणाला.

" तें सर्व खरें, पण आपली ही मानसिक स्फूर्ति आपल्या वडिलांच्या हेकेखोरपणास मागें टाकील तेव्हां ना "? त्याच्याकडे पहात विनायक ठांसून ह्मणाला.

" विनायक, माझेबद्दल तुला काय वाटतें " त्याच्या दृष्टीस दृष्टि मिळवून भालचंद्र ह्मणाला.

भालचंद्राची दृष्टि भेदक व तीक्ष्ण असून त्याच्या चेहऱ्यावर करारीपणाचें पाणी चमकत होतें.

" विनायक, वडिलांच्या हेकेखोरपणासच साथीदार करून घेऊन मी ह्यांतून आपला मार्ग काढणार आहें. आणि हा माझा हेतू सहसा विफल होणार नाहीं अशी मला खात्री आहे. "

त्याच्या स्वरांत मार्दव असून जरी तो हंसत हंसत बोलत होता तरी त्याच्या बोलण्याच्या एकंदर झोंकावरून त्यांत करारीपणाची व आत्मविश्वासाची बरीच झांक दिसत होती.

विनायकास त्याच्या बोलण्याचा हेतू समजला नव्हता, व तो त्यानें विशेष स्पष्ट करावा ह्मणून तो ह्मणाला—

" पाहूं आतां, घोडा मैदान जवळच आहे ! "

" हो, हो, पहाना ! "

भालचंद्र आपल्या भाषणांतील संदिग्धता सोडण्यास अद्यापि तयार नव्हता. विनायक बराच वेळ विचार करीत चालला पण त्याला कांहीं तें गूढ उकलेना. अखेरीस कंटाळून त्यानें मन मोकळें करून बोलावें, या हेतूनें तो स्पष्ट ह्मणाला—

" भालचंद्र, तूं आपला अंतिम हेतू कसा साधणार हें अद्यापि कांहीं माझ्या ध्यानांत येत नाहीं. "

" आपलें अंतिम साधण्यासाठीं मी योजलेला बेत तुला सांगितल्यानंतर तें सर्व तुझ्या ध्यानांत येईल. पण त्याच्या अगोदर तूं काय ठरविलें आहेस तें सांग. कारण जशी तुझी तशीच माझीहि स्थिति आहे. तेव्हां तूं योजलेला बेत जास्ती चांगला असल्यास किंवा त्याच्यापासून कांहीं घेण्यासारखें अस-ल्यास तें घेऊन मला माझ्या बेतांत फरक करण्यास बरें पडेल. "

" तुझी आणि माझी स्थिति सारखी असें कसें ह्मणतोस ? तुझ्या वडिलांच्या मनांतून तुला आय. सी. एस्.-सिव्हिलीयन करवावयाचें आहे, पण

माझ्या वडिलांच्या मनांतून मी काय करावें असें आहे हें मला अद्यापि समजलें नाहीं. ”

“ तुझ्या वडिलांच्या मनांत कांहीं जरी असलें तरी त्यांच्या स्वभावाची मला जी माहिती झालेली आहे त्यावरून तूं एखाद्या स्वतंत्र धंद्यांत किंवा जनकार्यांत पडावें असें मात्र त्यांना वाटत नाहीं, हें मी तुला खात्रीनें सांगतों. ”

“ असेल कदाचित्. पण त्याविषयीं उगीच तर्क करित बसण्यापेक्षां तूं कोणचा बेत योजला आहेस तो सांगेनास ? ”

“ पुष्कळ विचार केल्यानंतर बाबांना चकविल्याशिवाय कांहीं चालावयाचें नाहीं याची मला खात्री पटली असून त्याप्रमाणें मी त्यांना चकविण्याचा बेत केला आहे. लवकरच दोन तीन महिन्यांत ते मला इंग्लंडला पाठविणार असून त्यासंबंधीं त्यांनीं मला सांगितलेंहि आहे. ”

“ पण आय्. सी. एस्. होणें पसंत आहे किंवा नाहीं हें त्यांनीं तुला कधीं विचारलें नाहीं का ? ” विनायकानें मध्येंच विचारलें.

“ नाहीं नाहीं. लंडनला नागपुरचे विश्वनाथराव कुण्ठे आज बरेच दिवसांपासून राहत आहेत. त्यांचे वडील बंधूचा व आमचे बाबांचा फार स्नेह आहे व अभ्यासाच्या पूर्ण तयारीसाठीं त्यांचे घरीं ते मला ठेवणार आहेत. ”

“ तर मग तेथें जाऊन तूं परिक्षा देणार वाटतें ? ”

“ नाहीं. बाबांच्या इच्छेप्रमाणें मी इंग्लंडला जाणार पण परीक्षेस मात्र बसणार नाहीं. ”

“ म्हणजे तेथें गेल्यावर त्यांचा हिरमोड करण्याचा तुझा विचार आहे वाटतें. ह्यापेक्षां त्यांना येथेंच तसें स्पष्ट सांगितलेलें काय वाईट ? ”

“ विनायक, आमच्या बाबांचा स्वभाव तुला ठाऊक नाहीं म्हणून तूं असें म्हणतोस. मला सिव्हिलीयन होणें आवडत नाहीं एवढें नुसतें म्हटलेलें देखील त्यांच्या स्वभावास रुचावयाचें नाहीं. तेथें गेल्यानंतरसुद्धां कांहीं कालपर्यंत त्यांना माझा बेत मीं कळविणार नाहीं. माझा तर हेतू साधावा व बाबांचाही माझेवर राग होऊं नये एवढ्यासाठीं मी दुसराच उपाय योजला आहे आणि तो साधण्यासाठीं मला कांहीं कालपर्यंत त्यांना अज्ञानांतच ठेविलें पाहिजे. ”

“ आणि तूं इंग्लंडला जाऊन, नंतर त्यांना चकविणार म्हणतोस ? ”

" होय. "

" आणि ह्यानें त्यांना राग येणार नाहीं ? अरे ते जर तुला सिव्हिलीयन होण्यासाठीं तेथें पाठविणार तर त्यांना राग आल्याशिवाय कसा राहील ! "

" त्यांना राग येईल ह्मणण्यापेक्षां बाईट वाटेल असें ह्मणणें जास्त अर्थाचें होईल ! "

" पण हें तूं कशावरून ह्मणतोस ? "

" कशावरून ह्मणजे त्यांच्या स्वभावावरून. मला सिव्हिलीयन करण्यांत त्यांचा जो हेतू आहे त्यावरून मी तुला हें खात्रीनें सांगतों समजलास." त्याच्या बोलण्यांत जोर होता.

ते बराच वेळ स्तब्ध होते. भालचंद्राला आत्मविश्वास जरी होता तरी आपला डाव साधेपर्यंत त्याच्या सिद्धीवद्दल त्याला शंका वाटत होती व त्या विषयावद्दल बोलणें निघाल्यावरोवर ही शंका त्याच्यापुढें उभी राहिली. "सांगतो त्याप्रमाणें वडिलांना फसवून हा आपला डाव साधणार कसा ?" हा प्रश्न अद्यापि विनायकापुढें उभा होताच; व त्याला तो कांहीं उकलत नव्हता, अखेर त्यानें भालचंद्रास विचारलेंच !

" पण हें तूं साधणार कसें ? "

" तिकडे गेल्यावर विश्वनाथरावांच्या सहाय्यानें हें साधण्याचा माझा विचार आहे; आणि त्यांच्या स्वभावाची मला जी माहिती मिळाली आहे त्यावरून माझ्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतील अशी मला पूर्ण आशा आहे. "

" तुझ्या बोलण्यांत संदिग्धता बरीच आहे. मला नाहीं समजत तूं काय ह्मणतोस तें ! "

"तुला सर्व समजावून सांगतों पण त्याची वाच्यता मात्र होतां उपयोगी नाहीं कारण माझा विचार असा आहे असें आमच्या बाबांच्या कानांवर गेल्यास ते मोडता घातल्याशिवाय रहावयाचे नाहींत, व जी गोष्ट त्यांना कळूं न देतां गोडी गुलाबींत करून घेणार आहें ती भांडणतंट्याशिवाय व्हावयाची नाहीं."

"मला सिव्हिलीयन करण्यांत बाबांचा हेतू पैशाचा अगर माझे सुस्थितीचा नसून दुसराच आहे. त्यांची वृत्ति अधिकारलोलूप आहे. अधिकारानें हातांत सत्ता व जगांत मानमान्यता मिळते अशी त्यांची समजूत आहे व ह्याच इच्छेनें

त्यांनीं स्वतः नौकरीहि केली परंतु त्यांच्या अहंमन्यतेनें ती त्यांना फार दिवस लाभली नाहीं. आपणांस नाहीं तर आपल्या मुलास तरी तशी स्थिति असावी असें त्यांस वाटणें साहाजिक आहे. पण मला हें पसंत नाहीं. मला ती नोकरी, तिची तीं मानमान्यता व अधिकारसंपन्नता नको आहे. शिक्षण घ्यावयाचें तें नोकरीसाठींच असें मला वाटत नाहीं. आपल्या सध्यांच्या स्थितींत सुखवस्तु लोकांचें शिक्षणविषयक ध्येय निराळें असावें अशा मतांचा मी आहें. मनाची नोकरी धरून शास्ता होऊन जनसेवा करण्यापेक्षां मार्गदर्शक बनून जनसेवा करण्यांत मला भूषण वाटतें, व ह्यानेंच मला मान व अधिकारसंपन्नता लाभेल. असें असतां निव्वळ वडिलांच्या इच्छेसाठीं ह्मणून स्वतःची योग्य आवडनिवड बाजूला ठेऊन आत्मघातकी बनणें मला केव्हांहि मानवावयाचें नाहीं. जिवाचा नाश करणें काय किंवा जिवाला आनंद देणाऱ्या वृत्तींचा नाश करणें काय सारखेंच ! दोघांचीही योग्यता आत्मघाता इतकीच ! असें असतां परंपरागत चालत आलेल्या रूढीला बळी पडून खोट्या पुत्रधर्माचें पालन करण्यास माझें मन धजत नाहीं. आत्मघाताच्या मतास लागणाऱ्या डागण्या आजन्म सहन करण्यापेक्षां वडिलांशीं कटू होण्याचा प्रसंग व आपल्या इच्छेसाठीं सोसावे लागणारे हाल मला ज्यास्त प्रिय आहेत. "

शेवटले कांहीं शब्द तो ठांसून बोलला. त्याच्या एकंदर बोलण्यांत न डगमगणाऱ्या कृतनिश्चयाची झांक दिसत होती.

थोडा वेळ थांबून तो पुढें ह्मणाला—

" विनायक, होतां होईल तों वडिलांशीं भांडण करण्याचा प्रसंग टाळावा अशी माझी इच्छा आहे. ह्या इच्छेमुळेंच मी विलायतला जाण्याच्या त्यांच्या इच्छेआड येऊं इच्छीत नाहीं. शिवाय मी तेथें गेल्यानें माझा फार फायदा होणार आहे. एकतर स्वतंत्र वातावरणांत रहावयास मिळाल्यानें आपल्या विचारांचें चांगल्या रीतीनें पोषण होईल. दुसरें ब्रिटिश म्युझिअमच्या लायब्ररीचा फायदा घेतां येईल. व ह्या दोन्ही गोष्टी माझ्या पुढील हेतूला फारच उपयोगी पडणाऱ्या आहेत. नाहीं ? "

" पण तेथें गेल्यावर तुझें हें सर्व जमणार कसें ! "

"ज्यांच्या येथें बाबा मला ठेवणार आहेत त्यांस सहाय्य करून घेण्याचा माझा बेत आहे. आमच्या तिकडच्या गार्डीयनची मला येथें जी कांहीं माहिती मिळाली

आहे त्यावरून ते मला मनापासून मदत करतील असें वाटतें आहे. शिवाय इतके दिवस तिकडे राहिल्यानें स्वतंत्रतेच्या वातावरणांतील स्वतंत्र आचार-विचार कर्तव्यगारीची महती यांचें वारें त्यांस लागलें नसेलसें तुला वाटतें का ? अरे ज्या गोष्टी आमच्या कुटुंबचालकाच्या दृष्टीला येथें अयोग्य दिसतात त्याच तेथील कुटुंबचालकांच्या दृष्टीला तेथें योग्य दिसतात. इकडे आमचे पालनकर्ते वयांत आलेल्या समजणाऱ्या तरुणांचा-मुलांचा आयुष्यक्रम आपण आखूं बघतात. तर तिकडील पालनकर्ते तो मुलांस आखण्यास आपण मदत करतात. आमच्या इकडील या अयोग्य चालीनें पुष्कळ चांगल्या बुद्धिमत्तेचा अयोग्य दडपणामुळें व्हावा तसा विकास होत नाहीं, आणि तिकडील उन्नतीच्या व इकडील अधोगतीच्या मुळाशीं त्यांच्या व आमच्या चालींतील हा फरक बऱ्याच मोठ्या प्रमाणानें वावरत असला पाहिजे.''

'' तुझें हें म्हणणें कदाचित् खरें असेल व त्याप्रमाणें तूं आचरावेंस हेंहि योग्य आहे. पण हें तुझें आचरण जनतेच्या दृष्टीनें योग्य होईल का ?''

'' हो, न व्हावयाला काय झालें ? आणि कदाचित् अंगीं मुरलेल्या अयोग्य दृष्टीनें त्यांना जर तें आवडलें नाहीं तर त्यास माझा इलाज नाहीं. त्यांच्या अदूर दृष्टीनें त्यांना जरी तें अयोग्य वाटत असलें तरी नयदृष्टीनें तें अयोग्य ठरत नाहीं ना ? आणि मी चांगल्यासाठींच हें सर्व करणार आहेंना ? शिवाय माझ्या त्या कारणापासून लोकांचा थोडाच तोटा होणार आहे ! उलटा झाला तर माझाच होईल.''

भालचंद्राच्या बोलण्यावरून आपल्या मनोगत विचारांस तो व्यावहारिक स्वरूप दिल्याशिवाय राहावयाचा नाहीं, याची विनायकास खात्री वाटूं लागली. त्यानें चातुर्यानें केलेली युक्तियोजना पाहून तर त्यास कौतुक वाटावयास लागलें व त्याच्या मनांत त्याच्याबद्दल पूज्यभाव उत्पन्न झाला. त्याच्या प्रमाणेंच आपली स्थिति झाल्यास आपण काय करावें हा विचार त्याच्या मनांत आला. ह्या विचारानें त्याला क्षणांत अस्वस्थ केलें. व असें झालें तर पुढें काय करावयाचें याबद्दल भालचंद्राचा विचार घेऊन ठेवणें चांगलें असें वाटून तो म्हणाला.

'' भालचंद्र, तुझ्यासारखीच माझी स्थिति झाली तर मी कसें करावें ? ''

'' विनायक, माझ्यासारखी तुझी स्थिति होणें शक्य तरी आहे का ? तुझे वडील तुला सिव्हिलीयन हो म्हणून सांगतील असें तुला वाटतें का ? ''

"अरे, सिव्हिलीयन नाहीं पण साधा प्राव्हिनशीअल हो ह्मणून सांगितलें तर!"

" जरी सांगितलें आणि त्यांना नोकरी प्रिय आहे असें जरी धरलें तरी पण तो पेशा तुझ्यावर लादतीलच असें मला वाटत नाहीं. तितका अट्टाहासी त्यांचा स्वभाव नसावा असें मला वाटतें ! "

" येथें मात्र आपण चुकतां बरें का ! ते आपल्या वडिलाप्रमाणें अधिकार-लोलुप नाहींत पण अट्टाहासी मात्र आहेत. आणि एकदां का इरेला पडले ह्मणजे मागें कसें घ्यावें हें त्यांस समजत नाहीं. "

" असेल, तसेंहि असेल. पण तशींच वेळ आली तर तुझी पाठिराखी होण्यास तुझी आई आहेना ? ती तुला खात्रीनें मदत करील. शिवाय तुझ्यासंबंधी नक्की असें तुझ्या वडिलांचें आजच कांहीं ठरलेलें दिसत नाहीं. तेव्हां जी परिस्थिति आपणांस ठाऊक नाहीं तिच्याविषयीं उगीच कल्पनाचित्र रेखाटून अमका मार्ग किंवा अमकी युक्ति श्रेयस्कर असें ठरविणें मला तर चांगलें दिसत नाहीं. तुझे बाबा जेव्हां तुझ्या इच्छेस विरोध घेऊन तूं अमुक कर असें तुला सांगतील तेव्हां पाहूं काय करावयाचें तें. उगीच आतां त्याचा विचार कशाला पाहिजे?"

बराच वेळ झालेला पाहून दोघेहि घराकडे परत फिरले.

त्यांच्या परत येण्याच्या वाटेवर माधवाचा बंगला होता. ही सकाळची वेळ असल्यानें माधवासारखा प्राणी ह्यावेळीं गुलाबी झोपेंत असावयाचा हें जरी स्वाभाविक होतें तरी अशा वेळीं त्याला फाटकापाशीं उभा असलेला पाहून दोघांसही आश्चर्य वाटलें, व त्यांनीं अर्थभरित दृष्टीनें एकमेकांकडे पाहिलें. हें त्यांचें पहाणें माधवाच्या लक्षांत देखील आलें नाहीं.

त्यांना पहातांच त्यांना चहा घेण्यासाठीं माधवानें बोलाविलें. व त्यांनींहि आढेवेढे न घेतां त्याचें आमंत्रण स्वीकारलें.

प्रकरण २ रें.

माधव कोण !



प्रख्यात श्रीनिवासराव कळमकरांचा माधव हा एकुलता एक मुलगा असून तो घरचा फार श्रीमंत होता. माधवाच्या वडिलांस स्वर्गवासी होऊन जवळ जवळ वर्ष झालें होतें. व त्याची आईहि त्यास लहानपणीं त्याच्या वडिलांच्या स्वाधीन करून इहलोक सोडून गेली होती. पोरका व एकुलता एक मुलगा म्हणून श्रीनिवासरावांनीं त्याचें फार प्रेमानें संगोपन केलें होतें.

माधवाचें घराणें फार जुनें असून त्यांचा पिढीजात धंदा सावकारीचा होता. मोंगलांचे वेळेपासून माहूरकर व चंद्रपुरकर राजे ह्यांचे हे सावकार होते. पुढें ह्या दोघांचाहि अस्त झाल्यावर त्यांची सावकारी वारपट्यांत सुरू झाली व ती अद्यापपर्यंत चालू असून तिच्या जोडीस ते शेतकीचा धंदा करित असत. नि. जामाकडून वऱ्हाडप्रांत कर्जफेडीच्या व्यवस्थेसाठीं इंग्रजांचे हातीं आल्यानंतर जेव्हां हजारों गांव दिले गेले तेव्हां माधवाच्या आजानें जवळजवळ तीस गांव घेतले होते व हल्लीं त्यांतील अर्धा पाऊण लाख एकर जमीन ह्यांच्या मालकीची असून लागवडीखालीं होती.

ह्यांचें रहाण्याचें मुळगांव कळप होतें व हल्लीं हें गांव जरी अगदीं मोडकळीस आलेलें आहे तरी त्याच्या ऐन भरभराटीचे वेळीं वाढतां वाढतां त्याचा विस्तार बावन पुऱ्यांत–पेठेंत–झालेला होता.

श्रीनिवासरावांच्या पश्चात् माधव सर्व इस्टेटीचा मालक झाला असून त्याची सांपत्तिक स्थिति एखाद्या लहानशा संस्थानिकाप्रमाणें होती असें ह्मणावयास हरकत नाहीं. असो.

श्रीनिवासरावांनीं माधवाला जरी प्रेमानें वाढविलें होतें तरी त्याचे फाजील लाड करून इतर श्रीमंत देशमुख देशपांडे यांच्या मुलाप्रमाणें त्यांनीं त्यास बिघडविलें नव्हतें. त्याच्या शिक्षणाची ते योग्य काळजी घेत असत व अवांतर

जमेदार व श्रीमंत मंडळीप्रमाणें त्याचा भावी आयुष्यक्रम होऊं नये व विद्यामृताच्या सुसंस्कृतीनें त्यानें ह्या जगांतील आपल्यावरील जबाबदारी ओळखून आपली भावी जीवनयात्रा कर्तव्यगारीची व सुसमय करावी असें त्यांस नेहेमीं वाटत असे आणि ते जिवंत रहाते तर त्यांनीं तसें घडवूनहि आणिलें असतें, परंतु माधवाचें जीवनचित्र ईश्वरानें निराळ्याच तऱ्हेनें रेखाटलें असल्यामुळें, आयुष्यक्रमाला चांगलें अगर वाईट वनविणाऱ्या त्याच्या नवयौवनाच्या प्रवेशकालीं श्रीनिवासरावांस मृत्यूनें गाठावें हें योग्यच होतें !

राधाबाई–माधवाच्या आईच्या अकालीं निधनानें श्रीनिवासरावांचें मन संसारांतून जवळ जवळ उडाल्यासारखेंच झालें होतें. एखाद्या अल्पवयस्क मुलीवरोवर लग्न करून पुन्हां संसारांत पडण्याची त्यांस इच्छा नव्हती. अल्पवयस्क मुलीचरोवर शरीरसंबध करून अयोग्य संसार थाटण्याचा गौण मार्ग त्यांस पसंत नव्हता व आपणांस जें योग्य वाटेल त्याप्रमाणें आचरण ठेवण्याइतकें नीतिधैर्य त्यांच्यांत असल्यामुळें कोणाच्या भीडेस अगर आग्रहास ते बळी पडले नाहींत. माधवाचें योग्य संगोपन व शिक्षण यांतच आपल्या आयुष्याचा व्यय करीत विधुरावस्थेंत रहाणें त्यांस जास्त श्रेयस्कर वाटत असे. पत्नीवरोबर कांहीं काल सुखानें कालक्रमणा केलेल्या त्यांच्या कळपच्या घरांतहि रहाणें त्यांस जड वाटावयास लागलें होतें म्हणून यवतमाळ येथें व आपल्या कांहीं इजाऱ्याचे गांव येथें त्यांनीं तीन चार टुमदार बंगले बांधले असून ते कधीं ह्या खेडेगांवीं तर कधीं यवतमाळ येथें रहात असत.

त्यांस शिकारीचा नाद असे व प्रिय पत्नीच्या निधनानंतर तर त्यांस तिचें फारच वेड लागलें होतें. घरीं असले म्हणजे त्यांच्या सर्व आनंदाचें केंद्रस्थान बालवयी माधव असे व नसले म्हणजे घराबाहेरील क्रूर श्वापदांची शिकार ! माधवाला शिक्षणासाठीं नागपुरास ठेविल्यावर तर त्यांस शिकारीशिवाय चैनच पडेनासें झालें, व अखेर ह्या शिकारीच्या नादांतच एका चवताळलेल्या वाघणीस ते बळी पडून चिचाऱ्यांस प्राणांस मुकावें लागले.

अशा तऱ्हेनें श्रीनिवासरावांची जीवनयात्रा संपली. आणि वंशवृद्धि करणाऱ्या त्यांच्या प्रिय माधवाच्या जीवनयात्रेस सुरुवात झाली.

माधव लहानपणापासून हूड व एककल्ली असा होता. श्रीनिवासरावांच्या योग्य परिश्रमानें विद्यार्जनाचे मार्गांत जरी तो व्यवस्थित दिसत होता तरी पण

वडिलांच्या पश्चात् हातीं येणाऱ्या संपत्तीचा व स्वतंत्रतेचा पगडा, त्यास नागपुरास ठेवल्यापासून, त्याचेवर हळूहळू चसावयास लागला असून त्यांच्या मृत्यूनंतर तर शिक्षण देखील त्यांस निरर्थक वाटावयास लागलें होतें. हूडपणामुळें त्याची वृत्ति साहजिक चैनी असे व दावांत असल्यामुळें इतके दिवसपर्यंत तिचा पगडा त्याच्यावर बसलेला दिसत नव्हता पण वडिलांच्या मृत्यूमुळें साहजिक तो दाब नाहींसा झाला व त्यांची चैनीवृत्ति हळु हळूं जोरावयास लागली.

त्याच्या श्रीमंतीमुळें गावांतील खुशालचंद चैनीमंडळी त्याच्या भोवतीं जमूं लागली असून त्यांनीं आपली दीक्षा त्यांस देण्यास सुरवात केली होती. नाटकें, गाणें, वजावणें ह्या साध्या व विशेष अपाय न करणाऱ्या आनंददायी प्रकारांपासून त्यांची चैन आतां वाढावयास लागली असून पार्ट्या, ग्रेझर ट्रिप्स, सुरापान, अभक्ष्यभक्ष्य वगैरे प्रकारांचीं त्यांत आतां भर पडावयास लागली होती. येवढ्यानेंच थांवलें असतें तर वरें झालें असते पण नाहीं ! त्यांत वेश्यागमनाची भर पडली असून त्याच्या-माधवाच्या-साध्या चैनीचें रूपांतर हळूहळूं व्यसनलंपटतेंत व्हावयास लागले होतें.

अशी स्थिति झाली तेव्हां अर्थात त्यांस शिक्षण घेणें निरर्थक वाटावयास लागलें व कॉलेजमध्यें जाण्याची तो अळंटळं करूं लागला. आठआठ पंधरापंधरा दिवसांनीं केव्हां तरी एकदां कॉलेजमध्यें जावें व आपण अद्यापि विद्यार्थी आहों असें लोकांस भासवावें येथपर्यंत त्यांची मजल येऊन ठेपली होती. असें जरी होतें तरी त्याचें मन अद्यापि भ्रष्ट झालेलें नव्हतें. आपण करतों हें वाईट असें त्यास वाटत असे. पण त्या वाटण्याचा व्हावा तसा उपयोग होत नव्हता.

त्याची वागणूक कॉलेजच्या प्रिन्सीपॉलचे कानावर गेलेली होती. माधव हा मध्यम विद्यार्थी होता. ही व त्याची घरची स्थिति वगैरे लक्षांत घेतां तो अशा तऱ्हेनें वागावा हें त्यांस पसंत नव्हतें. त्याला उपदेश करावा असें त्यांच्या मनानें घेतलें व तेवढ्यासाठीं त्यांनीं त्याला आपल्या चेंवरमध्यें नेऊन खालीलप्रमाणें उपदेश केला.

"माधव, अलीकडे शिकण्याकडे तुझें लक्ष नाहीं असें दिसतें. व खरी स्थिति काय असावी हें तुझ्या एकंदर वागणूकीवरून स्पष्ट दिसत आहे. तूं घरचा चांगला संपन्न आहेस. तुझे वडील फार चांगले होते. त्यांचें उदाहरण

डोळ्यापुढें ठेऊन त्वां वागावेंस हें चांगलें. श्रीनिवासरावांचा मुलगा ह्मणून लोक तुला ओळखतात, तेव्हां त्यांच्या थोर नांवास काळीमा लागणार नाहीं अशा तऱ्हेनें वागणें हा तुझा धर्म–तुझें कर्तव्यकर्म आहे. गेल्या चार पांच महिन्यांतील तुझ्या वागणुकीवरून हें तुझ्याकडून होत नाहीं हें माझ्यासारख्या त्रयस्थालाच वाटतें असें नाहीं तर तुला देखील तें वाटत असलें पाहिजे. नीट विचार कर आणि आपलें आचरण सुधार. पोट भरण्यासाठींच शिकलें पाहिजे अशी तुझी स्थिति नाहीं. तुला शिकावयाचें आहे, तें तुझ्या संपत्तीला शोभा आणण्यासाठीं शिकावयाचें आहे. हल्लीं तुझें आचरण आहे तेंच पुढें चालू राहिल्यास श्रीमंत–व्यसनी श्रीमंत–ह्मणून जनता तुझ्याकडे बोट दाखवील, चांगले लोक तुला तिरस्कारानें लेखतील, कोणाच्याहि विश्वासास अगर आदरास तूं पात्र होणार नाहींस. त्यापेक्षां श्रीमंत–सुशिक्षित, नीतिमान् श्रीमंत असें ह्मणून घेणें चांगलें नाहीं का ? पुढें जगांत आपणास मानमान्यता मिळावी असें तुला वाटत नाहीं का ! जनतेच्या विश्वासास व आदरास आपण पात्र असावें असें तुला वाटत नाहीं का ! तुझ्यासारखे लोक ह्या हिंदुस्थानच्या राष्ट्रीय संपत्तीचे घटकावयव होत, व ही संपत्ति भाग न पडतां जितकी स्थिर राहील तितकी पाहिजे आहे. व्यसनांत पैशाचा अपव्यय करण्यापेक्षां चांगल्या कामीं–तुमच्या देशाची स्थिति सुधारण्याच्या कामीं–त्याचा सद्व्यय झालेला चांगला हें तर तुला समजतें ना ! असें आहे. तर त्या कामीं त्याचा व्यय होईल असें तुला करावयास नको का ! माधव, माझ्या बोलण्याचा योग्य–इच्छित–उपयोग होईल अशी मला आशा आहे. तूं अगदींच गांवढळ, अज्ञान, अक्षरशत्रु नाहींस. चांगलें व वाईट त्याच्या मधील भेद करण्याइतका तूं प्रगल्भ झालेला आहेस तेव्हां माझा उपदेश ह्मणजे आंधळ्यापुढें नाच किंवा बहिऱ्यापुढें व्याख्यान ह्याप्रमाणें होणार नाहीं अशी मला उमेद आहे. जा आतां. ’

प्रिन्सिपॉल ऐवढेंच करून थांबले नाहींत. त्यांनीं माधवाच्या घरीं त्याच्या पालनकर्त्याला–गोविंदरावाला–पत्र लिहून सर्व हकिकत कळविली व योग्य ती खबरदारी घेण्यासाठीं त्यांस आग्रहाची विनंती केली.

प्रिन्सिपॉल साहेबांच्या उपदेशाचा परिणाम माधवावर होईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं. तो अद्यापि व्यसनपंकजांत पूर्ण रुतलेला नव्हता व आपण करतों

तें वाईट अशी त्याची मनोदेवता त्याला अद्याप सांगत होती. साहेबांच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय केला. व तो त्या तयारीलाहि लागला पण हें त्याला जितकें सोपें वाटत होतें तितकें नव्हतें; याचा त्याला अनुभव येऊं लागला. त्यानें आपल्या पहिल्या मित्रमंडळीपासून होतां होईल तों दूर राहण्याचा बेत करून तो त्यांना टाळूं लागला. पण हें त्यांस साधेना ! त्याच्या पेशावर चैन मारावयास सवकलेलीं हीं कुत्रीं त्याला त्याच्या इच्छेप्रमाणें वागूं देईनात व तो जसजसा त्यांस टाळावयाचा किंवा दूर करावयाचा प्रयत्न करी तसतशी ही मंडळी त्याला जास्तच चिटकावयास लागली.

ह्या मंडळीस दूर लोटण्याचें सामर्थ्य माधवामध्यें नव्हतें. कारण तो मनाचा कमकुवत होता. आपण करीत होतों तें वाईट असें जरी त्याला वाटत होतें तरी त्यापासून अगदीं अलिप्त राहण्याइतकें किंवा त्या अनिष्ट प्रकारास दूर फेंकून देण्याइतकें त्याचें मानसिक धैर्य नव्हतें. आपण ज्या व्यसनांत सांपडलों आहोंत तीं क्रमाक्रमानें थोडीथोडी बंद करतां करतां नंतर आजिबात बंद करावींत असें त्याला वाटत असे. व त्याचा प्रत्यक्ष अनुभव येईपर्यंत तें शक्य आहे अशी त्याची समजूत होती.

पण ही त्याची समजूत चुकीची होती. व्यसनांत सांपडलेला मनुष्य अशा तऱ्हेच्या समजुतींनीं त्यापासून जितका दूर रहाण्याचा प्रयत्न करीत असतो तितका कांहीं कालपर्यंत जरी तो दूर होत असला तरी खरोखरीचा तो त्यापासून दूर होत नाहीं. अशा तऱ्हेनें दूर होण्याचे त्याचे जे प्रयत्न असतात तेहि विशेष महत्वाचे किंवा फलदायी नसतात. अमक्याच्या संगतीनें मी विघडलों तेव्हां त्याची संगत सोडावी ह्मणजे मी सुधारीन ही जी त्याची समजूत झालेली असते तीच मुळीं कोती व भ्रामक असते. तो त्या मनुष्याची संगत सोडतो पण त्याला खरी व्यसनाधीन करणारी स्वतःच्या मनाची प्रवृत्ती त्याला दाबता येत नाहीं, किंवा तो दाबत जरी असला तरी जितक्या नेटानें ती दाबावयास पाहिजे असते तितक्या नेटानें ती दाबत नसल्यानें ती दाबली जात नाहीं, व कांहीं वेळानें ती पुन्हां उचल खावयास लागते.

अशीच कांहीं अंशीं माधवाची स्थिति होती असें ह्मणावयास हरकत नाहीं. आपल्या व्यसनी वागणुकीचें खापर तो आपल्या कमकुवत मनावर फोडण्यास तयार

नसून तें त्यानें आपल्या मित्रमंडळीचें माथीं फोडिलें होते, व ह्यांची एकदांची संगत सुटली ह्मणजे आपण चांगले होऊं असें त्यास वाटत असे. त्यांची संगत सोडण्यास काय उपाय योजावेत याचा तो विचार करीत असे. अशा तऱ्हेची स्थिति असतां त्याच्या पालनकर्त्याचें–गोविंदरावचें त्याला खालील पत्र आलें.

" चिरंजीव राजश्री माधवराव यांसी—अनेक आशीर्वाद विशेष–सोबत आपल्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉलचें आलेलें पत्र पाठविलें आहे, त्यावरून हें पत्र काय उद्देशानें लिहिलें आहे हें समजेलच ! आपण सुज्ञ आहांत. आपल्या वडिलांच्या थोर आयुष्याचा आपणापुढें दाखला आहे. तेव्हां आपण कसें वागावें हें मी आपणांस लिहावयास पाहिजे असें नाहीं. विषाचें रोपडे तें लहान आहे तोंवरच उपटून टाकतां येत असतें त्याचा एकदां वृक्ष झाला ह्मणजे त्याचा समूळ नायनाट करणें शक्य नसतें हें ध्यानीं घेऊन आपण आपली वागणूक सुधारावी. तेथें राहून तें आपणांस साधेल असें वाटत नसल्यास आपण येथें यावें. पत्राचें उत्तर लवकर पाठवावें. कळावें हें आशीर्वाद.

आपला हितचिंतक,
गोविंदराव."

पत्र वाचून माधव खिन्न झाला. आपल्या घरीं आपल्या पालनकर्त्यांस ही गोष्ट समजली हें त्यास बरें वाटलें नाहीं. पण आतां काय ! झाल्या गोष्टीस इलाज नव्हता. पुढें कसें करावयाचें हा प्रश्न त्याच्यापुढें उभा राहिला. आपल्या अयोग्य मित्रमंडळीची संगत त्याला सोडावयाची होती व तेवढ्यासाठीं गोविंदरावाच्या पत्राप्रमाणें यवतमाळास जाणें हें श्रेयस्कर असें त्यास वाटूं लागलें. पण आपली वागणूक त्यांना कळली असल्याकारणानें तेथें जाण्यास त्यांचें मन घेईना. यवतमाळास न जातां दुसरीकडे कोठें तरी जावें असें त्याच्या मनांत येई पण तसेंहि करण्यास त्याचें मन धजेना. शिवाय आपण दुसरीकडे जातों असें झटलें तर गोविंदराव परवानगी देतील कीं नाहीं याची शंका होती.

त्यानें पुष्कळ विचार केला व अखेरीस यवतमाळासच जाणें चांगलें असें ठरवून लागलीच त्यानें तो बेत अमलांतहि आणला.

यवतमाळला आल्यावर त्याला एकतऱ्हेचें समाधान वाटूं लागलें होतें. एखाद्या संकटातून 'सुटलों अगर बचावलों' ह्यानें जें समाधान किंवा सुख वाटत

असतें तशा तऱ्हेचें त्याचें तें समाधान होतें. ह्याच समाधानांत गोविंदरावाच्या प्रेमळ उपदेशाची भर पडून त्याच्या मनाची वृत्ति आनंदी बनून गेली होती. आपल्या वडिलांप्रमाणें आपण चांगले वागूं अशी तो इच्छा धरूं लागला परंतु त्याप्रमाणें वागण्याचें त्याच्या हातून अद्यापि होत नव्हतें.

त्याची वृत्ति चैनी होती ह्मणून मागें सांगितलेंच आहे. पावसाळ्यांत मुबलक मिळणाऱ्या जलानें एखादा निःशब्द लहानसा ओढा मोठ्या नदीस आपल्या भीषण ओघनादानें जसा मागें सारित असतो व तो पावसाळा व त्याचा तो जलवर्षाव नाहींसा झाल्यावर जसा तो ओढा पुन्हां पूर्ववत् निःशब्द बनतो त्याप्रमाणें–माधवाची यवतमाळास आल्यावर तेथें कांहीं दिवस गेल्यानंतर स्थिति झाली होती. प्रिन्सिपॉलच्या व गोविंदरावांच्या उपदेशानें त्याच्या मनोवृत्ति क्षुब्ध होऊन मी असें करीन, मी तसें करीन असें जें तो ह्मणत होता किंवा त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें होतें तें गेलें. कांहीं दिवस त्याला पुन्हां कोणीं उपदेशामृत न पाजल्यामुळें किंवा त्याच्या जबाबदारीचें त्यास महत्त्व न भासविल्यानें पार नाहींसें होऊन, त्याची चैनी वृत्ति पुन्हां उचंबळूं लागली. शिक्षणाची त्याला पहिल्यापासून विशेष गोडी नव्हती किंवा त्याची महती जाणण्याचीहि त्यास जरुरी वाटत नव्हती. तेव्हां आपला काल विद्याव्यासंगांत जावा असें त्याला वाटणें शक्य नव्हतें. ह्यामुळें त्याचा तेथील वेळ त्याला कंटाळवाणा होऊं लागला व तो वेळ कशा तऱ्हेनें घालवावा हें त्याला समजेनासें झालें. निद्रा किंवा अवांतर गप्पा गोष्टी ह्यांच्यांत जरी तो आपला वेळ सध्यां घालवित असे तरी नाइलाजामुळें तो त्याला तसा घालवावा लागत असे, व त्यापासून त्याला व्हावा तितका आनंद होत नसे कीं सुखहि वाटत नसे. नागपुरसारखे रंगेल मित्र त्याला तेथें मिळणें शक्य नव्हतें, व यदाकदाचित् जरी मिळाले असते तरी आपल्याच गावीं तशा तऱ्हेच्या मंडळींत मिसळण्याइतकी त्याची मानसिक अधोगति झालेली नव्हती. शिवाय गोविंदरावाचा त्याला थोडासा वचक वाटत असे.

असें जरी होतें तरी त्याच्या कंटाळणाऱ्या मनास आल्हाद देणारी तेथें एक दिव्यशक्ति होतीच, आणि तिच्या सान्निध्यांत किंवा चिंतनांत त्याला आनंद वाटत असे.

प्रकरण ३ रें.

दिव्यशक्ति कोणची ?

त्या कंटाळवाण्या मानसिक स्थितींत देखील माधवास आनंद देणारी दिव्यशक्ति होती आणि ती कोण ह्मणाल तर त्याच्या पालनकर्त्या गोविंदरावांची मुलगी लक्ष्मी ही होय !

ह्यावेळीं लक्ष्मीचें वय १४ व १५ चे दरम्यान असून सुगंधित पुष्पाच्या मुग्ध पण उमलणाऱ्या मोहक कलिकेप्रमाणें तिची स्थिति होती. कलिकेस आपल्या भावी रमणीय स्थितीचें जसें ज्ञान नसतें तसेंच तिलाहि तिच्या भावी रमणीय स्थितीचें ज्ञान नव्हतें; पूर्ण विकासानंतर येणाऱ्या रमणीत्वाचें पूर्ण स्वरूप जसें मोहक असतें तसेंच लक्ष्मीचेंहि तें होतें व विकासानंतर अंगीं येणाऱ्या विनय, शालीनता वगैरे गुणांच्या अभावाची मुग्धकलिका जशी अल्लड व स्वच्छंदी असते तशीच लक्ष्मीहि अल्लड व स्वच्छंदी होती.

लक्ष्मी खरोखरीच लक्ष्मी होती. लक्ष्मीसारखी मुलगी तेवढ्या टापूंत नव्हती. तिचें बहुतेक बाळपण जरी खेड्यांत गेलेलें होतें तरी इतर मुलींप्रमाणें ती खेडवळ किंवा अक्षरशत्रु नव्हती. श्रीनिवासरावांनीं तिला माधवाबरोबर मराठी व थोडें इंग्रजीहि शिकविलें होतें. तिला वाचण्याचा फार नाद असे व घरीं येणारी वर्तमानपत्रें व मासिकें ती मोठ्या आवडीनें वाचीत असे. वाचनानें तिच्या ज्ञानाचा सांठा वाढलेला होता व तिचे विचारहि प्रगल्भ झालेले होते, आणि त्या विचारांचें तिच्या आचरणांत नेहेमीं प्रत्यंतर दिसून येत असे.

अंतःशुद्धीच्या मोहकतेप्रमाणें तिची देहयष्टी व शरीरकांतीहि मोहक होती. निष्काम शिशुपणाचा त्याग करून यौवनदशा ती नुकतीच आक्रमावयास लागली असल्यानें आधींच्याच तिच्या केतकी कांतीवर यौवनाच्या तजेल्याची भर पडत चालली असून त्यानें तिचें सौंदर्य चंद्रकलेप्रमाणें सारखें वाढत चाललें होतें. तिचा बांधा गोंडस असून अवयव रेखीव होते. हें सर्व असल्यावर नरवर्गास

मोहिनी घालणारें दुसरें स्त्रीसौंदर्य तें कोणतें ? माधव तर बोलून चालून वीस वर्षांचा अल्लड व प्रणयलालसेनें वेडावलेला तरुण ! व लक्ष्मीच्या सौंदर्यास मोहून संसारयात्रा करावी तर हिच्याच बरोबर असें त्यास वाटावें यांत नवल तें कसलें !

लक्ष्मीच्या नैसर्गिक सौंदर्यानें व मुग्ध यौवनविकासानें त्याला चांगलीच भुरळ घातली असून हा जसजसा जास्त मोहावत चालला तसतशी लोहचुंबकाकडे आकर्षिल्या जाणाऱ्या जड लोहगोळ्याप्रमाणें त्याची स्थिति होऊं लागली. तिचें रमणीय मुखकमल दृष्टीस पडावें व तिच्या कर्णमधुर भाषणाचे मंजुळ स्वर कानीं पडावे व तेवढ्यासाठीं तिच्या सान्निध्यांत नेहमीं असावें असें त्यास वाटत असे. पण हें सर्व करणें त्याला शक्य कोठें होतें ? कोणी पाहील का ही धास्ती त्याच्या मनांत येऊन तसें करावयास तो धजत नसे.

शिवाय आपली नागपुरची स्थिति तिला कळली असेल का हीहि शंका त्याच्या मनांत येत असे. ती जर तिला कळली असेल तर तिचें मन आपणाकडे ओढेल असें त्यास वाटत नसे. कारण त्याला तिच्या स्वभावाची वगैरे पूर्ण माहिती झालेली होती. निव्वळ संपत्तीला भुलून ती आपणाला माळ घालील हें त्याला शक्य दिसत नव्हतें. ह्या सर्व अडचणी जरी त्याच्यापुढें उभ्या रहात असत व एखादेवेळीं लक्ष्मीची अपेक्षा करणें व्यर्थ होय असें जरी त्याला वाटे तरी त्याचें मन त्याच्या ताब्यांत रहात नसे व ह्या अडचणीहि लक्षांत घ्याव्या असें तें त्याला सांगत नसे. ह्याप्रमाणें त्याचें आशाळू मन त्याला आशाखोर बनवावयाला लागलें म्हणजे लक्ष्मीच्या लग्नासंबंधानें त्याच्या वडिलांनीं आपल्या मृत्युपत्रांत घालून ठेविलेल्या अटींचेंहि त्याला विस्मरण पडत असे.

तो दिवसेंदिवस जास्त आशाखोर बनत चालला असून तिच्याजवळ प्रेमयाचना करावी असेंहि आतांशीं त्याच्या मनांत येऊं लागलें होतें. आपल्या इकडील प्रचलित समाजपद्धतीला धरून हा मार्ग नाहीं असें जरी त्याला ठाऊक होतें तरी सर्व परिस्थितीचा विचार करतां त्याच मार्गाचें अवलंबन करावें हें योग्य व श्रेयस्कर असें त्याला वाटलें व त्याप्रमाणें करण्याचा बेत ठरवून योग्य संधीची तो वाट पाहूं लागला.

सूर्यास्ताची वेळ. तप्त लोहगोलाप्रमाणें दिसणारें आरक्त सूर्यबिंब व सभोंवार पसरलेली त्याची ती प्रभा किती तरी रमणीय व मोहक दिसत होती !

बंगल्याच्या मागील बगीच्यांतील लतामंडपांत बसून लक्ष्मी ती शोभा पहाण्यांत गुंग झालेली होती. ह्यावेळीं ती काळी चंद्रकळा नेसली असून तिनें तर ती फारच खुलून दिसत होती. सूर्यास्त समयींच्या मनास आल्हाद देणाऱ्या ह्या सृष्टि शोभावलोकनांत लक्ष्मी दंग झाली असून आपल्याशींच ईश्वरकृतिकौतुक खालील पद ती गुणगुणत होती.

आनंदें खुलली, सृष्टि ही, आनंदें खुलली,
या वसंतकालीं खालीं, वरतीं, मनीं, फुलें फुललीं ! ॥ ध्रु० ॥
तरुवल्ली भरली वनींवनिं, तरुवल्ली भरलीं,
फल-पुष्प-दलीं; ती वेळ जयांची दैन्याची सरली !
खग वातपथांमधिं गात फिरति ते गगनीं,
रस पीयूषासम मधुर कोकिला-कवनीं !
नच मयूर, नाचुनि भूषविती सुर अवनी !
पवनें तनु शमली, सुगंधित, पवनें तनु शमली,
तीं अन्य सुखें या सौख्यापुढतीं सकल तुच्छ गमली ! ॥ १ ॥
निशावधू नटली, मनोहर, निशावधू नटली,
विधुरमणागमनीं प्रेमगान निजवदनीं पुटपुटली !
नच शुक्र, कोहिनुर रत्न विलसतें भाळीं !
उडुजडित शिरींचा टोप किरणहि ढाळी !
पट-धवल चंद्रिका वपू शोभवी काळी !
विलासांत रमली, प्रियासह विलासांत रमली,
मृदु-हास्य प्रणयिप्रणयिनींचिया उमटे मुखकमलीं ! ॥ २ ॥

शांत व शीतल वायुलहरी बरोबर तिच्या कर्णमधुर आलापांचें उत्कृष्ट मिलन झालें असून तिची वृत्ति पूर्ण आनंदी बनून गेलेली होती. व ह्या आनंदाच्या भरांत तिच्या गायनांतील संकोच नाहींसा होऊन तें स्वैर संचार करावयास लागलें होतें.

सांवलीप्रमाणें तिच्या पाळतीवर असलेल्या माधवाचे कानीं तें जातांच तो

---

१ पद-चाल—तरुण कुलीन गोरा.

लक्ष देऊन ऐकूं लागला. तो ह्यावेळीं बंगल्याच्या वाजूच्या सज्जांत उभा होता. तिच्या गानरवानें तो जास्तीच मोहाबला व तिची एकदां भेट घेऊन आपला मनोदय तिला कळवावा ह्या हेतूनें ती होती तेथें तो आला.

इतक्यांत लक्ष्मीला कसलीशी आठवण झाली व घाईनें उठून ती घराकडे येण्यास निघाली. पण ह्या धांदलींत तिचा पदर वेलास अडकून सपशेल बाजूला झाला व तिचें उन्नत वक्षस्थल, तिचें सौंदर्य पहाण्यांत अगोदरच दंग असलेल्या माधवाचे दृष्टीस पडलें. पदर सोडवून तो ती सांवरून घेईपर्यंत माधवाची कामी दृष्टि तिकडे अचल होती.

पदर सोडवून सांवरून घेतल्यावर ती घराकडे येण्यास निघाली तों समोर माधवास पहातांच ती लाजली.

'लक्ष्मी !' तिच्या खांद्यावर हात टाकून माधव ह्मणाला.

'माधवराव !' खांद्यावरचा हात सारून मागें वळत ती ह्मणाली. नैसर्गिक लज्जेनें तिच्यावर आपला पगडा बसविला.

'लक्ष्मी !' भांवावलेल्या माधवाचे तोंडांतून जास्ती शब्दच निघेनात ! पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. मनांत असणाऱ्या त्याच्या विचारांस अखेरीस शब्दद्वार सांपडलें.

"लक्ष्मी, माझ्या हृदयांत खळबळ उडवून देणारे व मला आनंदित करणारे विकार तुला समजत नाहीं कां !" तिच्याकडे टक लावून पहात तो ह्मणाला.

माधवाच्या बोलण्यानें व टक लावून पहाण्यानें तर तिच्या गोंधळलेल्या स्थितींत जास्तीच भर पडली व आपल्या पायांकडे पहात ती अचल उभी राहिली.

तिच्या मुग्धतेचा परिणाम माधवाची आशा दुणावण्यांत झाला. आपलें ह्मणणें तिला समजलें असून स्त्रीस्वभावानुरूप स्पष्ट बोलण्याचें तिला धाडस होत नाहीं, ह्या कल्पनेनें आनंदावलेल्या माधवानें तोच प्रश्न तिला पुन्हां केला व पुन्हां तिच्या खांद्यावर हात टाकला.

"माधवराव, कुमारिकेला ह्याप्रमाणें स्पर्श करणें आपणांस योग्य दिसतें कां ?" त्याचा हात झिडकरित ती ह्मणाली.

आपलें आरक्त होत असलेलें मुखकमल तिनें अद्यापि वर केलें नव्हतें.

'लक्ष्मी, तूं कुमारिका खरी पण बालिका मात्र नव्हेस. तूं... " तिनें आपलें मुखकमल वर केलें. तें रागानें आरक्त झालेलें होतें.

"तूं आपणांस अद्यापि बालपणांतील निर्विकार बालिकाच समजतेस काय ! लक्ष्मी, तुझें हें सौंदर्य व यौवन तुझ्या व माझ्या यौवनदशेला कामपिडीत नाहीं का करित ! असें उगीच डोळ्यावरून पांघरुण कां घेतेस ! तुझ्या सोबतिनें संसारयात्रा आनंदानें व सुखानें क्रमण्याचा माझा मनोदय तुला नाहीं कां समजत ! लक्ष्मी ! बोल ! ! ह्यांतच माझें सर्व सौख्य सांठवून ठेविलें आहे. लक्ष्मीपती आहे तरी मला खरोखरीचा लक्ष्मीपती करून सुखी करणें, लक्ष्मी ! सर्वस्वी तुझ्या स्वाधीन आहे ! "

तिची क्रुद्ध मुद्रा जरा शांत झाल्यासारखी दिसत होती, तरी तिनें माधवास कांहींच उत्तर दिलें नाहीं.

" बोल ! लक्ष्मी ! ! बोल, मला एकदां सोक्ष मोक्ष कळूं दे ! ! ! तुझ्या स्तब्धतेवरून मला सुखी करण्याचा....."

" नाहीं, माधवराव असें मात्र समजूं नका–" लक्ष्मी एकदम ह्मणाली.

" मग काय तूं माझा अव्हेर करणार ? " घोर निराशेनें तो ह्मणाला.

" असें देखील समजूं नका." अडखळत तिनें उत्तर दिलें.

थोडावेळ तीं दोघेंहि स्तब्ध होतीं.

" आपण ह्मणतां त्याप्रमाणें मी इतक्यांतच संसारी व्हावें असें मला वाटत नाहीं " ती पुढें ह्मणाली.

"तर माझ्या आशेला अद्यापि जागा आहे ह्मणावयाची ! तुझा होकार असला ह्मणजे झालें, मग तूं सांगशील तेव्हां आपण लग्न करूं."

" तें मी कसें सांगणार, व लग्न ह्मणजे काय याची मला कल्पना देखील नसतांना आपणास मी होकार तो कसला देणार ? "

" काय ! अद्यापि लग्नकल्पना तुझ्या मनाला शिवली नाहीं ? वयपरत्वें येणाऱ्या तारुण्यानें व तज्जन्य कामबोधानें तुला कोणावरहि प्रेम करावयास शिकविलें नाहीं. मला तर हें गूढ दिसतें ! कां, मला कोणी प्रतिस्पर्धी आहे ? लक्ष्मी, आपला प्रेमसांठा तूं कोणासाठीं सांठवून तर ठेवित नाहींस ना ? बोल !

बोल ! ! मला एकदां तुझा मनोदय कळूं दे ! " हताश स्थितींत तो कांहीं तरी वरळला.

त्याला उत्तर द्यावें असें तिला वाटेना.

तिची मुग्धता पाहून आपणांस कोणीतरी प्रतिस्पर्धी असावा अशी पुसट कल्पना त्याच्या डोक्यांत आली पण ती जोरावण्यापूर्वी 'आपले नागपुरचे ढंग हिला कळले असतील व त्यामुळेंच आपल्या प्रेमाविषयीं साशंक होऊन ही स्पष्ट बोलत नसेल' हाहि विचार त्याच्या मनांत आला व ह्याच विचाराला प्राधान्य मिळून त्याला आपल्या भावी वर्तणुकीबद्दल आश्वासन द्यावें असें वाटून तो ह्मणाला—

"लक्ष्मी, माझ्या अनीतिमान् वर्तणुकीवरून तर तूं मला धिःकारित नाहींसना। नागपुरास असतांना वाईट मंडळीच्या नादीं लागून मी बिघडलों होतों खरा. पण आतां पुढें मी तसा बिघडणार नाहीं, याची मला खात्री आहे. आणि तेवढ्यापासूनच जर माझ्या प्रेमाबद्दल—माझ्या प्रेमाच्या अचलत्वाबद्दल तूं साशंक झाली असशील तर मी तुला खात्रीनें—नव्हे शपथ घेऊन सांगतों कीं, माझें प्रेम अचल राहिल. मी कधींहि तुझा विश्वासघात करणार नाहीं. "

बोलण्याच्या भरांत आपण काय बोलतों, कोणासमोर बोलतों व तें बोलणें वाजवी आहे कीं, नाहीं [illegible] ध्यानांत घेण्याचें त्याला भान राहिलें नाहीं.

तो आपल्या उत्तराकडे [illegible]च्या तोंडाकडे मोठ्या आतुरतेनें पहात होता.

त्याला काय उत्तर द्यावें हें तिला समजेना, तेव्हां कांहीं तरी उत्तर देण्याच्या हेतूनें ती ह्मणाली—

" माधवराव मी [illegible] सांगणार ! मला कांहीं समजत नाहीं ! "

इतक्यांत तिला घरांतून कोणीशी हांक मारली, व ती ऐकतांच ती जाण्यास निघाली.

आपणांस कांहीं देखील न सांगतां ती जाणार हा विचार माधवरावाच्या मनांत येतांच त्याची वृत्ती बदलली. तिला स्पष्ट विचारावें असा विचार त्याच्या मनांत आला तर लागलीच त्याची अप्रयोजकता त्याला दिसूं लागली. ती आपणांवर अनुरक्त जरी नसली तरी आपण आपलें प्रेम अर्पण केल्यास त्याचा ती अनादर करणार नाहीं अशीहि कल्पना त्याच्या डोक्यांत आली; व तिनें आतां सांगितल्याप्रमाणें कदाचित् स्त्रीस्वभावांतील लज्जेच्या अतिरेकामुळें आप-

णांस स्पष्टपणें सांगण्यास ती लाजत असेल असें त्यास वाटूं लागलें. व हा आपला तर्क खरा असावा अशी त्याची खात्री होऊं लागली व त्या भरांत कामानलानें भडकलेलें आपलें शरीर व मन तिच्या शीतल देहस्पर्शानें व अमृतमय अधर प्राशनानें शांत करावें असें वाटून त्यानें तसा प्रयत्नहि केला. आणि तेवढ्यासाठीं तिला तो कवटाळूं पहात असतां त्याला जोराचा हिसका देऊन व धिःकाराच्या तिरस्करणीय दृष्टीनें त्याचेकडे रागानें पहात ती तेथून दूर सरली.

"माधवराव, आजपर्यंत माझे भाऊ ह्मणून जे होतां ते आपणच का! बावांनीं (श्रीनिवासरावांनीं) मरतांना भाऊ ह्मणून ज्यांच्या पदरांत मला घालून माझ्या कल्याणाची काळजी वहावयास ज्यांस सांगितलें ते आपणच ना? कां दुसरे कोणी अहां! कां त्यांच्या मरणापासून आपणांत फरक पडला आहे? बाबांची समजूत खोटी-या आपल्या वर्तनानें तुह्मी अखेर खोटी ठरविलींत ना! इतके दिवस वाडीला लावलेलें भाऊ-बहिणीचें प्रेम यापुढें तुह्मीं निराळ्या थरावर नेऊं पहातां, पण तें तसें जाईल कसें! नाहीं! तसें होण्यापेक्षां तें जागचें जागीं जिरलेलें काय वाईट! आणि हो तें तसें नाहींसेंच झालें पाहिजे. कारण यापुढें तुमच्या सारख्याची बहिण-नुसती बहिण देखील ह्मणवून घेण्यास मी तयार नाहीं समजलांत?"

कडकडणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें एवढें बोलून विद्युद्वेगानें ती तेथून चालती झाली.

उभा होता तेथेंच एखाद्या निर्जीव पुतळ्याप्रमाणें घडलेल्या प्रकारानें विस्मय चकित होऊन माधव उभा राहिला. आपण कोणच्या उद्देशानें येथें आलों, त्याचा परिणाम काय झाला व तो कसा झाला याची जुळवा जुळव तो करूं पहात होता.

ह्यावेळीं दिनमणी अस्तास गेला असून त्याच्यामागून लय पावणारा संधिप्रकाशहि मावळत चालला होता. संध्यासमयींचा शीतल वायुप्रवाह हळूहळू वहावयास लागला असून त्याच्या झुळुकींनीं माधवाचा त्रस्त मेंदु शांत होत होता. हळूहळू काय झालें याची त्याला आठवण होऊं लागली. त्याच्या हातून घडलेल्या नीच प्रकाराची जशी त्याला स्पष्टपणें ओळख पटूं लागली तसें त्याचें विचारी मन त्याला खाऊं लागलें व त्याचें मस्तक पुन्हां भणभणूं लागलें.

आपण केलें तें वाईट, आतां त्याचें क्षालन कसें करावें वगैरे अनेक तऱ्हेचे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. पण डोकें शांत नसल्याकारणानें त्याचें योग्य मनन त्याच्याकडून होईना.

भ्रांतचित्तानें तो तेथून घरांत आला व आपल्या खोलींत जाऊन पडला. तेथें विचार करतां करतां त्याचा डोळा लागला व तेवढ्यांत त्याला एक स्वप्न पडलें. त्याला पडलेलें स्वप्न आनंदपर्यवसायी होतें. स्वेच्छेनें जलविहार करण्यासाठीं एका खोल डोहांत त्यानें उडी घेतली असून त्यांत तो पोहत असतां आपण आंत चाललों आहों असें त्यास वाटूं लागलें. आणि किनाऱ्यावर येण्याची तो धडपड करूं लागला. पण तेवढ्यासाठीं तो जों जों प्रयत्न करी तों तों तीराकडे जाण्याऐवजीं आपले पाय धरून आपणांस कोणी मध्यांत ओढून नेत आहे असें त्याला वाटलें. त्यानें पराकाष्ठा केली पण अज्ञ राहून त्याला जलसमाधी देण्याच्या तयारींत असलेल्या त्याच्या शत्रूपुढें त्याचें कांहीं चालेना. अखेरीस हतवीर्य होऊन नशीवावर त्यानें हवाला टाकला. इतक्यांत एकाएकीं कसलासा भयंकर आवाज होऊन त्याला आंत ओढूं पहाणारी शक्ति नष्ट झाली व जवळच कोणी फेंकलेल्या दोरीस धरतांच त्याला किनाऱ्यावर ओढून काढलें.

पुढचें स्वप्न पहाण्यापूर्वी किंवा आपणांस कोणी वांचविलें हें समजण्यापूर्वीच तो जागा झाला, व त्या स्वप्नाचा विचार करूं लागला. पण त्या विचारानें त्याला त्या स्वप्नाचा कांहीं अर्थबोध होईना.

जागृतावस्था आल्यावर पुन्हां त्याच्या मनांत पहिले विचार आले. लक्ष्मीचा आपण अक्षम्य अपराध केला असून त्याबद्दल तिची आपण माफी मागितली पाहिजे असें त्याच्या मनानें घेतलें. माफी मागितली नाहीं किंवा आपण जें कांहीं केलें त्याबद्दल आपणांस वाईट वाटत नाहीं असें जर आपण तिला दर्शविलें नाहीं तर आपणाबद्दल तिचा काय ग्रह होईल हीच कल्पना ह्या माफी मागण्याच्या विचाराच्या मुळाशीं होती. आमच्याच घरांत आपल्या आश्रयानें रहाऱ्या मुलीच्या मनांत आपण वाईट, अनीतिमान् आहों अशी कल्पना राहूं देणें त्याला इष्ट वाटत नव्हतें. त्याला तें असह्य वाटत होतें. तो मनाचा थोर होता म्हणूनच त्याच्या डोक्यांत हे विचार चालले होते. तिच्याजवळ क्षमा


मागण्यांत आपला कमीपणा आहे ही कल्पना देखील त्याला शिवली नाहीं. असो.

त्याच रात्रीं निजानिज होण्याच्या आधीं योग्य संधी साधून त्यानें तिच्याजवळ क्षमेची याचना केली. तो ह्मणाला.

"लक्ष्मी, माझे लाडके ताई, मला तूं क्षमा नाहीं का करणार? भलत्याच वाईट भावनेनें वेडावून जाऊन मी तुझ्याशीं जे अनुचित आचरण केलें, व तुझ्या कोवळ्या मनाला–तुझ्या शुद्ध प्रेमाला जो कलंक लावला त्याबद्दल मला फार वाईट वाटत आहे. मला मेल्यापेक्षां मेलेलें वाटत आहे. 'क्षमा केली' असे तुझे शब्द ऐकेपर्यंत मला चैन पडावयाचें नाहीं. मला जीवित गोड वाटावयाचें नाहीं....."


तो आणखी पुढें किती तरी बोलत होताच. त्याच्या ह्या अनुतापाची लक्ष्मीला शंका वाटत होती, व तेवढ्या मुळेंच त्याच्या बोलण्याकडे तिचें लक्ष नव्हतें किंवा त्याच्या बोलण्याचा तिच्यावर परिणाम होत नव्हता. असें जरी होतें तरी ती मनाची थोर होती. माधवास पुन्हां दुखवावें असें तिला वाटेना. ती ह्मणाली—

"माधवराव–दादा, इतकें झालें तें झालें. तुह्माला जर खरोखरच पश्चात्ताप होत असेल तर ह्यापुढें आपलें आचरण सुधारा व मला तुह्मांला 'दादा' ह्मटल्याबद्दल, पुन्हां खेद करावा लागणार नाहीं अशा तऱ्हेनें वागा."



प्रकरण ४ थें.

चहा घेतल्यानंतर.



माधवरावच्या ह्मणण्याला मान देऊन विनायक व भालचंद्र चहापान करण्यासाठीं त्याच्यावरोबर आंत आले, त्यावेळीं माधवासंबंधीं त्यांच्या मनांत कांहीं बेत ठरलेला असून त्या बेताप्रमाणें माधवाजवळ गोष्ट काढण्याचाहि त्यांचा विचार ठरला होता. व ह्याचें सूचक असेंच त्याचें त्याला पाहिल्या नंतरचे, एकमेकांकडचें वघणें होतें.

विनायक व माधव ह्यांची मैत्री फार जुनी होती. भालचंद्राचें तसें नव्हतें. तो यवतमाळास आल्यानंतर त्याची माधवाशीं ओळख झाली होती व विशेष सलगीनें तो माधवाशीं बोलेल हें शक्य नव्हतें, ह्मणून चहा घेतल्यानंतर विनायकानेंच प्रथम बोलण्यास सुरवात केली.

"माधव, तुझी व माझी पुष्कळ दिवसांची मैत्री आहे ह्मणून तुला कांहीं विचारावेंसें मला वाटतें."

भालचंद्र जागेवरून उठला व त्यांच्या हितगुजांत आपण नसणें चांगलें हें माधवास दाखविण्यासाठीं तो तेथून जाण्याच्या तयारीनें ह्मणाला—

"माधवराव, तुह्मीं व विनायक आतां बरेंच वेळ बोलत वसालसें दिसतें. मला कांहीं काम असल्यानें फार वेळ थांबता येत नाहीं तेव्हां मी जातों म्हणतों"

"बैसरे, मोठा आला आहे कामाचा ! शिवाय तूं येथें असावेंस अशी माझी इच्छा आहे" त्याला हाताला धरून खालीं बसवित विनायक ह्मणाला.

"बसाना जरा, जाल मग सावकाश" असें ओधानेंच माधवास त्याला ह्मणावें लागलें.

विनायक काय विचारणार याची माधवाला कल्पनाहि नव्हती, तरी पण

त्याच्या गंभीर चेहऱ्याकडे पाहून तें कांहीं विशेष स्वरूपाचें असावें असें त्याला वाटलें.

"माधव, भालचंद्र हा माझ्या चांगल्या मित्रांपैकीं एक आहे तेव्हां त्यानें येथें आपलें बोलणें होईपर्यंत असावें असें मला वाटणें साहजिक आहे, परंतु मी जें तुला विचारणार आहें तें तुझ्याच संबंधाचें असल्यामुळें त्याच्या येथें असण्यापासून तुला विषाद तर नाहींना वाटावयाचा ? आणि तसें असल्यास त्यानें येथें बसावें असाच माझा आग्रह नाहीं. "

" विनायक, भालचंद्रराव तुझे मित्र आहेत तसेच माझेहि आजपासून मित्र होतील.ते येथें असल्यानें मला कांहीं वाईट वाटणार नाहीं.खरेंना भालचंद्रराव ?" माधव ह्मणाला.

भालचंद्राला तेथें बसावयास व माधवाचे मित्र होण्यास पाहिजेच होतें.

" तुमची तशी इच्छा असेल तर माझी मैत्री आपल्या सेवेला हजर आहे."

हंसत पण गंभीरतेनें तो ह्मणाला.

" माधव माझ्या बोलण्याचा राग मानूं नको. मी खऱ्या कळकळ्यानें तुला विचारित आहें. नागपुराहून तूं येथें कां आलास या संबंधानें मी ऐकिलें तें खरें कां ? "

आपणाबद्दल तो कांहीं तरी विचारणार आहे हें जरी त्याला समजलें होतें तरी तें अशा स्वरूपाचें असेल ही माधवाला कल्पना देखील नव्हती ह्मणून त्याचा प्रश्न ऐकल्याबरोबर त्याचें तोंड एकदम उतरलें. हा वेळपर्यंत आनंदांत असलेलें त्याचें मन खिन्न झालें व त्याला उत्तर देण्याऐवजीं तो खालीं मान घालून बसला.

" माधव, तुला वाईट वाटावें ह्मणून मी बोललों नाहीं. " त्याचे शब्द ऐकून तो एकदम ह्मणाला.

" विनायक, वाईट वाटत असलें तरी आतां त्याचा काय उपयोग ? जी गोष्ट होऊं नये ती झाली, पण ती झाली आणि तें मला कबूल करणें भाग पडतें एवढेंच त्याच्यांत वाईट आहे. "

त्याच्या बोलण्यावरून त्याला पुरा पश्चात्ताप झालेला आहे हें उघड दिसत होतें. पण पश्चात्तापानंतरच्या जागृतीनें चांगल्या गोष्टी करून आपल्या वाइ-

टावर तो पांघरूण घालण्यास तयार आहे कां येवढेंच त्या दोघांना बघावयाचें होतें.

पश्चात्तापानंतर जागृति ही येते. पण त्या जागृतीनें तो मनुष्य अर्धवट असल्यास चांगला जागा होत नाहीं; किंवा कोणती चांगलीं कृत्यें करून आपली मागची वागणूक बुजवून टाकावी हें त्याला नीट समजत नाहीं.

अशीच स्थिति माधवाची होती. त्याला पश्चात्ताप झाला होता म्हणूनच तो नागपूराहून निघून आला होता. पण तेथून आल्यानंतर पुढें कशातऱ्हेनें वागावयाचें हें त्याला समजलें नव्हतें. हें जर त्याला समजलें असतें तर लक्ष्मीशीं केलेला वाष्कळपणा त्याच्या हातून कधींच घडला नसता. असो.

" ह्याच्यांत वाईट तें कसलें ! झालेला गुन्हा कबूल करण्यांतच मोठेपणा असतो, व हें त्याचें मोठेपण सत्याच्या दृष्टीचें नसतें तर पुन्हां तशी कृति आपल्या हातून होऊं नये म्हणून वरचेवर कबूलीनें त्याची आठवण करण्यामध्यें असते. मग ही कबूली दुसऱ्याजवळ केली काय आणि स्वतःजवळ केली काय एकच ! दोषास मनुष्य हा नेहमीं पात्र असतोच. म्हणून तेवढ्यासाठीं नेहेमीं दोष करणें मात्र चांगलें नव्हे ह्याची मनाशीं खुणगांठ घालून एखादे वेळेस दोष घडला तर त्याचें क्षालन करण्यास मनुष्यानें नेहेमीं तयार असलें पाहिजे. दोषाचें क्षालन पुन्हां न करण्यानें होत असतें किंवा त्या दोषाविरुद्ध चांगल्या गोष्टी करण्यानें होत असतें ? माधव, अशा तऱ्हेनें तूं सध्यां वागत असल्यास मी अगर कोणीहि सुज्ञ मनुष्य तुला दोष देणार नाहीं किंवा तुझा तिरस्कार करणार नाहीं. "

त्याच्या बोलण्याप्रमाणें आपल्या हातून घडलें नव्हतें हें माधवास ठाऊक होतें. उलट त्यानें त्याला व्यसनाधीन करणाऱ्या मित्रमंडळीच्या त्यागाशिवाय दुसरें कांहीं केलें नव्हतें. शिवाय कालरात्रीं लक्ष्मीशीं केलेली वागणूक अद्यापि त्याच्या डोळ्यासमोर दिसत होती. ती विनायकाला समजून त्यानें शेवटले शब्द उच्चारले नसतीलना अशीहि त्याला धास्ती वाटूं लागली असून, त्याच्या वाचाशक्तीवर तीनें आपला ताबा बसविला होता.

" माधव, मी काय बोललों इकडे तुझें लक्ष होतेंना ? कां अद्यापि त्या अयोग्य खिन्नतेचा तुझ्यावर पगडा असून लाजेमुळें ती तुला बोलूं देत नाहीं ? अरे तूं मनुष्यासारखा मनुष्य असतां असा लाजतोस कां ? "

" विनायक त्यांत लाजावयाचें काय ! मी लाजत नाहीं पण काय बोलावें हेंच मला समजत नाहीं " माधवानें कांहींतरी उत्तर दिलें.

खरें पाहिलें असतां तो लाजत नव्हता परंतु निंदेला तो भीत होता हीच गोष्ट खरी होती.

" बरें, तें असूं दे. पण येथें आल्यापासून तूं आपला वेळ कसा घालवितोस ! अभ्यास वगैरे करतोस काय ? "

" नाहीं, अभ्यास वगैरे कांहीं करीत नाहीं.गप्पा गोष्टींत वेळ घालवितों झालें!'

" बरें, पुढें तूं काय करणार ? "

" पुढें–होय. कांहीं नाहीं कदाचित् वाटल्यास पुन्हां कॉलेजमध्यें जाईन "

" म्हणजे कॉलेजमध्यें पुन्हां जावयाचें कांहीं ठरलेलें नाहीं असेंचना ? "

याच्यावर माधवानें कांहींच उत्तर दिलें नाहीं, व त्यांचें हेंही मौन नकारार्थी उत्तरार्थेंच दर्शक होतें.

" माधव, तुझ्यासारख्या संपन्न व होतकरू तरुणानें आपलें आयुष्य अशा तऱ्हेनें घालवावें हें जरा चमत्कारिक नाहीं का दिसत ? आज, तुझे वडील जिवंत असते तर त्यांनीं तुला असें स्वस्थ बसूं दिलें असतें कां ? याचा कधीं विचार तुझ्या मनांत येत नाहीं कां ? तुझ्या वडिलांच्या तुझ्याबद्दल कोठल्या तरी मोठमोठ्या आशा असत,पण आज, निव्वल त्यांच्या मृत्यूनेंच, त्या निष्फळ ठरूं पहात आहेत, आणि त्या तशा निष्फळ कां होत आहेत तर तुझ्यामुळें ! जवळ मुलबक संपत्ति असली ह्मणजे कांहीं करूं नये अशी जी घातुक वृत्त कित्येक श्रीमंतांच्या मनांत ठसलेली असून तिचे जें प्रत्यंतर ते नेहमीं आपल्या आचरणांत दाखवित असतात तशी तर तुझी वृत्ति झाली नाहींना ? शिकावयाचें काय किंवा हातपाय हालवावयाचे काय ते पोटासाठीं अशी तर तुझी समजूत झाली नाहींना? शिकणें किंवा हातपाय हालविणें निव्वळ पोटासाठींच नसते असें तुला वाटत नाहीं कां ? " माधव, आपण या जगांत जन्मास जे येतों किंवा ईश्वर आपणांस जन्मास जो घालितो तें तो आपल्या हातून कांहीं तरी चांगलें व्हावें या हेतूनेंच घालित असतो, हें तर तुला कबूल आहेना ? असें आहे तर त्याप्रमाणें कालदेशमान पाहून आपण कांहींतरी चांगलें करावयास नको कां ? त्याप्रमाणें तुझ्या हातून कांहीं झालें आहे का किंवा करण्याचा तरी तूं विचार केला आहेस कां ? तुझ्या

बोलण्याकडे पाहतां ह्याचें 'नाहीं' असेंच उत्तर येतें. बरें, नाहींतर नाहीं. राहिलें ! चांगल्याची गोष्ट वाजूला राहिली पण अद्यापपर्यंत स्वंतत्र रीतीनें असे जें कांहीं तूं केलें आहेस तें सर्व वाईट आहे. तुझा त्यापासून तोटा झाला आहे व जगाचाहि त्यापासून तोटा झाला आहे. श्रीमंती–मुबलक संपत्ति जवळ असली ह्मणजे वाटेल तें करावयास हरकत नाहीं, याच उन्मत्तपणाच्या समजुतीनें तूं सर्व केलेसना ! घरची मंडळी, आप्तेष्ट, गुरु, मित्र, लोक ह्यांचा आपणांवर रोष होईल हें ठाऊक असतांना निव्वल वरील उन्मत्तपणाच्या समजुतीनें त्यांच्या रोषास किंवा मतास भीक घालून तूं व्यसनी बनत होतासना ? माधव, हा श्रीमंतीचा ताठा फार वाईट असतो, आणि त्या श्रीमंतीच्या ताठ्याच्या नादानें तूं एकदां मोहावलास म्हणजे या जगांतील तुझें जीणें मातीमोल झालें ह्मणून समज. त्या ताठ्यानें तूं अद्यापि पुरा मोहावल नाहींस आणि म्हणूनच तुला ही उपरति होऊन चांगल्यासाठीं तूं येथें आला आहेस, तर पुन्हां त्या संपत्तीच्या ताठ्याचा पगडा तुझ्यावर बसेपर्यंत तूं आपलें मन खंबीर कर आणि आपलें वर्तन सुधार ! ”

तो कळकळीनें बोलत असून त्याच्या भाषणाची आस्था त्याच्या स्वरांत पूर्णपणें दिसून येत होती. थोडावेळ थांवून तो पुढें ह्मणाला–

“माधव, संपत्तीला तारुण्याची जोडी मिळाली आणि या जोडीला जर सद्-सद्विवेकबुद्धीची लगाम नसली तर ती स्वैरगामी होऊन त्याच्यावर आरुढ होणाऱ्या प्राण्याला बेफाम करित असते. डोळे झांकून तो या जगांत वावरावयास लागतो व मन मानेल तें अविचाराचें कृत्य करावयास मागे पुढें पहात नाहीं. ह्मणून शिक्षणानें–शिक्षणाच्या सुसंस्कृतीनें किंवा चांगल्या संगतीनें ही सदसत्-विवेकबुद्धी जागृत रहात असते व इष्ट व अनिष्ट सुष्ट व दुष्ट ह्यांच्या तात्विक मननानें तिचा विकास होत असतो. असा तिचा विकास झाला ह्मणजे अर्थात् त्या प्राण्याच्या कृत्यांवर ती आपली सत्ता–आपला अधिकार गाजवीत असते. अशा रीतीनें ती आपली सत्ता गाजवावयास लागली ह्मणजे त्या मनुष्याच्या हातून अयोग्य अगर घाताचें असें कोणतेंच आचरण घडत नाहीं. व जगाच्या उपहासास तो कधींच पात्र होत नाहीं, त्याचें मन त्याला खात नाहीं, किंवा खिन्नताहि त्याला शिवत नाहीं. ”

त्याच्या बोलण्याचा माधवावर चांगलाच परिणाम झाला. त्याची खिन्नता, त्याचें मौन पार नाहिसें झालें.

" विनायक, तुझ्यासारखा सार्थ उपदेश करणारा मला अद्यापि कोणीच भेटला नव्हता. " त्याच्या स्वरांत कृतज्ञता दिसत होती. " पण मी पुढें कसें करावें ? " त्यानें विचारलें.

" माधव, आतांच मी तें कसें सांगूं ? ज्या अभागी देशांत तूं जन्मास आला आहेस तेथें करण्यासारखें तुला पुष्कळ आहे. पण तें करावयास लागण्यापूर्वी जी कांहीं पूर्व तयारी करावी लागते तिच्या मागें तूं लागावेंस हें चांगलें."

" विनायक, ह्यापेक्षां जरा स्पष्टतेनें बोल. माझें अज्ञान मला झांकून ठेवावयाचें नाहीं, पण खरोखर तूं काय बोललास तें मला बरोबर समजलें नाहीं ! "

माधवाचें अज्ञान पाहून त्याला आश्चर्य वाटलें.

" कॉलेजमधील विद्यार्थी ह्या नात्यानें पहातां, माधव, हें तुझें अज्ञान खरोखरीच गर्हणीय आहे, परंतु—असो, माझ्या म्हणण्याचा अर्थ एवढाच आहे कीं, आपल्या देशाची स्थिति सुधारण्याचा त्वां प्रयत्न करावास. तूं चांगला श्रीमंत आहेस, तरुण आहेस, हुशार आहेस, तेव्हां या मार्गांत पडल्यास तूं आपला नांवलौकिक करून घेऊन देशाचाहि फायदा करशील. खरें म्हटलें असतां तुझ्यासारख्याला हाच मार्ग योग्य व तो तूं पत्करावास ही माझी इच्छा आहे."

" विनायक, ह्या बाबीसंबंधांत मी अद्यापि अज्ञान आहें. आपला देश भिकार आहे व तो सुधारला पाहिजे ही गोष्ट मला कबुल आहे पण ती साधावयाची कशी ? "

" ती कशी साधावयाची हें आतांच नक्की सांगतां यावयाचें नाहीं. पण त्या तयारीस लागण्यापूर्वी आपल्या देशाच्या सध्याच्या स्थितीचा व मागील इतिहासाचा चांगला अभ्यास केला पाहिजे. "

" बरें तर, तो कसा करावयाचा तें मला सांग ? "

" माधव, अमुक गोष्ट चांगली असें मी तुला सांगतों म्हणून तूं तिकडे जाण्यास तयार होत आहेस का खरोखर मनापासून तिकडे जावें असें तुला वाटत आहे ? पहिली स्थिति जर असेल तर हा जुलमाचा,—किंवा पाहिजे तर भिडेचा म्हण— रामराम फार दिवस टिकावयाचा नाहीं, तेव्हां मी काय म्हणतों याचा नीट विचार कर. आणि नंतर मनाच्या खऱ्या कळकळीनें देशभक्तीचें व्रत उचल. "

त्याचें म्हणणें सत्य होतें.

यापुढें या विषयावर बोलण्यापेक्षां माधवास विचार करण्यास फुरसत मिळणें जास्त फायद्याचें आहे. हा विचार भालचंद्राच्या मनांत येऊन तो ह्मणाला—

" विनायक, माधवरावांस नीट विचार करूंदे. आजच ह्या विषयाची अखेर लावण्याची घाई नाहीं. तूं सांगितलेला मार्ग त्यांस पसंत पडल्यास—त्याची जरूरी त्यांस मनापासून भासल्यास, तो ते स्वीकारण्याच्या तयारीला आपोआप लागतील. कां माधवराव मी ह्मणतों तें खरेंना ? "

" यांत विचार तो कसला करावयाचा ? माझा बेत ठरला असून तुमच्या सल्लयाप्रमाणें, नव्हे माझ्या इच्छेला अनुसरून मी जनकल्याण करण्यासाठीं तुह्मी ह्मणतां तो पेशा स्वीकारणार ! "

क्षणभरानें तो पुढें ह्मणाला—

" विनायक, माझ्यामध्यें तूं भयंकर क्रांति करून सोडली आहेस. यापूर्वीच जर हें उपदेशामृत तूं मला पाजलें असतेंस तर नागपुरास घडलेले प्रकार माझ्या हातून कशाला घडले असते ! "

* * * * *

माधवानें बेत केला खरा, पण—

प्रकरण ५ वें.

संविधानकांतील कांहीं पात्रें.



वऱ्हाड प्रांतच्या अव्वल इंग्रजींत पुण्याकडील जी कांहीं मंडळी उदरभरणासाठीं नोकरीच्या मागें लागून वऱ्हाडांत गेली त्यापैकीं चिंतामणराव–विनायकाचे वडील हे एक होत. तिकडे गेल्यावर पंधरा रुपयाचे कारकुनीपासून वाढत वाढत आठशें रुपयांच्या अम्मलदारी पर्यंत ते आपल्या नोकरींत वाढत गेले होते. त्यांचेवेळीं सरकारी नोकरी दुर्मिळ नसून बेताचें इंग्रजी ज्ञान असणाऱ्यास फार तर काय पण नुसतें साधारण लिहितां वाचतां येणारासहि क्वचित् प्रसंगीं ती मोठ्या मानानें मिळत असे. चिंतामणराव प्रवेशपरीक्षेंत पास झालेले असून चागले हुशारहि होते. शिवाय वरिष्ठांची मर्जी संपादन कशी करावयाची हें त्यांस चांगलें अवगत होतें. ह्यामुळें त्यानां आपल्या नोकरींत सारखी बढती मिळत जाऊन लवकरच ते अंमलदारहि झाले होते.

मुदत भरल्यानंतर सुद्धां, सरकारच्या मेहरनजरेनें तीन चार वर्षें जास्ती नोकरी करून, यांनीं पेनशन घेतलें असून आपलें राहिलेलें आयुष्य आपल्या मित्राच्या–श्रीनिवासरावांच्या सहवासांत आनंदानें घालविण्यासाठीं व आपल्या इस्टेटीची देखरेख करण्यासाठीं हे यवतमाळास येऊन राहिले होते. या जिल्ह्यांत यांनीं तीन इजारे गांव घेतले होते. यांनीं पेनशन घेतली त्यावेळीं त्यांच्या नोकरींचा सुरकारनें योग्य विचार करून 'रावसाहेब' या पदवीनें त्यांचा गौरव केला होता.

त्यांच्या कुटुंबांत ह्मणण्यासारखीं माणसें नव्हतीं. ते, यांची पत्नी–गोदावरीबाई, मुलगा विनायक व मुलगी कमला एवढेंच यांचें कुटुंब होतें. विनायक हा पुण्यास फर्ग्युसनमध्यें असून यंदां बी. ए. च्या परीक्षेस बसला होता. ह्यांचें

वय वीस एकवीस वर्षांचें असून ह्याचा स्वभाव फार दिलदार असा असे. ह्याचें शिक्षणविषयक ध्येय प्रगतिकारक असे, व शिक्षण आटोपल्यानंतर देशोन्नतीच्या कार्यास स्वतःस वाहून घेण्याचा याचा विचार होता. कमला ह्याचेपेक्षां तीनचार वर्षांनीं लहान होती. तिचें मराठी शिक्षण पुरें झालें असून सध्यां ती इंग्रजी पांचवें बुक शिकत होती, व हें तिचें शिक्षण खासगी रीतीनें होत होतें.

कमला शिकत जरी होती तरी साधारण अशा शिकणाऱ्या मुलींच्या अंगीं आढळणारा ताठा तिच्या अंगांत दिसून येत नसे. त्याचप्रमाणें भावी गृहिणीपदास त्रासदायक होणाऱ्या ज्या कांहीं गोष्टी अशा मुलींचे अंगीं येत असतात त्याहि तिच्या अंगीं मुरलेल्या नव्हत्या; व—हें सर्व होण्यास तिची थोर माताच कारण होती.

गोदावरीबाई जरी जुन्या तऱ्हेच्या वळणांतील होत्या तरी त्या सुशिक्षित व समंजस होत्या. त्यांच्यांत हेडक पुराणप्रियता नव्हती किं जुनें तेवढें सगळें व्हाईट अशा प्रकारची दुराग्रही सुधारकी समजुतहि नव्हती. संसारशकट हाकलण्याचें त्यांचें एकंदर धोरण कित्ता घेण्यासारखें होतें. स्त्रिया सुशिक्षित कां असाव्यात ह्याबद्दलचें त्याचें मत खरोखरीच विचार करण्यासारखें असे. त्या ह्मणत असत, " पुरुषापेक्षां बायकांवरच संसाराची जबाबदारी जास्त असते. लहान मुलांचे—भावी पिढीचें—बालपण, त्याची जोपासना वगैरे करण्याचा सर्व भार त्यांच्या आयांवरच असतो,व ह्या आयांची जशी स्थिति असते तसें सामाजिक वळण त्यांच्या मुलांस लागत असतें. संसार सुखाचा अगर दुःखाचा करणें हें पुरुषापेक्षां बायकांचेंच हातीं कांहीं जास्त प्रमाणानें असतें. व जिला आपली सहधर्मचारिणी ह्मणून मनुष्य जवळ करतो तीच जर खाष्ट व दुष्ट असली तर त्या मनुष्याचें व तिचें आणि त्यांच्या पोराबाळांचे आयुष्य मातीमोल होतें. त्यांस संसार निरस वाटावयास लागतो व त्यांचें मन नेहमीं उद्विग्न असतें. पण तिच गृहीणी जर सुशिक्षित असेल तर तिच्या कोत्या समजुती नाहींशा होऊन ती आनंदी बनून आपल्या नवऱ्यास व आपल्या मुलाबाळांस खरोखरच आनंद देणारी दिव्य देवता बनूं शकते ! "

अशा तऱ्हेचे विचार असल्यानें त्या स्त्रीशिक्षणाच्या जरी चहात्या होत्या तरी प्रचलित स्त्रीशिक्षणपद्धती त्यांस पसंत नव्हती. प्रचलित शिक्षणानें अल्लड

मुलींची छानछुकी व छछोरना वाढून त्यांची वृत्ति योग्यायोग्यतेची छान करण्यापेक्षां पाश्चात्यानुकरण प्रियतेकडे जास्ती झुकत असून आपल्या इकडील परिस्थितीस ती फार अपायकारक होत असते, हे त्यांच्या नेहमीं ध्यानांत येत असे. ह्मणून प्रचलित स्त्रीशिक्षण पद्धतीनें अंगीं भुरणाऱ्या दोषांचें अनुकरण त्या नेहेमीं करित असत व त्यापासून दूर रहाण्यास त्या तिला नेहमीं जागवीत असत. आणि खऱ्या शिक्षणानें वाढणारी मनाची प्रगल्भता. होणारें मनोधर्याचा विकास व मिळणारें नैतिक सामर्थ्य ह्यांचा चांगुलपणा त्या तिजजवळ प्रसंगानें गात असत. व्यक्तीची, कुटुंबाची अगर समाजाची प्रगति होण्यास व संसारांत कर्तबगारीनें वागतां येण्यास शिक्षणासारखें दुसरें साधन नसल्याचें त्यांचें मत असून हेंच शिक्षणात्मक ध्येय तिच्या मनावर बिंबविण्याचा त्या नेहेमीं प्रयत्न करित असत.

अशा तऱ्हेच्या मातेच्या नजरेखालीं वाढलेलीं मुलें कोणच्या तऱ्हेचीं असलीं पाहिजेत ह्याची वाचकांनींच कल्पना करावी.

गोदावरीबाईसारख्या चांगल्या पत्नीचा लाभ होता ह्मणूनच चिंतामणरावांच्या संसाराची मजा होती. चिंतामणरावांचा स्वभाव बराच मासलेवाईक होता असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्यांच्या वेळच्या प्रमुख समाजसुधारकांत ते मोडत असत व त्या सुधारकांप्रमाणें त्यांचे देखील आचरण असे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे व्यासपीठावर जोरानें हातवारे करून चार दोन शब्द बोलणारे ते कोरडे सुधारक होते. स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, पुनर्विवाह, अबलोन्नति, अंध धर्मश्रद्धा, कर्मठपणा वगैरे सामाजिक बाबींवर त्यांचीं नेहमीं व्याख्यानें झडत असत, व ही व्याख्यानें देतांना खऱ्या कळकळीपेक्षां मानाच्या मार्गे लागलेल्या दांभीकवृत्तीचाच त्यांच्यावर पगडा बसलेला असे. असो.

विनायकाचा सहाध्यायी भालचंद्र ह्याचे वडील प्रभाकरराव हे उमरावतीचे एक प्रख्यात वकिल होते. स्वतंत्र धंद्याच्या स्वतंत्रतेचा जरी ते पूर्ण उपभोग घेत होते तरी अधिकारजन्य मानापानाची व अधिकाराची त्यांस फार लालसा असे व ह्या त्यांच्या लालसेमुळें एल. एल. बी. झाल्याबरोबर त्यांनीं जबाबदारीच्या सरकारी नोकरींत प्रवेशहि केला होता, परंतु ह्यांचा मानी व अरेरावी स्वभाव त्यांस तेथें नडला. सरकारी नोकरींत असतांना वरिष्ठाच्या ह्मणण्याप्रमाणें चालावें लागतें, त्यांचे घरीं नेहेमीं येरझारा घालावयास लागतात व मनाच्या विरुद्ध कांहीं गोष्टी

कराव्या लागत. हे प्रकार प्रभाकररावांच्या स्वभावास जुळणें कठिण होते, तरी पण नोकरीच्या अधिकाराच्या लालसेनें त्यांनीं बरेच दिवस ते अंगवळणी पाडून घेतले, पण असा जुलमाचा रामराम किती दिवस चालावयाचा ! अखेर बरेच दिवसपर्यंत दाबून ठेवलेला त्यांच्या देहस्वभावानें उचल खाल्ली व त्याचा परिणाम नोकरीच्या राजीनाम्यांत झाला.

नोकरी सोडल्यानंतर हे उमरावतीस वकिली करूं लागले. आपल्या ह्मणण्याच्या सत्यतेसाठीं नोकरीवर लाथ मारली असल्यानें हे बरेच लोकप्रिय झाले होते. ह्या लोकप्रियतेंत हुशारीची भर पडून त्यांच्या धंद्याचा जम चांगल्या रीतीनें बसून तो सध्यां तर फारच भरभराटीवर होता. मात्र धंद्याच्या ह्या चलतीप्रमाणें तीचें खरें सौख्य अनुभवावयास लागणारी कौटुंबिक स्थिति त्यांची नव्हती. धंद्याची चलती चालावयास व त्यांची बायको मरावयास एकच गांठ पडली. ह्या प्रमाणें अशा स्थितींत विधुरावस्था कपाळीं येणें फार वाईट पण ती प्रभाकररावांच्या कपाळीं आली असून त्यांस आतां खरें संसारसुख असें नव्हतें. नाहीं ह्मणायास व संसाराची कांहींशी गोडी वाढविण्यांस त्यांस एक मुलगा भालचंद्र हा होता. आई मेली त्यावेळीं भालचंद्र बारा तेरा वर्षांचा होता.

त्यावेळच्या लोकाग्रणींत प्रभाकरराव हे प्रमुख होते. राष्ट्रीय सभा घ्या, सामाजिक परिषदा घ्या, प्रभाकरराव हे तेथें असावयाचेच ! व हे तेथें असत ते मानाच्या मागें लागून असत अशांतलाच सर्वस्वी प्रकार नसे तर देशहिताची त्यांस थोडीशी कळकळ वाटत असल्यानें ते तेथें असत.


त्यावेळच्या समजुतीला धरून देशाच्या कल्याणाचे त्यांचे विचार व आचार असत. जातिभेदाच्या निमूर्लनत्वानें साधणारे राष्ट्रैक्य, त्यांच्या दृष्टीचा अयोग्य धार्मिक कर्मठपणा, धर्मविषयक यांची वाहवलेली कल्पना, हुद्याच्या नोकरीचा लाभ वगैरे अनेक प्रकारांत ते नेहेमीं मन घालीत असत. सामाजिक सुधारकांस त्यावेळीं ऊत आला असून समाज सुधारण्याविषयीचीं त्यांचीं मतें स्वतःच्या विचार आचारांतील फरक लक्षांत न घेतां ते बेधडक जनते पुढें मांडीत असत. दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची त्यावेळीं अशा लोकांस सवय झालेली असे व हिंदुस्थानांतील ह्मणजे सर्व भिकार अशा तऱ्हेची त्यांची भावना झा-

लेली असे. ह्या सर्व प्रकारांचें प्रतिबिंब प्रभाकररावांच्या वागण्यांत आणि बोलण्यांत लहान-मोठ्या प्रमाणानें दिसून येत असे. असो.

प्रस्तुतच्या कथानकाचे सुरवातीला भालचंद्र बी.ए.च्या परीक्षेस बसला होता. तो पास झाला ह्मणजे त्याला सिव्हिलियन बनविण्याचा त्यांचा हेतु होता. हा आपला हेतू मुलाच्या आवडीनिवडीला धरून आहे किंवा नाहीं हें त्यांनीं कधींच लक्षांत घेतलें नव्हतें.

मुलाचा भावी आयुष्यक्रम त्याच्या आवडीपेक्षां आपल्या आवडीप्रमाणें घडवून आणण्याचा प्रभाकररावांचा हा विचार इकडील प्रचलित कुटुंबपद्धतीस सोडून होता असें नाहीं. मुलांच्या आवडीनिवडीकडे दुर्लक्ष करून, त्यांस आवड नसेल त्या धंद्याचे बोजड जूं त्यांच्या मानेवर आपल्या वडिलकिच्याच अधिकारानें ठेवून, त्यांच्या जन्माची राख रांगोळी करण्याची ही घातूक चाल चांगली असें नाहीं पण तिच्या वच्या वाईटाकडे वघतो कोण!—अशिक्षित तर बघणार नाहींतच पण सुशिक्षित ह्मणविणाऱ्या मोठमोठ्या चांगल्या लोकांनीं तिकडे वघूं नये हें खरोखर दुर्दैव होय ! अशा रीतीनें योग्य मनुष्यास अयोग्य अगर अयोग्यास योग्य धंद्यांत अडकविल्यास त्यापैकीं शेकडा नव्याण्णव लोकांस अपयश हें येतें. आणि अखेर वडिलकिचा मान घेणारे हे पालनकर्ते अशा अपयशाचें खापर आपल्या अप्रयोजक वागणूकीच्या माथीं न फोडतां त्या अभागी मुलांच्या माथीं फोडतात !

पण अशा उलट्या परिस्थितींत सुद्धां आपल्या आवडीप्रमाणें पेशा स्वीकारणारी मंडळी असते. पण ती फार क्वचित् व विरळ ! आणि अशा क्वचित् च विरळ असणाऱ्यापैकींच आमचे भालचंद्र व विनायक हे होते.



प्रकरण ६ वें.

पुढें चालूं.



श्री निवासरावांच्या हयातींत व त्यांच्या नंतर त्यांच्या इस्टेटीची व्यवस्था गोविंदरावच बघत असत. पुढें त्यांच्या मृत्यूनंतर माधवाचे पालनकर्तेदेखील हेच होते.

गोविंदरावांची मुळची घरची स्थिति फारच गरीबीची असून हे कलमचे रहाणारे होते. ह्यांचे वाडवडील भिक्षुकवृत्तीवर आपला चरितार्थ चालवित असत. वऱ्हाडांतील बहुतेक स्थानिक भिक्षुकांप्रमाणें यांस जोशीपणाची वृत्ति अगर त्याजबद्दलची सनदी जमीन वगैरे कांहीं नव्हतें. मुळ जोशांच्या पसरलेल्या वृक्षांच्या तावडींतून सांपडणारे सण, गृहकृत्यें व लग्नमुंजी यांवर मिळणाऱ्या द्रव्यावर या वर्षारंभाची त्या वर्षारंभास गांठ घालून ते आपलीं कशीबशी गुजराण करित असत.

ह्याप्रमाणें अशा निष्कांचन स्थितींत श्रीधरभट-गोविंदरावांचे वडील-आपली बायको, लहान मुलगा व म्हातारी आई यांसह सुखानें कालक्रमणा करित असतां त्यांजवर कालचक्राचा फेरा आला. गोविंदा दीडदोन वर्षांचा असतां मातृसुखास आंचवला, व यानंतर थोड्याच दिवसांनीं त्याला संभाळणारी आजी ही कालाच्या तडाख्यांत सांपडली.

पैसे मिळवावयाचे, घरांत बघावयाचें व मुलांस सांभाळावयाचें हीं तिन्ही कामें आतां एकट्या श्रीधरभटजींवरच येऊन पडलीं. व त्या त्रासानें बिचारा कंटाळून गेला. तें घरदार नको, तो मुलगा नको व हा जन्महि नको असें त्यास वाटावयास लागलें. पण नको म्हटल्यानें कां कोठें हा मागचा त्रास चुकणारा होता!

मुलास कोणाच्या तरी स्वाधीन केल्यास आपली बरीच काळजी चुकेल या आशेनें त्यानें तेथील आपल्या वर्गाच्या भटभिक्षुकांची पुष्कळ मनधरणी करून

पाहिलें पण त्यापैकीं कोणीहि गोविंदास संभाळण्यास तयार होईना. भिक्षुकांची वृत्ति श्वानाप्रमाणें असते ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. मुलास संभाळून भिक्षुकी करण्यास श्रीधरभटास जास्ती अवसर मिळेल ही त्यांना धास्ती वाटत होती ह्मणून त्यांच्यापैकीं मुलास संभाळण्यास कोणीच तयार होईना. संभाळण्याचें तर राहिले. पण उलट " तुला संभाळणें होत नाहीं तर त्याला पाद्र्याच्या स्वाधीन कर " असें बोलून ते त्याची हेटाळणी करित असत.

गोविंदाच्या सुदैवानें म्हणा कीं श्रीधरभटजीच्या नशिबानें ह्मणा श्रीनिवासराव तेथें आले. तेव्हां त्यांच्यासारखा थोरा मोठ्याच्या घरीं आपली दाद लागल्यास पहावें या आशेनें आपल्या लाघवी पण भेकड स्वभावास धीर देऊन गोविंदास घेऊन भटजींची स्वारी एके दिवशीं त्यांच्याकडे आली. श्रीनिवासरावांसारखा सुधारलेला मनुष्य आपल्या ह्मणण्याचा विचार करील कीं नाहीं ही त्यांस शंका होतीच ! तरी पण भीतभीत आपल्या दारिद्र्याचे व गोविंदाच्या हाल अपेष्टांचें हृदयद्रावक वर्णन करून आपल्या येण्याच्या कारणाचीं त्यानें प्रस्तावना केली. ह्यावेळी कर्मधर्मसंयोगाने घरमालकिणहि तेथेंच होती.

राधाबाईला अद्यापि मुलबाळ झालेलें नव्हतें. तेव्हां गोविंदाकडे व त्याच्या त्या आशाळभूत नजरेकडे पहातांच त्यांचें हृदय द्रवलें. त्यांनीं पटकन् त्याला उचलून घेतलें व " भटजी मी ह्याला संभाळतें " असे अचानक शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडले.

श्रीनिवासरावांनींहि भटजीस आपणाकडे देवपूजेस रहाण्यास सांगितलें.

झालें ! त्या दिवसापासून श्रीधर भटजी व गोविंदा हे श्रीनिवासरावांच्या घरीं राहूं लागले.

राधाबाईनीं गोविंदास खरोखरच पोटच्या मुलाप्रमाणें वाढविलें. तेथें रहावयास लागल्यापासून व थोरामोठ्यांचा आश्रय मिळाल्यानें तो क्रमाक्रमानें गोंद्याचा गोविंदा व गोविंदाचा गोविंदराव बनला.

योग्य वेळ होतांच गोविंदरावांचे लग्न झालें, त्यांना मिळालेली बायको चांगली सालस व सद्गुणी होती. परंतु प्रेमाचा मोबदला ह्मणून लक्ष्मीची त्यांस

जोड दिल्यावर मागें लागलेल्या दुखण्यानें तिचा लवकरच अंत झाला. सततच्या दुखण्यानें जरी ती नेहेमीं त्रस्त असे तरी त्याच्यावर राग व, त्याला टाकून बोल असें तिनें कधींहि केलें नाहीं. तिच्या ह्या प्रेमळ स्वभावानें ती सर्वांस फारच प्रिय झालेली होती. तिला बरें करण्यासाठीं श्रीनिवासरावांनीं तर पाण्यासारखा पैसा खर्च केला, पण त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. औषधाचा मारा चालूं होता तरी मृत्यु व जीव ह्यांच्या झगड्यांत बिचारीच्या शरीराचा सारखा ऱ्हास होत होता. अखेरीस झिजून झिजून बिचारीचा अंत झाला.

त्यावेळीं लक्ष्मीचें वय ९–१० वर्षांचें होतें.

अशी उत्तम सुस्वभावी बायको मेली म्हणून गोविंदरावास, सरें पाहिलें असतां, अतिशय दुःख व्हावयास पाहिजे होतें पण, गृहिणी ह्मणजे संसारचक्राचा कणा, जीवनयात्रा वाहणाऱ्या रथाचे आपल्या जोडीचे दुसरें चाक, आपल्या हृदयास आकर्षण करून एकजीव करणारी दिव्य शक्ति, आनंद देणारी दिव्य देवता, या तऱ्हेची पत्नीविषयक प्रगल्भ भावना त्यांच्या मनांत होती कोठें ? उलट, बायको ह्मणजे मन सांगेल त्याप्रमाणें आपल्या हुकमांत वागणारा बंदा गुलाम, पोटावारी बिनपगारी नोकरी करणारा नोकर, कामेच्छा भागविण्याचें चालतें बोलतें यंत्र या तऱ्हेची अयोग्य व निष्ठूर अशी त्यांची समजूत होती; तेव्हां त्यांस वाईट वाटावें कोठून ! ह्या माउलीच्या मृत्यूस तिचा असाध्य रोग जरी कारणीभूत असला तरी वरील घातुक कल्पनामुळें त्यांची तिच्या बरोबरची निष्ठूर वागणूक बरीच कारणभूत होती असें ह्मटलें पाहिजे. असो.

खऱ्या प्रेमाचा अभाव असल्यानें ' बायको मेली ' हें बरें झालें असें त्यांना वाटणें साहजिक होतें. त्यांना जें संसारसुख पाहिजे होतें तें तिच्याकडून मिळत नव्हतें. अशा स्थितींत त्यांच्या मनांतील इच्छेप्रमाणें तिचें जगणें त्यांच्या दुसऱ्या लग्नाच्या आड येत होतें, तें आतां पार नाहींसें होऊन दुसरें लग्न करावयास आपण मोकळे झालों ह्मणून त्यांना एक तऱ्हेचें समाधान वाटत होतें. व ह्या समाधानाच्या आनंदांत जरी त्यांनीं बरेच दिवस घालविले तरी त्यांचें दुसरें लग्न झाल्याचें अद्यापि दिसत नव्हतें. त्यांचें जरी बरेंच वय झालें होतें तरी ते अद्यापि स्वतंत्र नव्हतें, व श्रीनिवासराव लग्न करून देईपर्यंत त्यांस वाट पहाणें जरूर होतें.

श्रीनिवासराव आज नाहीं उद्यां गोष्ट आढतील ह्या आशेवर ते बरेच थांबले पण त्यांच्याकडून ह्या बाबतींत जेव्हां गोष्ट निघण्याचा रंग दिसेना तेव्हां त्यांच्याप्रमाणें आपणहि विधुरावस्थेंत रहावें असा त्यांचा मानस आहे कीं काय असा त्यांस संशय येऊं लागला तरी त्यांच्याजवळ ह्या बाबतींत बोलण्याचें गोविंदरावास धैर्य होत नव्हतें.

लग्न तर व्हावयास पाहिजे होतें पण त्यासंबंधानें आपल्या अन्नदात्याजवळ गोष्ट काढण्याचा धीर होत नव्हता, असा दुहेरी पेचांत ते सांपडले होते. पण अशानें हताश होण्यासारखे किंवा स्वस्थ हात चोळीत बसण्यासारखे गोविंदराव नव्हते.

आपणां स्वतःकडून होत नाहीं तर श्रीनिवासरावांच्या स्नेहाकडून ही गोष्ट त्यांच्या कानावर घालण्याचा त्यांनीं विचार ठरविला.

त्यांच्या नशिबानें ह्यावेळीं चिंतामणराव येथेंच नोकरीवर होते. त्यांच्याकडे जाऊन स्वतः सांगण्याइतकें त्यांचें व गोर्विंदरावाचें रहस्य नव्हतें. बरें दुसरें कोणाकडून सांगावें तर गोष्ट अती नाजूक असल्यानें चिंतामणरावांच्या इतर मित्र मंडळी बरोबर तत्संबंधीं बोलण्यास त्यांची तयारी नव्हती. गोदावरी बाईस आपला हेतू कळला ह्मणजे आपलें काम खात्रीनें होईल असें अखेरीस त्यांना वाटूं लागलें व त्याप्रमाणें त्यांनीं तजवीजहि केली.

त्यांच्या खटपटींत त्यांस यश आलें, एके दिवशीं अशीच संधी साधून ह्याबद्दल गोदावरीबाईनीं आपल्या यजमानाजवळ बोलणें काढलें.

" गोविंदाचें अद्यापि लग्नाचें वय असतां श्रीनिवासराव यासंबंधी कांहींच करित नाहीं हें काय ? त्यांच्या घरांत कोणी बायको मनुष्य नको कां ! " त्या म्हणाल्या.

" कां ! आपल्या कमलेस द्यावयाचा तुझा विचार आहें वाटतें ? "

" भलतेंच कांहींतरी बोलायाचें झालं ? त्याला द्यावयाला माझी कमळी जशी वरती आली असेल कीं नाहीं ! "

" मग ही चौकशी का ? "

"माझ्या ओळखीच्या एका गरीब बाईची मुलगी असून जमल्यास त्याला द्यावी असें ती परवां मजजवळ सांगत होती. गरिबी असल्यानें ते करतील कीं नाहीं याची तिला शंका आहे"

"अग न करावयाला काय झालें? नाहींतरी कोणा श्रीमंताची त्याला पुन्हा मुलगी मिळणार आहे थोडीच?"

"विचारणं होईलना मग! आणि तशांत ते जर लग्न करणार असले तर झटलं आपला शब्द टाकून ठेवावा गरिबाचा फायदा होतो आहे तर नको कां.....'

"बरं मी पाहीन!"

गोदावरीबाईंना कबूल केल्याप्रमाणें श्रीनिवासराव व गोविंदराव एके ठिकाणीं आहेत अशी संधी पाहून चिंतामणरावांनीं गोष्ट काढली.

"कां गोविंदा आम्हांला लाडू घालण्याचा विचार आहे कीं नाहीं?"

"कसले लाडू?"

"कसले म्हणजे, तुझ्या लग्नाचें. कां यजमानाप्रमाणें तुझा देखील लग्नाशिवाय रहाण्याचा विचार आहे?" श्रीनिवासरावाकडे पहात ते म्हणाले.

गोविंदानें यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. श्रीनिवासराव देखील कांहींच बोलले नाहींत. जवळ जवळ पांच मिनिटें झालीं तरी कोणीहि बोलेना.

अशा तऱ्हेचें वडील मंडळीचें बोलणें निघालें असलें म्हणजे ज्याच्याबद्दल तें बोलणें चाललेलें असतें तो मनुष्य जवळ असल्यास तेथून दूर जातो असें आपले इकडे नेहेमीं घडत असतें. पण गोविंदराव तेथेंच उभे राहिले असल्यानें या बाबतींत आपला काय विचार आहे हें जाणण्याची त्यांस इच्छा असल्याचें चाणाक्ष श्रीनिवासरावांच्या तेव्हांच लक्षांत आलें. तेव्हां आपला मनोदय त्यास स्पष्ट कळवा ह्या हेतूनें ते म्हणाले—

"गोविंदानें दुसरें लग्न करावें असें मला तर वाटत नाहीं!"

"का बरें?"

"बरा प्रश्न विचारलांत चिंतामणराव. मला दुसरें लग्न करण्याबद्दल मार्गे

तुह्मी आग्रह करीत असतां मी पुन्हां लग्न कां करीत नाहीं याची सविस्तर कारणें तुह्मांस सांगितलीं आहेतच; परंतु तीं गोविंदास ठाऊक नसल्यानें आज पुन्हां त्यांची आवृत्ति करणें जरूर आहे.

" तुह्मी ज्यांना सुधारक ह्मणतां त्या सुधारकांपैकीं मी एक असून माझें कार्यक्षेत्र हें व्यासपीठ नसून स्वतःचें घर आहे. माझी पहिली बायको वारली त्यावेळीं माधवाचें वय पांच वर्षांचें होतें व मीहि ह्मणण्यासारखा वृद्ध झालेला नव्हतों तसेंच संपत्ती, शरीरप्रकृति वगैरे सर्व बाजूंनीं माझें तें विवाह करण्याचें वय होतें. परंतु त्या फंदांत मी पडलों नाहीं व भासमान सुखाच्या मागें लागून आपलें दुःख वाढवून घेतलें नाहीं.

" प्रथम संबंधापासून झालेले अपत्य जिवंत असतां निव्वळ स्वतःच्या विषयवासनेसाठीं द्वितीय संबंध करून आमच्या देशास ही दशा आणणाऱ्या भाऊबंदकीचें रोपटें आपण होऊन आपल्या हातानें रोवावें हें तर मला फारच गौण दिसतें. स्त्रीवर्ग कितीहि सुशिक्षित व पुरुषवर्ग कितीहि समजंस असला तरी पहिल्या अपत्य स्नेह्यामुळें त्यांच्या कल्याणाच्या इच्छेनें व दुसरा स्त्रीमोहाच्या क्षैण विकारवशतेनें मनुष्य विचारमूढ बनतो; व नंतर तें त्यांचें सुशिक्षण व तो समंजसपणा जागचेजागीं राहून भिन्नभावाचा हळूंहळूं प्रादुर्भाव व्हावयास लागतो. एकीकडे जास्ती व एकीकडे कमी अशी त्यांच्या–पुरुषांच्या–संततिप्रेमाची आपोआप वांटणी होऊन द्वितीय संबंधाच्या मुलांकडे जास्ती व प्रथम संबंधाच्या मुलाकडे कमी असें तें साहजिक जाऊं लागतें. प्रेमाचा ओढा कमी असल्यानें पहिलीच्या मुलांची हेळसांड होते वगैरे–वाजवी प्रमौघाच्या फाजील लाडानें दुसरीचीं मुलें शेफारतात, व ह्यामुळें जगांतील भावी जबाबदारी घेण्यास तीं अगदीं अयोग्य बनतात. पुढें हळूं हळूं भिन्नभावाचा विकास ह्या मुलांस झपाट्यानें व्हावयास लागून त्याचें रूपांतर गृहकलहांत होऊं लागतें व एकेकाळीं शांतता व सौख्य पूर्णत्वानें नांदत असलेल्या त्याच गृहांत भांडण व तंटे यांचें पूर्ण साम्राज्य माजतें.

" मी ह्मणतों ही स्थिति हिंदुस्थानांतच असते असें नाहीं तर ती सर्वत्र पहावयास मिळते. आमचे इकडील कायदेकानु व समाजशास्त्र ह्यांनीं ती इकडे जास्त शोचनीय होत आहे तर पाश्चात्यांच्या–ख्रिश्चन धर्मानुयायांच्या कायदे-

कानु व समाजशास्त्र ह्यांच्या चांधणूकीनें तिचें तीव्रतर स्वरूप तिकडे भासत नाहीं. ”

त्यांच्या स्पष्ट व निर्भीड भाषणाचा परिणाम त्या दोघांवरहि झालेला दिसत होता. थोडा वेळ थांबल्यावर ते पुढें ह्मणाले—

“ असें जरी आहे; तरी माझ्या ह्मणण्यास हरताळ लावणारे अपवादात्मक दाखले तुह्मांस दाखवितां येतील. पण किती झाले तरी ते अपवादच ! एकंदरीनें विचार करतां ते लक्षांत घेणें कधींहि योग्य होणार नाहीं.


“ गोविंदा, ह्या बाबतींतले माझें विचार तुला आतां कळलेच आहेत. त्यांची महती तुला वाटत नसल्यास किंवा माझें ह्मणणें खोटें ठरवीन अशी तुला खात्री असल्यास तूं खुशाल दुसरें लग्न कर. तशांत पुढें माऊचंदकी होईल अशी तुझी स्थिति देखील नाहीं. दुसरें लग्न करण्याचें तुझ्या मनांत असल्यास तसें सांग ह्मणजे त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास मला ठीक पडेल. तुझें दुसरें लग्न झाल्यावर मी देईन ते पैसे घेऊन तूं आपलें निराळें बिऱ्हाड व निराळा संसार थाटावास. मात्र तुझ्याबद्दल व तुझ्या बायकोबद्दल माझी खात्री होईपर्यंत मी लक्ष्मीला तुमच्या स्वाधीन करणार नाहीं.

“मला आतांच सांगावयास नको, आणखी आठ दिवसांनीं नीट विचार करून सांग. दुसरें लग्न करण्याचा तुझा बेत ठरत असल्यास ‘ मला पसंत नाहीं तेव्हां कसें करावें’ हा विचार अगदीं देखील मनांत आणूं नकोस. तुझ्या करण्यापासून मला यत्किंचित् देखील वाईट वाटणार नाहीं, समजलास. जा आतां. ”

श्रीनिवासरावांच्या उपदेशामुळें ह्मणा कि त्यांचा कांहीं अंतस्थ हेतू असल्यामुळें ह्मणा, गोविंदरावानें कांहीं दुसरें लग्न केलें नाहीं.

प्रकरण ७ वें.

बिझिकचा डाव.



लक्ष्मीशीं घडलेली वागणूक व विनायकाचा उपदेश ह्या दोन्ही गोष्टी लागोपाठ घडल्यानें त्यांचा माधवाच्या मनावर चांगला परिणाम झाला होता. लक्ष्मीशीं केलेल्या बाष्कळपणाचें त्यास राहून राहून वाईट वाटत असून तो आपल्या हातून कसा घडला याचें त्यास आश्चर्य वाटत असे. यानंतरची त्याची तिच्याशीं वागणूक फार चांगली व खरोखरीच्या भावास शोभण्यासारखी अशीच असे. तो जरी तिच्याशीं अशा तऱ्हेनें वागत असे तरी लक्ष्मीची वागणूक त्याच्याशीं असावी तितक्या मोकळ्यापणाची असत नसे. ही गोष्ट त्याच्या ध्यानांत येत नव्हती असे नाहीं, पण तिचा दोष तिला न देतां तो आपल्याकडे घेत असे. असो.

विनायकाच्या उपदेशानें तर त्याच्या मनांत नवीन विचार यावयास लागले असून ह्या विचारांनीं त्याच्या मनांत नवीन आशा उद्भवावयास लागल्या होत्या व त्याच्या आचरणावर त्यांचा बराच परिणाम झाल्यासारखा दिसत होता. आपला बहुतेक काल तो विनायकाचा संगतींत अगर उपयुक्त वाचनांत घालवूं लागला असून निरनिराळ्या विषयांवर त्याच्याशीं वादविवाद करण्यांत अगर कांहीं माहिती विचारण्यांत त्याला समाधान वाटूं लागले होते.

मित्रप्रेमानें माधव सुधारावा असें जरी विनायकास वाटत असे तरी त्याला सुधारण्याचे प्रयत्न करण्यांत त्याचा निवळ हाच हेतू होता असें नाहीं. त्याच्या मनांत जे कांहीं विचार घोळत असत त्यांची वाढ होण्यास योग्य अशीच माधवाची स्थिति असल्यानें तो त्याला सुधारण्याच्या मार्गें लागलेला होता. तो त्याच्या येथें नेहेमीं जाऊन बसत असे किंवा त्याला आपल्या येथें घेऊन येत असे. निरनिराळ्या सामाजिक धार्मिक वगैरे विषयांवर तो त्याच्याशीं वादविवाद करित

असे व देशकालीन स्थितीची चर्चा करणारीं वर्तमानपत्रें, मासिके वगैरे तो त्यास वाचावयास लावित असे. समाजाचा किंवा राष्ट्रांचा उत्कर्ष याची महती त्याच्या मनांत ठसेल अशा तऱ्हेचीं पुस्तकें तो त्यास वाचावयास देत असून तीं त्यानें खरोखर मनापासून वाचलीं आहेत किं नाहीं हें पाहण्यासाठीं त्या त्या विषयांवर तो त्याच्याशीं चर्चा करित असे.

माधवाची वृत्ति चैनी आहे हें तो ओळखून होता व अशा चैनी वृत्तीच्या माणसास एकदम वरील तऱ्हेच्या व्यासंगांत सर्वस्वी गोवण्याचा प्रयत्न केला तर तो साधणार नाहीं हेंही तो ओळखून होता. म्हणून त्याच्या चैनी वृत्तीस निरुपद्रवी मनोरंजनाच्या प्रकारांत घातल्यास कांहीं कालानें त्याची पूर्वीची चैनी– व्यसनी वृत्ति नाहींशी होऊन ह्या प्रकारांची त्यास गोडी लागून त्याची नीतिमत्ता सुधारले व आपण ज्या मार्गांत त्यास घालूं पहातों त्या मार्गांत तो स्थिर होईल असें त्यास वाटत होतें. म्हणून आपल्या बरोबर तेथील 'रिक्रीएशन कबांत' तो त्यास घेऊन जात असे. टेनीस, बीलीयर्डस, पत्ते वगैरे खेळांची तेथें त्यास हळूहळूं गोडी लागावयास लागली होती.

या ठिकाणीं विनायकानें ज्या हेतूनें माधवास नेलें तो वऱ्याच अंशीं जरी साध्य झाला तरी पुढें त्याच ठिकाणच्या कांहीं मंडळीची संगत ही त्याच्या पतनासहि वऱ्याच अंशानें कारण झाली.

या दोन्ही कुटुंबांचा घरोबा असल्यानें लक्ष्मी व कमला ह्यांची मैत्री चांगली असून एकमेकींच्या सहवासांत त्या आपला बराच वेळ घालवित असत. लक्ष्मीपेक्षां कमला वयानें व ज्ञानानें मोठी होती. तिला नेहेमीं ज्ञानाच्या गोष्टी सांगत असे, व शिवणकामांत वगैरे तर ती तिची गुरु होती. असें होतें तरी कमलेच्या अंगी ताठा नव्हता. व तिच्याशीं ती खऱ्या मैत्रीणी प्रमाणेंच मोकळ्या मनानें व बरोबरीच्या नात्यानें वागत असे.

एके दिवशीं कंटाळा आल्यानें ह्या दोघीहि बिझिक खेळत बसल्या होत्या खेळतांना दोघींचे जिव्हायंत्र सारखें चालू होतें. त्याचे दोन चार डाव झाल्यावर विनायक व भालचंद्र तेथें आले. त्यांस पाहून कमला म्हणाली—

"दादा, येतोस कां आपण चौघे मिळून खेळूं?"

" मलहि आज वाचून बराच कंटाळा आला आहे, तेव्हां खेळण्यास कांहीं हरकत नाहीं ह्मणा. का! " भालचंद्राचा रुकार आहे किं नाहीं हें पाहण्यासाठीं विनायक ह्मणाला.

" माझी तयारी आहे, पण गडी कोण कोण? " भालचंद्र मुद्दाम ह्मणाला.

" ह्या दोघींजणी एका बाजूला होतील. होना कमले? "

" हो, आह्मी दोघी एका बाजूला होतों. पण पहारे दादा, जर तुमच्यावर गेम लागली तर! "

" त्याच्यांत काय मोठेसें! लागली तर लागली. तुह्मीं बायकांनीं हरविलेलें आह्मांला आपलें चालेल. " हसंत हसंत त्यानें उत्तर दिलें.

" मला नाहीं वाटत पण तुह्मीं आमच्यावर गेम घालसे! " भालचंद्र ह्मणाला. हें त्याचें इतकें बोलणें झालें पण त्यांत लक्ष्मीनें कांहींच भाग घेतला नाहीं. दुसरीकडे पहात ती त्यांचें बोलणें ऐकत होतीं.

भालचंद्र व विनायक हे पटाईत खेळणारे होते. व त्यांच्या नशिबानें त्यांच्याकडे पानेंहि चांगलीं येत होतीं. पहिला डाव संपण्याच्या अगोदरच त्यांनीं त्या दोघींवर गेम दिली.

" कां, ताईसाहेब! गेम कोणीं दिली! ही पहिली बरें का! आपण आणखी दोन तास खेळूं. तोपर्यंत किती गेम्स् होतात तेवढें लक्षांत ठेवा. " मुद्दाम तिला चिडविण्यासाठीं विनायक म्हणाला.

" तुमच्याकडे पानें चांगलीं येत गेलीं म्हणून! नाहींतर तुम्हीं गेम काय देत होता! " आपल्या बाजूला येणाऱ्या कमीपणानें न डगमगतां ती म्हणाली.

ह्या वेळेलाहि लक्ष्मी कांहीं बोलली नाहीं.

दुसरा डाव सुरू झाला. आतां मात्र डावाचा रंग बदलला.

" दादासाहेब, आतां पाहूं कोण गेम देतें तें! लक्ष्मी, मघाची ह्यांची गेम आपणासर आहे ना! हरकत नाहीं. " आनंदानें कमला म्हणाली

प्रेमकलह हा केव्हांहि झाला तरी प्रिय असतोच. मग तो कशाहि तऱ्हेचा असला तरी चालतो. तो करण्यास प्रेमाचीच जरूरी असते असें नाहीं. लहान मुलांशीं, मित्रांशीं किंवा भावंडांशीं तो केला तरी चालतो व अशा तऱ्हेच्या कलहानें त्याच्यांतलें सारस्य कमी होतें असें नाहीं.

विनायकाला कमळेशीं–आपल्या धाकट्या वहिणींशीं प्रेमकलह करण्यास ही संधी चांगली होती व ती त्यानें वायां जाऊं दिली नाहीं.

ह्या दोघींचा डाव विघडवावयाचा असा त्यानें भालचंद्रास नेत्रसंकेत केला. त्याचा हेतू ओळखून भालचंद्रहि तसाच खेळूं लागला. त्यांच्या खेळण्यानें दोघींच्या हातांत पानें तुंवून राहूं लागलीं.

"हा कायरे दादा, तुझा विघ्नसंतोषीपणा ! आपल्या हातांत डाव नाहीं तर नाहीं, पण तो दुसऱ्याच्या हातांत असतां त्याला करूं द्यावयाचा नाहीं ! "

"ताई, याला विघ्नसंतोषीपणा ह्मणत नाहींत तर खेळण्याचें कसब ह्मणतात. तुह्मी आमच्यावर गेम देणार अहां ना ? "

" ही हो ! देऊं तर, तूं काय समजलास ! तुह्मीं खेळतां तसें आह्मालाहि खेळतां येतें आणि डावाचा रंग आह्मालाहि समजतो बरें. ?"

डाव अडविण्याच्या खेळण्यानें त्यांच्या हातांतील हुकूम संपले असतील अशा समजुतीनें तिनें विझिकचें पान टाकलें.

" पाहूं आतां किती हुकूम काढतां ते ! " ती पुढें ह्मणाली.

" अग हुकूमाला काय तोटा. हा पहा एक्का, आणि भालचंद्र टाक पाहूंरे विझीकचें पान ह्मणजे डवल च्यान्स कशाला ह्मणतात तें आपल्या कमळा-ताईला समजेल. "

बोलण्याप्रमाणें विनायकानें खरोखरीच एक्का टाकला व भालचंद्रानेंहि विझी-कचें पान काढलें. आपल्या मूर्खपणानें बाजू आपल्याच अंगावर आलेली पाहून ती खजिल झाली. तिनें हिरमुसलें तोंड केलें. लक्ष्मीनें तिच्याकडे पाहिलें.

जास्ती चिडविल्यास गोष्ट भलत्याच थराला जाईल. हें विनायक व भाल-चंद्र यांना दिसूं लागलें व तो ह्मणाला–

" कमलाताई, असें कसें खेळतां. नीट खेळलें तर त्या डावाची मजा. "

कमलेला समाधान वाटलें. तरी दोषाचें सर्वच माप आपल्या पदरांत घेण्यास ती तयार नव्हती.

" दोष कांहीं माझ्या एकटीकडेच नाहीं. "

" बरें, तसें कां असेना. आतां मात्र नीट खेळावयाचें ! " विनायक ह्मणाला.

यानंतरच्या डावास व्यवस्थित स्वरूप आलें. डाव आपल्या बाजूनें होण्याचीं चिन्हें दिसूं लागतांच कमळेला समाधान वाटलें व त्याचा परिणाम तिच्या चेह-

च्यावर दिसूं लागला. आनंदी मुद्रेनें ती वरचेवर लक्ष्मीकडे पहात होती. नीट खेळण्यासाठीं तिला वरचेवर बजावित होती. इतकें चाललें होतें तरी लक्ष्मी अद्यापि मुखस्तंभच होती. कमलेच्या बोलण्यास उत्तर ती फक्त तिच्याकडे पाहूनच देत होती.

मुकाट्यानें खेळत असून शांतपणाची वरपंगी स्वस्थता जरी लक्ष्मीच्या चेहऱ्यावर दिसत होती तरी सूक्ष्म अवलोकन करणारास तिची वृत्ति शांत नसावी हें स्पष्ट दिसण्यासारखें होतें. आणि ती तशी नव्हतीहि !

डाव संपल्यावर अखेरीस विनायकावर गेम लागली.

" दादासाहेव, आपली गेम फिटली वरें ! "

" ताईसाहेब, फिटली नाहीं बरें. आमची गेम शेमफूल होती. " तिला पुन्हां चिडविण्याच्या हेतूनेंच विनायक म्हणाला.

पण ती चिडली नाहीं. गेम लागली या आनंदांतच ती होती. आनंदांत असलेल्या मनुष्यांस सहसा चीड येत नसते. हिणविण्याचा परिणाम त्यांच्यावर होत नसतो. आणि हें हिणविणें जर मायेच्या–प्रेमाच्या माणसाचें असलें तर त्याचा त्यांवर मुळींच परिणाम होत नाहीं. तर असल्या हिणविण्यानें उलट त्याच्या आनंदवृत्तींत भर पडते.

" ती देखील फेडूं बरें दादासाहेब, कां लक्ष्मी असेंच ना ? " तिनें आपला आनंदी चेहरा लक्ष्मीकडे वळविला.

लक्ष्मीनें नुसत्या सस्मित चेहऱ्यानेंच तिला उत्तर दिलें. ती मघांपासून बोलत नाहीं हें कमलेच्या लक्षांत आलें. लागलाच तिनें तिला प्रश्न केला.

"पण लक्ष्मी तूं मघापासून अशी मुकी मुकी कां !....."

तिच्या बोलण्यानें लक्ष्मीचा चेहरा बदलूं लागला. त्यावर मुग्ध पण तीव्र लज्जाविकाराची छटा चमकूं लागली. अस्पष्ट भीतीचें चिन्ह तेथें दिसूं लागलें.

"ह्या भालचंद्ररावांना लाजतेस वाटतें ?" कमलेनें आपल्या प्रश्नाचें आपणच उत्तर दिलें.

कमलेच्या बोलण्यावरून विनायक व भालचंद्र यांनीं लक्ष्मीकडे पाहिलें. ह्यानें तर ती जास्तीच लाजली. तिनें कमलेच्या बोलण्यास उत्तर असें कांहींच दिलें नाहीं.

नवीन डावाचीं पानें वांटण्यांत कमला गुंतली होती. मोठ्या उत्साहानें तिनें दुसऱ्या डावास सुरवात केली.

"लक्ष्मी, ही गेम पुन्हां द्यावयाची वरें का !" आपल्या हातांतील पानाकडे पाहून कमला म्हणाली.

त्यांचा डाव सुरू झाला. इतक्यांत माधव तेथें आला. त्याला पाहून भालचंद्र म्हणाला.

"या माधवराव हीं घ्या पानें, मला जरा कंटाळा आला आहे." माधवाच्या हातीं पानें देऊन भालचंद्र पलीकडे इझिचेअरवर जाऊन पडला.

"माधव नीट खेळ वरें का. ह्यावेळेला आपल्यावर गेम देण्याचा या दोघींचा बेत आहे." विनायक म्हणाला.

" म्हणजे सांगून सवरून गेम देणार वाटतें ? " कमलेकडे पाहून माधव म्हणाला.

कमलेनें त्याला उत्तर दिलें नाहीं.

"असें म्हणावयास हरकत नाहीं" विनायक म्हणाला.

यावर देखील कमला बोलली नाहीं.

डाव संथपणें चालला होता. कमला व लक्ष्मी ह्या मन लावून खेळत होत्या. डावाचा रंग त्यांच्याच बाजूकडे होता. मुकाट्यानें जरी त्या दोघीजणी खेळत होत्या तरी त्यांची चंचल दृष्टि मधेंच इकडे तिकडे प्रवास करित असे. व हा दृष्टिप्रवास करतांना त्यांच्या डोऱ्यांची चंचलता जास्त दृग्गोचर होत असे. त्यांच्या मुखकमलावर मोदक आरक्तता आलेली होती.

अखेरीस डाव संपला ! विनायक व माधव यांवर गेम लागली. खरे म्हटलें असतां ह्यावेळीं कमलेचे आनंदोद्गार बाहेर पडावयास पाहिजे होते. पण ती कांहींहि बोलली नाहीं. लक्ष्मीप्रमाणें तिनेंहि मूक व्रत स्वीकारलेलें दिसूं लागलें. अद्यापपर्यंत तिची बडबड सारखी सुरू होती ती एकाएकीं अशी मूक कां व्हावी ! व ही मूकवृत्ति कशाची वरें द्योतक असावी ?

प्रकरण ८ वें.

मित्रांचा वाद.



श्रीनिवासरावांनीं आपल्या पश्चात् माधव वयांत येई-पर्यंत गोविंदरावास त्याचे पालनकर्ते नेमिलें होतें. माधव लवकरच दोनचार दिवसांत कायद्याच्या दृष्टीनें सज्ञानावस्थेंत येणार होता. गोविंदराव आपल्या कारकिर्दीतले सर्व हिशोब वगैरे त्यास समजावून देत होते, व त्यांच्या एकंदर त्यावेळच्या वागणुकीचें धोरण त्यांना यापुढें हें काम करावयास नको आहे अशा तऱ्हेचें दिसत होतें. माधवास ते दिसत होतें, पण त्याच्या मनांतून तसें व्हावें असें नव्हतें. ह्मणून त्याप्रमाणें हिशेब वगैरे समजावून घेत असतां तो त्यांना ह्मणाला—

" गोविंदराव, तुह्मी मला जे इतक्या बारकाईनें हिशेब वगैरे समजावून सांगतां त्याचें कारण काय ? तुमच्यावर माझा विश्वास नाहीं असें थोडेंच आहे ! "

" तसें नव्हे. मी तरी माझ्यावर तुझा विश्वास नाहीं असें कोठें ह्मणतो ! पण यापुढें ही दगदग माझ्याच्यानें व्हावयाची नाहीं. "

" ह्मणजे ? हा सर्व कारभार मी पुढें बघावा अशी तुमची इच्छा आहे काय ? "

" हो. "

" आणि, ती कां बरें ? "

" मला या सर्व दगदगीचा कंटाळा आलेला आहे. आणि शिवाय—" ह्यापुढें ते बोललेच नाहींत.

" आणि शिवाय काय ? "

" आहे झालें कांहींतरी ! त्याच्यांत ह्मणण्यासारखा अर्थ नाहीं ! "

" अर्थ नसला तरी मला सांगावयास कांहीं हरकत आहे कां ! "

" हरकत कसली ह्मणा. पण नकोच तो विषय. "

ह्या संदिग्ध बोलण्यानें माधवाची उत्सुकता जास्त वाढली. तो म्हणाला—

हेंच योग्य !

" गोविंदराव, माझ्यासंबंधीं कांहीं असेल तर तें जाणण्याची माझी इच्छा आहे. मग तें चांगलें असो अगर वाईट असो. "

" तुझ्यापेक्षां तें माझ्यासंबंधीं जास्ती आहे. आणि तुझा तसा आग्रहच आहे तर सांगतों. तुझ्या वडिलांनीं ही इस्टेट माझ्या ताब्यांत दिल्यापासून मी माझा तळीराम बराच गार करून घेतला आहे असा येथील वऱ्याच मंडळीचा माझ्यावर आक्षेप आहे. कदाचित् तो तुझ्या कानींहि आला असेल. त्यांचें निरसन व्हावें म्हणूनच हे सर्व हिशोब मी तुला इतक्या बारकाईनें समजावून देत आहें. आणि त्यामुळेंच पुढें ही व्यवस्था मी पहावी अशी माझी इच्छा नाहीं. "

" असें असेल तर मला ते हिशोब नको आहेत. " असे म्हणून माधवानें आपल्या पुढील हिशोबाचें कागद दूर केलें, व तो पुढें म्हणाला. " गोविंदराव, तुमच्यावर माझा विश्वास नाहीं असें तुम्हाला कसें वाटलें! गांवांतील रिकामटेकड्या मंडळीशीं तुम्हांला काय करावयाचे आहे! बाबांचा तर तुमच्यावर विश्वास होताना ? आणि म्हणूनच गांवांतील इतर मंडळी टाकून त्यांनीं तुमच्या स्वाधीन मला आणि या संपत्तीला केलें होतेंना ? बाबांच्याप्रमाणें माझाहि तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे, हें मी तुम्हांला आज सांगून ठेवतों. ह्या बाबतींत कोणी कांहीं झटलें तर निकडे तुम्हीं लक्ष देऊन आपल्या मनाला वाईट वाटून घेऊं नका. बाकी ह्या बाबतींत अद्यापपर्यंत माझ्याजवळ कोणी बोललें नाहीं. "

" नसतील बोलले, पण पुढें मागें बोलण्याची वाट पहात असतील. मध्यंतरीं तूं बिघडला होतास त्याचें देखील खापर ह्या मंडळीनीं मातेंच माथीं फोडलें. आतां येवढें मी कबूल करतों कि त्यांत थोडाबहूत दोष निष्काळजीपणानें माझ्याकडे येत होता . "

" मला नाहीं वाटत त्यांत तुमचा कांहीं दोष होतासें. मी जर वाटेल तसा वागावयास लागलों तर त्यांत तुमच्याकडे दोष कसा येत होता ? आणि जरी येत असला तरी येथें आणून तुम्हींच मला सुधारलेंना ? "

" बरें तें असो म्हणा. तुझ्या मनांत माझ्याबद्दल संशय नाहीं हेंच मला पुरेसें आहे आतां हे बाकीचे घतोसना समजावून ? "

" अंहं. मला ते हिशोब नको नी कांहीं नको समजावून घ्यावयाला. "

" त्या दृष्टीनें समजावून नको घेऊंस; पण व्यवहार काय आहे हें तर तुला समजावयास पाहिजेना ? "

" त्याची आतांच कांहीं जरूरी आहेसें मला वाटत नाहीं. जेव्हां वेळ येईल तेव्हां घेईन समजावून. "

" बरें तर मग मी आपल्या कामाला जातों. "

असें ह्मणून गोविंदराव बाहेर गेले.

माधव स्वस्थ तेथेंच पडला होता. थोडया वेळानें विनायक व भालचंद्र तेथें आले. ते आल्यावर त्यांच्या गप्पा सुरू झाल्या.

विनायक, अगर भालचंद्र ह्यांच्यासारखी तरुण मंडळी एका ठिकाणीं जमली ह्मणजे त्यांच्या गप्पांचा ओघ वाहतां वाहतां प्रचलित देशस्थितीवर येऊन आदळावयाचा ! ह्याप्रमाणें त्यांच्या गप्पा एका प्रसिद्ध मासिकांतील लेखावर सुरूं झाल्या. सदरहू लेखांत, लेखकानें देशांतील श्रीमंत लोकांचें कर्तव्य त्यांच्यावरील जबाबदारी लक्षांत घेतां कोणतें असावें याचा उहापोह केलेला होता. राष्ट्रांची आर्थिक संपत्ति व बौद्धिक संपत्ति याची त्यानें तुलना केलली असून बौद्धिक संपत्ति असेल तर आर्थिक संपत्ति मिळवितां येते; राष्ट्राची निकृष्टावस्था झालेली असेल तर बुद्धीमान लोकांच्या बुद्धिमत्तेनें ती घालवितां येतें, राष्ट्रांत नसलेलें चैतन्य आणतां येतें, असें सिद्ध करून दाखविलें होतें. आपल्या सध्यांच्या स्थितींत अशिक्षित व कुशिक्षित यांनीं सर्व देश आक्रमिला असतां देशांतील समजंस–त्यांतल्या त्यांत जीवनकलहाची काळजी नसणाऱ्या श्रीमंत व सुशिक्षित लोकांचें खरें कार्य कोणतें असा प्रश्न विचारून देशांच्या भावी सुस्थितीचा पाया जें सार्वत्रिक शिक्षण त्यांचा प्रसार करणें हें त्यांचें पवित्र व खरें कार्य असा त्याला त्यानेंच जबाब दिला होता. पण सध्यां आमच्यांतील श्रीमंतांची तशी स्थिति नसून वरील पवित्र कार्यापेक्षां अनीतींत, व्यसनांत किंवा अयोग्य दानधर्मांत आपल्या संपत्तीचा, बुद्धिमत्तेचा व शरीराचा अपव्यय करणें त्यांच्या अंगीं खिळून गेल्याचें त्यानें स्पष्ट ह्मटलें होतें.

हा त्या लेखकाचा दोषारोप फाजिल धाष्टर्याचा व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा आहे असें विनायकाचें मत असून त्याप्रमाणें तो बोलतहि होता.

" तूं म्हणतोस, पण मला नाहीं वाटत हा दोषारोप तसा आहेसा !"

"मग काय तो सर्वस्वी खरा आहे ? "

"हो; अगदीं खरा आहे."

"तो तसा आहे असें घेऊन चाललें तर शिक्षणासाठीं आपल्या लोकांनीं केलेल्या प्रयत्नांची काय वाट त्यांचें कांहींच महत्त्व नाहीं कां ! "

" महत्व नाहीं असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं, महत्व आहे, पण तें जेवढें असावयास पाहिजे होतें तेवढें नाहीं. "

" म्हणजे ! ',

" उदाहरणार्थ आपला महाराष्ट्र देशच घे. ह्या देशाच्या आकाराच्या मोठेपणावरून व त्यांतील श्रीमंत लोकांच्या संपत्तीवरून हें शिक्षणाचें कार्य जेवढें मोठे व महत्वाचे असावयास पाहिजे होतें तेवढें तें आहे कां ? लोकसंख्या, शिक्षणाची जरूरी, देशांतील व्यक्तीच्या हातांत अडकलेली संपत्ति, स्थलमानानें झालेली लोकसंख्येची वांटणी व दृश्य असें शिक्षणाचें कार्य याचा आढावा जर काढला तर तो तुझ्या म्हणण्यास दुजोरा देणारा असाच निघेल काय ? माझी खात्री आहे, तो तसा कधीं निघावयाचा नाहीं. आणि असें झालें म्हणजे ह्या लेखकाचें म्हणणें फाजिल धाष्टर्याचें व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारें आहे असें तुला म्हणता येईल काय ? "

" नाहीं पण याबद्दलचा दोष त्यानें श्रीमंतांच्या माथीं मारला आहे तो कां ? देशांतील दुसऱ्या विद्वान् व कर्तबगार लोकांस हें कार्य करतां येण्यासारखें नाहीं कां ? अशा लोकांना वगळावें व नुसत्या श्रीमंतानांच दोष द्यावा हें मला तर पसंत दिसत नाहीं. असे लोक जर श्रीमंतांजवळ ह्या बाबतींत मदत मागावयास गेले तर मला नाहीं वाटत ते त्यांचा हिरमोड करतीलसें. "

" विनायक, हा प्रश्न फार निराळा असून तो व्यवहाराच्या कसोटीनेंच सुटणारा आहे. आणि ह्या बाबतींत माझे तर असें मत आहे कीं श्रीमंत लोक अशा कार्याला पाहिजे तेवढी भरपूर मदत करण्याऐवजीं त्याच्याकडे कानाडोळा करित असतील, यदाकदाचित् त्यांनीं थोडीबहूत मदत केलीच तर ती खऱ्या जाणीवेची–कळकळ्याची मदत असण्याऐवजीं आपल्या श्रीमंतीचें द्योतक म्हणून दिलेली भिक्षा असणार आणि अशा लोकांपासून मिळणारी अशी मदत अखे-

रीस भिक्षाच ठरणार व भिक्षेवर चालणाऱ्या इतर कार्यांप्रमाणें हींहि कार्यें चालणार. भिक्षा मागणाऱ्यांची संख्या कमी झाली किंवा त्यांचा जोम खुंटला कीं ह्या कार्यांच्या नाड्यां आवळत चालल्या. ह्या बाजूनें विचार केला ह्मणजे लेखकाचें ह्मणणें जास्त पटणारें आहे असें मला वाटतें."

त्या दोघांचें बोलणें माधव शांततेनें ऐकून घेत होता. विनायकहि स्तब्ध होता. भालचंद्र पुढें ह्मणाला–

" श्रीमंतांनीं ह्या कामांत पुढाकार घेतल्याशिवाय हें कार्य होणारें नाहीं. कारण इतरांचे, मग ते कितीहि सुशिक्षित वा विद्वान् असोत, या-लोकांवर वजन पडणार नाहीं. ह्याला कारणें बरींच आहेत. एक तर अशा तऱ्हेचें शिक्षणकार्य—जात व धंदा यांचा विचार न करतां सुरूं असणारें सार्वत्रिक शिक्षण–हें पाश्चात्य समजलें जातें. पूर्वपरंपरेनें तें आमच्या लोकांच्या अंगीं खिळलेलें नाहीं. तेव्हां तें नवीनपणानें त्यांच्या अंगीं खिळवावयाचें ह्मटलें ह्मणजे ते समाजांत–आमच्या समाजांत वजन अ-सणाऱ्यांच्याकडूनच खिळविलें गेलें पाहिजे. ह्या दृष्टींचें समाजांत वजन अस-लेले लोक ह्मटले ह्मणजे श्रीमंत लोक हेच होत. त्यांच्या श्रीमंतीमुळें जन्मसिद्ध वर्णश्रेष्ठत्वापेक्षां त्यांचा समाजांत दर्जा वरच्याप्रतीचा असतो. व ह्या दर्जानेंच त्याचें समाजांत वजन असतें. हा सार्वत्रिक शिक्षणप्रसाराचा गाडा त्यांनीं ए-कदां हाकण्यास सुरवात केली ह्मणजे इतर श्रीमंत लोकहि त्यांना भराभर ये-ऊन मिळण्याचा संभव असतो. व अशातऱ्हेनें एकदां हें कार्य सुरूं झालें ह्मणजे विद्वान् व कार्यकर्त्या व श्रीमंत मंडळींची आपोआप सांगड पडून हें कार्य त्वरेनें व चोखपणानें उरकणारें आहे."

" भालचंद्रराव तुम्ही म्हणतां तें अगदीं खरें–" अद्यापपर्यंत स्वस्थ असलेला माधव म्हणाला. " कारण श्रीमंताचा श्रीमंताकडे ओढा साहजिक असतो. व्यसनाचरणांत जर ते एके ठिकाणीं जमूं शकतात किंवा जमतात तर अशा ठि-काणीं तें कां जमूं नये ?"

" माधवराव, पण हा शक्याशक्यतेचा प्रश्न नसून वस्तुस्थितीचा आहे." भालचंद्र ह्मणाला.

" दुसऱ्या गोष्टीसाठीं ते एके ठिकाणीं जमतात, नेहेमीं जमतात किंवा जम-

विले जातात. पण अशा कार्यांसाठीं मात्र ते अद्यापि एके ठिकाणीं जमल्याचें ऐकिवांत नाहीं, एवढाच काय तो फरक आहे ! " विनायक ह्मणाला.

" आणि ते लवकर जमतील किं नाहीं हाहि प्रश्न आहे " भालचंद्र ह्मणाला.

" कां बरें ? " माधवानें पृच्छा केली.

" म्हणजे त्यांच्या अज्ञानामुळें, व इतर कांहीं वृत्तींमुळें ! जे समजंस आहेत त्यांना या कार्याचें इतकें महत्त्व वाटत नाहीं. जे मध्यमप्रतीचे आहेत त्यांना त्याचे महत्त्व कळत नाहीं व जे अशिक्षित आहेत त्यांना कांहींच नाहीं. कित्येकांत कर्तृत्वशक्ति नाहीं तर कित्येकांत आळस भरलेला आहे व कित्येक सुखासीन आहेत तर कित्येक दुर्मार्गाच्या रस्त्यानें जात आहेत. मिळून सार काय तर ह्या लोकांत जेवढी जागृति असावयास पाहिजे तेवढी नाहीं. "

थोड्यावेळानें तो पुढें म्हणाला—

" माधवराव, माझ्या बोलण्याचा राग मानूं नका. पण ओघानें आलें म्हणूनच बोललों. ह्या लेखकाच्या ह्मणण्याला दुजोरा देण्यासाठीं आपण तुमचेंच उदाहरण घेऊं या. तुह्मीं श्रीमंत आहां; आणि आपल्या श्रीमंतीचा उपयोग कांहीं कालपर्यंत तुह्मीं अयोग्य मार्गानें केलेला आहे. मग तुमच्या वाईट आचरणावरुन तुह्मीं स्वतः दोषी असा किंवा तुमचें मित्रमंडळ दोषी असूं दे. त्याचा आपणांस विचार कर्तव्य नाहीं. ही जशी तुमची स्थिति तशीच इतरांची स्थिति ! आतां तुह्मीं सुधारलांत ती गोष्ट निराळी. व तुमच्याप्रमाणें ह्या मंडळींत असें सुधारणेंहि फार कठीण; कारण मनुष्याच्या मनावर एकदा कां मोह पडला ह्मणजे तो मोह दूर करणें फार कठिण. आणि तो सहसा दूर होत नाहीं. आमच्या श्रीमंत मंडळींच्या मनावर हा जो अयोग्य मोह पडतो, तो न पडतां योग्य—जनकार्याचा योग्य मोह—जेव्हां त्यांच्या मनावर पडेल तेव्हांच त्यांच्या हातून अशी कार्ये घडतील. अंकुशाचें मारानें जसें हत्तीला वळणावर आणावयाचें असतें, त्याचें कार्य कोणतें हें जसें त्यास समजावून द्यावयाचें असतें तसें अशा छापी लेखांनीं ह्या श्रीमंतांना जागें करावयाचें असतें. "

" पण अंकुशाचा मार प्रत्यक्ष असतो. "

" आणि अशा लेखांचा पर्यायाचा असतो. श्रीमंताव्यतिरिक्त समाजाला जागें करून त्याच्यांतून त्याच्या कर्तव्याची जाणीव त्यांस द्यावयाची असते. " भालचंद्रानें हंसत हंसत माधवाचें वाक्य पुरें केलें.

प्रकरण ९ वें.

वडिलांची अखेरची इच्छा.



यद्याप्रमाणें माधव वयांत येऊन वडिलार्जित सर्व इस्टेट त्याच्या ताब्यांत आली. त्याचें स्वातंत्र्य त्याला मिळालें. जगांत वागण्याची जवाबदारी त्याची त्याचेवरच येऊन पडली. तो स्वतःचा मुखत्यार वनला.

त्याच्या हिताची काळजी श्रीनिवासरावांना असणें योग्यच होतें. पण ही त्यांची काळजी नुसती नांवाची नव्हती तर खऱ्या पितृवात्सल्याच्या कळकळीची होती. माधवाचें आयुष्य चांगल्या तऱ्हेचें जावें, अशी त्यांची इच्छा होती व आपल्या हयातींत त्याप्रमाणें ते काळजी घेत असत. कदाचित् तसाच प्रसंग आल्यास आपल्या पश्चात् देखील त्याची योग्य काळजी घेतली जावी ह्मणून त्यांनीं व्यवस्थाहि करून ठेविली होती. संपत्ति, तारुण्य व स्वातंत्र्य ह्या त्रिदोषांचा मिलाफ झाला ह्मणजे मनुष्यप्राणी उन्मत्त बनून बहुधा व्यसनपंकजांत रुततो. तो स्वच्छंदी बनून आपल्या अमोल आयुष्याचा वाटेल तसा अपव्यय करित असतो. अशा स्थितींत त्याला खरें उपदेशामृत पाजण्याची जबाबदारी सुशिक्षणांतर्गत त्याच्या नैतिक भावनेवर किंवा त्याच्या असेष्टांवर अवलंबून असते. आपल्या हयातींत त्यांनीं माधवास शिक्षणक्रमांत घातलेलें होतें. व आपल्या पश्चात् जरी खरे आप्तसंबंधी नाहींत तरी त्या प्रमाणेंच असणाऱ्या गोविंदरावाच्या हवालीं त्यांनीं त्यास केलेलें होतें. शिवाय तो सज्ञान झाल्यानंतर त्याच्या खऱ्या आयुष्यक्रमास सुरवात होण्याच्या सुमारास खऱ्या प्रेमाच्या उपदेशानें भरलेलें एक पत्र त्यांनीं त्याचे साठीं लिहून ठेविलें होतें. व तें ह्या वेळींच त्याच्या हातांत पडावें अशी त्यांनीं व्यवस्था करून ठेवलेली होती. माधव ज्या दिवशीं सज्ञान झाला त्याचदिवशीं तें त्याच्या हातांत पडलें. पूज्य पित्यानें लिहून ठेवलेलें पत्र ह्मणून माधवानें तें मोठ्या आस्थेनें वाचावयास सुरवात केली.

" चि. रा. माधवराव यांस अ. आ. उपरी–हें पत्र मी तुला लिहून ठेवावयास पाहिजेच असें नाहीं. कारण मी ह्यांत जो तुला उपदेश करणार तो सुशिक्षण, सुसंगती ह्यांनीं अगोदरच तुझ्या मनांत बिंबला असेल. तरीपण अपत्यस्नेहाच्या अंधप्रीतीनें मला राहावत नाहीं व ह्यामुळेंच त्याची योग्यता मला जास्त वाटते. असो. खालील मजकूराचा नीट विचार कर व त्याप्रमाणें योग्य आचरण ठेवून आपल्या कुलाचा लौकिक वाढव !

"जगांत जन्मास येऊन आपणांस कांहीं करावयाचें असतें. व्यक्तिचें, कुटुंबाचें, समाजाचें, देशाचें व अखिल मानवयोनीचें आपणांस कांहीं तरी ऋण फेडावयाचें असतें याची जाणीव प्रत्येकानें आपल्या अंतःकरणांत बाळगावयास पाहिजे. व अशी जाणीव जो कोणी बाळगित नाहीं त्याचें जीवित व्यर्थ होय। सृष्टीक्रमानुसार जन्म झाला, आणि तो आला तसाच गेला–स्वार्थ साधला नाहीं, आणि परमार्थहि साधला नाहीं. स्वतःचें कल्याण करून घेतलें नाहीं व दुसऱ्याचेंहि केलें नाहीं. कुडींत चैतन्य आहे तोंपर्यंत त्याचा सदुपयोग करून तें जगास भासविलें नाहीं. महत्वाकांक्षा धरली नाहीं. किंवा कर्तबगिरीहि गाजाविली नाहीं तर त्या जन्माचें ह्या मानवी जीविताचें–महत्व तें काय ? मानवजन्म सर्वांत श्रेष्ठ समजतात, आणि हा त्याचा श्रेष्ठपणा त्याच्या विशिष्ट बुद्धिमत्तेवर, त्याच्या कर्तबगारीवर अवलंबून असतो; असें आहे तर त्या मानवजन्माची महती कायम ठेवणाऱ्या कृतींचा प्रत्येक मनुष्यास अंगीकार करावयास नको काय ! अंगीकार करावयास पाहिजे. इतर योनींपेक्षां मानवी योनी श्रेष्ठ आहे हें कृतिसिद्ध तत्व अबाधित ठेवण्यासाठीं त्याला त्यांचा अंगीकार करावयास पाहिजे. पण पुष्कळ वेळां मनुष्यप्राणी त्यांचा अंगीकार करित नाहीं. आळस, अज्ञान यांनीं मनुष्यप्राणी मोहावलेला असला ह्मणजे तो कर्तव्यशून्य बनत असतो. ह्यांतच संपत्तीमूल सुखासीनतेची भर पडलेली असली म्हणजे तर विचारावयासच नको. संपत्तीच्या सुस्थितीनें त्याच्या अज्ञानांत भर पडून त्याची आळशी वृत्ति अनीतिमय सुखलोलुप बनते. व त्याच्या बिनमोल आयुष्याचा व सर्व शक्तिमान् संपत्तीचा कुमार्गानें सारखा ऱ्हास होऊं लागतो.

"असें जरी आहे तरी हें चक्र फिरविण्यास, मानवी आकांक्षा वाढवून त्याच्या कर्तबगारीस चलन देण्यास शिक्षणासारखें दुसरें साधन नाहीं. मनुष्याच्या बाल-

पणच्या स्वयंसिद्ध जिज्ञासावृत्तीचा शिक्षणानें परिपोष होतो. त्याचें मन आशाखोर बनतें व सुस्थितीकडे तें आपोआप धांव घेऊं लागतें. वाचन, मनन, सहवास व प्रवास इत्यादि प्रकारांनीं हें मन सुसंस्कृत बनून हळूंहळूं आपल्या स्थितीचें निरीक्षण करूं लागतें. आपलें व दुसऱ्यांचें निरीक्षण करण्यापर्यंत मजल आल्यानंतर आपल्या सुस्थितीसाठीं तें आपोआप मार्ग शोधूं लागतें व नवीन मार्गाची म्हणजे कर्तबगारीची कांस हळूंहळूं धरूं लागतें. कर्तबगारीच्या क्षेत्रांत उतरल्यानंतर भोंवतालची परिस्थिति नीट लक्षांत येऊन त्याच्या कर्तव्याची सरी सुरुवात होते.

"हल्लींच्या काळांत कर्तबगारीच्या मनसोक्त विहारास आडकाठी घेणारी गोष्ट म्हटली म्हणजे जीवनकलहाची तीव्रता. शिक्षणक्रम आटोपून युवक जगांत येतो तो बहूधा एकटा येण्याऐवजीं दुकटा–सहकुटुंब–असा येतो. बालविवाहपद्धतीनें पायांत अडकवलेल्या बिडीनें तो खराखुरा कैदी बनलेला असतो, त्याची स्वतंत्रता गेलेली असते, व त्याच्या कर्तबगारीला स्वतंत्रतेविना हरताल लागलेली असते. चार दोन पैसे मिळविण्याचा सुलभ व सत्वर असा मार्ग संसार थाटण्यासाठीं–जीवनकलहाची तीव्रता कशी तरी शमविण्यासाठीं–त्याला शोधावा लागतो. याप्रमाणें त्याचें स्वातंत्र्य जाऊन परिस्थितीचा त्याला दास बनावें लागते. अशा रीतीनें कर्तव्यशून्य संसारचक्राला एकदां तो जुंपला गेला कीं तो बहूधा कायमचाच जुंपला गेला म्हणून समजावें.

"अशी स्थिति तुझी असणार नाहीं. अनिष्ट चालीरीतीनां अंधभक्तीनें कवटाळून मी तुझें लग्न लेलेलें नाहीं, व माझ्या पश्चात् तूं सज्ञान होईपर्यंत तें होऊं नये अशी मी व्यवस्था करून ठेविलेली आहे. संपत्तीच्या अभावीं तुला पोटासाठीं नोकरी करणेंहि भाग नाहीं. तुला शिक्षण दिलेलें असून शिक्षणानें येणाऱ्या महत्वाकांक्षेसाठीं करावयास लागणाऱ्या प्रयत्नास तुला स्वतंत्र व संपन्न असें ठेविलें आहे. संपत्तीचें चांगलेंच पाठबळ असल्यानें या भौतिक कालांत तुझा सामाजिक दर्जा चांगलाच वाढणारा असून तुझ्या शब्दाला अगर कृतीला महत्त्वहि मिळणारें आहे. तेव्हां अशा स्थितींत, समाजाचें व देशाचें आपल्यावरील ऋण फेडण्यास त्वां तयार व्हावेंस हेंच तुला योग्य आहे व माझीहि तशीच इच्छा आहे.

"मात्र, याप्रमाणें देशसेवक बनतांना तूं कोणत्या मार्गानें जावेंस हें माझ्या समजुतीप्रमाणें मी तुला सुचवून ठेवितों.

"इतर देशापेक्षां आपल्या देशाचें महत्त्व खरोखरीच अधिक आहे. त्याच्या जोडिला वसविण्यास जगांत दुसरा कोणताही देश नाहीं. आर्थिक व परमार्थिक प्रगति जर कोणच्या देशांत झालेली असेल तर ती ह्या हिंदुस्थानांतच होय. जगाच्या पुरातन इतिहासाचें जर मनन केलेंस तर ही गोष्ट स्पष्ट दिसण्या-सारखी आहे. शिक्षण असलें ह्मणजे ज्ञान वाढतें. ज्ञान असलें ह्मणजे महत्वा-कांक्षा वाढते. महत्वाकांक्षा असली ह्मणजे कर्तबगारी येते व कर्तबगारी असली ह्मणजे शोधकता अंगीं बाणते. ह्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे पूर्वी हिंदुस्थानची जी उन्नति झाली तिच्या मुळाशीं शिक्षण–समाजांतील विचार करण्याची शक्ति–हें होतें हें उघड होऊन इकडील समाज सुशिक्षित होता ह्मणूनच ही त्याची प्रगती झाली हें स्पष्ट होय. त्याचप्रमाणें हल्लींची त्याची निरक्षरता पाहिली ह्मणजे ही त्याची अधोगती कां झाली हें समजण्यासारखें आहे.

"हल्लीं देशांत देशहिताच्या अनेक संस्था निघालेल्या असून त्यांचीं कार्यें व ध्येयेंहि निरनिराळीं आहेत. धार्मिक, औद्योगिक, सामाजिक, राजकीय वगैरे अनेक बाजूंनीं ह्या मंडळ्या कार्यें करीत आहेत. परंतु त्यापासून ह्मणण्या-सारखा त्वरित फायदा होणारा आहे असें मला वाटत नाहीं. सर्व चळवळीचा मूलपाया जो समाज तो जर अशिक्षित–अक्षरशत्रू आहे व तुमच्या चळवळीचा हेतु किंवा आपला नफा तोटा समण्याइतकी जर त्याची मानसिक उन्नती झालेली नाहीं तर ह्या सर्व चळवळींचा फायदा कोणता ? समाज जर अशिक्षित आहे, त्याची ग्रहणशक्ति व विचारशक्ति नष्ट झालेली असून तो रूढीबद्ध बनलेला आहे तर बालविवाह किंवा जातीभेद ह्यांच्यां अनिष्ट परिणामांची त्यांच्या कानींकपाळीं ओरड करण्यापासून काय फायदा ? ह्यापासून फायदा होण्या-ऐवजीं उलटे अनिष्ट परिणाम मात्र झालेले आहेत. ज्या समाजाच्या कल्याणासाठीं हे लोक धडपड करीत असतात त्यांची व ह्या समाजाची ताटातूट मात्र झालेली दिसते. ज्या समाजाला बरोबर घेऊन जाण्याची ह्यांची इच्छा असते त्यांच्या बरोबर तो येत तर नाहींच पण उलटा हट्टानें मागें रहातो व त्यांच्याहि पुरोगामी

धोरणाला मार्गें खेंचतो. अशा स्थितींत अशा तऱ्हेच्या देशकार्यांत पडण्यापेक्षां समाजाची निरक्षरता घालविण्यासाठीं तूं खटपट करावीस. तनमनधन सर्वस्व अर्पण करून ह्या शिक्षणविषयक चळवळीस तूं नेटानें पुढें लोटावेंस एवढीच माझी इच्छा आहे. हाच माझा तुला उपदेश आहे. नाहींतर... लिहवत नाहीं पण लिहितोंच ! इतर लक्ष्मीपुत्रांप्रमाणें अनीतीला कवटाळून क्षणिक आनंद देणाऱ्या भासमान कुसौख्याच्या मार्गें लागून आपल्या सर्वस्वाचा ऱ्हास करावास म्हणजे झालें ! पण असें तुझ्या हातून होणार नाहीं अशी मला खात्री आहे. असें केलेंस तर तुझा पिता या नात्यानें मृत झालेल्या माझ्या आत्म्याला त्यापासून बरें वाटणार नाहीं हें तूं नीट लक्षांत ठेव. माझ्या सदिच्छेला किंवा तुझ्या लौकिकाला काळोखी फांसली जाणार नाहीं अशाच तऱ्हेनें तूं वागशील अशी मला खात्री आहे, व माझी अखेरची इच्छाहि हीच आहे. जास्त काय लिहूं ! कळावें हे आशिर्वाद.

तुझा शुभ हितेच्छु पिता
श्रीनिवासराव."

" बाबा, तुमची अखेरची इच्छा कधींहि विफल होणार नाहीं ! " गहिंवरलेल्या माधवाचे तोंडातून अचानक उद्गार बाहेर आले !

प्रकरण १० वें.

बंदरावर.

"मी तुला सांगावें असें नाहीं. तूं सुज्ञ आहेस. समंजस आहेस. तुला सर्व कांहीं समजतें. परदेशांत जें मी तुला पाठवित आहें तें कांहीं विशिष्ट हेतू धरूनच पाठवित आहें. आपले घरीं खाण्यापिण्यास कमी आहे किंवा तुला आपल्या चरितार्थाचा मार्ग सांपडणार नाहीं म्हणून कांहीं मी तुला इतक्या लांब पाठवित नाहीं. सिव्हिलियन होऊन नोकरी करून तूं आपलें पोट भरावेंस येवढ्याच साठीं, ह्याच आर्थिक हेतूनें मी तुला तेथें पाठवित नाहीं. तुला सिव्हिलियन करण्यांत माझा निराळा हेतू आहे. आणि तो कोणचा हें आतां तुला सांगण्याची पाळी आलेली आहे. यापुढें तुला अज्ञानांत ठेवणें योग्य नाहीं." प्रभाकरराव म्हणाले.

आजच्या बोटीनें भालचंद्र विलायतेस जाणार होता. त्याला पोंहचविण्यासाठीं ते मुंबईस आलेले होते. भालचंद्र त्यांचें बोलणें शांततेनें ऐकून घेत होता. ते पुढें म्हणाले—

"आपल्या ब्राह्मणाच्या कपाळीं नोकरीचा किंवा वकिली वगैरे सारख्या धंद्याचा शिक्का मारलेला दिसतो. ह्या कांहीं ठराविक धंद्याशिवाय ब्राह्मणांनीं हालचाल केलेली दिसत नाहीं. आणि सध्यांचा काल असा आहे कीं तशी हालचाल करणें त्यास शक्यहि नाहीं."

त्यांच्या बोलण्यांत व्यत्यय आणून त्यांचें बोलणें भालचंद्रास सोडतां आलें असतें, पण तसें त्यास करावयाचें नव्हतें.

"अशा स्थितींत वकिलीसारख्या धंद्यांत पडून लोकांची मर्जी संपादून दिखाऊ स्वतंत्रतेनें पण खऱ्या पारतंत्र्यानें कज्जेदलालीचा पैसा मिळविणें मला

तर पसंत नाहीं. ह्या धंद्यांत खरा मान नाहीं किंवा कांहीं सौख्याहि नाहीं. नेहेमीं जिवाची धडपड चालूं असते. पैसे घेतल्यामुळें पक्षकारांचे आम्ही मिंदे झालेलें असतों व त्यांचें काम करण्याठीं आम्हांला सत्रा संघानें बाळगावीं लागतात. खऱ्या स्वतंत्रतेचा त्यांत आम्हांस उपभोग ध्यावयास मिळत नाहीं. आफिसर लोकांशीं धंद्यामुळें नेहेमी प्रसंग येत असल्यानें त्यांची मर्जी आम्हांस संभाळावी लागते. नुसतें येवढेंच नाहीं तर हलक्या सुलक्या कारकुनांशीं व पट्टेवाल्याशीं देखील आम्हांला सलोख्यानें रहावें लागतें. मानी स्वभावाला ही गोष्ट रुचणारी नसते. पण त्याला इलाज नाहीं. ह्याचा मला पूर्ण अनुभव आहे. तशी स्थिति तुला अनुभवावयाला लागूं नये ह्मणून तुला सिव्हिलियन करण्याची माझी इच्छा आहे. आम्हाला जेवढा मान नाहीं तेवढा जनतेंत ह्यांना आहे. पुन्हां पेशा सुखाचा व त्या मानानें ऐपतहि चांगली ! सरकार दरबारांत वजन व लोकांतहि वजन ! तेवढ्यासाठीं कोणाची हांजी हांजी करावयास नको की कांहीं नको ! असो. माझ्या ह्या हेतूची परिस्फुटता मी अद्यांप तुझ्याजवळ केली नव्हती ती आतां केली. आतां यापुढें मात्र माझा हेतू तडिला नेणें तुझ्या हातीं आहे; कारण तूं परदेशांत जात आहेस. येथून तेथें तुझ्यावर देखरेख ठेवणें मला शक्य नाहीं. शिवाय येथील व तेथील परिस्थिति निराळी ! अल्लड तरुणाला मोहपाश पडणें हें तिकडे फार सुलभ. त्यांच्या व आपल्या नीतिविषयक कल्पना व त्यांचा आचार यांत फार फरक. ह्यामुळें चांगले चांगले तरूण तिकडच्या मोहपाशांत अडकतात व कर्तव्यविन्मुख होतात. तसें मात्र तूं करूं नकोस ह्मणजे—"

" असें कसें होईल बाबा ? शिवाय माझ्यावर देखरेख करावयाला डॉ. विश्वनाथराव आहेतचना ! "

" अरे येथून जेवढीं मुलें तिकडे जातात त्यांच्यावर देखरेख ठेवण्याची व्यवस्था त्यांचे आईबापांकडून होतच असते. "

" तें कांहीं असलें तरी मला पाठविल्याबद्दल ह्या बाजूनें पश्चात्ताप करण्याची पाळीं आपणांस यावयाची नाहीं. "

त्यांचें बोलणें चाललें आहे इतक्यांत लक्ष्मी व कमला तेथें आल्या. परंतु त्या दोघी आंत येतांच लक्ष्मी मागच्या पायानेंच मागें झाली व झटकन् तेथून निघून गेली. ती गेली असें पहातांच कमलेनें मागें वळून पाहिलें. तिनें तिला परत येण्यासाठीं हांक मारली. पण ती आली नाहीं.

कमलेच्या मनांत निराळाच तर्क आला.

लक्ष्मी तेथून परत गेली ती साध्या भावनेनें गेली होती. कमलेच्या मनांतील तर्काची तिला अंधुक देखील कल्पना नव्हती.

प्रभाकररावांनीं त्या दोघींना हांका मारल्या. हांके बरोबर कमला आली. लक्ष्मी आली नाहीं हें पाहून त्यांनीं तिला ती न येण्याचें कारण विचारलें.

" ती मजबरोबर येथपर्यंत आली. पण लागलीच मागें गेली. मी तिला हांक मारली पण ती कांहीं आली नाहीं. " चेष्टेच्या स्वरांत व भालचंद्राकडे सहेतूक दृष्टीनें पहात ती म्हणाली.

इतक्यांत विनायक व माधव हेहि तेथें आले. समवयस्क मित्रमंडळी एके ठिकाणीं जमलेली पाहून प्रभाकरराव तेथून जाण्यास निघाले. जातानां मात्र आपल्या उपदेशाची आठवण ठेवण्यास त्यांनीं भालचंद्राला पुन्हां कळकळीनें सांगितलें.

प्रभाकरराव बाहेर पडल्यावर मंडळीच्या चोलण्यास सुरवात झाली. माधव तेथें असल्यानें कमलेला जरी चमत्कारिक वाटत होतें व एरव्हीच्या स्थितींत त्याच्या देखत बोलणें जरी तिला जड गेलें असतें तरी लक्ष्मीबद्दल तिच्या मनांत आलेल्या तर्कानें ती उपरोधीक स्वरानें भालचंद्राची थट्टा करूं लागली. भालचंद्राला आपल्या भावासारखेंच लेखीत असल्यानें तिच्या बोलण्यांत जरी विनय होता तरी संकोच नव्हता.

" भालचंद्रराव, येथून आपला पाय काळजी शिवाय निघतोना? "

" मला कसली आली आहे काळजी ? "

" कसली म्हणजे ! पण नको दादाच्या देखत सांगितलें तर तो तुमची थट्टा करील. "

" हं, हें काय चुवा प्रकरण आहे ? " विनायकानें भालचंद्रास विचारलें.

" मला कांहींच माहीत नाहीं ह्या काय म्हणतात तें ! "

" बरोबर आहे. तें माहित असलें, नव्हे त्याचा सारखा जप चालला असला तरी तें नाहीं असें म्हणावेंच लागतें. " हंसत हंसत मुद्दाम त्याच्याकडे पहात ती म्हणाली.

विनायक व माधव यांना तिच्या बोलण्याची अंधूक कल्पना आली होती तरी त्याचा संदर्भ त्यांच्या ध्यानात येत नव्हता, तेवढ्यासाठीं ते दोघेजण तिच्या

कडे व मालचंद्राकडे पहात होते. अशा तऱ्हेनें पहात असतां तिच्या व माधवाच्या दृष्टीचें अकस्मात् मिलन झालें! माधवास जिज्ञासा लागली असल्यानें त्याची दृष्टि खोचदार होती. दोघांच्या दृष्टीचें मिलन झाल्याबरोबर लज्जेनें आपला पगडा कमलेवर बसविला. तिनें आपली दृष्टि वळविली तरी माधव तिच्याकडे पहातच होता.

" भालचंद्र, ताई काय म्हणते ? " पाठीवर थाप मारून विनायकानें त्याला विचारलें.

विनायकाच्या विचारण्यांतील चेष्टचा स्वर ओळखून त्याला ही गोष्ट माहित असावी असें कमलेला वाटले. त्याच्या बोलण्याचा भालचंद्रावर काय परिणाम झाला हें पाहण्यासाठीं तिनें आपली नजर वर केली तों ती पुन्हां माधवाच्या अचल दृष्टीस मिळाली तो आपल्याकडे सारखी टक लावून पहात आहे हें पहातांच कमलेची ढांसळलेली शांतता पार ढासळली. तिची वृत्ति बावरली! तेथून जावें असें तिला वाटूं लागलें व आपली स्थिति कोणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून ती तेथून झटकन् बाहेर पडलीहि !

" ताई, अग सांगितल्याशिवाय जातेस कोठें ? भालचंद्र कांहीं तेवढ्यासाठीं तुझ्यावर रागावणार नाहीं. " विनायक म्हणाला.

त्याला उत्तर देण्यास देखील ती तेथें राहिली नाहीं.

" अरे कमलाताईच कशाला हाव्यांत ? मी तुला सांगतों काय समजुतीचा घोटाळा उडाला आहे तो ! " हंसत हंसत भालचंद्र म्हणाला.

" मी व लक्ष्मी एकमेकांवर अनुरक्त झालेलों आहोंत हा संशय घेऊन त्यावर ही सर्व इमारत कमलाताईनीं उभारली आहे. "

" म्हणजे ! " अनपेक्षित गोष्ट कानीं पडल्यामुळें विनायकाचे तोंडांतून आश्चर्योद्गार बाहेर पडले.

माधवाच्या मनास धक्का बसल्यासारखें झालें. मग तो नैसर्गिक मत्सरानें बसला किं काय कोण जाणें !

" म्हणज काय ? माझ्या सांगण्यावर तुझा विश्वास बसत नाहीं. माझा पेशा कोणचा, मी कोणच्या कार्यासाठीं धडपड करित आहें हें तुला ठाऊक असतां अशा भानगडींत मी गुंतेन असें तुला वाटते काय ! " भालचंद्र बोलला.

विनायक यावर कांहींच बोलला नाहीं.

" काय ? माझ्यावोलण्यावर तुझा विश्वास वसत नाहीं ! मी जें सांगतों तें तुला खरें वाटत नाहीं ? "

" माझा तुझ्यावर विश्वास आहे. " शांत स्वरानें विनायक म्हणाला.

" तूं जरी म्हणत आहेस तरी मला तें खरें वाटत नाहीं. हा प्रकारच असा कांहीं चमत्कारिक असतो कीं...."

" असेल. पण आपल्याला त्याच्याशीं काय करावयाचें आहे. निदान सध्यां तरी कर्तव्य आहे, असें मला वाटत नाहीं. शिवाय हा प्रश्न ज्याचा त्याचाच असल्यानें दुसऱ्यानें त्यामध्यें होतां होईल तितकें न पडणें चांगलें. "

" कांहींका म्हणेनास ! पण ही तुम्हां सर्वांची समज चुकीची आहे हें मात्र माझें म्हणणें ध्यानांत ठेव. असो हा विषय आतां इतकाच राहूं दे. त्यालाच महत्व देऊन राहिलेल्या थोड्या वेळांत वाटाघाट करण्याइतकी त्याची योग्यता आहेसें मला वाटत नाहीं. " भालचंद्र म्हणाला.

त्याच्या स्वरांत वरपंगीपणा दिसत नव्हता. तरी माधवास त्याचें म्हणणें खरें वाटलें नाहीं. लक्ष्मीबद्दल त्याच्या मनांत प्रेम वसत असून आमच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठींच तो कांहीं तरी बतावणी करत आहे असाच त्याच्या मनाचा ग्रह झालेला होता.

" तुझ्या कल्पनेप्रमाणें तुला विलायतेला तर जावें लागत आहे. "

" होय, त्याला काय इलाज आहे. आपले बेत पार पाडण्यासाठीं बाबांच्या हेतूप्रमाणेंच वागण्याचें मला सोंग घेतलें पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. तेथें गेल्यानंतर आतां पुढें कसें काय जमतें तें पहावें. "

" भालचंद्र, तूं तर जाणारच. तेथें गेल्यानंतर तुला आपल्या इच्छेप्रमाणें वागावयास सांपडेल. पण माझ्या बेताचें..."

" माझ्या इच्छेप्रमाणें जसें माझें जमून येत आहे तसें तुझेंहि जमून येईल. "

" जमून येईल का जमवून आणावें लागेल, कोणास ठाऊक ? "

" असं निराशेचे उद्गार काढूं नकोस. नाहीं जमून आलें तर जमवून आणावें. मव तेवढ्यासाठीं तुला थोडाबहुत त्रास पडेल खरा पण त्याला इलाज नाहीं. मनांत असलेल्या कार्याच्या पूर्व तयारीं पैकीं हा एक भाग समजावा म्हणजे झालें. आतांपासूनच जर तूं असा हातपाय गाळावयाला लागलास तर तुझें पुढें कसें व्हावें ? "

" तसें नव्हेरे. मी हातपाय गाळनों अशांतली स्थिति नाहीं. तूं जाणार, तेव्हां तुझ्या सहकारित्वाला मी मुकणार ह्मणून मला वाईट वाटतें. "

" मी जरी गेलों तरी तुझें व माझ पत्रव्यवहारानें सहकारित्व रहाणारचना ? शिवाय हे माधवराव आहेत. माझ्यापेक्षां त्यांची स्थिति निराळी आहे. ते स्वतंत्र आहेत, लक्ष्मीसंपन्न आहेत. त्यांची मदत तुला चांगलीच फायद्याची होईल. "

माधवाचें त्यांच्या बोलण्याकडे असावें तितकें लक्ष नव्हतें. तरीपण " हो हो, मी मदत करीन " असें तो ह्मणालाच !

" माधव तूं ह्मणतोस पण मला नाहीं वाटत..."

" कां बरें ? " भालचंद्रानें मध्येंच पृच्छा केली.

" मला नाहीं वाटत, बाबांजवळ तेवढें तुझें वजन पडेलसें. "

" आणि माझें पडलें असतें कां ! "

" तुझें पडलें असतें कीं नाहीं हें मी जरी खात्रीनें सांगूं शकत नाहीं तरी तें माधवाचें पडणार नाहीं हें मी खात्रीनें सांगूं शकतों. " भालचंद्राकडे वळून विनायक ह्मणाला.

या मुद्याची विशेष वाटाघाट करणें भालचंद्रास इष्ट वाटत नव्हतें. माधवाचें चिंतामणरावावर वजन कां पडणार नाहीं या विनायकाच्या म्हणण्याचा अर्थ त्याच्या ध्यानांत आलेला होता व त्याच मुद्याचा जास्ती खल केल्यास माधवास वाईट वाटण्याचा संभव होता ह्मणून त्यानें बोलण्याचा रोंख फिरविला.

" आतांच कशाला त्याची वाटाघाट ! वेळ येईल तेव्हां पहातां येईल समजलास विनायक ? मग मी सांगेन तुला कसें काय करावयाचें तें ! "

यानंतर त्यांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. थोड्या वेळानें प्रभाकरावहि तेथें आले.

" भालचंद्र,हीं घे पत्रें.तिकडील लोकांस हीं दिलेलीं आहेत.हें आँ. शंभूराव यांचें पत्र असून आपल्या देशाची कळकळ वाहणाऱ्या तुझ्यासाठी त्यांनीं ब्राऊनसाहेबांस तें दिलेलें आहे. हीं सर्व पत्रें ज्यांचीं त्यांना पोहचतीं करून त्यांच्याशीं ओळख करून घे. "

इतक्यांत जेवण तयार झालें आहे असें हॉटेलच्या मनुष्यानें येऊन सांगितलें. सर्व मंडळी जेवावयास गेली.

योग्य वेळ होतांच मंडळी बंदरावर जाण्यासाठीं निघाली. बंदरावर पोंहचतांच प्रभाकररावांनीं पुन्हां भालचंद्रास आपल्या सांगण्याची आठवण केली व त्यास नीट जपून वागण्यासाठीं व कज्जकळीनें अभ्यास करण्यासाठीं उपदेश केला. त्यांचें बोलणें ऐकून घेतल्यावर भालचंद्र त्यांस म्हणाला–

" बाबा, माझ्याबद्दल तुम्हीं यत्किंचित्हि काळजी धरूं नका. आपल्या उपदेशास व नांवलौकिकास साजेल असेंच माझें तेथील आचरण राहील. "

जाण्याची वेळ झालेली पाहून त्यानें वडिलांच्या पायांवर डोकें ठेविलें. व त्यांचा निरोप घेतला. नंतर विनायक, माधव, लक्ष्मी व कमला यांचे निरोप घेऊन तो लॉंचमध्यें बसून निघाला.

ह्या सर्व मंडळींचा बंदरावर येण्याचा विषय भालचंद्र हाच असल्यानें साहजिक सर्वत्रांची दृष्टि त्याचेकडेच लागलेली असणें योग्य होतें. त्याप्रमाणें लक्ष्मीहि त्याचेकडे सारखी बघत होती. तिचें तें बघणें किंवा तिच्यासारख्या उपवर कुमारिकेनें भालचंद्रासारख्या युवकासच आपल्या दृष्टीचा विषय करणें हें त्रयस्थांस, निराळ्या तऱ्हेचें उत्कट प्रेम–लुब्धकतेचें चिन्ह भासणारें होतें–परंतु खरें पाहूं गेलें असतां ती त्या दृष्टीनें भालचंद्रास लेखीत नव्हती कीं तिच्या मनांत त्याच्याबद्दल पूज्यभाव–विषयीप्रेमरहित पूज्यभाव–होता आणि त्या पूज्यभावाच्या कौतुकानेंच ती त्याच्याकडे पहात होती. हाच विचार तिच्या मनांत असल्यानें लज्जा अगर लज्जाजनित विनयहि तिला शिवलेला नव्हता. आपल्या अचल दृष्टीनें ती त्याच्याकडे पहात होती. लॉंचमध्यें बसून तो बोटीवर गेल्यानंतर आणि बोट दृष्टिआड होऊन तो दिसेनासा होऊन मंडळी परत मागें वळेपर्यंत सुद्धां ती सारखी त्याच्याकडे पहात होती. तिच्याबरोबर कमला होती, पण तिच्या मनांत निराळाच तर्क आला असल्यामुळें तिनें ह्या बाबतींत परत घरीं येण्यासाठीं मंडळी मागें वळेपर्यंत तिला अडथळा केला नाहीं. मंडळी परत फिरण्याच्या बेतांत दिसल्यावर तिनें तिला हंसत हंसत म्हटलें–

" लक्ष्मी, आतां किती डोळे फाडून जरी बघितलेंस तरी कांहीं भालचंद्रराव तुला दिसावयाचे नाहींत. "

तिच्या बोलण्यांत थट्टेचा छद्मीपणा होता !

तिचें बोलणें माधवानें ऐकिलें, व त्याबरोबर त्याच्या आधींच्याच मानसिक अस्वस्थतेंत आणखीं भर पडली !

प्रकरण ११ वें.

मानसिक अस्वस्थता.

लक्ष्मी भालचंद्रावर अनुरक्त आहे ! या समजुतीचा परिणाम माधवावर काय झाला ! झाला म्हणण्यापेक्षां होत होता म्हणणें जास्त अर्थाचें होईल. एके कालीं तो लक्ष्मीवर अनुरक्त झाला होता. आपलें सर्वस्व तिला अर्पण करण्यास तो एका पायावर तयार होता. तिच्या सुखदुःखाशीं आपल्या सुखदुःखाची सांगड घालून तिला आपली सहधर्मचारिणी करण्याची त्याला उत्कट इच्छा लागलेली होती.

आतां त्याचें लक्ष्मीवर प्रेम नव्हतें असें नाहीं. होतें– पण तें समजण्या इतकें किंवा जाणविलें जाण्याइतकें पहिल्यासारखें तीव्र नव्हतें. तिच्याबद्दल त्याच्या मनांत स्नेह होता, पण तो कोणत्या स्वरूपाचा हें मात्र त्याला नक्की सांगतां येण्यासारखें नव्हतें. त्याच्या मूळच्या बालिश स्नेहाला यौवनांतील कामुकतेची भर पडून त्याचें स्वरूप निराळें बनलें होतें. पण तें स्वरूप तरी पुढें कोठें टिकलें ! त्याच्या त्या प्रेमाची लक्ष्मीनें अवहेलना केल्यानंतर व ती त्याला भासविल्यानंतर होत असणाऱ्या अंतःशुद्धीनें तो तें पुन्हां पूर्वपदावर आणूं पहात होता. व त्याप्रमाणें ते थोडें बहूत आलेंहि होतें परंतु–

नागपुराहून आल्यानंतर लक्ष्मीनें त्याच्याविषयीं प्रेमाची हेटाळणीं केल्यापासून सत्संगति व वडिलांचा पत्रद्वारें उपदेश ह्यानें त्याच्या पहिल्या मानसिक स्थितींत भयंकर क्रांति घडविली होती. त्याचें पहिलें सुखलोलुप गढूळ मानासिक वातावरण कर्तव्याच्या उपदेशानें शांत व स्वच्छ झालेलें होतें, अविचारी वयांतील सुखलालसा त्याच्या मनातून हळू हळू दूर होऊं लागली होती, व ती दूर होण्या योग्य अशाच परिस्थितींत तो सारखा सांपडत असल्यानें तिची त्याच्या मनावरील छापहि बरीच कमी झाली होती. परंतु— !

संपत्ति, शिक्षण व आयुष्य यांचा व्यय स्वतःच्या एकट्याच्याच सुखासाठीं करण्यापेक्षां समाजाच्या सुखासाठीं त्यांचा व्यय करणें जास्त श्रेयस्कर असें त्यास वाटूं लागलें होतें. हें त्याचें वाटणें अद्यापर्यंत म्हणण्यासारखें जोरावलें नसून त्याला कृतीचें रूपहि मिळालें नव्हतें, परंतु तें पुढें मागें लवकरच मिळण्याचा संभव होता व हें त्याच्या विचार क्रांतीवरून उघड होत होतें. परंतु—! ह्या सर्व स्थितीवर एका क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टीनें विरजण पडण्याचा रंग दिसूं लागला. त्याच्या दैवाचा वारा जो सुलट दिशेनें वाहूं लागला होता, तो जोरावण्याऐवजीं मंदगती होऊं लागला. त्याच्या सद्भाग्याचें जें चक्र वरील गोष्टींनीं गती घेऊन त्याला वैभवशाली बनविण्याच्या मार्गाला लागलें होतें तें अधु झालें. त्याची गती रोंखली गेली. आणि हें सर्व कशामुळें झालें, तर लक्ष्मी-जिला आपण आपलें सर्वस्व एकदां अर्पण करणार होतों ती लक्ष्मी, आपल्या प्रेमाची अवहेलना करून भालचंद्रावर अनुरक्त झाली या खोट्या समजुतीच्या नुसत्या कल्पनेनें—विचारानें !

एखाद्या समजुतीचें बेड एकदां कां डोक्यांत शिरलें म्हणजे ती नुसती समजूत नसून खरी गोष्ट आहे असेंच भासविणाऱ्या, सिद्ध करणाऱ्या प्रकारांचा त्याच्या त्या कल्पनेस नेहमीं दुजोरा मिळत असतो. हीच स्थिति माधवाची झाली. लक्ष्मीनें आपल्या प्रेमाची अवहेलना केली त्याचें कारण आतां त्याच्या मनानें शोधून काढलें. त्यावेळीं तिनें केलेला बहाणा खरा नव्हता; तिचें प्रेम भालचंद्रावर बसलेलें होतें; वगैरे गोष्टी त्याला सिद्ध अशा दिसूं लागल्या. आपल्या प्रेमापेक्षां, ज्याच्या आईबापांनीं तिचें व तिच्या वडिलांचें लहानपणापासून पालनपोषण केलें त्याच्या प्रेमापेक्षां, त्रयस्थ भालचंद्राचें प्रेम तिला जास्ती योग्यतेचें वाटावें हें त्याला सहन होईनासें झालें. तिनें कृतघ्नपणा करावा आणि आपल्या पदरीं अपमान बांधावा हें अपमानाचें शल्य त्याला दुःसह झालें. भालचंद्राबद्दल जरी त्याला मत्सर वाटूं लागला नाहीं किंवा दुष्टबुद्धीनें तो त्याचा द्वेषाहि करूं लागला नाहीं तरी लक्ष्मीनें त्याच्यावर प्रेम करावें ही समजूत त्याला सुख देणारी नव्हती.

लक्ष्मीला पाहून त्याच्या मनोवृत्ती पहिल्यासारख्या उचंबळत नसत. या मृत्युलोकात आपणास सुख जर कोणापासून होईल तर तें हिच्याचपासून असेंहि त्याला

पहिल्यासारखें वाटत नसे, कीं तिच्या चिंतनांतच त्याच्या अहोरात्री पहिल्याप्रमाणें जात नसत. मग त्याला असें कां वाटावें ? याचा तो राहून राहून आपल्या मनाशीं विचार करी. पण त्याचें संयुक्तिक असें कारण सांपडून त्याच्या मनाला शान्ती मिळत नव्हती. उलट ह्या गोष्टीचा तो जसजसा जास्ती विचार करी तसतसें त्या विचारानें त्याचें मन जास्तच क्षुब्ध होई व त्याची अस्वस्थता वाढे.

" लक्ष्मीचें आपणावर प्रेम नाहीं, वाटेल त्यावर प्रेम करण्यास ती स्वतंत्र आहे. आपलेंहि मन तिच्याकडे पहिल्यासारखें ओढत नाहीं " वगैरे सात्विक विचार त्याच्या मनांत येऊन ते त्यास असें सांगत कीं " लक्ष्मीचें भालचंद्रावर प्रेम आहे ह्मणून त्याबद्दल तुला विषाद कां वाटावा ? त्याची बुद्धि सात्विक " ह्याप्रमाणें पूर्वपक्ष करी व त्यामुळें त्याला शांतीहि वाटे पण लागलीच त्याचें मन–कामक्रोधादि षड्रिपूंनीं ग्रासलेली त्याची इच्छा–हा त्याचा पूर्वपक्ष, " लक्ष्मीनें तुझ्यावर प्रेम कां करूं नये, भालचंद्रापेक्षां तुझी योग्यता कमी आहे काय ? ती वाटेल त्यावर प्रेम करण्यास स्वतंत्र असली तरी तिच्या प्रेमावर पहिला तुझा हक्क आहे " वगैरे तमोगुण विचारांनीं ढांसळून टाकी, व त्याचें मन लालची बनवी. पण लागलीच लक्ष्मीकडे आपल्या मनाचा पहिल्यासारखा ओढा नाहीं या वस्तुस्थितीचा त्याच्या मनावर पगडा बसून आपण हा भलताच हेका कां धरावा असा विचार येऊन तो खिन्न होई; व त्याच्या मनाची अस्वस्थता वाढे.

माधव तरुण होता. तारुण्यांतील सळसळणारें रक्त त्याच्या शरीरांत खेळत होतें. तो श्रीमंत होता. जगांतील व्यवहार त्यास कळत नव्हते. लहानपणापासून श्रीमंतींतच वाढला असल्यानें फाजील अहंपणा त्याच्या अंगीं मुरलेला होता. आणि ह्या अहंपणाच्या भावनेनेंच वरील प्रकारांमुळें त्याची अस्वस्थता वाढत असे. लक्ष्मीनें आपणांस झिडकारून दुसऱ्यावर प्रेम करावें हा त्याला अपमान वाटत असे. शिवाय ही अपमानाची खोटी समजूत घालवून टाकण्याइतकी त्याच्या मनाची प्रगल्भता झालेली नव्हती. त्याला समजूं लागल्यापासून त्याच्या वागणुकींत ठराविकपणा होता असें नव्हतें. आपण कसें वागावें, आपणांस काय करावयाचें आहे ह्या संबंधाचे त्याचे विचार जितके ठराविक व स्थिर स्वरूपाचे असावयास पाहिजे होते तितके ते नव्हते. नागपुरच्या व्यसनी मंडळींत सांपडला व्यसनी बनला. घरीं आल्यावर चांगल्या मित्रमंडळीच्या सहवा-

सानें चांगला बनूं लागला. अशातऱ्हेची त्याची स्थिति होती. मनावर परिणाम घडविणाऱ्या भोंवतालच्या परिस्थितीप्रमाणें तो अद्यापि वहावत चालला होता. स्वतःचें असें त्याला कांहींच नव्हतें. ह्या त्याच्या अस्थिर स्वभावाची त्याच्या अहंपणाच्या वृत्तींत भर पडून त्याची मानसिक अस्वस्थता जास्तीच वाढूं लागली.

भालचंद्रास पोंहचविल्यानंतर यवतमाळास परत येऊन त्याला बरेच दिवस झाले होते. तो तेथें परत आल्यापासून वरील विचारच त्याच्या मनांत घोळत असत. देशहितविषयक विचार त्याच्या मनांतून हळू हळू जाऊं लागले, व विनायकाच्या संगतींत त्याचा जरी बराच काळ जात असे तरी त्याच्या संगतीचा पहिल्यानदां जो त्याच्या वर्तणुकीवर परिणाम घडूं लागला होता तो आतांशी घडेनासा झाला. आपली खरी स्थिति कित्येकांस कळावी अशी त्याची इच्छा नव्हती व ह्मणून वरपांगी तो त्याच्याशीं पहिल्याप्रमाणें देशहिताची चर्चा करी. पण ती निव्वळ चर्चाच असे. त्यापासून कांहीं उपयोग घडावा अशी त्याला मनापासून इच्छा होत नसे. अर्थात् विनायकाच्या हें ध्यानांत आलें नाहीं. माधव खरोखरीच सुधारणेच्या मार्गाला लागला असून तो कांहीं तरी देशकार्य करणार असेंच त्यास वाटत असे.

अशा स्थितींत यवतमाळास दिवस घालवित असतां एके दिवशीं प्रवासाच्या निमित्तानें माधव तेथून निघून गेला. देशाची स्थिति पाहण्यासाठीं आपण बाहेर पडतों असें त्यानें मंडळीस सांगितलें होतें. पण तें खरें होतें कां ? नव्हतें त्याच्या वरील अंतःस्थितीवरून तें खरें मव्हतें हें उघड होतें.

प्रकरण १२ वें.

जाण्याचें खरें कारण.

माधव यवतमाळ सोडून निघाला तो लक्ष्मीला दृष्टिआड करावें म्हणूनच निघाला. ती दृष्टिसमोर असणें त्यास दिवसेंदिवस असह्य होऊं लागलें होतें. तो तिचा द्वेष करित होता अशांतला प्रकार नव्हता किंवा तिच्यावर लोभ करित होता असाहि प्रकार नव्हता. तिचें सौंदर्य दिवसेंदिवस वाढत चाललें होतें व ती दृष्टिसमोर आली ह्मणजे तें सौंदर्य त्यास त्रासदायक, सुख भासवून त्रास देणारें, असें होत असे. कारण यौवनदशेंतला कामविकार त्याच्या शरिरांत खेळत होता त्याचें प्रेम स्वतंत्र होतें. तें अद्यापि दुसऱ्याच्या स्वाधीन होऊन त्याच्या जीवनक्रमास स्थैर्य आलेलें नव्हतें. लक्ष्मीशीं लग्न करावें अशी प्रबळ इच्छा एकदां त्यांच्या मनांत खेळत होती. तिच्या सौंदर्यानें तो वेडावून गेलेला होता व त्या काममूढ स्थितींतच तिच्या प्रेमाची त्यानें याचना केलेली होती.

थोड्याबहुत प्रमाणानें तीच स्थिति सध्यां होती असें ह्मणावयास हरकत नाहीं. परिस्थितीच्या तडाख्यानें व मूळच्या कमकुवतपणानें एकदां वठलेले त्याचें कामुक प्रेम पुन्हां उसळूं लागलें व लक्ष्मीशीं लग्न करण्याची इच्छा त्याच्या मनांत प्रबळ होऊं लागली. लक्ष्मीनें आपल्याशीं लग्न कां करूं नये हा विचार त्याच्या मनांत घोळूं लागला. लक्ष्मीच्या प्रेमाची अपेक्षा करण्याची ह्या दृष्टीनें तो आपली व भालचंद्राची स्थिति अजमावून पाहूं लागला. स्वतःच्या व त्याच्या गुणावगुणांची तो तुलना करूं लागला. आपणांत व भालचंद्रांत कमीपणा देणारा असा फरक त्याला सांपडेना; उलटा भालचंद्राचा उच्चपणा त्याला दिसूं लागला. भालचंद्र सुशिक्षितः तर मीहि सुशिक्षितः तो श्रीमंत तर मीहि त्याच्यापेक्षां जास्त श्रीमंत; तो देशकार्यांत पडणारा तर मीही पडूं पहाणारा; उलट तो परतंत्र तर मी स्वतंत्र; त्याच्या हातून लक्ष्मीला जेवढें सुख मिळण्याचा संभव आहे त्यापेक्षां

आपण तिला जास्त देऊं अशी त्याला खात्री होती.कारण तो लक्ष्मीवर पूर्ण अनुरक्त झालेला होता. ती त्याला हवी होती. आपणांस आवडत असणाऱ्या वस्तूंची आपण जास्ती काळजी घेत असतों ह्या न्यायानें - भालचंद्रापेक्षां आपणाकडून लक्ष्मीला जास्ती सुख मिळेल असें त्यांस वाटत असे.

नाहीं म्हणावयास, भालचंद्रापेक्षां त्यास कमीपणा देणारी एक गोष्ट होती आणि तीं म्हटली म्हणजे नागपूरचें त्याचें वाईट आचरण. लक्ष्मीनें येवढीच गोष्ट लक्षांत घेऊन आपणांस दूर लोटलें असेल तर त्यास त्याचा नाइलाज होता. पण एखादेवेळेस अयोग्य वर्तन घडलें असलें म्हणून काय झालें ? त्याबद्दल त्या मनुष्यास नेहेमीं वाईट–त्याज्य–लेखून शासन करणें योग्य होईल कां ! चुकीस मनुष्य नेहेमीं पात्र असतो पण एकदां चुकी झाली असून नंतर तिचा पुनरावृत्तीं जर त्याचेकडून झाली नाहीं किंवा होण्याचा संभव नाहीं तर तिजबद्दल त्या मनुष्यास नेहमीं दोषी लेखणें कधींहि योग्यव्यवहार्य होणार नाहीं. तसेंच उलट आपली चुकी सुधारावयाची जर तो प्राणी मनापासून खटपट करित असेल. तर त्या चुकीचा नुसता उच्चार करून अगर ती दाखवून त्या मनुष्याला नेहेमीं दोषार्ह समजणें कधींहि समंजसपणाचें होणार नाहीं. अशा तऱ्हेनें लक्ष्मीनें आपणांस दोषार्ह समजून आपणांस नेहेमीं दूर लोटावें हें त्याला योग्य दिसेना.

पण तिला खरोखरीच असें वाटतें कां ? हा संशय हळूं हळू त्याच्या मनांत येऊं लागला. तिला तसें वाटत असतें तर ती आपणाशीं येवढ्या चांगलेपणानें वागतीना ! बंधुभगिनी ह्या नात्यानें ती खरोखरच त्याच्याशीं फार प्रेमळपणानें वागत असे. त्याच्याशीं घडणाऱ्या प्रत्येक व्यवहारांत तिचें भगिनीप्रेम व्यक्त होत होतें. या नात्यांत जर ती आपल्याशीं एवढ्या प्रेमळपणानें वागते तर तिच्या मनांत आपल्या मागील कृत्यांबद्दल किल्मिष नसावें असें त्यास वाटणें साहजिक होतें. असें आहे तर आपल्याशीं तिनें प्रेमयाचनेच्या वेळेस तसें वर्तन कां करावें याचा तो विचार करूं लागला. त्यांच्या विवाहास नात्यागोत्याची आडकाठी येणारी नव्हती. उलट तो व्हावा अशी गोविंदरावाची इच्छा असल्याचें त्यास समजलें होतें.

आपण प्रेमयाचना केली त्यावेळीं तिनें सांगितलेलें सर्व खरें समजावें का ? हो.–तिच्या एकंदर नंतरच्या वागणुकीवरून तसें समजावयास हरकत नाहीं असें त्याला वाटूं लागलें. नव्हे, त्याच्या मनानें घेतलें. अशी मनाची खात्री

झाल्यावर आपण पुन्हां प्रेमयाचना केल्यास ती फुकट जाणार नाहीं असें त्याल वाटूं लागलें.

मनुष्यस्वभाव काय चमत्कारिक असतो पहा. लक्ष्मीनें माधवाच्या कामुक प्रेमाचा धिक्कार केला होता. व इतःपर अशा तऱ्हेच्या दृष्टीनें त्यानें आपणाकडे पाहूं नये असेंहि तिनें त्यास बजाविलें होतें. शुद्ध भगिनीप्रेमाचा संबंध यापुढें आपणा दोघांमध्यें रहावा असेंहि त्यावेळीं त्यांच्यामध्यें ठरलें होतें. असें असतां माधवानें कामुक दृष्टीनें तिच्याकडे पाहून तिच्याकडून तशा तऱ्हेचें प्रेम आपणांस मिळेल अशी मनाची खात्री करून घ्यावी ! वस्तुस्थिति धडधडीत उलट असतां अशा तऱ्हेनें त्यानें आपल्या मनास रिझवावें ? य मानवी स्वभावास काय म्हणावें ?

आशाबद्धता ! आशेनें मनुष्य बद्ध होतो व निराशेच्या स्थितींतहि त्यास ही बद्धता आनंद देते ! आपली आशा सफल होणार नाहीं अशी धडधडीत विपरीत परिस्थिति असते तरी ती त्याला दिसेनाशी होते व त्याच्या सारासार बुद्धीला अंधत्व येतें. मनांतील गोष्टींच्या सारख्या निदिध्यासानें तीच गोष्ट सारखी त्याच्या डोळ्यासमोर खेळत राहून आपल्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं जमणार असेंच त्याला वाटूं लागतें व त्या हेतूची विफलता जरी त्याच्या अनुभवास तीव्रतेनें आली असली तरी त्यानें त्याची विन्मुखता वाढत नाहीं तर उलट खची केलेल्या भरारणाऱ्या वृक्षाप्रमाणें हा त्याचा हेतु वाढीस लागून तो साधणार म्हणून त्याची वृद्धि जोरानें उसळूं लागते.

निदिध्यास लागल्यानंतर मनांतील हेतु साधण्याकडे मनुष्याचें साहजिक लक्ष लागतें. आपल्या मनांतील गोष्ट लक्ष्मीजवळ काढून पुन्हां प्रणययाचना करावी असें माधवाच्या मनानें घेतलें. त्याच्या मनानें जरी घेतलें तरी लक्ष्मीजवळ गोष्ट काढण्यास त्याला धीर होईना. त्याची स्वतःची दृष्टि जरी प्रणयी बनलेली होती तरी लक्ष्मीच्या वागणुकींत त्याला तो कोठें दिसेना. तिच्या वागणुकींत प्रणयजन्य विनय अगर लज्जा त्याला कोठेंच आढळेना. मोकळेपणाच्या भगिनीप्रेमानें ती त्याच्याशीं वागत असे. त्या वागण्यांत संदिग्धता नसे. तो जरी प्रणयी बनलेला होता तरी भगिनीप्रेम व पत्नीप्रेम यांमधील फरक त्याला स्पष्ट दिसत होता. लक्ष्मीशीं बोलण्यांत अगर तिच्याकडे पहाण्यांत जसा त्याला संकोच–प्रणयी प्रेमाच्या पूर्ण स्थितींतील संकोच–जसा

त्याला वाटत असे व त्यामुळें तिच्याशीं बोलण्याचालण्यांत जशी त्याची त्रेधा उडत असे, तशी लक्ष्मीची उडत असल्याचें त्याच्या कधींच दृष्टीस पडलें नाहीं. ह्यामुळें स्पष्टतेनें गोष्ट काढण्यास त्याचें मन साशंक होत असे. तिच्याकडून पुन्हां आपल्या प्रेमाची अवहेलना होईल असें त्यास वाटत असे. पण हें त्याचें वाटणें क्षणिक–लक्ष्मीशीं बोलतचालत असतांच्या वेळेपुरतेंच क्षणिक असे. ती पुन्हां दृष्टिआड झाली व ह्याच्या मानसिक भराऱ्यांस सुरवात झाली ह्मणजे तें टिकत नसे. आपणास एकदां ठेंच लागली त्यामुळें आतां धीर होत नाहीं असेंच त्याला वाटे.

लक्ष्मी अजाण नव्हती. माधवरावाच्या वागण्याची तऱ्हा तिच्या लक्षांत येत असे. पण तिकडे ती मुद्दाम कानाडोळा करित असे. आपल्या कोणत्याहि वागणुकीनें माधवाच्या प्रेमास–प्रणयी प्रेमास–दुजोरा मिळूं नये अशी तिची इच्छा होती, व ह्मणूनच त्याचा हेतू आपल्या लक्षांत येत नसून किंवहुना आपण तो ओळखत नसून त्याचें व आपलें नातें कोणतें असावें हें त्यानें वेळींच उमजावें अशासाठीं सरळ भगिनीप्रेमाच्या नात्यानेंच ती त्याच्याशीं वागत असे. आपल्या वडिलांच्या मनांतून आपण माधवाशीं लग्न करावें असें आहे हें लक्ष्मीला ठाऊक होतें. व ह्मणून त्यांना देखील आपण त्या गोष्टीस कबूल नाहीं हें दर्शविण्याची तिची इच्छा होती. अशा संधीची ती वाट पहात होती. व तिच्या नशीबानें ती लौकरच आली.

गोविंदरावाच्या मनांतून लक्ष्मीनें माधवाशीं लग्न करावें असें फार होतें, पण त्याप्रमाणें घडवून आणण्यास आपल्या वडिलकीच्याच हक्कावर मुलगी वाटेल त्याच्या ताब्यांत बांधण्यास, तो असमर्थ होता. कारण मुलीच्या संमतीशिवाय तिचें लग्न करूं नकोस असें श्रीनिवासरावांनीं त्यास बजाविलें होतें, व माधवाच्या लग्नसंबंधाच्या बाबतींत त्यांनीं माधवास पूर्ण स्वतंत्रता ठेवलेली होती. माधवाचा स्वभाव त्यास ठाऊक होता. तो लक्ष्मीवर अनुरक्त झालेला जरी त्यास दिसत होता, तरी लक्ष्मीची संमती असल्याशिवाय तो तिच्याशीं लग्न करण्यास तयार होणार नाहीं याची त्याला खात्री होती. लक्ष्मीचें या बाबतींत काय मत आहे हें अजमावून पहाण्याच्या इराद्यानें माधव, तो व लक्ष्मी एकदां एके ठिकाणीं आहेत असें पाहून त्यानें बोलणें काढलें. तो माधवाला ह्मणाला—

" माधवराव, तुमच्या लग्नाच्या संबंधांत बऱ्याच मंडळींकडून पत्रिका वगैरे मजकडे आलेल्या आहेत, तेव्हां या बाबतींत काय करावयाचें तें समजल्यास त्याप्रमाणें व्यवस्था करावयास मला बरें पडेल. "

माधव यावर कांहींच बोलला नाहीं.

" इथें वडिलांच्या ठिकाणीं जरी मी तुह्मांस आहें तरी या बाबतींत माझ्या मतानेंच चालण्याचा माझा विचार नाहीं. श्रीनिवासरावांचीहि अशीच इच्छा होती. तुमचें तुह्मांला चांगलें वाईट आतां सर्व कळतें. "

" बाबा, पत्रिकांबरोबर मुलींचे फोटो आलेले असतीलच. दादासाठीं बायको पहावयाची ती पसंत मात्र मी करणार. कां असेंच ना दादा ? " लक्ष्मी हंसत हंसत ह्मणाली.

तिच्या बोलण्यानें दोघांचींहि मनें खट्टू झालीं.

"पण येवढ्यांतच कां या लग्नाची घाई ? मला नाहीं वाटत मी येवढ्यांत लग्न करावेंसें." माधव ह्मणाला. त्याचा आशातंतू एकदम तुटला व त्या स्थितीचा परिणाम त्याच्या चेहऱ्यावर दिसूं लागला. तेथें बसावें असें त्याला वाटेना. "गोविंदराव, मला इतक्यांत लग्न कर्तव्य नाहीं असें तुमच्याकडे चौकशी करणारांना कळवा ह्मणजे झालें." येवढें बोलून तो तेथून जाण्यासाठीं उठला.

" चिंतामणरावांस देखील असेंच कळवावयाचें का ? " 'गोविंदरावानें विचारलें.

ह्या त्याच्या प्रश्नास त्यानें उत्तरच दिलें नाहीं. त्यानें तो ऐकला होता कीं नाहीं देव जाणे ! तो तेथून निघून गेला.

माधवाच्या स्तब्धतेनें गोविंदराव बुचकळ्यांत पडला. कमलेशीं त्याचें लग्न होऊं नये अशी त्याची इच्छा होती. व ह्या इराद्यानेंच त्याचे मनाचा कल पाहण्यासाठीं त्यानें त्यास वरिल प्रश्न केला होता.

माधव गेल्यानंतर बराच वेळपर्यंत बापलेक दोघेंहि स्तब्ध होतीं. आपल्या बोलण्यानें माधवास वाईट वाटलें असावें ह्मणून लक्ष्मी खिन्न झालेली होती. पण त्याला नकार दर्शविणेंच तिला योग्य वाटत होतें. त्याच्याशीं लग्न करण्यास तिचें मन तयार नव्हतें.

थोड्या वेळानंतर गोविंदराव तिला ह्मणाले.

" लक्ष्मी, मला तुजजवळ कांहीं बोलावयाचें आहे. अशा प्रकारें बोलणें जरी आपल्या चालीरीतिला सोडून आहे तरी तसें बोलल्याशिवाय माझ्याच्याने राहवत नाहीं. तूं आतां लहान नाहींस. तुझें हितानहित तुला कळूं लागलें आहे. आपलें हित साधणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. म्हणून विचारतों, कीं माधव तुझ्याकडे कोणच्या दृष्टीनें बघत असतो ! "

" बाबा, तुम्ही काय बोलणार तें मी समजलें. पण तुमच्या इच्छेप्रमाणें वागण्यास माझें मन तयार नाहीं. बालपणापासून माधवासंबधींच्या माझ्या प्रेमाला जें वळण मिळालेलें आहे तें आतां बदलणें शक्य नाहीं त्यास माझा नाइलाज आहे ! "

एवढें बोलून ती तेथून निघून गेली. हा विषय जास्ती लांबविण्याची तिची इच्छा नव्हती. खोलीच्या बाहेर पडतांच माधव तिच्या दृष्टीस पडला. त्याचा चेहरा म्लान व निस्तेज झालेला होता. यापुढें या घरांत राहिल्यास आपणांस सुख लागावयाचें नाहीं असें माधवाच्या मनानें घेतलें. त्या दिवशींच त्यानें आपल्या जाण्याची तयारी केली व दुसऱ्या दिवशीं तो तेथून निघून गेला.

आपल्या जाण्याचें खरें कारण मात्र त्यानें कोणासहि कळविलें नाहीं. आपल्या देशाची स्थिति अवलोकन करण्यासाठीं आपण मोठ्या थोरल्या प्रवासास जात आहों असें त्यानें सर्वांस सांगितलें.

प्रकरण १३ वें.

नोकरी म्हणजे पराधिनता.



चिंतामणरावांच्या मनांतून विनायकास नोकरीस लावावयाचें होतें. ते ज्या परिस्थितींत वाढले होते ती परिस्थतीच अशी होती कीं नोकरी करून द्रव्य संपादन करणें या व्यतिरिक्त शिक्षणाचें दुसरें कांहीं ध्येय असेल असें त्यांस मार्गे वाटत नव्हतें. थोडक्या श्रमांत, कर्तव्यगारीचा विशेष बोजा शिरावर न घेतां जीवितध्येय जें द्रव्य संपादन करणें त्यास नोकरीसारखा दुसरा सुलभ मार्ग नाहीं असें त्यांच्या मनानें पूर्णपणें घेतलेलें होतें.

एकेकाळीं समाजसुधारकांच्या प्रमुख कंपूंत चिंतामणराव मोडत असत. ह्या दृष्टीनें त्यांच्या वरिल समजुतीचा विचार केला ह्मणजे ती त्यांस न शोभण्यासारखी दिसते परंतु ज्या हेतूनें ह्या समाज-सुधारक-कंपुस त्यांनीं कवटाळलें होतें त्या हेतूचा विचार केला ह्मणजे ती त्यांस शोभण्यासारखी होती असेंच ह्मणावें लागतें. लोकांत व सरकारांत वजन वाढावें ह्मणूनच ते समाजसुधारक बनले होते. लोकांची स्थिति खरोखरीच खालावलेली आहे, ती घालविण्याचे श्रम करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे ह्या भावनेनें प्रेरित होऊन ते समाजसुधारक बनले नव्हते. स्वतःच्या सुखापुढें लोकांच्या सुखाची त्यांस काळजी नव्हती. किंवा लोकांच्या दुःखाची त्यांस कल्पनाहि येत नव्हती.

त्या वेळच्या समाज-सुधारकांची सामाजिक चळवळ फावल्या वेळाची होती. धंदा किंवा त्याहापेक्षां जनल्यास मानाची सरकारी नोकरी करून फावल्या वेळांत देशाच्या स्थितीचा ते विचार करित असत. स्वतःच्या सुस्थितीपुढें अशातऱ्हेच्या जनकार्यास ते गौणत्व देत असत. ह्या बजूनें पाहूं लागलें ह्मणजे विनायकानें नोकरींत शिरावें असेंच चिंतामणरावांस वाटणें साहजिक होतें, व त्याप्रमाणें त्याला चांगली नोकरी मिळवून देण्याच्या खटपटींतहि ते होते.

सर्वांत उत्तम सरकारी नोकरी झटली झणजे आय. सी. एस. होऊन सिव्हीलीयन होणें ही. पण तिच्या भानगडींत विनायकानें पडावें अशी त्यांची इच्छा नव्हती, कारण ती मिळविण्यास त्यांच्या दृष्टीनें बराच त्रास असे. हिच्याच जोडीच्या प्राव्हीनशिअल सर्व्हिसमध्यें विनायकास लावून देण्याचा त्यांचा विचार ठरला व त्याप्रमाणें ते खटपटीलाहि लागले.

सरकार दरबारांत त्यांचें चागलें वजन होतें. मुलाच्या नोकरीसाठीं त्यांनीं साहेबांची गांठ घेऊन आपली इच्छा त्यांस कळविली. साहेबांजवळ नोकरीची याचना करतांना विनायकाची हुशारी जितक्या मोहक भाषेंत त्यांना मांडतां येणें शक्य होतें तितक्या मोहक भाषेंत ती त्यांनीं मांडली; व साहेबांनीं सर्व गोष्टी नीट लक्षांत घेऊन कृपाळु होऊन नोकरी दिल्यास ती मोठ्या आनंदानें स्वीकारण्यास मुलगा तयार असल्याचेंहि आपल्या पदरचें खोटें विधान त्यांनीं बेधडक ठोकून दिलें. परंतु या त्यांच्या विनंतीस निदान त्यावर्षी तरी मान देणें साहेबास अशक्य होतें कारण त्या वर्षाचा ठराविक नंबर अगोदरच भरून गेला होता. पाहिजे असल्यास दुसरीकडे तजवीज करतों असें साहेबांनीं त्यास सांगितलें.

पण चिंतामणरावांच्या मनांतून त्याला दुसऱ्या प्रकारच्या नोकरींत घालावयाचें नव्हतें.

" यंदा नाहींतर नाहीं. पण पुढल्यावर्षी तरी माझ्या मुलाच्या हक्काचा अगोदर विचार होईल ? "

" अलबत पण पुढल्यावर्षी जरा अगोदर अर्ज करा म्हणजे बरें पडेल. "

" अर्ज मी बरोबरच आणला आहे. पुढल्यावर्षींच्या उमेदवारांच्या नांवाच्या यादींत त्यांचें नांव घालून त्याच्या नांवापुढें आपण शेरा माराल तेवढें बरें होईलसें मला वाटतें. "

" कां माझी बदली बगैरे झाली तर कसें करावें अशी पंचाईत येऊं नये झणून कीं काय ? " साहेब हंसत हंसत म्हणाले.

चिंतामणरावांनी बरोबरचा अर्ज पुढें केलाच होता तो घेऊन साहेबांनी आपल्या जवळ ठेवला व ' मी सर्व कांहीं करीन ' असें त्यांस सांगितलें.

यानंर इकडल्या तिकडल्या चार शिळोप्याच्या गप्पा ठोकून चिंतामणराव उठले.

" रावसाहेब, आपण आपल्या मुलाचा अर्ज दिलात पण त्याला बरोबर आणलें नाहीं वाटतें. त्याला एखादेवेळेस मजकडे पाठवून द्याल तर बरें. मला त्या प्रमाणें अर्जावर शिफारसहि करतां येईल. " साहेब म्हणाले.

मुलाला पाठवून देण्याचें कबुल करून त्यांनीं साहेबांचा निरोप घेतला.

आपण केलेली व्यवस्था मुलास पसंत आहे किंवा नाहीं हें बघणें त्यानां इतकें महत्त्वाचें वाटत नव्हतें. समजूं लागल्यानंतर मुलांच्या जीवनक्रमाची दिशा त्यांनांच ठरवून देणें चांगलें असा विचार त्यांच्या मनाला शिवणारा नव्हता. ते समाजसुधारक होते व समाजाची खरी प्रगति व्यक्तिस्वांतन्त्र्यावर अवलंबून असल्याचें जरी ते नेहेमीं प्रतिपादन करीत असत तरी तिची अंमलबजावणी आपल्याकडून होते किं नाहीं किंवा ती करणें आपलें कर्तव्यकर्म आहे असें ते कधींच समजत नसत. सुळचें घरचें कांहीं नसतां स्वतःच्याच हिमतिवर कर्तबगारीनें एवढी मोठी नोकरी करून जगांत मानमान्यता व द्रव्यसंपादन करून ते योग्यतेला चढले असल्यानें मी मोठा ' मी शाहणा, मी कर्तबगार ह्या अहंमन्यतेनें त्यांना पुरें पछाडलेलें होतें. मुलाच्या भावी आयुष्यक्रमाबद्दल त्यांचा विचार घेणें म्हणजे आपल्या शहाणपणाला कमीपणा आणणें असें ते समजत असत व या खोट्या समजुतीस योग्य अशीच त्यांची क्षुद्र बुद्धि असे. मुलाचें बालपण, तरुणपण आणि जमल्यास म्हातारपण यांत सुद्धा मुलाचा बाप जिवंत असतां, वडिलकींच्याच मानानें येणाऱ्या जबाबदारीस हट्टानें कवटाळून, त्याच्या इच्छेला हरताळ लागला तरी नाहीं पण आपल्या अहंमन्यतेला मान मिळून आपल्या इच्छेप्रमाणेंच सर्व कांहीं झालें पाहिजे अशा तऱ्हेची दुराग्रही अनिष्ट समजूत त्यांच्या हाडींमासी खिळून गेलेली होती.

घरीं आल्यानंतर त्यानीं आपला बेत विनायकास सांगितला. यावेळीं कमला व गोदावरीबाई तेथें होत्या.

वडिलांचें म्हणणें ऐकल्यानंतर आपण ज्या प्रसंगास भीत होतों तो प्रसंग जवळ येऊन ठेवला, आतां कसें करावें याची काळजी विनायकास उत्पन्न झाली. बापाचा स्वभाव त्याला पुरा माहित होता. आतांच आपण त्यास नाहीं म्हणून म्हटलें तर ते चिथरतील, व कदाचित् गोडीगुलाबीनें आईच्या मध्यस्थीनें साधणारी गोष्ट असाध्य होऊन भांडण तंट्यापर्यंत मजल येईल व आपणांस

घराबाहेर व्हावें लागेल हें त्यास उघड दिसत होतें. त्यानें वडिलांच्या म्हणण्यास होकार दिला नाहीं किंवा नकारहि दिला नाहीं. त्याच्या स्तब्धतेवरून आपला विचार त्यास संमत असल्याचें धरून चिंतामणरावांनीं साहेबाकडे कधीं चलावयाचें म्हणून विचारलें.

"आतांच त्याची घाई नसल्यास ८-१५ दिवसांनीं जाऊं" विनायक म्हणाला

" जितकें लवकर जावें तितकें चांगलें असें मला वाटतें. "

" तसें कां होईना. तुम्हीं म्हणाल तेव्हां जाऊं. "

विनायकानें त्यांना होकार दिला पण तो वेळ मारून नेण्यापुरता होता.

त्याच दिवशीं त्यानें आपल्या आईला एकीकडे गांठून तिला आपला बेत सांगितला. त्याचें बोलणें ऐकून गोदावरीबाईनां जरा चमत्कारिक वाटलें. एवढी चांगली नोकरी त्यास पसंत नसावी हें पाहून त्यांस आश्चर्य वाटलें.त्या म्हणाल्या-

" नोकरी करावयाची नाहीं तर पुढें काय करावयाचें ? आणि एवढा शिकलास तो तरी कशासाठीं ? "

" आई, शिकणें म्हणजे नोकरी साठींच असतें कां ! त्याचा उपयोग स्वतःचे कल्याणाकरितांच आहे काय ? शिक्षण घेतलें, चार पैसे मिळविले, लग्न करून थाटानें संसार थाटला आणि जन्मास आला तसा कोरडाच हें जगत् सोडून गेला म्हणजे सार्थक केलें असें तुला वाटतें कां ? "

त्याचें बोलणें ऐकून त्या भोळ्या मुलाला विरक्त वृत्तीची आवड उत्पन्न झाली किं काय याची त्यांना धास्ती पडली !

" आपला समाज, आपला देश, आपला धर्म, आपलें राष्ट्र ह्यांचें या जगांत अस्तित्व असावें किं नाहीं, याचा शिक्षणानें येणारी कल्पना स्वार्थांत गुरफटून मी पुनून टाकावी असें तुला वाटतें काय ! शिक्षण घेण्यांत लोकांचा तो हेतु असला तरी माझा तो नाहीं. शिक्षणानें वाढणारी सुसंस्कृता. खळबळणारी भूतदया यांना स्वार्थासाठीं बळी देणें माझ्या हातून तरी कधीं होणार नाहीं ? गेले दोन्ही दुष्काळ तूं पाहिलेसना ! आदल्या वर्षी पिकें चांगलीं असतां दुष्काळाच्या सालीं लोक कसे पटापट मरत होते. लोकांचे हाल वाचविण्यासाठीं सरकारनें लाखों रुपये खर्च केले तरी लोक मरतच होतेना ? हें असें कां व्हावें याचा तूं कधीं

विचार केला आहेस कां ? मोंठमोठ्या सुधारलेल्या देशांत मजुरांस दोनदोन तीनतीन रुपये मजुरी मिळते. पण आमच्या इकडील मजुरांस चार आणे मजुरी मिळावयाची मारामार पडते. तिकडील मजूर, आह्मी आहोंत ह्मणून देशांत लोक श्रीमंत होतात असें समजतात, तर आमच्या इकडील मजूर, देशांत श्रीमंत लोक आहेत ह्मणून आम्हांस मजुरी मिळते असें समजतात. तिकडच्या मजुरांस जगांत काय चाललें आहे याची रोज बिनचूक माहिती असते तर आमच्या इकडच्या मजुरांस देशांत–प्रत्यक्ष आपल्या गावांत–काय चाललें आहे याची देखील माहिती नसते. तिकडचें व इकडचे लोक हे एकाच मनुष्य-कोटींतले असतां असें स्थितिवैचित्र्य कां असावें याचा तूं कधीं विचार केला आहेस काय ?

" या स्थितिवैचित्र्याचें कारण तिकडले लोक सुधारलेले तर इकडले लोक अडाणी, ते सज्ञानी तर हे अज्ञानी, याशिवाय दुसरें कोणतेंही नाहीं. आमच्या जनतेच्या याच अज्ञानामुळें, तिला व राष्ट्राला सर्वत्र कीड लागलेली असून राष्ट्रांतील किंवा व्यक्तींतील चैतन्य नाहींसें झालेलें आहे. राष्ट्राचा जीव, जी प्रगत्येच्छा ती अस्तंगत झालेली असून कलाकौशल्य, समाजधोरण, समाजशिस्त यांची सर्व बाजूंनीं अवनती झालेली आहे. भौतिक दृष्टीनें राष्ट्रांस जिवंत ठेवणाऱ्या कर्तबगारीनें आपलें तोंड लपविलें असून लोकांस निकृष्ट करून सोडलें आहे. निवृत्ती मार्गाविषयींच्या चुकलेल्या समजुतीनें आह्यांस धार्मिक अंधश्रद्धेची जोड देऊन जीवनकलहाच्या भोवऱ्यांत गटांगळ्या खावयास लावलें आहे ! या भोवऱ्यांत असें गंटागळ्या खात आह्मीं किती दिवस रहावें ? शिक्षणानें आमच्या विचारशक्तीचा विकास झाला असून आमचें मन आशाखोर बनत चाललें आहे. दैववादापेक्षां कर्मवादाचें महत्व आम्हांला जास्ती वाटूं लागलें आहे. अर्धपोटी रहाणाऱ्या आह्मांस, तसें रहाण्याचा कंटाळा यावयास लागला असून पंचपक्वान्नानें आपलें पोट भरावें असें वाटूं लागलें आहे. आशेनें आह्मांस सजिवता दिली आहे व सुस्थितींत असावें या इच्छेनें आह्मांस मार्ग दिसूं लागला आहे. "

कोणाहि प्रेमळ मातेला मुलाचे असले विचार ऐकून आनंदच वाटला असता.

मग गोदावरीबाईंना तरी तो कां वाटूं नये ! त्यांना आनंद तर वाटलाच; शिवाय त्याच्या समंजसपणामुळें त्यांना धन्यताहि वाटली.

" आई, याप्रमाणें विचार माझ्या मनांत घोळत असतां, मला नोकरी गोड लागेल कां ! सर्व आयुष्य स्वतंत्रतेनें जनकार्यांत वाहण्यांतच मला जर भूषण वाटणारें आहे, तर पराधिनता देणारी नोकरी मला कशी रुचावी ! "

मुलाचें बोलणें ऐकून त्यांचें हृदय आनंदानें व प्रेमानें उचंबळलें. प्रेमानें त्यांनीं त्याला कुरवाळलें. व त्याच्या पाठीवरून हात फिरवून त्या म्हणाल्या—

" बाळ तुझ्यासारखा मुलगा असावयास नशीबच पाहिजे. तिकडच्या स्वभावामुळें त्यांच्याशीं उघड बोलण्यास तूं भीत असशील. तुझ्यासाठीं मी तिकडे रदबदली करून त्यांचें मन वळवीन, समजलास. "

प्रेमळ मातेच्या आश्वासनानें त्यास कितीतरी धीर आला !

प्रकरण १४ वें.

विनायकाचें विचार.

"मी तुझ्यासाठीं योजलेला नोकरीचा बेत पसंत नाहीं म्हणून मला समजलें तें खरें कां ? " समोर बसलेल्या विनायकास चिंतामणरावांनीं विचारलें.

अशातऱ्हेनें आपल्या मुलास विचारणें हें चिंतामणरावांच्या स्वभावास सोडून होतें, परंतु गोदावरीबाईनीं ह्या बाबतींत त्यांनां सर्व सांगितलें असल्यानें, विनायकास गोडीगुलाबीनें नीट समजावून आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यास लावूं या आशेनें ते अशा सौम्य शब्दांनीं त्याच्याशीं बोलले.

वडिलांनीं आपण होऊनच विषय काढल्यानें आपल्या मनांतील ह्यावेळीं सर्व त्यांना सांगणें चांगलें असें त्याला वाटूं लागलें. वडिलांचा सौम्य स्वर पहातां आईनें आपल्याबद्दल त्यांना बरेंच सांगितलें असल्याचें त्याला वाटलें. व अशा वेळींच मन मोकळें करणें योग्य अशा समजुतीनें तो म्हणाला–

" होय. आपण पाहिलेली नोकरी मला पसंत नाहीं अशांतला हा भाग नाहीं. तर भावी आयुष्य नोकरीशिवाय इतर प्रकारच्या व्यवसायांतच घालविण्याचा माझा विचार आहे. आपल्याला ह्या पासून कदाचित् वाईट वाटेल परंतु... "

" नोकरी करणें तुला योग्य वाटत नाहीं तर वाटतें तरी काय ? मला नाहीं वाटत दुसरा कोणचाहि धंदा केलास, तर त्यांत अशी पैशाची प्राप्ति तुला होईलशी ! " त्याचा हेतु आपणांस माहीत नाहीं असें खोटेंच भासविण्यासाठीं ते मुद्दाम म्हणाले.

" बाबा, माझ्या बोलण्याचा राग मानूं नका. माझ्या स्वतःच्या हिताचा. हिताचा हा प्रश्न असल्यानें मला स्पष्ट बोलणें भाग आहे. "

" बाबा, माझ्या दृष्टीनें पैशाच्या प्राप्तीसंबंधाचा हा प्रश्न नाहीं. स्वतःच्या उपजीविकेस लागणाऱ्या पैशापेक्षां मला ज्यास्ती पैशाची जरूरी नाहीं. त्याच-प्रमाणें जिल्हाधिपती किंवा जज्ज होण्याचीहि मला आवड नाहीं. मोठमोठ्या मानाच्या पदव्यांत मला मोठेपणा वाटत नाहीं. किंवा त्या मिळविणें ही जन्माची इतिकर्तव्यता आहे अशीहि माझी समजूत नाहीं, या सर्व ह्मणण्यावरून मी निवृत्ति मार्गात शिरलों आहें असें समजूं नका. अंगाला राख फांसून जगाविषयीं उदास होऊन आत्मिक उन्नतीचा मार्ग स्विकारणाऱ्यांपैकीं मी नाहीं. या जगांत मी जन्मास आलों आहें, तो कांहीं कारणासाठींच आलेला आहें अशी माझी दृढभावना आहें. शिक्षणानें पोंसलेल्या बुद्धिबलानें माझें कर्तव्य कोणतें याचा मी नीट विचार करून तें ठरविलें आहे. माझ्या ध्येयांत अगर कर्तव्यांत अयोग्य अगर नीतीला सोडून असा हेतु नाहीं. जगांतील कोणत्याहि सत्पुरुषाला त्यास नांवें ठेवतां येणार नाहींत. मी मानवयोनींतील असून नरवर्गांपैकीं आहें. सौख्यमूल प्रगत्येच्छा, निश्चयबल व धैर्य ह्यांचेच बलावर मानवजातीनें अद्यापपर्यंत आपली उन्नति करून घेतलेली आहे, आणि त्याच गुणांच्या बलावर माझें अंतिम साधण्याची माझी इच्छा आहे. "

" तुझें असें अंतिम तें कोणतें ? स्वावलंबी बनविणाऱ्या नोकरीपेक्षां तें अधिक योग्यतेचें असेलसें मला नाहीं वाटत ! "

" बाबा, असें कसें ह्मणतां ! स्वार्थहेतु-प्रेरित अंगीं कर्तव्य शून्यता बन-विणारी नोकरी कोणीकडे व जनतेच्या कल्याणासाठीं मनोभावें कर्तव्यविकास करावयास लावणारें जनकार्य कोणीकडे ! "

" ह्मणजे ! "

" आपल्या अभागी लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं व्यासपीठावरून उप-देश करण्याचें जें तुह्मीं काम केलेंत त्यास अपत्यधर्मानुसार मूर्त स्वरुप देण्याचें माझें पवित्र कर्तव्य करण्याचें मीं योजिलें आहे. "

बोलण्याच्या भरांत खऱ्या कळवळ्यामुळें आपण कोणाशीं बोलतों आहों यांचें देखील त्याला भान राहिल्यासारखें दिसत नव्हतें. तो खऱ्या अंतःकरणा-पासून बोलत होता, त्याच्या बोलण्यांत संकोच नव्हता.

त्याचें बोलणें ऐकून चिंणामणराव जागचे जागींच गार झाले ! मुलाची देश-

भक्ति इतक्या उज्वल स्वरूपाची असेल अशी त्यांस कल्पना देखील नव्हती. देशभक्ति ह्मणजे व्यास–पीठावर उपदेशक या नात्यानें चढावयास मिळणारें मुख्य साधन, व असा उपदेशक बनणें ह्मणजे लोकांत मानमान्यता मिळविण्याचा एक सुलभ मार्ग असें त्यांचें मत असून ह्या बाबतींत 'पुराणांतील वांगी पुराणांत' अशी त्यांची वागणूक असे. स्वकार्यापुढें देशकार्यास किंमत देणें ह्मणजे निव्वळ मूर्ख बनणें असें ते समजत असत. मुलाच्या डोक्यांतील हें मूर्खपणाचें देशकार्याचें वेड काढावें या हेतूनें ते ह्मणालेः—

" विनायक, हें मूर्खपणाचें वेड तुझ्या डोक्यांत कोठून शिरलें कोणास ठाऊक ! देशकार्य करून हिंदुस्थानची उन्नति करणें, ह्मणजे तुला हातचा मळ वाटतो काय ? तीं तुझ्या सारख्यांचीं कामें नव्हत, समजलास. त्याला अलौकिक सामर्थ्याचे पुरुष लागतात. कुठें दोन पुस्तकें शिकलास ! कॉलेजमधील शिक्षणाची झुळुक घेतलीस व पोकळ युक्तिवाद करावयास शिकलास ! ! आणि एवढ्यानेंच शेंफारून निघालास देशकार्य करावयाला ! ! ! जोंपर्यंत अनुभव आला नाहीं तोंपर्यंत या साऱ्या गोष्टी. अरे, आमच्यांतील कितीतरी समाजसुधारक असे तुझ्यासारखेच बहकून लागले होते सुधारणा करण्याच्या मार्गें. पण त्यांस देखील अखेरीस हार खावी लागली. आणि ही मंडळी कांहीं लहानसहान नव्हती. चांगलीं मोठमोठीं धेंडें होतीं. बिचारे निघाले होते सुधारणा करावयाला ! पण त्यांची ती सुधारणा बाजूला राहून स्वतःला मात्र बिचाऱ्यांनीं जगाच्या उपहासास पात्र करून घेतलें. हीं किंवा अशींच अनेक उदाहरणें डोळ्यांपुढें असतां तुझ्यासारख्यानें डोळे मिटून त्या मार्गाकडे वळावें हें मला तर शहाणपणाचें दिसत नाहीं. "

" बाबा, असें कसें ह्मणतां ? हे जे तुमचे समाजसुधारक सुधारणा करण्यासाठीं निघाले होते त्यांचें एकतर मनोधैर्य बळकट नव्हतें किंवा ते खरे कळकळीचे सुधारक नव्हते. बालविवाह, विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य वगैरे विषयांवर यांचें शब्दतांडव जितक्या जोरानें होत असे त्याच्या शतांश देखील लोकगंगेला किंवा इतर परिस्थितीला झिडकारून वागण्याचें यांच्यांत मनोधैर्य नव्हतें. कोणी बापाच्या, तर कोणी भावाच्या, कोणी अविभक्त कुटुंबपद्धतीच्या तर कोणी विचारक्रांतीच्या आड, स्वतःवर पाळी येतांच दडून प्रतिपादन के-

लेल्या तत्वांस हरताळ लावावयास तयार झाले. बोलणें व चालणें ह्यामध्यें ह्या-प्रमाणें फरक दिसतांच समाजोन्नतीची ह्यांनीं उचललेली तळी त्यांच्याच छाती-वर पडली व बिचारे जगाच्या उपहासास पात्र झाले. असें झालें ह्मणून समाज-सुधारणा होऊं नये का ? किंवा तिचे पहिले नेते भेकड निघाले ह्मणून दुसऱ्या कोणीं प्रयत्न करूं नये ? समाजास व खुद्द देशास बदललेल्या परिस्थितीस सा-जेसें समाजशास्त्र पाहिजे आहे. व तें पाहिजे आहे ह्मणून कोणी ह्मणावयास लागला तर त्याच्या तोंडावर अयोग्य समाजसुधारकांच्या विटंबनेचा तुकडा टाकून त्यास नामोहर करावयाचें ! बाबा, अशानें देशाची ह्मणा किंवा समा-जाची ह्मणा उन्नती होणारी नाहीं. फुरसतीच्या वेळेचा उपयोग करून मान-मान्यता मिळवूं पाहणारे नेते आमच्या समाजास नको आहत. गौतम, महावीर, शंकराचार्य, रामानुजाचार्य, दयानंद ह्यांच्यासारखे अहोरात्र खपणारे सत्पुरुष आह्मांला पाहिजे आहेत.

"प्रथम दर्शनीं अपयश दिसत असतां अगर कांहीं काळपर्यंत यश मिळतांहि असतां न डगमगतां आपला मार्ग स्वार्थाची व छिद्राण्वेषण लोकोपवादाची एक होळी करून नेटानें व शांतपणानें आक्रमण्याइतकी पुढाऱ्यांची—नेत्यांची ज्योत जिवंत असावयास लागते. व ती इतकी जिवंत असावयास मनाची स्फूर्तीहि ति-तकीच कसदार असावयास लागते. कोणी वंदो किंवा निंदो आपलें उद्दिष्ट सर्वकाळ डोळ्यासमोर ठेवून समाजसुधारक बनणाऱ्यानें सारखी खटपट केली पाहिजे. आपल्या इकडील राहिले. पाश्चात्यांतले दाखले द्या. ठराविक पुराणप्रियतेस हरताळ लावून धर्मक्रांति करणारा लूथर, वाशिंगतन, कर्तव्यतत्पर क्रामवेल, नेलसन, शूराग्रणी नेपोलियन, बिनतारायंत्राचा कल्पक व योजक दिर्घोद्योगी मार्कोनी, प्रसिद्ध कल्पक एडिसन असे एक ना हजार दाखले आपणास दाखवितां येतील. हे सर्व साधारण माणूसकोटींतीलच आहेतना, कां कांहीं विशेष स्वरूपाचे किंवा ईश्वरी अंशानें बनविलेले पुतळे आहेत ? निश्चयाच्या मनोबलांतचना त्यांच्या कर्तव्याचा किंवा अलौकिक सामर्थ्याचा उदय झालेला आहे ? असें जर आहे तर आपणांस तसें कां होतां येऊं नये. त्यांची परिस्थिति निराळी असल्यामुळें त्यांस सर्व करतां आलें किंवा येतें असा तुह्मीं याउपर आक्षेप घ्याल. त्यासहि समर्पक उत्तर आहेच. त्यांची परिस्थिति निराळी तर त्यांचा काम करण्याची तऱ्हा निराळी.

"अंधश्रद्धेच्या कर्मठ स्थितींत वैदिक धर्माचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडावयास स्वामी दयानंदजी जेव्हां निघाले, तेव्हां लोकांनीं काय त्यांची कमी अवहेलना केली ? भौतिक उन्नतीनें शेफारलेल्या पाश्चात्यांस वेदांताचें रहस्य दाखविण्यास हिंदू लोकांस काय कमी त्रास पडला ! त्यांच्या धार्मिक परिषदेंत भिक्षुकाप्रमाणें स्वतःचें चंबुगवाळें टाकून आह्मांला प्रथम प्रवेश करून घ्यावा लागला. व त्याचा उत्तर भाग स्वामी विवेकानंदासारख्या थोर विभूतीनें आपल्या निस्सीम श्रद्धेच्या व कर्तव्य स्फूर्तीच्या जोरावरच पार पाडलाना ! नास्तिक बनलेल्या पाश्चात्यांस रामतीर्थासारख्या हिंदू महात्म्यानें 'प्रति ईश्वर मीच' असें कितीदां तरी नेटानें सांगितलें. आणि त्यांनीं हें त्याचें ह्मणणें त्याच्या वाणींतील तेजस्वितेमुळेंच ऐकून घेतलेंना ! ह्याप्रमाणें आपली थोरवी, आपली योग्यता पाश्चात्यांच्या नजेरस आणूस देऊन हिंदू ह्मणून कोणीतरी जिवंत लोक पृथ्वीच्या पाठीवर आहेत याची ओळख त्यांना व पर्यायानें आह्मालाहि करून दिली आहे. त्यांनीं राष्ट्रांत चैतन्य आणलें असून कर्तव्यहीन बनलेल्या आह्मांस जागें केलें आहे. आणि ही एवढी थोर कामगिरी त्यांनीं संस्कृतिजन्य निश्चयाच्या व स्फूर्तिजन्य कर्तबगारीच्या जोरावरच केली आहेना !"

त्याचें कळकळीचें व स्फूर्तिमय भाषण ऐकून चिंतामणराव थक्कच झाले. ठराविक पूर्वसंस्कारांचें त्यांच्या मनावर जरा जास्त दडपण जरी होतें तरी त्याचें बोलणें खोडून आपलेंच ह्मणणें पुढें करणें त्यांस लज्जास्पद वाटूं लागलें. त्याच्या ह्मणण्याप्रमाणें त्यास वागूं द्यावें अशी पुसट अगदीं पुसट कल्पना त्यांच्या मनांत डोकावून पाहूं लागली होती. परंतु—

विनायकाचें भाषण चालू असतांनाच हातांत घेतलेल्या ताज्या "मराठी" दैनिकांतील खालील स्फुटाकडे त्यांचें लक्ष गेलें.

"येथील सन्मान्य नागरिक व प्राव्हिन्शअल सर्व्हिस मधील राव बहादूर आण्णासाहेब कुंठे यांस उत्तर भागाचे कमीशनर नेमले म्हणून त्यांचा सन्मान करण्यासाठीं येथील सर्व नागरिकांची काल टाऊन हॉलमध्यें सभा भरली होती. आण्णासाहेबांचा नोकरींतील व खासगी वर्तनक्रम कित्ता घेण्यासारखा असून अद्यापपर्यंत कोणास न मिळालेल्या ह्या मानाच्या व योग्यतेच्या जागेपर्यंत ते आपल्या अंगच्या हुशारीनेंच चढलेले आहेत. योग्य हिंदी मनुष्यांची निवड

करून त्यांस विश्वासाच्या व महत्वाच्या जागा देण्यास सरकार कधींहि मागें पंहात नाहीं हें या नेमणुकीनें नेहमीं जनतेच्या दृष्टीसमोर रहात जाईल. ”

वरील बातमीनें विनायकाच्या भाषणाचा त्यांच्या मनावर झालेला थोडाबहुत परिणाम पार नाहींसा झाला. त्यांच्या दृष्टीस मोह घालणारी नोकरी मिळत असतां देशकार्याच्या मृगजलाचे मागें लागणें ह्मणजे निवळ मूर्खपणा होय असें त्यांच्या मनानें पुन्हां घेतलें. कसेंहि करून विनायकास नोकरींत गोंवावयाचें असें आपल्या मनाशीं ठरवून ते त्याला ह्मणाले—

“ विनायक तुझें ह्मणणें किंवा तुझे विचार सर्वथाच योग्य आहेत असें नाहीं. निःस्वार्थ बुद्धीनें समाज सुधारणा करणारांस तूं जो दोष दिलास तो बरोबर नव्हे देशांतील परिस्थितीपुढें त्यांस हात टेंकावें लागले त्याचा दोष त्यांच्याकडे नाहीं किंवा त्यांची कर्तव्यतत्परता मलीन होती अशांतला प्रकार नाहीं. आपल्या देशाची स्थिति अद्याप सुधारणा करण्याइतकी परिपक्व झालेली नाहीं. देशाची किंवा समाजाची स्थिति खालावलेली आहे याचा विचार करण्याची देखील साधारण जनतेस अपेक्षा वाटत नाहीं. जेथें इच्छाच नाहीं तेथें गोडी तरी कोठली असणार ? अशा लोकांच्या कानीं कपाळीं समाजसुधारकांनीं किती जरी कंठशोष केला तरी त्याचा फायदा होणार नाहीं. मागच्या अनुभवावरून ही गोष्ट प्रत्ययास आलेली आहे. त्याच प्रत्ययाचा तुझ्यासारख्या होतकरू तरुणांनीं आपल्या आयुष्याचा अपव्यय करून पुन्हां अनुभव घ्यावा हें मला योग्य दिसत नाहीं. या माझ्या ह्मणण्यावरून तुझ्यासारख्यानीं देशकार्यांत आजिबात पडूं नये असें मात्र माझें मत नाहीं. नोकरीकरून स्वार्थ, व देशकार्य करून परमार्थ, दोन्हीहि साधावेत. माझें ह्मणणें तुझ्या ताज्या दमाच्या रक्ताला आतांच पटावयाचें नाहीं. तेव्हां या गोष्टीचा तूं शांतपणें विचार कर आणि नंतर तुझें मत काय होईल तें मला सांग. ”

चिंतामणरावांनीं आपली नेहेमीची तामसी अरेरावी वृत्ती सोडून सामदामाच्या वृत्तीचा अंगिकार केला होता अशा तऱ्हेनें वागण्यांत आपला कार्यभाग साधावा याशिवाय त्यांचा दुसरा कोणताहि हेतु नव्हता.

“ हें घे तुझें पत्र. मला वाटतें. भालचंद्राचें असावें. ” जात असलेल्या विनायकास मागें बोलावून त्यांनीं पत्र त्याच्या हातांत दिलें.

प्रकरण १५ वें.

लक्ष्मीचा निश्चय.



माधव घर सोडून प्रवासास कां गेला यांचें खरें कारण इतर मंडळीस जरी ठाऊक नव्हतें तरी तें गोविंदराव व लक्ष्मी यांस पुरतेपणीं ठाऊक होतें. लक्ष्मी आपल्या ह्मणण्यास तयार होणार नाहीं याची खात्री. पटल्यानंतरच तो घर सोडून गेला होता, व अशा तऱ्हेच्या त्याच्या जाण्यानें त्याच्या मनाचा मोठेपणा व्यक्त होत होता.

माधव गेल्यापासून गोविंदरावांची लक्ष्मीच्या मागें त्याच्याशीं लग्न करण्याची नेहमीं टोंचणी असे. ते निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या तऱ्हेनें तिला उपदेश करीत असत, व कुणीकडूनहि तिनें माधवाशीं लग्न करण्यास तयार व्हावें अशा तऱ्हेनें तिला समजवित असत. माधवाच्या जाण्याचा लक्ष्मीच्या मनावर जरी थोडावहुत परिणाम झाला होता व तिचा बापहि त्याच्याशीं लग्न करण्यास तिला नेहेमीं समजावून सांगत असे तरी माधवाशीं लग्न करावें असें लक्ष्मीस वाटत नसे. लग्न करण्यास आपली संमती असल्याचेंहि तिनें कधीं गोविंदरावास भासविलें नाहीं. यानें गोविंदराव जरा चिडल्यासारखे झाले; व एके दिवशीं त्यानीं स्पष्टपणानें तुला माधवाशीं लग्न केलें पाहिजे असें सांगितलें.

लक्ष्मीनें त्यांना कांहींच उत्तर दिलें नाहीं.

" लक्ष्मी, तुला वाटतें तरी काय तें मला एकदां समजूं दे, ह्मणजे ह्या बाबतींत मी पुन्हां तुझ्याजवळ गोष्ट काढणार नाहीं. " ते संतापून ह्मणाले.

तरीहि लक्ष्मीनें आपली स्तब्धता सोडली नाहीं; यानें तर ते जास्तच चिडले.

" लक्ष्मी, ह्या बाबतींत तुझ्या कल्याणासाठींच मी तुला पुष्कळ तऱ्हेने सांगून बघितलें. आणि आतां मी जें कांहीं सांगणार तें शेवटचेंच सांगणार आहें. येवढ्यानेंच तुला उमज पडला तर ठीक; नाहींतर तूं आणि तुझें नशीब ! माध-

वाशीं लग्न करावयास जें मी तुला लांगतों तें कांहीं माझ्या फायद्यासाठीं सांगत नाहीं. त्यांत तुझाच फायदा आहे. माधव अतिशय श्रीमंत आहे. त्याच्या श्रीमंतीची कदाचित् तुला कल्पना नसेल. आज मितीला तो जवळ जवळ पन्नास लाखांचा मालक आहे. त्याच्या श्रीमंतीस साजेल इतका तो विद्वान् आहे. सध्यां त्याची वर्तणूक पूर्ण निवळलेली असून मध्यंतरींच्या अल्लडपणाच्या वागणूकीवर त्यानें आपल्या सध्यांच्या वर्तणूकीनें पांघरूण घातलेलें आहे. तो पुन्हां अनीतीच्या मार्गाकडे वळेल असें मला तर वाटत नाहीं. तो तरुण आहे. त्याच्या अंगांत कर्तबगारी आहे. पण ह्या सर्व गोष्टींचें चिज होणें सर्वस्वीं तुझ्या हातीं आहे. त्याच्या उच्छृंखल स्वभावास आळा घालून त्याच्या अंगभूत गुणांचा विकास करावयास त्याला योग्य सहधर्मचारिणीची जरूर आहे. तुझ्या संबंधानें त्याच्या मनांत उत्कट प्रेम वसत आहे. तो तुझ्यावर पूर्ण अनुरक्त झालेला आहे. त्याला चांगला अगर वाईट बनविणें तुझ्याच हातीं आहे. तो येथून निघून गेला ह्या एकाच गोष्टीवरून त्याचें तुझ्यावरील प्रेम व त्याचा मनाचा मोठेपणा व्यक्त होत आहे. ”

लक्ष्मी त्यांचें बोलणें शांतपणानें ऐकून घेत होती. तिच्या चेहऱ्याकडे पहाणारांस तिच्या मनांतील खळबळ स्पष्ट दिसणारी होती. गोविंदराव पुढें ह्मणाले–

“ काकासाहेब (श्रीनिवासराव) ज्याप्रमाणें स्त्रीशिक्षण वगैरे विषयांचे कैवारी होते, त्याचप्रमाणें व्यक्तिस्वातंत्र्याचेहि ते पूर्ण कैवारी होते. आणि ह्मणूनच तुझ्या अगर माधवाच्या संबंधानें माझ्या एकट्याच्याच विचारानें मीं कोणतेंहि कृत्य करूं नये अशी त्यांनीं व्यवस्था करून ठेवलेली आहे. त्यांच्यामुळेंच आज मी तुला शिक्षणाच्या मार्गांत ठेवलेलें आहे. त्यांच्यामुळें आज आपण या स्थितींत आहोंत. याचा विचार कर. आपल्यावर असलेले त्यांचें उपकारऋण आपणांकडून जर फिटण्यासारखें आहे तर तें फेडणें आपलें काम आहेना ! ”

येवढें बोलून ते स्तब्ध बसले. लक्ष्मीच्या मनाची स्थिति चमत्कारिक झाली. वडिलांचें ह्मणणें लक्षांत घेतां माधवाशीं लग्न करावें असें तिला वाटे तर स्वतःच्या मनाच्या कलाचा विचार करतां त्याच्याशीं लग्न करूं नये असें तिला वाटे. ह्या मानसिक आंदोलनाच्या स्थितींत ती तेथें किती तरी वेळ बसली होती. गोविंदराव गेल्याचेंहि तिला भान राहिलें नाहीं.

बराच वेळ गेल्यानंतर गोविंदराव तेथून गेल्याचें तिच्या लक्षांत आलें. ती तेथून उठली व आपल्या खोलींत आली. खोलींत आल्याबरोबर खोलीचा दरवाजा तिनें बंद करून घेतला व आपल्या बळकटीवर जाऊन ती पडली. अद्यापपर्यंत तिच्या डोळ्यांतून पाणी आलें नव्हतें पण खोलीचा एकांत मिळतांच तें आलें. एखाद्या प्रिय मित्राजवळ आपलें दुःख सांगून मनुष्य जसें आपलें दुःख हलकें करून घेत असतो, तसें त्या एकांतरूपी प्रियसखीजवळच अश्रुरूपानें ती आपलें दुःख सांगूं लागली.

अश्रुस्रवानें आपलें दुःख कमी केल्यावर तिला जरा स्वस्थता वाटूं लागली तिची मानसिक अस्वस्थता कमी झाली. पण ही फार वेळ टिकली नाहीं. पुन्हां आपल्या स्थितीविषयीं तिच्या मनांत विचार येऊं लागले. बापाचें बोलणें तिच्या मनाला सारखें लागून राहिलें होतें. माधवाचा सर्व भावी आयुष्यक्रम खरोखरंच आपल्यावर अवलंबून आहे कां, याचा ती आपल्या मनाशीं पुन्हां पुन्हां विचार करूं लागली. ह्या दृष्टीनें ती त्याच्या मनाचा विचार व वर्तनाची चिकित्सा करूं लागली. माधवानें पहिल्यानदां, अगदीं पहिल्यानदां, जेव्हां तिच्याशीं प्रेमयाचना केली व त्यावेळचें त्यांचें वर्तन जरी अगदीं कानष्ठ प्रतीचें माणूसकीस लाज आणणाऱ्यां तऱ्हेचें होतें तरी त्यानंतरचें—तिनें त्यास [वजांविल्यानंतरचें, त्याचें वर्तन खरोखरीच वाखाणण्यासारखें होतें. बंधुधर्मानुसारंच त्याचें तिच्याशीं वर्तन होतें त्याच वर्तनास नांव ठेवण्यास कोठेंहि जागा नव्हती. किंवा त्याच्या सौजन्यास कमीपणा आणतां येईल अशा तऱ्हेचें तें नव्हतें. ह्या साऱ्या कालांत आपल्या मनोगत प्रेमाचें त्यानें केव्हांहि दिग्दर्शन केलेलें नव्हतें. त्यापासून होणारा त्रास तो मुकाट्यानें सोशित होता. मुंबईहून आल्यानंतर हा त्याचा प्रेमविकार दिसूं लागला तरी त्याचें स्वरूप योग्य मर्यादेंतच होतें. त्यांत उत्छृंखलपणाचा भाव अगदीं दिसत नव्हता; किंवा आपल्या एकट्याच्या सुखासाठीं दुसऱ्यास दुःख द्यावें, आपल्या इच्छेसाठीं दुसऱ्याच्या इच्छेवर वरवंटा फिरवावा अशी स्वार्थ बुद्धीची भावनाहि त्याच्या आचरणांत दिसत नव्हती. किंबहुना दुसऱ्याच्या सुखासाठीं कराव्या लागणाऱ्या आत्मयज्ञाची त्यांत छटा दिसत होती. व याची पूर्णता आपण येथून निघून जाण्यानें त्यानें केली, ह्यांत त्याची निःस्वार्थी परहित बुद्धि चांगलीच दिसत होती.

आपण आपल्या बापाचा आशाभंग केला तर त्यांत त्याला किती वाईट वाटेल, याचाहि तिनें विचार केला नाहीं. 'बाप' ह्या शब्दानें, ह्या शब्दाच्या कल्पनेनें, त्याच्या उच्चारानें, त्याच्या चिंतनानें उत्पन्न होणारा पूज्यभाव तिच्या मनांत ह्या स्थितींत आल्याशिवाय राहिला नाहीं. त्यानीं आपल्या सुखासाठीं येवढी काळजी वहावी व आपण त्या काळजीची पर्वाहि करूं नये हें तिला कसेंसेंच वाटूं लागलें. ह्या कल्पनेनें तिच्या विचारशक्तीच्या नाजुक ठिकाणींच हात घातला.

शिवाय आपणा सर्वांवर श्रीनिवासरावांनीं केलेले उपकार तिच्या विचारक्षेत्रांत येऊं लागले. ज्यांच्या मनाच्या थोरपणामुळें, ज्यांच्या औदार्यामुळें आपण आज ह्या स्थितींत आहोंत; त्यांच्या नुसत्या आठवणीनें तिचें मन कळवळलें, तिच्या मनांतील कृतज्ञताबुद्धि जागी होऊं लागली. उपकारकर्त्यांचें नेहेमीं-वेळप्रसंगीं स्वार्थाची होळी करून अभीष्टच करित राहिलें पाहिजे ही भावना तिच्या मनांत जागृत होऊं लागली. ह्यानें तिची सर्व विचारशक्ति एकमार्गी बनली.

ह्या सर्व विचारांनीं स्वार्थत्यागाचें बीं रुजून त्याच्या वृक्षाची, तिच्या मनावर, आकांक्षापूर्ण स्वार्थी मनावर, छाया पसरूं लागली. आपल्या मनांत कांहीं असलें तरी त्यास कमीपणा देऊन माधवाशीं लग्न करणेंच आपणांस उचित असून तें आपलें पवित्र कर्तव्यकर्म आहे असेंच तिला वाटूं लागलें. हा विचार तिच्या मनांत चांगलाच बळावला. तो आपण वडिलांस केव्हां कळवूं असें तिला झालें. त्यांना तो कळविण्यासाठीं ती झटकन उठून दरवाज्याकडे वळली. दार उघडून बाहेर जाण्यासाठीं तिनें दाराची कडी काढली. आतां बाहेर पडणार इतक्यांत समोरून कमला आलेली तिला दिसली. तिचें तोंड उतरलेलें होतें. दोघींची दृष्टादृष्ट होतांच कमलेला रडूं आलें.

प्रकरण १६ वें.

घर सोडलें.



लंडन, ता. १३. ११. १९०४.

"रा. विनायकराव मु॥. यवतमाळ यांसी. प्रेमपूर्वक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. तुझें गेले महिन्यांतलें पत्र पावलें. पत्र वाचून फार आनंद झाला. अंगीकृत कार्यासाठीं तुला फार त्रास पडेलसें दिसतें. तुझ्या वडिलांचा स्वभाव हेकेखोर असल्यानें हा प्रयत्न करून ते तुला नोकरींत गोंवण्याची खटपट करतील असें मला वाटत नाहीं. या बाबतींत हा माझा तर्क आहे, तो खोटा ठरो अशी माझी मनापासून इच्छा आहे.

" इकडे आल्यापासून मीं काय केलें यांचें तुला अद्यपि कळविलें नव्हतें. यांचें खरें कारण कळविण्यासारखें माझे हातून कांहींच झालें नव्हतें. पण आतां तशी स्थिति नाहीं. माझे हातून कांहींतरी होत आहे आणि त्याबद्दल तुला मला लिहिणें जरूर आहे.

" डॉ. विश्वनाथराव यांनीं येथें आल्यानंतर मला चांगलेंच साहाय्य केलें आहे. व अद्यापहि करितच आहेत. येथें आल्यापासून हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचें सर्व दृष्टीनें अध्ययन करण्यांत मी माझा वेळ घालवित असतों. ब्रिटिश म्युझियमचें पुस्तकालय या कामीं माझ्या फारच उपयोगी पडत आहे. हिंदु असल्या कारणानें या बाजूनें अभ्यास करणें मला इतरांपेक्षां फारच सोपें जात आहे. आपल्या गतकालीन चांगल्या व वाईट स्थितीचीं कारणें शोधून तीं हल्लींच्या निकृष्ट स्थितीशीं ताडून पाहून त्यावरून निघणारीं माझीं अनुमानें विचारणीय आहेत कीं नाहीं हें अजमावून पहाण्याच्या हेतूनें मी इकडील मासिकांत लेख लिहिण्यास सुरवात केली आहे. या दृष्टीचे माझे सारे दोनच लेख अद्यापपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. चांगल्या विद्वानांनीं या माझ्या लेखाचें समालोचन करतांना योग्य पसंती दर्शविलेली आहे, व यामुळें मला दुप्पट हुरूप चढल्यासारखें झालें आहे. येथील सर्व हिंदी मंडळीस डाक्टर फारच प्रिय

असून वजनदार मंडळींत ते मोडत असतात. हिंदुस्थानांतून निरनिराळ्या व्यासंगाची मंडळी येथें येते. व ह्या सर्वांशीं बोलण्याचालण्याची मला ह्यामुळें चांगली संधी मिळते.

"माझी प्रकृति चांगली आहे. तरी प्रकृत्यस्वास्थ्यामुळें मला आय्. सी. एस्. चा कोर्स यंदा झेंपणार नाहीं म्हणून गेल्या मेलनें डाक्तरांनीं बाबांस पत्र लिहिलें आहे. या एकाच गोष्टीवरून डॉक्तरांची मला केवढी मदत आहे याची तुला कल्पना येईल."

"तुझ्याकडील सर्व मजकूर मला कळवावा. माधवराव हल्लीं काय करतात ? आपले घरांतील सर्वत्र मंडळीस माझे नमस्कार कळवावे. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला.

भालचंद्र."

भालचंद्राचें पत्र वांचून त्याची व आपली स्थिति ह्याबद्दलचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. व अशा तऱ्हेनें विचार करतां करतां त्याचा डोळा लागला.

त्याला झोंप लागली तरी त्याचें मन काम करीतच होतें. आपल्या स्थिती-च्या कल्पनेनें रंगलेलीं स्वप्नें त्याला पडत होतींच. अशा स्थितींत असतां त्याला कमलेनें हांक मारली. तिची हांक ऐकतांच तो दचकून उठला व बावरलेल्या दृष्टीनें सभोंवार पाहूं लागला. स्वप्न सुखांत अनुभवीत असलेली स्थिति अद्यापि त्याच्या मनांतून गेलेली नव्हती.

" दादा, तुला जेवावयाला नाहींका यावयाचें ? सगळें तुझ्यासाठीं खोळंबून बसले आहेत. "

प्रेमळ स्वरानें बहिणीनें उच्चारलेले शब्द एकून तो भानावर आला. मुकाट्यानें उठून तों जेवावयास गेला. जेवतांना त्यानें मौनव्रत धरलें होतें. व हें लक्षांत येण्यासारखें होतें. आपल्या मघाच्या बोलण्यानें तो खिन्न झालेला आहे हें चिंतामणरावांनीं ताडलें. यावेळीं त्याच्याशीं न बोलणें हेंच चांगलें असें समजून ते कांहींच बोलले नाहींत.

जेवण झाल्यानंतर तो पुन्हां खोलींत येऊन पडला. ' आतां पुढें कसें करावें

त्याचा तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला. परिस्थिति विरुद्ध आहे तेव्हां स्वस्थ बसावें काय हा प्रश्न त्याच्यापुढें येऊन पडला. तो आपल्या वडिलांचा स्वभाव पूर्णपणें ओळखत होता. त्यांच्याकडून आपणांस सहानुभूति मिळून मदत होईल हें त्यास शक्य वाटेना. त्याचप्रमाणें मातेकडून खटपट करून वडिलांचें मन वळवितां येईल हेंहि त्यास साधेलसें दिसेना आपल्या मनाप्रमाणें तर झालें पाहिजे, होत नसल्यास घडवून आणलें पाहिजे पण हें साधावें कसें ? हा प्रश्न दिवसगतीवर टाकणें आतां शक्य नव्हतें. किंवा या बाबतींत भालचंद्राची सल्ला घेणेंहि त्यास शक्य नव्हतें.

आपला आपणालाच मार्ग शोधला पाहिजे हें त्यास उघड दिसूं लागलें पण तो शोधावयाचा कसा हें मात्र त्याला अद्यापपर्यंत नीटपणें समजेना. शिवाय आपण ह्या मार्गाचा एकदां अंगिकार केला असें वडिलांस समजलें ह्मणजे त्यांचा आपल्यावर राग होणार हें त्यास दिसूं लागलें. त्याचप्रमाणें आपल्या वडिलांस अज्ञानांत ठेवणेंहि त्याला आतां शक्य नव्हतें. आपल्या मनांत काय आहे हें त्यानें त्यांना अगोदरच कळविलें होतें.

तो असहाय्य अशा स्थितींत सांपडला. आपल्या मनाप्रमाणें आपल्या उच्च हेतूसाठीं वडिलांशीं भांडून घरांतून बाहेर पडल्यावर पुढें करावें कसें याची त्याला पंचाईत पडली. तो शिकलेला होता. पोट भरण्यापूर्ती नोकरी त्याला कोठेंहि मिळाली असती. पण नोकरी धरून त्याचा हेतु साधणें शक्य नव्हतें. त्याचा हेतु साधण्यासाठीं त्याला पैशाचें, पोट भरून मनांतील हेतूसाठीं करावयास लागणाऱ्या पूर्व तयारीला पुरण्याइतकें पैशाचें, पाठबळ पाहिजे होतें.

गरज लागली कि रस्ता सापडतो; ह्याप्रमाणें त्याचें झालें. मनांत विचाराच्या लाटा सारख्या येत जात असतां ह्या बिकट स्थितींतूनहि त्याला मार्ग दिसूं लागला. वडिलांशिवाय दुसरे कोणी आपणांस मदत करतील का या दृष्टीनें तो पाहूं लागतांच माधवाची मूर्ति त्याच्यापुढें दत्त ह्मणून उभी राहिली. तो घरचा चांगला श्रीमंत असून स्वतंत्र होता. तो त्याचा लहानपणाचा बालमित्र होता व तेथून तो नुकताच जाईपर्यंत त्याचें व त्यांचें चांगल्याच तऱ्हेचें सख्य होतें. शिवाय तो त्याच्याच पंथांतला होता. ह्या सर्व गोष्टी व हे सर्व विचार एकदम त्याच्या मनांत आले. माधव ह्यावेळीं आपणास मदत करील ह्याची त्याला खात्री वाटूं लागली.

हेंच योग्य !

लक्ष्मीचें मन निराळ्याच विचारांत गर्क झालें होतें, व त्यामुळें कमला काय बोलते इकडे तिचें लक्ष नव्हतें. कमलेचें बोलणें ऐकून, विनायक गेला ही बातमी समजल्यानें स्वार्थत्यागाच्या प्रेरणेनें आनंदावलेलें तिचें मन एकदम खट्टू झालें. आनंदाच्या टिकाणीं दुःख दिसूं लागलें. आणि तें कां तर ती विनायकावर अनुरक्त झालेली होती म्हणून. यौवनाचा तिच्या शरीरांत संचार झाल्यानंतर तिचें मन सहजच विनायकाकडे ओढूं लागलें होतें. हा प्रेमविकाराचा प्रकार पहिल्यानदां तिला नीटसा कळत नव्हता. पण पुढें त्याचा जसजसा जास्ती विकास होऊं लागला, तसतशी त्याची ओळख तिला जास्ती पटूं लागली होती. माधवाच्या प्रेमाचा जेव्हां, तिनें अव्हेर केला तेव्हां तिचें प्रेम विनायकावर बसलेलें होतें. पण त्याची अद्यापि दुसऱ्या कोणास–फार तर.काय पण प्रत्यक्ष विनायकास देखील कल्पना नव्हती.

तो घर सोडून गेला हें कळतांच तिची चित्तवृत्ति एकदम बावरली. आपल्याप्रमाणें त्याच्यावरहि संकट यावें याचें तिला आश्चर्य वाटूं लागलें. याचा ती जसजसा जास्ती विचार करूं लागली,तसतसें तिचें मन जास्तीच भ्रमूं लागलें– विनायकाकडे तिचें मन ओढा घेऊं लागलें. आपल्याप्रमाणें त्याच्यावरहि संकट यावें आणि तेंहि एकाच कालीं! या गोष्टीच्या साम्यतेनें या लोकीं ईश्वरानें त्याचॉ व आपली सांगड घातलेली आंहे असें तिला वाटूं लागलें. ही ईश्वराच्या घरची सांगड आपण तोडण्याची इच्छा करणें किंवा परिस्थितीकडे पाहून ती तोडण्याची खटखट करणें अयोग्य; आणि अयोग्य तर सर्वस्वीं त्याज्य असें तिच्या मनानें घेतलें.

हे विचार तिच्या मनांत चालू असतां माधवाची आठवण ती पार विसरली. आपण ठरविलेला बेत तिच्या मनांतून नाहींसा झाला. त्या भरांत विनायकाची जास्त चौकशी करण्याच्या हेतूनें ती कमलेला म्हणाली–

" पण ते गेले तरी कोणीकडे ? "

मानसिक अस्वस्थतेमुळें आपण आपलें अंतःकरण उघडें करीत आहोंत याचें तिला भान राहिलें नाहीं. पण कमलेच्या लक्षांत ही गोष्ट आली नाहीं.

" तो कोणाला सांगून गेला असेल तर ना हें कळावयाचें ! "

" पण त्यांनीं पत्र लिहून ठेविलें आहेना ? "

" होय ठेविलें आहे, पण त्यांत काय आहे हें मला कांहीं अद्यापि समजलें नाहीं. आणि ह्यावेळीं तर बाबांना विचारण्याचीहि सोय नाहीं. "

" मला वाटतें तुझ्या आईला ठाऊक असेल. "

यावर कमला जरा गुरफटली:

" जा गडे, त्यांना विचारून येना ! "

" तिला कांहीं ठाऊक नव्हतें; आणि दादा तिला सांगूनहि गेला नाहीं असें ती मजजवळ ह्मणत होती. पण कदाचित् बाबांच्या बोलण्यावरून तिला समजलें असेल "

असें ह्मणून कमला जाण्यासाठीं निघाली. इतक्यांत गोविंदराव तेथें आले.

" कां कमले, कसें काय ठिक आहेना ? "

" ठिक कसलें ! "

" कांहीं जास्ती कमी झालें वाटतें घरीं ! चिंतामणराव रागावले वाटतें ? "

" होय, ते रागावलेले आहेतच. पण ते घर सोडून गेले ह्मणे कालच रात्रीं ! " लक्ष्मी मध्येंच ह्मणाली.

" ते कोण ? "

लक्ष्मी चपापली. आपण भलतेंच बोललों असें तिला वाटलें. ती स्तब्ध राहिली.

" काय कमले, घर सोडून कोण गेले ? " गोविंदरारावांनीं पुन्हां विचारलें.

" आमचा दादा काल रात्रीं घर सोडून कोठेंसा गेला. "

" कोण विनायक ? आणि तो कां ? "

" बाबांचें आणि त्याचें काल कांहीं बोलणें झालें. त्यावरून तो गेला असावेंसें वाटतें. "

यापुढें जास्ती विचक्षणा करण्याची पाळी येऊं नये ह्मणून कमला तेथून निघाली.

" जातें आं मी ! " असें ह्मणून ती गेली.

ती गेलेली पाहून गोविंदरावांनीं लक्ष्मीस विचारलें, तेव्हां ती म्हणाली,

" मलाहि अद्याप ह्मणण्यासारखें समजलें नाहीं. पण चिंतामणरावांच्या मनांतून त्यांनीं नोकरी धरावी असें होतें आणि तें त्यांना पसंत नव्हतें ह्मणून ते कालरात्रीं कोणाला न कळवितां घर सोडून गेले. "

" हीं आजकालचीं पोरेंच अशीं. मीच जाऊन चौकशी करतों काय आहे ती. ! "

ते तेथून गेले पण त्यांच्या मनांत निराळाच संशय आलेला होता. लक्ष्मी विनायकास नांवानें कां संबोधीत नाहीं ? याचा ते विचार करीत गेले.

गोविंदरावांशीं बोलत असतां मध्येंच लक्ष्मी चपापली. आणि त्यावेळेपासून तिच्या मनांतील विचारांनीं उलट खाल्ली, माधव त्याचें प्रेम बापाची इच्छा, कृतज्ञताबुद्धी; आपलें स्वतःचें प्रेम, व आपली स्वतांची इच्छा यांचे विचार पुन्हां तिच्या मनांत घोळूं लागले. आपली स्वतःची आवड, आपलें सुख व स्वार्थत्याग यांचें तिच्या मनांत तुंवळ युद्ध सुरू झालें. ती हिंदु होती. हिंदुधर्मांत ती वाढली होती. हिंदु आचार-विचारांचें तिच्या मनावर वर्चस्व होतें. या सर्वांचा परिणाम तिला स्वार्थत्यागी बनविण्यांतच होऊं लागला. स्वार्थाची-स्वतःच्या सुख लालसेची तिला किंमत कमी कमी वाटूं लागली. स्वतःच्या आवडीस आपल्याच हातानें दूर लोटणें तिला वाजवी वाटूं लागलें.

ह्या भावनेनें तिचें मन प्रथमतः जरा खट्टूं झालें, पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. स्वार्थत्यागांतच तिला मोठेपणा वाटूं लागला. आपण आपलें कर्तव्य-स्वार्थत्यागाचें कर्तव्य-बजावावें. हेंच तिला भूषणास्पद-लौकिकदृष्ट्या भूषणास्पद-वाटूं लागलें. व ह्यामुळें होणारा आनंद ती अनुभवूं लागली.

हा आनंद कृत्रिम होता. स्वाभाविक-नैसर्गिक आनंदाची त्याला सर येणारी नव्हती. तरी तिला तोच आनंद योग्यतेचा वाटूं लागला.

गोविंदराव विचारतील त्यावेळीं आपण माधवाशीं लग्न करण्यास तयार आहों असें त्यांस सांगण्याचें शेवटीं तिनें ठरविलें.

प्रकरण १८ वें.

विमला देवी.

"ना हींतर, बाबांना समजलें म्हणजे !"

" त्याची नको तुम्हांला काळजी ! मी सर्व कांहीं व्यवस्था केलेली आहे. " डॉक्तर विश्वनाथराव म्हणाले, " भालचंद्रराव, तुमच्या योग्यतेबद्दल मला पूर्ण विश्वास वाटत आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणें कालापव्यय होत असेल, तर तुम्हीं खुशाल कोर्स सोडा. गेल्या मेलनें तुम्हीं आजारी असल्यामुळें यंदां तुम्हांला परीक्षेस बसणें होणार नाहीं म्हणून मी प्रभाकररावांस कळविलेंच आहे. त्यांचें उत्तर आल्यानंतर आणखीं बतावणी काय करावयाची तें पहातां येईल. आणि यदाकदाचित् त्यांना कळलेंच तर त्यांच्या रागाची मी वाटेल तशी समजूत करीन, मग तर झालेंना ? "

"येवढी जवाबदारी तुम्हीं घेणार असल्यावर मला काय ? मी कोर्स सोडतों. तें माझ्या फायद्याचेंच आहे. "

" तुमच्या वडिलांना फसवून तुम्हांला मदत करण्यांत मी कांहीं अपराध करीत आहें असें मला तर वाटत नाहीं. मात्र पहिल्यानदां जेव्हां तुम्ही मदतीची अपेक्षा केलीत त्या वेळेस मात्र आतां-सारखें मला वाटत नव्हतें. या बाबतींत मी कसा वागलों हें इतके दिवस तुम्हांला सांगितलें नव्हतें पण आतां सांगतों. येथें आल्यानंतर तुमचे विचार जेव्हां तुम्हीं मजजवळ प्रगट केलेत तेव्हां मला मोठा विचार पडला. तुम्हीं म्हणत होतां त्याप्रमाणें तुम्हांला मदत करावी असें मला वाटे, परंतु बोलण्याप्रमाणें तुमच्या हातून कृति घडेलच असें मला खात्रीपूर्वक वाटेना. तुमच्या वडिलांचा ठपका व तुमच्या शिक्षणक्रमाची माती ह्या दोन्ही गोष्टी मला तुम्हांस मदत करा असें सांगेनात. तुमच्याबद्दल

मला स्वतःला कांहींच माहिती नसल्यानें मी मोठ्या पंचाइतींत पडलों तेव्हां आमचे बंधु व तुमच्या कालेजांतील माझ्या ओळखीच्या एका प्रोफेसरास पत्रें लिहून त्यांच्या कडून तुमच्या संबंधीं कांहीं माहिती मागविली, व तुह्मांसहि कोर्सचा अभ्यास करावयास सांगितला. हेतू हा कीं तुह्मीं ह्मणत होतां त्याप्रमाणें तुमच्या मनाचा खरोखरीच ओढा असल्यास आपला अभ्यास संभाळून तुह्मीं इतर माहिती मिळवाल व माहितगारांकडून तुमच्याबद्दल मला माहिती मिळेल; तुमच्या वागणुकीनें तुमची कार्यासाक्ति प्रत्यक्ष माझ्या नजरेस येऊं लागली व त्या दोघांनींहि तुमची हुशारी व तरतरी यांजबद्दल आपापल्या पत्रांत स्तुति केली. येथपर्यंत मजल आल्यावर तुह्मांला मदत करावी असें मला वाटूं लागलें. ह्यांत तुमच्या लेखांची भर पडली. तुमच्या लेखांची योग्य विद्वानांकडून प्रशंसा ह्मालेली पाहून तुह्मांला मदत करणें ह्मणजे मी आपलें पवित्र कर्तव्यकर्म बजावण्यासारखें आहे असें मला वाटूं लागलें. आणि त्याप्रमाणें तें मी आपल्याकडून होईल तितक्या कसोशीनें बजावीत आहें. ”

“ त्याबद्दल मीं आपला खरोखरीच ऋणी आहें. ”

“ माझें मी कर्तव्य बजाविलें. त्यांत दुसरें काय केलें? पालनकर्ता या नात्यानें येणारी माझ्या वरील जवाबदारी योग्य तऱ्हेनें ओळखणें हें माझें काम आहे. मी जरी हिंदु आहें, तरी हिंदुस्थानच्या अचल वातावरणांत मी रहात नाहीं. चैतन्यानें भरलेल्या व नेहेमीं खळवळत असणाऱ्या पाश्चात्य वातावरणांत मी सध्यां रहात आहें. दिवसेंदिवस मनुष्याची प्रगति होत जाऊन सुवर्णयुग अद्यापि पुढें आहे असें मला वाटत आहे. मागलें तेवढें सर्वच चांगलें असें माझें मत नाहीं. हिंदुस्थानचा एकदां भाग्योदय झाला. आतां तो पुढें होणें शक्य नाहीं अशी कर्तृत्वशून्य निराशा मला कधींहि शिवत नाहीं. आणि या बाबतींत येथील बऱ्याच लोकांशीं माझा मतभेद होत असतो. ”

“ ही आमची कर्तृत्वशून्य निराशा किंवा दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें ह्मणजे अंध पुराणप्रियता आह्मांला सोडील तो सुदिन ! जोंपर्यंत आमचे लोक आपल्या स्थितीचा विचार करूं इच्छित नाहींत तोंपर्यंत आमचें डोकें वर निघणार नाहीं. ”

“ असेंच राहून कसें चालेल; जगाच्या वाढत्या सुधारणेबरोबर आह्मांलाहि सुधारणाही केलीचें पाहिजे. ”

"होय पण ती व्हावी कशी ! हाच प्रश्न सध्यां आपणांला सोडवावयाचा आहे. आणि माझ्या मतें तो सोडवावयाचा म्हणजे आपली पूर्वपरंपरा लक्षांत घेऊनच सोडला पाहिजे. आपल्या जुन्या इतिहासाचा अभ्यास करून सोडला पाहिजे. आपण सुधारलेले आर्यलोक हिंदुस्थानांत आल्यापासून आपल्या धार्मिक, राजकीय, सामाजिक, औद्योगिक, बौद्धिक वगैरे बाबींत ज्या घडामोडी झाल्या. ह्या घडामोडींचा आमच्यावर काय परिणाम झाला व तो कसकसा होत गेला यांचा विचार केला पाहिजे. जित व जेते या मूळभावाचें रूपांतर जाऊन तेथें बंधुप्रेम कसें आलें व आर्य व अनार्य हे जवळ जवळ एकमेकांच्या सहवासानें कसे राहूं लागले; एकाच्या संगतीनें दुसऱ्याची उन्नति कशी झाली, एकानें देशाच्या बुद्धिमत्तेचा तर दुसऱ्यानें देशाच्या संपत्तीचा भार आपल्या शिरावर घेऊन देशाची बौद्धिक व सांपत्तिक उन्नति कशी घडवून आणली, यांचें बारकाईनें निरीक्षण केलें पाहिजे. देशाची भरभराट असतांना किंबहुना जगांतील इतर सर्व देश दाट अंधःकारांत गुरफटले असतां आमच्या देशाची उन्नति झालेली आहे. आणि हल्लींच्या सुधारलेल्या देशांप्रमाणें ही आमची उन्नति एकांगी नव्हती. ही लौकिक व पारलौकिक या दोन्ही दृष्टींची होती. भौतिक उन्नतीनें देशांतील लोक सुखासमाधानानें रहात होते, त्यांची कर्तृत्व-शक्ति झळकत होती व आपल्या अस्तित्वाचें चैतन्य ते इतर जगास भासवीत होते. व त्या बाजूनें इच्छा परिपूर्ण होत असल्यानें त्यांचें मन शांत रहात असे. मनाच्या ह्या भौतिक दृष्टीच्या शांतीस धार्मिक उच्चतम तत्त्वांच्या विचारानें येणाऱ्या चिरमय शांतीची जोड मिळत असे. आयुष्याच्या पूर्वरंगांत या जगांतील आपलीं कर्तव्यें जनता एकनिष्ठेनें बजावीत असे, व उत्तररंगांत आपलें आयुष्य ईश्वरभजनांत, आत्मोन्नतींत घालवीत असे. शरीरांत दमदार ताजें रक्त खेळतें आहे तोंपर्यंत प्रवृत्ति व नंतर निवृत्ति मार्गाचें अवलंबन करून आमचे पूर्वकालीन पूर्वज आपली ह्या लोकींची जीवनयात्रा संपवीत असत. परंतु कालांतरानें ही स्थिति बदलली. ईश्वरनिर्मित सर्व वस्तूंप्रमाणें ईश्वरनिर्मित राष्ट्रांलाही पूर्वायुष्य व उत्तरायुष्य हें असतें, ह्या अबाधित ऐतिहासिक सिद्धांताची प्रचीति आमच्या राष्ट्राला आली. चढलेला जसा उतरावयाचाच, उगवलेला जसा मावळावयाचाच किंवा जन्मलेला जसा मरावयाचाच त्याप्रमाणें आमच्या राष्ट्राची स्थिति झाली ! एकेकाळीं वैभवशिखरावर चढलेले आह्मी आर्य

त्या वैभवशिखरावरून च्युत होऊन खालीं खोल दरींत येऊन पडलों, व ज्या अनार्यांस आह्मीं आर्य बनविलें ते आम्हीं स्वतः अनार्य बनलों. आणि ह्या वेळेपासून जे आह्मी एकदां अनार्य बनलों ते अद्यापपर्यंत तसेच आहोंत ! जगांत आर्य नसलेले लोक आर्य बनले आणि आम्हीं आर्य असतां अनार्य झालों ! तें कां, याचें कारण आह्मीं हुडकून काढलें ह्मणजे आह्मीं पुन्हां आर्य होऊं ! आह्मांला सध्यांच्या स्थितींत जें कांहीं करावयाचें आहे, जें आमचें कर्तव्य आहे, व जें आह्मांला केलेंच पाहिजे, तें हेंच आहे. "

त्याचें भाषण डॉक्टर शांतपणानें ऐकत होते. हा त्यांचा शांतपणा कृत्रिम नव्हता. तो कळकळीचा होता. आपण त्याला त्याच्या अंगीकृत कार्यांत मदत करीत आहोंत ती वाजवी–योग्य आहे या समजुतीच्या अहंपणाचा–सकौतुक सात्विक अहंपणाचा–त्यांच्या ह्या शांतपणांत भाग होता. ते प्रेमानें त्याच्याकडे पहात होते व अतृप्त मनानें त्याचें भाषण ऐकत होते.

"हिंदुस्थानची अवनति होण्यास आरंभ झाला तेव्हांच्या व नंतरच्या स्थिती-चाच त्याच्या पूर्णस्थितीशीं ताडून पाहून आपणाला विचार करावयाचा आहे. राष्ट्रास जिवंत ठेवणाऱ्या जनतेच्या आयुष्यक्रमांत प्रवृत्ति व निवृत्ति मार्गांचा जोंपर्यंत समतोलपणा होता तोंपर्यंत सर्व कांहीं ठीक होतें. लौकिक व पारलौकिक उन्नति यांना जोंपर्यंत सारखाच मान मिळत होता तोंपर्यंत राष्ट्रांत चैतन्य होतें. पण हा समतोलपणा जाऊन एका विशिष्ट मार्गासच किंवा उन्नतीसच जेव्हां ज्यास्ती महत्त्व येऊं लागलें तेव्हां पहिलें पारडें फिरलें. एका पारड्यास जास्ती महत्व येतांच दुसऱ्याची किंमत कमी झाली व त्याकडचें जनतेचें लक्ष हळूहळू कमी होऊं लागलें. पारलौकिक उन्नतीची जास्ती महती वाटूं लागल्यानें आम्हीं निरीच्छ होऊं लागलों. निरीच्छ होऊं लागल्यानें दृश्य कर्तृत्वशक्तीला कमीपणा येऊं लागला. व या कमीपणानें आमच्या भौतिक उन्नतीचा मार्ग खुंटला. भौतिक उन्नतीस ह्मणजे दृश्य उन्नतीस हळूहळू कमीपणा मिळूं लागला व हा तिचा कमीपणा जसजसा वाटूं लागला तसतसा राष्ट्राच्या उन्नती-चाहि ऱ्हास होऊं लागून राष्ट्रांतील जीवंतपणा जाऊं लागला. भौतिक उन्नतीसाठीं खपत असणाऱ्या कर्तृत्वशक्तीचा उपयोग दुसरीकडे होऊं लागला राष्ट्राची ही स्थिति समजणारे लोक त्यावेळीं नव्हते असें नाहीं, होते; पण

ते फार अल्पसंख्यांक होते. राष्ट्रांतील जनतेच्या वाहणाऱ्या मानसिक ओघास आळा घालण्यास ते असमर्थ होते. लौकिक मार्ग व पारलौकिक मार्ग प्रवृत्ति व निवृत्ति ह्यांचे आपसांत झगडे सुरु झाले. परमार्थिक तत्वांचा धर्मांच्या नांवाखालीं जनतेंत प्रसार होऊं लागला. अनेक मार्ग, अनेक पंथ, अनेक सांप्रदाय यांचा हिंदुस्थानांत धुडगूस सुरु झाला. ह्यांतच जनतेच्या अंधश्रद्धेची व अज्ञानाची भर पडली. व अखेर ह्या सर्वांचा अतिरेक होऊन आमचा वैभव-रवि पार मावळला. दिवसाच्या बारा तासांप्रमाणें त्याच्या रात्रीच्या बारा तासांचा वेळ आतां संपत आला आहे. त्याचें आगमन कळविणारा स्फूर्तिमय उषःकाल नुकता दिसूं लागला आहे. उषःकालच्या शीतल समीरणप्रवाहांनें व रमणीय प्रकाशानें आम्हांला जागें केलें आहे. असे जागे झालेले थोडे आहेत. बाकीचे अद्यापि निद्रेंतच आहेत, व त्यांना जागें करणें हें आमचें काम आहे."

"शाबास" डॉक्तरांच्या तोंडांतून उद्गार निघाले.

ते पुढें बोलणार इतक्यांत नोकरानें त्यांना एक कार्ड आणून दिलें. त्यावरील नांव वांचुन त्यांना फार आनंद झाल्यासारखें दिसलें.

"जा, त्यांना घेऊन ये" नोकराकडे वळून ते म्हणाले.

"भालचंद्रराव, तुमच्याचप्रमाणें देशहिताची खरी कळकळ बाळगणाऱ्या ह्या एक प्रख्यात विदुषी आहेत—"

इतक्यांत नोकरानें दरवाजा उघडला. "या विमला देवी" असें म्हणून नोकरामागून आंत येणाऱ्या एका तरुण युवतीचें डॉक्टरांनीं स्वागत केलें.

प्रकरण १९ वें.

नवीन मित्राची जोड.



घरांतून बाहेर पडून माधवास जवळ जवळ दोन महिने झाले होते. यवतमाळाहून निघाल्यानंतर तो मुंबईस आला व अजूनपर्यंत तो तेथेंच होता. भालचंद्राला पोंहचविण्याच्या खेपेशिवाय तो मुंबईस असा कधींच आलेला नव्हता, व ह्या बाजूला म्हणण्यासारखे त्याचे मित्रहि कोणी नव्हते.

येथें आल्यापासून तो प्रवासी भुवनांत रहात होता. प्रवासीभुवन हें मुंबईतील हिंदुलोकांचें पहिलेंच हॉटेल. बाहेरगांवच्या मोठमोठ्या श्रीमंतसरदार, शेट-सावकार, सरकारी अंमलदार, व्यापारी व मध्यम स्थितींतल्या लोकांचें उत्तरण्याचें हें ठिकाण असे. निरनिराळ्या ठिकाणच्या नानाधंद्यांच्या लोकांचें येथें परंस्परांचें संघटन होत असे; ह्यामुळें वेळप्रसंगीं चांगल्या व गरजू लोकांस अशा तऱ्हेच्या भुवनापासून चांगले फायदे होत असत, तर कित्येक वेळां संभावित भामट्याची येथें चांगली पोळीहि पिकत असे.

मुंबईस आल्यावरोवर पहिल्यानदां माधवास बरें वाटलें. त्या अवाढव्य शहराची रचना पाहून त्याचे डोळे दिपून गेले. मोठमोठ्या राजवाड्यांस मागें सारणारे तेथील लक्ष्मीपुत्रांचे वाडे, व्यापाराची घालमेल, लोकांची उद्योगप्रियता व सर्वत्र टापटीप पाहून तो आश्चर्यानें दंग होऊन गेला. अशातऱ्हेनें मुंबईची शोभा पाहण्यांत त्याचें पहिले १०।१५ दिवस चांगले गेले. पण पुढें त्याचा वेळ कंटाळवाणा जाऊं लागला. त्याचा मूळचा स्वभाव लाजाळू असल्यानें व तेथील लोकांच्या झाकीच्या वागण्यानें तो दिपून गेला असल्यानें तेथें आपण होऊन त्यानें कोणाशीं ओळख करून घेतली नव्हती. तो तेथील मंडळीशीं क्वचित्च बोलत असे. ह्यामुळें तेथील मंडळीचा त्याच्या संबधीं निराळाच ग्रह झालेला होता. तो मोकळ्या दिलाचा किंबहुना मनुष्याप्रिय स्वभावाचा नसावा असें ते समजत असत.

ह्यावेळेस तेथें असणाऱ्या मंडळींत नानासाहेब नांवाचे एक गृहस्थ होते. हे पुण्याचे रहाणारे असून पेशवाईच्या अस्तानंतर शिल्लक राहिलेल्या सरदार घराण्यापैकीं हे एक होते. ह्यांची जहागीर चांगली होती; पण ती आतां नांवाचीच जहागीर राहिलेली होती. ह्यांच्या वाडवडिलांच्या कारकीर्दीत त्यांच्या त्रासानें ती बरीच क्षीण झालेली होती, व ह्यांनीं आपल्या अमदानींत तर तिला मृत्यूच्या दाराशीं आणून सोडलें होतें.

नानासाहेब ह्मणजे पौर्वात्य व पाश्चिमात्य सुधारलेल्या व्यसनलंपटतेचें एक उत्कृष्ट चित्र होते. गानलोलुपतेच्या आड दडून वेश्यागमन, गौरकायांचा स्नेह किंवा खोट्या सुधारकांचें मितपान ह्यांचा आश्रय घेऊन आसक्तीचें मदिरासेवन व अश्वपरीक्षेच्या किंवा घोड दौडीच्या मर्दानी खेळांच्या आवडचें समर्थन करून रेसेसमधील सुधारलेला जुगार हे त्यांच्या आयुष्यांतील नैमित्तिक प्रकार बनलेले होते. व ह्यांतच त्यांच्या कालाचा, द्रव्याचा व शरीराचा व्यय होत होता.

नानासाहेब सरदार होते व त्याप्रमाणें त्यांचा पोशाखहि असे. मलमल, किनखाप, किंवा जरतारी कापड यांचा जुन्या चालीचा भपका त्यांच्या पोषाखांत अगदीं नसे. त्यांच्या पोशाखांत पाश्चिमात्य पद्धतीचा साधेपणा नेहमीं असावयाचा. आपल्या पोशाख-विषयक बाबतींत ते नेहेमीं अप-टु-डेट असत. त्यांच्या डोक्यावर टोपी अगर हॅट कधींहि नसे. सरदारकीची पताका किंवा राष्ट्रियत्वाचें द्योतक असणारा शेमला खोंवलेला रंगीत पटका नेहेमीं त्यांच्या डोक्यावर असे व ह्यावरूनच ते हिंदुस्थानांतील आहेत असें समजत असे.

खाणें पिणें व नटणें मुरडणें ह्यांत जरी ते जवळजवळ पाश्चिमात्य बनले होते. तरी त्यांच्या इतर गुणांत किंवा विचाराचारांत ते तसे बनलेले नव्हते. त्यांच्यांतील आपलेपणाची गोडी, भौतिक प्रगतीची आवड वगैरे त्यांच्या ठिकाणीं कांहीं नसे; व ह्याबद्दल कोणी त्यांच्याजवळ बोलूं लागले तर ते लागलेच पौर्वात्य बनत व विश्वबंधुत्व व पारलौकिक प्रगति त्यांची महती गावयास लागत. आपलेपणा, समाज, देश ह्यांस महत्व देणें किंवा भौतिक आकांक्षा मनांत धरून त्याप्रमाणें वागूं पहाणें ह्मणजे निव्वळ मूर्खपणा, असें ते लागलीच प्रतिपादन करावयास लागत. अशा वादांत एकादे वेळेस बाजू त्यांच्या अंगावर येऊं लागली तर ते लागलींच सरड्याच्या रंगाप्रमाणें आपला रंग बदलीत व नास्तिकवादी बनून 'खावो पिवो और चैन करो' ह्याचा आश्रय घेऊन आपण सुटत.

वेश्या, दारू व जुगार ह्या त्रयीचा एके ठिकाणीं मिलाफ झाल्यावर मनुष्याच्या नैतिक व आर्थिक संपत्तीचा ऱ्हास होण्यास कितीसा उशीर लागतो ? धर्मराजासारख्याच्या नीतिमत्तेची किंवा कुबेरासारख्याच्या संपत्तीची देखील राखरांगोळी व्हावयाची । तेथें नानासाहेबासारख्या क्षुद्र मानवी प्राण्याची काय कथा ? ते कधींच भुकेकंगाल बनले होते.

पैशाच्या तगाद्यासाठीं त्यांच्या दाराशीं नेहेमीं सावकारांची धरणीं असावा यार्चीं व त्यांना थापा देऊन चकवितां चकवितां त्यांच्या नाकीं दम येऊं लागला. अखेरीस सावकारांच्या तगाद्यास कंटाळून त्यांनीं पुण्यास राहण्याचें देखील सोडलें. सावकारासाठीं त्यांनीं पुणें सोडलें, पण पैशासाठीं सावकारांनीं त्यांना कुठें सोडलें ! अखेरीस आपली राहिली सुरली जहागीर त्यांनीं कर्जाचे फेडीतं सावकारांना लावून दिली व त्यांच्या कचाट्यांतून ते कसे तरी मुक्त झाले. प्रपंचाच्या निर्वाहासाठीं त्यांना आतां कांहींतरी करावयास जरूर होतें, त्यांत व्यसनासक्तीचें त्यांच्यावर पुरें दडपण पडलेलें. प्रसंगामुळें त्यांची अनीतीमान् वृत्ति दिवसोंदिवस जास्त बेताल होऊं लागली. घोडदौडी, पत्ते वगैरेंच्या जुगारावर ते पैसे मिळवूं लागले. व ह्या पैशांत श्रीमंताच्या अज्ञान पण गुलहौशी पोरांना आपल्या वृत्तीची दीक्षा देण्यानें मिळणाऱ्या गुरुदक्षिणेची भर घालून ते आपल्या प्रपंचाचा खर्च भागवूं लागले.

माधवास पाहिल्यापासून त्याला आपल्या जाळ्यांत गोंवण्याचा ते विचार करूं लागले. माधव आपल्या बरोबरच्या नोकरासह ' भुवनांत ' फर्स्टक्लासमध्यें रहात असे. शिवाय त्याला कांहीं उद्योगधंदा असल्याचेंहि दिसत नव्हतें. ह्या गोष्टी त्याच्या श्रीमंतीच्या पूर्ण द्योतक होत्या. त्याची संकोचवृत्ति, त्याचें बुजकटासारखें वागणें, त्याचा लाजाळु स्वभाव हीं सर्व त्या चाणाक्ष नानासाहेबांच्या तेव्हांच लक्षांत येऊन तो आपल्या जाळ्यांत लवकर सांपडेल याची त्यांना खात्री वाटूं लागली. मुंबईसारख्या भव्य व बकाल शहरांत नानासाहेबांसारख्यांस आपल्या चातुर्याचा प्रभाव दाखविणें फार सोपें असतें. त्यांतून माधवासारख्या नवख्या व अपरिचित अपक्व तरुणांस तो दाखविणें ह्मणजे कांहींच नव्हतें. अंगीं योग्यता भासविणारा पोशाख, मिष्टास भाषण व मित्रत्व जोडणारा प्रारंभींचा सढळ हात वगैरे ठराविक युक्त्या त्यांच्या अंगवळणीं पडून गेलेल्या होत्या. पण या युक्त्यांचा प्रयोग करण्यास त्यांची माधवाबरोबर अद्यापि ओळख झालेली नव्हती. ती करून घेण्याच्या उद्देशानें योग्य संधी पाहून त्यांनीं

भुवनाच्या मॅनेजरास एके दिवशीं गांठलें; व माधवाच्या खोलीकडे बोट दाखवून त्याला विचारलें, " कायहो, मॅनेजर येथें कोण असतें ! "

" यवतमाळचे माधवराव. "

" स्वभावाचे बरेच रिझर्व्ह असावेसे दिसतात–नाहीं ? कोणाशीं बोलतांचालतांना तर मी त्यांस अद्याप पाहिलें नाहीं. "

" तसें दिसतें खरें. परंतु..... "

इतक्यांत माधव तेथें आला. तो यावेळीं बाहेरून फिरून आलेला होता. त्याला चहा पाहिजे होता. आपले खोलीजवळ बाहेर गॅलेरींत मॅनेजरास पाहतांच त्यानें त्यांस चहा पाठवून देण्यास सांगितलें. ह्या संधीचा नानासाहेबांनीं फायदा घेतला.

" माधवराव, आपली हरकत नसेल तर माझेच रूममध्यें आपण चहा घेऊं. मॅनेजर, आमचेच खोलींत चहा पाठवा. " लागलीच मॅनेजराकडे वळून नानासाहेबांनीं त्याला सांगितलें.

माधवास शिष्टाचारानुरूप नानासाहेबांचें निमंत्रण स्वीकारणें भाग पडलें.

चहा घेत असतां इकडल्या तिकडल्या गोष्टी काढून नानासाहेबांनीं त्यांना गार करून सोडलें, व आपल्याबद्दल त्याच्या मनांत चांगला ग्रह उत्पन्न केला. बोलतां बोलतां त्यांनीं त्याची थोडीबहुत माहिती करून घेतली, व त्याच्या येथें येण्याचा उद्देश त्याला विचारून घेतला.

" माधवराव, येवढ्या लहान वयांत आपले थोर विचार पाहून मला फार आनंद वाटतो. देशकार्यासारखें पवित्रकार्य आपण शिरावर घेतलें याबद्दल मी आपलें मनापासून अभिनंदन करतों, व त्यांत आपणांस यश येवो असेंच मी देवाजवळ मागतों. आपली ओळख झाली हा आज एक अलभ्य लाभ झाला असें मी समजतों. "

आत्मस्तुति कोणाला प्रिय नसते ? आत्मस्तुति जर प्रिय वाटते तर ती करणारा मनुष्यहि प्रिय कां वाटूं नये ? वाटावा. पण त्याचा हेतु समजून घेऊन नंतर त्याला प्रिय अगर अप्रिय समजावें. एवढी पोंच माधवांत नव्हती. आणि ह्मणूनच ह्या दिवसापासून तो नानासाहेबांस आपला प्रिय मित्र समजूं लागला.

प्रकरण २० वें.

विमलादेवीचें अंगीकृत कार्य.



सुप्रसिद्ध बंगाली समाजसुधारक देवेंद्रनाथ भट्टाचार्य यांची विमला देवी ही सर्वांत धाकटी मुलगी असून हिंदुस्थानच्या उन्नतीसाठीं सर्वस्व अर्पण करून मनोभावें खटपट करणाऱ्यापैकीं ती एक होती. ती बंगाल युनिव्हर्सिटीची ग्राजुएट होती. वडिलांच्या सामाजिक सुधारणेचें बरेंच पाणी तिच्या अंगांत खेळत असे, व समाजाचें पुरुषाइतकेंच महत्वाचें जें दुसरें स्त्रीअंग त्याची शिक्षण व कर्तबगारी या जोडीशिवाय प्रगति व्हावयाची नाहीं अशी तिची ठाम समजूत झालेली होती. तिची देशाच्या उन्नतीसाठीं खटपट करण्याची कार्यदिशा देखील हीच होती. हिंदी स्त्रियांचा समाजांतील दर्जा वाढवून भावी राष्ट्रपालक होणाऱ्या पुरुषांच्या व स्त्रियांच्या बुद्धिमत्तेला योग्य वळण लावण्याची जबाबदारी मातृवर्गाशिवाय दुसऱ्या कोणावर झणण्यासारखी पडत नसल्यानें स्त्रियांच्या उन्नतीशिवाय दुसरें देशकार्य तिला दिसत नसे. ती स्वतः बहुश्रुत होती. लहानपणापासून स्वार्थत्याग करून समाजोन्नत्ति करण्याचें बाळकडूं आईबापांकडून हिला मिळालेलें होतें. तिच्या भावी कार्येच्छेनुरूप त्यांनीं तिला शिक्षण दिलेलें होतें. व ह्या सर्व गोष्टींमुळें यौवनदशेंतच तिची प्रौढबुद्धी कर्तबगारीच्या अफाट मैदानावर मनसोक्त विहार करावयास लागली होती.

लिहितांवाचतां येणाऱ्या स्त्रियांसाठीं तिनें 'स्त्रीभारत' नांवाचें मासिक सुरु केलें असून बहुतेक सर्व देशी भाषांतून तें ती प्रसिद्ध करीत असे. त्याचें सर्व धोरण प्रगतीमय असे. पुराणप्रियता, अशिक्षितपणा व धर्मांची खोटी समजूत यांनीं स्त्रीवर्गाची—प्रायः हिंदुस्थानची अवनति कशी होत गेली, यांचें तिच्या लेखणीनें रेखाटलेलें हृदयद्रावक चित्र स्त्रियांचें अंतःकरण पार भेदून टाकीत असे. व तिच्या उपदेशाप्रमाणें आपल्या हातून कांहींतरी व्हावें असें त्यांस वाटूं लागत असे.

हिंदुस्थानच्या भरभराटीच्या काळीं तेव्हांच्या स्त्रीपुरुषांची वागणूक कशा तऱ्हेची असे, त्यांचें ध्येय काय असे व सर्वत्र रानटीपणाचें साम्राज्य पसरलें असतां फक्त एकट्या हिंदुस्थानचीच उन्नति कां व्हावी यांचें तिनें केलेलें सोपपत्तिक विवेचन ऐकून एखाद्या अडाणी मनाचें देखील समाधान होण्यासारखें असे; मग शिक्षणानें साधारणपणें विचार करावयास शिकलेल्या स्त्रियांच्या मनाचें त्यानें समाधान होऊन प्रगतीच्छेची त्यांस आवड उत्पन्न व्हावी हें साहजिक होतें. स्त्रीवर्गास उपदेश करतांना त्यांच्या बारिकसारिक आचारांवर टीका करून त्यांचीं मनें न दुखविण्याची ती योग्य खबरदारी घेत असे. लोकांस आपल्या मासिकाची गोडी लागावी ह्मणून मधूनमधून ती त्यांत गोष्टी वगैरे देत असे. मात्र अशा तऱ्हेच्या गोष्टींमध्यें शृंगाररसाचें फाजील महत्त्व कधींहि नसे. संसाराचें महत्त्व गोष्टीच्या रूपानें लोकांपुढें मांडतांना त्यांच्या कामुकवृत्तीस चेतना मिळून तिचे फाजील अनिष्ट परिणाम वाचकांवर—तरुण वाचकांवर—घडून ते त्यांतच दंग होऊं नयेत अशी ती खबरदारी घेत असे. ललित वाङ्मयाच्या विद्वान लेखकांस आपल्या मासिकासाठीं गोष्टी लिहिण्यास सांगतांना आपल्या समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या गोष्टींचेच आधारावर ती त्यांस लिहिण्यास सांगत असे, व त्यामध्येंहि प्रेमाचे—प्रणयी प्रेमाचे—चाष्कळ प्रताप जितके न येतील तितके चांगले असें ती बघत असे.

आपल्या मनांतील विचारांस ती याप्रमाणें मूर्त स्वरूप देत होतीच, पण येवढ्यानें तिचें समाधान होईना. उपदेशामृताचे घुटके पाजून मृत हिंदीसमाजाच्या अल्पसंख्यांक सुशिक्षित समाजांत येणारी सजीवता चैतन्यस्वरूपी होत नसते याचा तिला वेळोवेळीं अनुभव आलेला होता. फारच थोड्या समाजांतील या सजीवतेस बहुजनसमाजाच्या शिक्षणाच्या शक्तीची जोड असल्याशिवाय समाजांत देहक्रिया चालविण्याचें सामर्थ्य येणार नाहीं याची तिला खात्री पटली होती. निरक्षर स्त्रियांची अशी स्थिति असणें साहजिक होतें. परंतु कांहीं साक्षर स्त्रियांची स्थितीहि कांहीं अशीं अशा असते. मनांत इच्छा असली तरी ती पूर्ण करण्याचें सामर्थ्य परिस्थित्यनुरूप हिंदी समाजांतील स्त्रियांस नसतें. कोणास धर्मबंधनामुळें तर कोणास कुटुंबपद्धतीमुळें, कोणास रूढीबंधनामुळें तर कोणास द्रव्याभावामुळें मनांतील उत्तम विचार जागचेजागींच

जिरवून टाकावे लागतात. ह्यामुळें उन्नतीच्या दृष्टीनें समाजाची भयंकर हानी होते. ह्या सर्व अनिष्ट प्रकारांस आळा घालण्यासाठीं स्त्रियांना शिक्षण देण्याची तिनें एक संस्था काढली होती. ह्या संस्थेचा उपयोग होऊन ती चांगली चालेल कीं नाहीं हें पाहण्यासाठीं आपल्या रहाण्याच्या गांवीं—बारिसाल येथें स्त्रियांस व लहान मुलींस मोफत शिक्षण देण्याचें काम तिनें सुरु केलें होतें. बायकांना शिक्षण देण्यासाठीं ह्या संस्थेच्या नोकरांस त्यांच्या घरीं जावयास लागत असे, ह्या एकाच गोष्टीवरून ह्या संस्थेचें काम किती बिकट होतें याची कल्पना येण्यासारखी आहे. ह्या संस्थेची आर्थिक स्थिति समाधानकारक रहावी ह्मणून आपल्या मासिकाचा सर्व फायदा ती तिकडे देत असे. शिवाय नियमित वर्गणीदार देणारांची जोड तिनें ह्या संस्थेला घालून दिली होती. ह्या संस्थेच्या द्रव्यसहाय्यासाठीं आपले मासिकांतून व इतर पत्रांतून ती लोकांजवळ नेहेमीं याचना करीत असे. तिच्या मनांतून ह्याप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रत्येक कान्याकोपऱ्यांत स्त्रीशिक्षणाची व्यवस्था करावयाची होती. पण हिंदुस्थानांतील कुत्सित जनसमूह ह्या दृष्टीनें थोडाच तिच्याकडे वघत होता ! ह्यापैकीं कित्येक तिच्यावर निरनिराळे आरोप करूं लागले, कोणी तिला स्वार्थी ह्मणत, कोणी तिची संस्था जातीविषयक ठरवित तर कित्येक याच्याहि पुढें जात व तिची संस्था मदत करण्याच्या लायकीची नाहीं ह्मणून ह्मणत.

या सर्वांच्या निरनिराळ्या आक्षेपांस निरनिराळीं उत्तरें देणें तिला शक्य नव्हतें व तीं देण्याच्या तिनें प्रयत्नहि केला नाहीं परंतु कांहीं चांगल्या वजनदार पत्रांतून तिच्या संस्थेचा व संस्थेच्या ध्येयाचा जेव्हां उहापोह आणि तोहि हानिकारक असा होऊं लागला तेव्हां स्वस्थ बसणें तिला योग्य नव्हतें. संस्थेचे हेतू, तिनें वजावलेलें कार्य व ह्या सोबत तिचें स्वतःचें पत्र तिनें मोठमोठ्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केलें. तें तिचें पत्र खालील प्रमाणें होतें.

" सन्मान्य हिंदी नागरिक व माझे प्रिय भ्राते भगिनीं यांस—'हिंदी शिक्षणमंडळ' या नांवाची संस्था मला स्थापन करून आज जवळजवळ वर्ष होत आलें. वर्षाअखेर ह्या मंडळाचा अहवाल मी प्रसिद्ध करणार होतोंच, परंतु तों पर्यंत माझ्या देशबांधवांना धीर निघाला नाहीं. त्यांच्या उत्कंठेमुळें मला तो आजच प्रसिद्ध करावा लागत आहे

" ह्या मंडळानें अद्यापपर्यंत बजावलेलें कार्य अगदीं समाधानकारक आहे असें जरी ह्मणतां यावयाचें नाहीं तरी तें अगदीं निराशाजनक आहे असेंहि ह्मणतां येत नाहीं. ही संस्था अद्यापि बाल्यावस्थेंत आहे. ह्या बाल्यावस्थेंत तिच्या आईबापांनीं तिच्या इष्टमित्रांनीं तिला नीट वागविलें, तिची नीट जोपासना केली व तिची योग्य काळजी घेऊन तिला वाढीला लावलें तरच ती पुढें वाढून जोमाची, होऊन लोकांस फलदायक अशी होईल !

" संस्थेचें ध्येय काल, प्रसंग व परिस्थिति पाहून सर्वत्र स्त्रीशिक्षणाचा प्रसार करणें हें असून तें साधण्यासारखें आहे किंवा नाहीं याचा अजमास घेण्यासाठीं ह्मणून बारिसाल येथें त्याचा मी प्रयोग करून पहात आहें. ह्यांत बारिसाल ही माझी जन्मभूमि व मी बंगाली ह्मणून माझी दृष्टि बंगाल पुरतीच असे कित्येक आरोप माझ्यावर करण्यांत आलेले आहेत. पण ते खोटे आहेत. असा अयोग्य विचार देखील माझ्या मनास कधीं शिवला नाहीं.

" व्यक्ति, जात, समाज व पंथ यांस प्राधान्य देऊन राष्ट्रांस गौणत्व देणाऱ्या वृत्तीचा प्रादुर्भाव आमच्यांत नवीन आहे असें नाहीं. भाऊबंदकी करून स्वतःचा व भाऊबंदांचा नाश करण्याचा आमचा हा पेशा फार पुरातन असून तो आमच्या हाडींमासीं पुरा खिळून गेलेला आहे, असेंच मला मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें कौरव-पांडवांच्या घनघोर युद्धप्रसंगानें प्रसिद्धीस आलेलें कुरुक्षेत्र-सोनपत पानपत-हें ह्याचें अचल उदाहरण आहे. येथेंच व्यक्तिविषयक द्वेषानें भडकलेल्या मूढ जयचंदानें त्रयस्थ महंमद घोरीस बोलावून दिल्लीपति प्रतापी पृथ्वीराजास नामशेष केलें ! येथेंच प्रचंड विजयी मराठी सैन्यास आपसांतील भांडणांची कीड लागल्यानें धूळ खावी लागली ! याच बयेची-भाऊबंदकीची-थोरली बहीण जी अयोग्य अहंमन्यता, तिला कवटाळून आमच्या उपयुक्त चातुर्वर्णाची आम्हीं माती करून घेतली असून, सर्व शास्त्रें व धर्म यांस जन्म देणाऱ्या पुण्यश्लोक हिंदुस्थानास आम्हीं सर्व राष्ट्रांच्या थट्टेचा व गमतीचा विषय करून सोडलें आहे !

" मी व माझी संस्था यांसंबधीं वाटेल तशीं बेजबाबदार विधानें करणाऱ्यांसच उद्देशून मी हें लिहिलें आहे. माझ्या कामगिरीबद्दल मला अहंमन्यता वाटत नाहीं किंवा लोकांनीं माझा गौरव करावा अशीहि माझी इच्छा

नाहीं. पण रिकामटेकड्या, कुत्सित व कालाचा अपव्यय करून स्वतःस व दुसऱ्यांस अपशकुन करूं पहाणाऱ्या माझ्या निंदकांस माझा असा सवाल आहे कीं राष्ट्रीयत्वाची त्यांना कल्पना आहे काय ? उपासमार व कल्पनातीत कष्टमय स्थितींत लोळणाऱ्या त्यांच्या देशबांधवांबद्दल त्यांच्या मनांत सहानुभूति अगर दयेचा अंश आहे काय ? असल्यास त्यांची स्थिति सुधारण्याचे त्यांनीं कोणते प्रयत्न केले आहेत ! व तेवढ्यासाठीं त्यांनीं आपल्या सुखासीनवृत्तीस व गरम खिशांस कधीं चट्टा लावून घेतला आहे काय ?

"अशा प्रकारच्या विघ्नसंतोषी व हितशत्रू मंडळीस माझी येवढीच नम्र विनंति आहे कीं त्यांनीं ह्या आपल्या घातकी वृत्तीस फांटा द्यावा; आपलें विचारक्षेत्र चांगलें विस्तृत करावें व कोणत्याहि प्रकारासंबंधें टीकाकाराचा वेष धारण करतांना वृत्ति प्रगतिमय ठेवावी आणि चांगलासा पगार किंवा धंद्यांतील चलती हे गुण देशभक्त बनविण्यास पुरेसे होत नसतात, याची आपल्या मनाशीं खूणगांठ बांधून ठेवावी.

"मी काढलेली संस्था तिचे हिशोब व तिनें बजावलेली कामगिरी मला जनतेच्या दृष्टीपासून झांकून ठेवावयाची नाहीं. वाटेल तेव्हां वाटेल त्यांनीं येऊन आपल्या मनाची खात्री करून घ्यावी व योग्य वाटतील त्या सूचना कराव्या."

सर्वत्रांच्या कृपेची भुकेलेली,

नम्र.

विमलादेवी भट्टाचार्य."

हिशोबाच्या तक्त्याकडे पहातां सर्वांपैकीं जवळ जवळ निंमे रकम विमलादेवीनें दिलेली होती. विमलादेवीच्या पत्रानें तिच्या निंदकांचीं तोंडें बंदच झाल्यासारखीं झालीं, व त्यामुळें तिच्या कामांत जो तिला एक तऱ्हेचा व्यत्यय येत होता तो नाहींसा झाला.

आपण काढलेली संस्था चिरायु व कार्यकर्ती कशी होईल, याचाच तिला सारखा ध्यास लागलेला होता. पाश्चिमात्य देशांत अशा तऱ्हेच्या शिक्षणसंस्था असल्यास त्या कशा तऱ्हेनें चालविल्या जातात. त्या कोणच्या मार्गानें व कोणचें शिक्षण देतात हें पाहण्यासाठीं ती प्रवासास निघाली होती. इंग्लंडला येऊन

तिला सरासरीनें महिना झाला होता. डॉक्तरांची व तिची ओळख झालेली होती व त्यांस भेटण्यासाठींच ती मुद्दाम त्यांच्याकडे आली होती.

भालचंद्राचे लेख तिनें वाचले होते. त्याची अचानक भेट झालेली पाहून तिला फार आनंद झाला. तीच स्थिति भालचंद्राची होती, तिच्याबद्दलची त्याला वाचनानें माहिती झालेली होती. शिष्टाचाराचें औपचारिक भाषण आटोपल्यानंतर त्यांच्या संभाषणाचा ओघ तिच्या अंगीकृत कार्याकडे वळला. ती म्हणाली—

" मालचंद्रराव, डोईजड व बुद्धीवैभवाची कसोटी लावणारें असें देशकार्य मी शिरावर घेतलें आहे, व त्यांतून पार पडणें हें मला मुष्कीलीचें वाटत आहे. हिंदुस्थान म्हणजे अठरा धांन्याचें कडबोळें ! अनेक धर्म, नानापंथ, शेंकडो जाती ह्यानीं तें कसें खचून भरलेलें आहे ! लोकांत शिक्षण, सुसंस्कृतता नाहीं. कोणतेंहि कार्य तडीस नेण्यास लागणाऱ्या परिस्थितीचा तेथें पूर्ण अभाव आहे. हेकड पुराणप्रियता व भेदभाव ह्यांची गोडी चांगल्या चांगल्या सुशिक्षितांच्या सुद्धां हाडींमासीं खिळलेली दिसते. धर्माची खरी महती नाहींशी झाल्यानें तो निस्तेज झालेला आहे. मूळ धर्म बाजूला राहून कर्मठपणाचें फाजील प्राबल्य माजलें असून अशा लोकांचा समजांत बराच भरणा आहे. शिक्षित असो वा अशिक्षित असो, जो तो पोटाच्या पाठिमागें लागलेला ! एक भाषा नाहीं, एक धर्म नाहीं, एक आचार नाहीं. एक विचार नाहीं. या सर्व मार्गरोध करणाऱ्या बिकट स्थितींतून मला माझा मार्ग काढावयाचा आहे. रात्रंदिवस ह्याच विचारांत मी माझें सर्व बुद्धीवैभव खर्च करीत असतें. पण अद्यापपर्यंत अमुक मार्गानें गेलें असतां यश येईल याची मला खात्री वाटत नाहीं ! "

विमलादेवी जरी धीराची व कर्तृत्ववान स्त्री होती, तरी परिस्थितीपुढें तिनें देखील हात टेकले होते !

" तुह्मीं म्हणतां त्याप्रमाणें परिस्थिति आहे खरी. पण त्याला काय करावयाचें ! ती बदलेपर्यंत तर वाट पहात बसावयाचें नाहींना ? " डॉक्टर म्हणाले.

" नाहीं. तसें वाट पहात बसणें मूर्खपणाचें होईल. परिस्थिति कशीहि असो ती आपल्या कार्यास अनुकूल करून घेण्यांतच कर्तबगार मनुष्याची महती असते. शिवाजी, नेपोलियन, क्रॉइव्ह, क्रामवेल, चंद्रगुप्त, अकबर ह्यांच्या हुशा-

रीची व कर्तव्गारीची जी वाहवा होते ती याचमुळें ! परिस्थिति कशीहि असो, तिला सहाय्य करून घेऊनच ह्यांनीं मोठमोठी राज्यें स्थापन केलीं ना ? व आपल्या अंगीं योग्यता आल्यानंतर परिस्थितीची अनिष्टता घालविण्याचा ह्यापैकीं कित्येकांनीं प्रयत्न केला. " भालचंद्र ह्मणाला.

भालचंद्राच्या बोलण्यानें विमलादेवीचा चेहरा टवटवीत दिसावयास लागला. त्याच्या सारखा जोडीदार मिळाल्यास आपलें अंगीकृत कार्य तडीस जाईल, अशी तिला खात्रीं वाटूं लागली. तिच्याप्रमाणें डॉक्तरांचा चेहराही आनंदी दिसूं लागला. व त्याच भरांत ते त्याला ह्मणाले–

" शिवाजी व नेपोलीयन यांच्या जुन्या उदाहरणापेक्षां आपलें स्वत:चें उदाहरण दिलें असतें तर....."

" ह्मणजे ? "

" त त्यांचें त्यासच विचारा. " हंसत हंसत त्यांनीं विमलादेवीस सांगितलें.

प्रकरण २१ वें.

चिंतामणरावांचा राग.

"आतां मी साहेबांना काय सांगूं! कार्ट्यानें माझ्या तोंडाला काळोखी फासलीन्!" रागानें थयमान करीत चिंतामणराव ह्मणाले. "आणि तुझी त्याला फूस ह्मणूनच हें प्रकरण येवढ्या थराला गेलें, समजलीस. तुह्मां बायकांना कांहीं अक्कल नसते ह्मणतात तें खोटें नाहीं. अद्यापपर्यंत हाच विनायक कसा माझ्या अर्ध्या वचनांत वागत असे! पण तूं-तूं त्याला बिघडविलास! तुम्हांला बायकांना-स्वतंत्रता नसावी ह्मणतात तें अगदीं योग्य आहे. तुह्मांला जनावरांसारखेच वागवावयाला पाहिजे, जुन्या चालीचे लोक तुम्हांला वागवितात तसेंच तुह्मांला वागवावयाला पाहिजे. आह्मीं सुधारक ह्मणजे खरोखर मूर्ख! तुमची योग्यता वाढविण्याचे केलेले आह्मी सर्व प्रयत्न व्यर्थ होणार व आमच्या व्यवहारांत तुह्मी घोटाळा करावयास लागून आमच्या मूर्खपणाचें आह्मांला चांगलेंच प्रायश्चित्त भोगावयास लागणार! असें पुढील स्थितीविषयीं भाकित करावयास या तुझ्या वागणुकीवरून मला कांहींच दिक्कत वाटत नाहीं मूर्ख बायको! माझे सगळे हेतु कसे जागच्याजागीं राहिले. या विनायकाची पुढें कितीतरी योग्यता वाढली असती! सहज कोठेंहि डिपुटी कमीशनर झाला असता! संबंधाप्रमाणें राजा बनला असता! केवढा मानमरातब वाढला असता! परंतु! नशिबांत पाहिजेना....." ह्या प्रमाणें त्यांचे प्रलाप चाललेले होते.

गोदावरीबाईस आपल्या यजमानांचा स्वभाव ठाऊक होता. ह्यावेळी त्यांची समजूत घालण्याच्या प्रयत्न केला तर त्यापासून फायदा तर व्हावयाचा नाहीं; उलट त्यांच्या अगोदरच्या क्षुब्धतेंत भर पडून विपरीत परिणाम व्हावयाचा हें त्या जाणून होत्या. त्यांनीं अगदीं मौनव्रत स्वीकारलें होतें. ह्या त्यांच्या मौन-

पणानें चिंतामणराव अगोदर थोडे ओशाळल्यासारखे झाले पण ही चीड फारवेळ टिकली नाहीं.

अखेरीस जेवणाची वेळ आली. नेहेमीं कमला त्यांस जेवण्यास बोलावीत असे. पण आज तिला धीर होईना. आईनें तिला 'जेवावयाचें झालें' ह्मणून कळविण्यासाठीं सांगितलें तरी ती सांगावयास गेली नाहीं हें पाहून गोदावरीबाई स्वत:च कळविण्यासाठीं गेल्या.

"जेवावयाचें झालें आहे." दरवाजाच्या आड उभें राहून त्या ह्मणाल्या त्यांच्या स्वरांत प्रेमळपणा व विनय भरलेला होता.

चिंतामणरावांनीं नुसतें त्यांच्याकडे पाहिलें. ते अद्यापि रागावलेले असल्याचें त्यांच्या त्या दृष्टीवरून दिसत होतें. गोदावरीबाई तेथेंच उभ्या राहिल्या, व थोड्या वेळानें पुन्हां ह्मणाल्या—

"ह्मटलं, जेवावयाचें झालें आहे."

पुन्हां एकवार चिंतामणरावांनीं त्यांच्याकडे पाहिलें, व ते आंघोळीसाठीं आपल्या जागेवरून उठले. स्नान झाल्यानंतर त्यांचें जेवण वगैरे झालें, व ते पुन्हां आपल्या दिवाणखान्यांत येऊन बसले.

विनायक घरांतून निघून गेला, ह्यावद्दल सर्वत्रांसच वाईट वाटत होतें. परंतु इतर मंडळीनें आपल्या वाईट वाटण्याला रागाचें स्वरूप दिलें नव्हतें. विनायकानें हें केलें हें चांगलें कीं वाईट याचासुद्धां त्यांनीं आपापल्या परीनें विचार केला होता, व त्यानें केलें हें गैर अशीच त्या सर्वत्रांची खात्री झालेली होती. परंतु होऊं नये ती गोष्ट झाली असल्यानें आतां त्याबद्दल रागावण्यापासून काय फायदा होता, असें सर्वत्रांस वाटत होतें. ती गोष्ट निस्तरण्याचाच आतां प्रयत्न करणें योग्य ! असें जरी होतें, तरी अपमानाचें–आपली इच्छा मोडल्याच्या अपमानाचें–शल्य चिंतामणरावांना एका बाजूनें टोंचतच होतें, तर दुसऱ्या बाजूनें खोट्या जनापवादाची धास्ती त्यांस डंवचीत असून त्यांचें मन क्षुब्ध करीत होते. अनिच्छित गोष्ट आणि तीही प्रत्यक्ष आपल्या मुलाच्या हातून घडली म्हणून ते विनायकावर नुसते दांत ओंठ खात होते ! पण ही गोष्ट कां घडली

याचा विचार करण्याच्या भरीस ते पडले नाहींत. किंबहुना त्या बाजूनें विचार करण्याचें कारण आहे असेंहि त्यांस वाटलें नाहीं. आणि त्या बाजूनें त्यांनीं विचार तरी कां करावा ? ते जुन्या मताचे नव्हते. ते बहुश्रुत होते तरी ते हिंदूच-हिंदी समाजांत दृढयुक्त झालेल्या आचार विचारांतच वाढलेले हिंदू होते. पूर्ण वाढीच्या तरुणानें बापाची आज्ञा पाळणें हा त्याचा धर्मच आहे, अशी त्यांची समजूत होती. ह्या समजुतीच्या ते पुरे फशीं पडले असल्यामुळें त्यांची सारासारविचारशक्ति पार नष्ट झालेली होती ! ते विनायकास महान अपराधी समजत होते !

त्या दिवशीं घरांत जिकडे तिकडे खेदजनक स्तब्धता वावरत होती ! जेथें नेहेमीं कौटुंबिक आनंद असावयाचा तेथें आज कौटुंबिक दुःख पसरलेलें होतें ! कुटुंबाचा चालक ह्या दृष्टीनें दुःखाची तीव्रता कमी भासविण्याचा प्रयत्न करणें हें चिंतामणरावांचें कर्तव्य होतें. परंतु तें कर्तव्य बजाविण्याची त्यांची इच्छा नव्हती, व ह्या कर्तव्याची त्यांस ओळखहि नव्हती. ' साहेब आपणांस काय ह्मणतील ' ' लोक आतां नावें ठेवतील ' ह्याच विंवचनेंत व पोरानें व्यर्थ आपलें नुकसान करून घेतलें ' ह्या विचारानें होणाऱ्या मानसिक क्षुब्धतेंतच ते दंग होते.

" त्याला पसंत नव्हतें तर मी त्याला नोकरींत घातलें असतें का ? कधींच नाहीं. मला त्यानें तसें स्पष्ट सांगावयाचें होतें. तेऱ्हाव्यासाठीं घर सोडून कशाला गेला ? " ह्या किंवा अशाच अर्थाच्या त्यांच्यां बोलण्यांनीं घरांतील मंडळींना व प्रत्यक्ष त्यांना किती तरी समाधान वाटलें असतें. पण तितका विचारीपणा त्यांच्यांत होता कुठें ? अशातऱ्हेच्या उद्गारांनीं स्वतःला, स्वतःच्या योग्य निवडीला, कमीपणा आला असता. आणि स्वतः पदरांत कमीपणा घेणें हें त्यांस आपल्या वडिलकीच्या मानाला, आपल्या इभ्रतीला काळिमा लावण्यासारखें त्यांस वाटत होतें.

कमलेला घरांत कसेंसेंच वाटत असल्यानें ती मुकाट्यानें लक्ष्मीकडे गेली. गोदावरीबाईस देखील चैन पडत नव्हतें. हें प्रक्षुब्ध वातावरण शांत कसें करावें या विंवचनेंत त्या चूर झाल्या होत्या. त्यांना कळविल्याशिवाय, त्यांचा विचार

घेतल्याशिवाय विनायक घर सोडून गेला होता, व ह्यांबद्दल त्यांस अपमान वाटत होता असें नाहीं, तर त्याच्या मनांत काय आल्यानें तो गेला हें त्यांना समजलेलें नव्हतें, व ह्मणून त्यांस वाईट वाटत होतें. त्याच्या मनांतील सर्व विचार त्यांस ठाऊक असते, तर सध्याचें खवळलेलें कौटुंबिक वातावरण शांत करण्यास त्यांस सुलभ गेलें असतें. विनायकानें लिहून ठेविलेलें पत्र चिंतामणरावांनीं त्यांना वाचून दाखविलें होतें. व त्यावरून त्याचा निघून जाण्याचा हेतु व कारण जरी उघड होत होतें तरी त्याबद्दल त्या दोघांत–बापलेकांत–काय बोलणें झालें होतें हें समजण्यास त्यांना मार्ग नव्हता. त्या दोघांत झालेलें बोलणें त्यांस समजलें असतें तर आपल्या नवऱ्याची समजूत करण्याची समजूत करण्याची त्यांनीं तोड काढली असती. असें होतें तरी हा प्रकार जास्ती वाढूं देण्याची त्यांची इच्छा नव्हती.

दोन प्रहरीं त्या चिंतामणरावांच्या दिवाणखान्यांत दुपारचा चहा घेऊन आल्या. चहाचा पेला पतीपुढें ठेऊन त्या तेथेंच उभ्या राहिल्या. ' बोलणें कसें सुरूं करावें ' याचा त्या विचार करित होत्या. तिकडे चिंतामणरावहि बोलणें काढण्याची तयारी करीत होते. विनायक गेला ह्यांत हिचें–आपल्या पत्नीचें–अंग असावें याचा त्यांना संशय आलेला होता. व ह्या संशयानें ते गोदावरीबाईवरहि रागावलेले होते.

चहा घेतल्यानंतर गोदावरीबाईकडे वळून ते त्यांना छद्मी स्वरानें ह्मणाले,

" कां, चिरंजिवांना बरोबर किती पैसे दिले आहेत आपण ? "

" तो जर मला विचारून देखील गेला नाहीं तर...'

"मजजवळ लपवालपवी करण्यांत..."

"मी आजपर्यंत कधीं आपणांजवळ लपवालपवी केली आहे कां, कीं ती आतां करीन ? "

"तर मग तो तुला विचारिल्याशिवाय गेला ?"

" होय. "

"शाबास ! शाबास ह्मणावयाची तर या कार्टयाची ! गुलाम एवढा बेताल झाला असेल याची मला कल्पना देखील नव्हती ! तुजजवळून पैसे नेले

नाहींत तर मूर्खानें खात्रीनें चोरी केली असली पाहिजे. घरांतले दागदागिने पाहिलेस का ?"

"हो. सगळे अगदीं जिथल्या तिथेंच आहेत आणि म्हणून मला जरा धास्ती वाटते. कदाचित् जिवाला कांहीं जास्तीकमी करून घ्यावयाचा !"

नवऱ्याच्या मनांत अनुकंपा उत्पन्न करण्याच्या हेतूनेंच त्यांनीं हें वाईट विधान केलें. त्यांनीं आपले दागिने तपासून पाहिले नव्हते कीं तो जीवाला अपाय करून घेईल याबद्दलहि त्यांना धास्ती वाटत नव्हती; तर झालेल्या गोष्टीवर पांघरूण पडून तिचा शेवट गोड व्हावा अशी त्यांना इच्छा होती व म्हणूनच त्यावरीलप्रमाणें खोटें बोलल्या.

"ही आपली बायकी बुद्धि आम्हाला नको समजलांत ! म्हणे जीवाला जास्ती कमी करून घेईल ! जसा कांहीं जीव वाटेवरच पडला आहे की नाहीं ! आणि करून घेतलें तर घेतलें ! त्याला मी काय करणार ? मी कांहीं त्याला जीव द्यावयाला सांगितलें नाहीं ना ?"

"आपण जरी सांगितलें नाहीं तरीपण....."

"तरीपण काय ?"

"लोक काय म्हणतील तें नकोका बघायाला ! त्याला काय पोर म्हणतील".

"आणि आम्हांला थोर म्हणतील हेंच कीं नाहीं."

"असं भलतंच बोलायचं असलं, तर माझं बोलणंच खुंटलं !"

"बरें. तुमच्या मनांत काय आहे, तें तर कळूं द्या."

"माझं म्हणणं एवढंच आहे, कीं तो जेथें गेला असेल तेथून त्याला घरीं आणावा. आणि मग तुमच्या म्हणण्याप्रमाणं मी त्याला नौकरी करावयाला लावीन. इकडे त्याचें इतकं वाटत नाहीं. पण आमचं बायकांचं—माझं आईचं मन सकाळपासून तिळतिळ तुटतें आहे ! त्यानें आपल्या जिवाला कांहीं करून घेतलं तर काय करायचं मग ! त्यानें कांहीं लांडीलबाडी केलेली नाहीं कीं त्यांत आईबापाच्या नांवांला काळं लागेल म्हणून धास्ती धरायची, आणि त्याला समजावयाला लाज वाटावयाची !"

प्रकरण २२ वें.

लग्नाला संमत्ती.



विनायकरावावर लक्ष्मीचें प्रेम होतें. इहलोकींच्या संसारांतील त्याला आपला जोडीदार करावा असें तिला वाटत होतें. ही तिची भावना, ही तिच्या मनाची धांव नैसर्गिक स्फूर्तीची स्वयंसिद्ध अशी होती. विनायकावर प्रेम करावयास तिला कोणी सांगितलें नव्हतें. तर ती त्याच्यावर प्रेम करावयास आपोआप शिकली होती. कौमार्यावस्था व यौवन यांच्यामधील काळांत मनांत नवीन अननुभूत विकारांची लाट उसळत असते व पुढें जसजसें यौवन वाढीस लागत असतें, तसतसे हे त्याचे विकार बळावत असतात.

लहानपणीं तिच्या मनांत त्याच्याबद्दल अल्लड स्नेहभावाचें रूपांतर वाढत्या वयानें पूज्यभावांत झालें. पूज्यभाव उत्पन्न झाल्यावरोबर ती त्याला विशेष आदरानें लेखूं लागली. ' अरे ' चें रूपांतर ' अहो ' मध्यें झालें. तो माधवाला येऊन नेहमीं उपदेश करीत असे. त्याची वर्तणूक सुधारावी म्हणून तो नानातऱ्हेनें खटपट करीत असे. या त्याच्या वागणुकीचा लक्ष्मीवर निराळाच परिणाम घडला. ह्यावेळचें तिचें वय, तज्जन्य तिची मानसिक स्थिति व विनायकाची वागणूक या सर्वांचा तिच्या मनावर परिणाम घडून तिला तो आवडूं लागला. ह्या आवडीच्या मुळांशीं गुणलुब्धता—प्रणयी गुणलुब्धता—होती. ह्या प्रणयी गुणलुब्धतेचा परिणाम—नैसर्गिक परिणाम—म्हणून ती त्याच्यावर आपसुख प्रेम करूं लागली.

ह्या प्रेमाचें पहिलें स्वरूप स्वार्थबुद्धीचें असतें, कारण त्याचा उगम आवडी पासून असतो. आवड आली कीं तेथें लालसा ही आलीच. अमुक वस्तु आपल्या नयनाला आल्हादकारक दिसते, तेव्हां तिचा लोभ उत्पन्न होऊन तो धरणें हें साहजिक आहे. लोभ धरल्यानंतर ती वस्तु मिळविण्याची खटपट करणें हें

ओघानेंच येतें. आपणाला एखादें फूल आवडलें कीं तें आपण तोडून घेऊन आपल्या मन'ची इच्छा परिपूर्ण करितों. परंतु फूल व मानवी प्राणी यांची स्थिति एकच नाहीं. फूल स्वाधीन करून घ्यावयास, किंवा तें मिळविण्याची खटपट करावयास लौकिक दृष्टीचा मज्जाव नसतो; पण आपल्या प्रेमाचा मानवी प्राणी मिळविण्यास तो असतो. भर समाजांत आपल्या आवडीच्या फुलांकडे प्रेमबद्ध दृष्टीनें पहाणें, किंवा त्याचें कौतुक करणें हें निराळें ! पहिली स्थिति समाज चालूं देतें आणि दुसरी चालूं देत नाहीं. पहिल्याला आडकाठी–विनयाची–लज्जेची आडकाठी नसते तर दुसऱ्याला ती असते. व ह्यामुळें मानवी प्राण्याचें असलें पहिलें प्रेम, त्यांच्या प्रेमाची पहिली स्थिती मुग्ध स्वरुपाची बनते.

मनुष्यस्वभावाचा धर्मच असा आहे, कीं तो एकदां एका बाजूनें जाऊं लागला ह्मणजे त्याच बाजूनें जात असतो. साधारण स्वभावाची जर ही गोष्ट तर त्या स्वभावाला आनंदित करणाऱ्या किंबहुना त्याच्यावर ताबा चालविणाऱ्या इच्छेची गोष्ट कशी असावी ? तिनें एकदां जो मार्ग धरिला तो ती सोडीत नाहीं. इच्छा तर आहे किंबहुना क्षणोक्षणीं ती वाढत आहे पण ती साध्य करण्याची सोय नाहीं. अशी स्थिती आली ह्मणजे त्या इच्छेच्या चिंतनांतच त्या प्राण्याला आनंद वाटत असतो. तशीच स्थिति लक्ष्मीची झाली होती. ती विनायकावर प्रेमबद्ध झाली होती, परंतु त्या प्रेमाचा स्फोट करण्याम, त्याला व्यवहार्य स्वरूप देण्यास ती असमर्थ होती. लौकिक स्थितीचा, सामाजिक चाली-रितीचा, तिच्या अंगभूत लज्जेचा तिच्यावर पगडा बसलेला होता. आपली स्थिति उघडी करणें तिच्याकडून होत नव्हतें. अशा स्थितींत आपल्या प्रेमाच्या मुग्ध चिंतनांतच तिला आनंद वाटणें योग्य होतें. ती आपल्या मुग्ध प्रेम चिंतनांत आपल्या प्रेमाचीं कल्पनाचित्रें रेखाटण्यांत दंग होत असे, व भावी सुस्थिति येईल या आशेनें आपला वेळ घालवीत असून आपल्या उश्रृंखल प्रेमविकारास शांत करीत असे.

तारुण्यांतील उत्श्रृंखल प्रणयी प्रेमबाधा किंवा कामविकार हा तमोगुणी आहे. परंतु हें त्याचें स्वरुप बदलून लक्ष्मीनें आपल्या मुग्ध चिंतनानें त्याला रजोगुणी बनविलें होतें. प्रेमबाधेनें तिच्या वृत्ति उश्रृंखल बनेनाश्या झाल्या

किंवा तिच्या अंगाची लाहीहि होईनाशी झाली. विनायक तिच्या दृष्टीस पडतांच ती त्याच्याकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें बघत असे. पण ही तिची दृष्टि शांत असे. त्या दृष्टींत तिच्या मनाची चलबिचल दिसत नसे, कीं ती त्याच्यावर अनुरक्त झालेली आहे असेंहि भयस्थाच्या लक्षांत येत नसे. थोडक्यांत सांगावयाचें झणजे तिचें प्रेम प्रौढ बनलें होतें, तें स्वर्गीय स्वरुपाचें झालें होतें. तें तिला प्रक्षुब्ध करीत नसे तर उलटें आनंदवीत असे. व आनंद चिर स्वरुपाचा असे.

असें होतें तरी तिच्या प्रेमाचा हा कृत्रिम रजोगुण लवकरच नाहींसा झाला. 'तुला माधवाशीं लग्न करणेंच योग्य' असें तिला तिच्या बापानें सांगितल्यापासून व लौकिक दृष्टया तें तिला पटल्यापासून ह्या प्रेमानें तिची वृत्ती अस्वस्थ होऊं लागली. तें आपल्या तमोगुणाचा प्रभाव तिला दाखवूं लागलें. तिच्या मानसिक स्वास्थाचा त्यानें भंग केला व तिच्या स्वर्गीय आनंदाला त्यानें हरताळ लागला !

लक्ष्मीची स्थिति मोठी चमत्कारिक झाली ! ती पेंचांत सांपडली ! काय करावें हें तिला समजेना ! एकीकडे प्रेम तर दुसरीकडे कर्तव्य ! एकीकडे तिची आवड, इच्छा व आनंद तर दुसरीकडे वडिलांची आवड, माधवाची इच्छा व त्याचा आनंद ! श्रीनिवासरावांनीं आपणावर केलेले उपकार, त्यांच्यामुळें आपली आलेली सुस्थिति हें सर्व तिला स्वार्थत्यागी हो असेंच सांगूं लागलें. ह्यांत विनायक तिच्यावर प्रेमबद्ध झालेला दिसत नव्हता, ह्या गोष्टीची भर पडली. उपकारकर्त्याचें अभिष्ट करण्यापेक्षां स्वतःच्या सुखाची तिला महती कमी वाटूं लागली; व अखेरीस स्वार्थत्यागाच्या भावनेचाच विजय झाला ! आपल्या स्वतःच्या सुखावर, इच्छेवर, आनंदावर ती पाणी सोडण्यास तयार झाली. माधवाशीं लग्न करावें असेंच तिनें शेवटीं ठरविलें.

परिस्थितीच्या—कर्तव्याच्या परिस्थितीच्या—तडाख्यांत सांपडल्यामुळेंच तिनें वरील बेत ठरविला होता. तो नैसर्गिक स्फूर्तीचा नव्हता, तर विचाराचा होता. परंतु स्वतःच्या आवडीनिवडीचा जेथें प्रश्न असतो तेथें वरीलप्रमाणें केलेला बेत जरी खंबीर, अचल, असा असतो तरी, किंतीं झालें तरी तो कृत्रिम स्वरूपाचा असल्यानें चित्तवृत्ति प्रक्षुब्ध करणारी गोष्ट घडली झणजे त्या बेतापासून मनाला मिळावी तशी शांती मिळत नसते, तर उलट मानसिक

अस्वथता वाढविण्यास तो कारणीभूत होतो. विनायक–आपल्या हृदयाचा स्वामी घरांतून निघून गेला, हें समजल्यापासून लक्ष्मीच्या मनाची स्वस्थता नाहींशी झाली. ह्यामुळें मी स्वतंत्र असतें, माधवाशीं लग्न करावयाचें मीं ठरविलें नसतें, तर यावेळीं कितीतरी चांगलें झालें असतें असें तिला आतां वाटूं लागलें. घडलेला प्रसंग येऊं दिला नसता किंवा त्याचे पुढें अनिष्ट दिसणारें परिणाम होऊं दिले नसते असें तिला वाटूं लागलें.

विनायक निष्कांचन स्थितींत घरांतून बाहेर पडलेला होता. अशा स्थितींत त्याला कोणाची तरी मदत घेणें जरूर होतें. तो कोणाकडे जाईल याचा तिनें मनाशीं पुष्कळ विचार केला, व त्यांत तो माधवाकडे बहुधा मदत घेण्यासाठीं जाईल हें तिला संभवनीय दिसूं लागलें. एकंदर घडलेल्या गोष्टींनीं तिचें मन क्षुब्ध झालेलें होतें. विनायकाची चांगली स्थिति असावी एवढीच तिची इच्छा होती, व ह्या इच्छेच्या भरांत त्याला मदत करण्यासाठीं तिनें माधवाला खालीलप्रमाणें पत्र लिहिलें.

"तीं. रा. माधवदादा यांस–वडिलांचे सेवेशीं, मुद्दाम पत्र लिहिण्याचें कारण कीं घरांतुन कांहीं कारणावरून भांडून रा. विनायकराव निघून गेले आहेत ते बहुधां आपलेकडे येतील. कदाचित् पैशाची वगैरे मदत ते आपणाजवळ मागतील तरी आपण ती त्यांस द्यावी, व त्याप्रमाणें आह्मांला इकडे कळवावें ह्मणजे आमची काळजी दूर होईल. कळावें. वरकड सर्व मजकूर ठीक आहे. आपल्या पत्राची वाट पहात आहें. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

लक्ष्मीताई.',

त्या भरांत लिहिलिलें पत्र तिनें बंद करून नोकरांजवळ पोष्टांत टाकण्यासाठीं देखील दिलें. याप्रमाणें आपल्या प्रिय माणसांचद्दल केलेल्या तजविजीनें तिला समाधान वाटलें; व ह्या समाधानानें तिची वृत्तीहि आनंदी बनली.

थोड्या वेळानें ती बसली होती तेथें गोविंदराव आले. ती विनायकावर अनुरक्त झालेली असावी असा त्या दिवशींच त्यांनां संशय आला होता. त्या संशयाची निवृत्ति करून घेण्याची त्यांची इच्छा होती व त्याप्रमाणें ती माध

वाशीं लग्न करण्यास तयार होईल अशा तऱ्हेचा तिला उपदेश करण्याचेंहि त्यांनीं ठरविलें होतें.

" कां विनायकाची कांहीं जास्ती माहिती कळली का तुला ? "

" नाहीं. "

" मी आतांच तिकडून आलों. त्यानें तेथून जाण्यांत खरोखरीच फार मूर्खपणा केला. चिंतामणराव त्याच्यावर अतिशय रागावलेले आहेत. त्याचें तोंड देखील पुनः पाहण्याची आपणास इच्छा नाहीं असें ते म्हणाले. "

" येवढ्या थरावर मजल कां यावी हेंच मला समजत नाहीं. " कांहींतरी बोलावयाचें म्हणून ती बोलली.

" चिंतामणरावांनीं चांगली त्याच्यासाठीं नोकरी बघितली होती व त्याबद्दल त्यांचें व त्याचें काल सकाळी बोलणें झालें. त्याला नोकरीच करावयाची नव्हती म्हणून त्यानें घरांतून पोबारा केला. आपण घरांतून पळून गेल्यानें आपल्या वडिलांच्या कीर्तीस, त्यांच्या नांवलौकीकास केवढा कमीपणा येईल याचा देखील त्या मूर्खाने विचार केला नाहीं ! "

" मी म्हणतें त्यांनीं केला नाहीं पण चिंतामणरावांनीं तर तो करावयास पाहिजे होताना ? ते किती झाले तरी वडील आहेत. "

" ते वडील आहेत म्हणूनच त्यांनी सांगितलेलें त्यानें ऐकावयास पाहिजे होतें. वडाळ मनुष्यांच्या सांगण्याप्रमाणें घरांतील सर्व मंडळी चालली तरच त्या संसाराची मजा असते. आतां तुझी आई ज्यावेळेस वारली त्यावेळेस माझें लग्न करण्यासारखें वय नव्हतें का ? होतें, शिवाय त्यावेळीं लग्न करावें असें मलाहि पण वाटत होतें, परंतु निर्मळ काकांच्या (श्रीनिवासरावांच्या) म्हणण्यासाठींच म्हणून मी लग्न केलें नाहीं. वडील माणसें करतात तें आपल्या हिताचेंच करतात असें आम्ही समजत होतों. त्यांच्यापुढें ब्र काढण्याची आमची प्राज्ञा नव्हती. ते सांगतील तें मुकाट्यानें ऐकावयाचें एवढेंच आम्हांला ठाऊक होतें. आणि म्हणूनच आमचे संसार सुखासमाधानानें झाले. तशी स्थिति सध्याच्या पिढीची नाहीं. वडिलापेक्षां आपण शहाणे असा अहंभाव तिच्या

हाडींमासीं खिळलेला आहे. आणि ह्मणूनचें अशी स्थिति येते. लोकांत अब्रु जाते. दुसऱ्याला त्रास होतो आणि स्वतःला दुःख भोगावें लागतें. आतां या विनायकाचेंच पहाना! जवळ ना पैसा ना अडका अशी स्थिति! मूर्खाला भिकाऱ्याप्रमाणेंच घरची चांगली स्थिति असतां, भटकावयास लागणार; आणि तें का तर आपल्या मताप्रमाणें चालण्याचा अट्टहास धरावयाचा ह्मणून बरें! तें असो ह्मणा—आपणाला त्याच्याशीं काय करावयाचें आहे. ज्याचा तो करील व ज्याचा नो निस्तरील!"

थोडावेळ थांबून ते पुढें ह्मणाले, "मग माझ्या सांगण्याप्रमाणें तूं माधवाशीं लग्न करावयास तयार आहेसना?"

"हो."

प्रकरण २३ वें.

भितीला कान.



"तुझ्या पहिल्या कल्पनेप्रमाणेंच झालें म्हणावयाचें तर मग?"

"हो. आणि तें होणार असें मला वाटत होतें. असो. जें झालें तें झालें. आतां त्याचा विचार करणें योग्य नव्हे, तर पुढें कसें करावयाचें याचाच आतां विचार केला पाहिजे. ह्यावेळीं भालचंद्र येथें असता तर फार चांगलें झालें असतें."

" तो येथें नाहीं म्हणून काय स्वस्थ बसावयाचें ! "

"छत् स्वस्थ बसून कसें भागेल ! ज्या गोष्टीसाठीं मी घरांतून बाहेर पडलो ती थोडीबहुत तरी मला करून दाखविली पाहिजे. आणि तेवढ्यासाठींच तुझ्याकडे अगोदर आलों. "

" माझ्याकडून होणारी मदत करावयास मी तयार आहें. बोल काय करूं तें ! "

आपल्या मनांतील गोष्ट माधवाजवळ सांगावयास विनायक अद्यापि बाचकत होता. याचकवृत्ति हीच अशी आहे कि कमनशीबानें ती ज्यांच्या वाट्यास येते त्यांना असें वाटत असतें. आपल्या प्रिय मित्राजवळसुद्धां याचना करण्याचें जिवावर येतें. एकदम पैशाची मदत मागण्याचा विनायकाला धीर होत नव्हता. अशा तऱ्हेनें याचना करण्याचा त्याला कधींहि प्रसंग आलेला नव्हता, म्हणून तो घुटमळूं लागला–

तो घुटमळतो आहे हें पाहून माधव म्हणाला.

"विनायक, मी तुला पुन्हां सांगतों कीं वाटेल ती मदत तुला करण्यास मी तयार आहें. त्याबद्दल प्रत्यक्ष चिंतामणरावांचा जरी माझ्यावर रोष झाला तरी चालेल. बोल तुझ्या मनांत काय आहे तें बोल. तुझ्या ह्या संदिग्धतेवरून माझ्याबद्दल तुला खात्री वाटत नाहीं असें मला वाटूं लागलें आहे "

तरीदेखील विनायक बोलेना.

" अशा स्थितींत मजजवळ मदत मागावयास तुला वाईट, कमीपणाचें वाटत असेल ! पण, मी ह्मणजे दुसरा का कोणी आहें ? माझ्या सख्या भावाप्रमाणें मी तुला समजतों. पहिल्यानदां नागपुराहून मी जेव्हां यवतमाळास आलों, ज्यावेळीं माझ्या नागपुरच्या आचरणामुळें लोक माझ्याकडे तुच्छतादर्शक दृष्टीनें पहात असत व माझ्याकडे बोटें दाखवून माझ्या अयोग्य आचरणांची शिक्षा मला देत असत, त्यावेळीं कोणीहि संभावित मनुष्य मला चांगल्या दृष्टीनें लेखावयास तयार नसतां, आपली जुनी मैत्री आठवून तूंचना मला प्रथम जवळ केलेंस; आपल्या प्रेमळ वागंणुकीनें लोकनिंदेचें दुःख तूंचना मला कमी वाटावयास लावलेंस. असें असतां, तूं आतां माझ्याशीं असें कां वागावेंस ! त्यावेळीं मी वाईट स्थितींत होतों, व त्याला कारण माझा मीच होतों. आतां तुझी स्थिति वाईट आली आहे व त्याला कारण तूंच जरी आहेस तरी त्याबद्दल तुला दोष देतां येण्यासारखा नाहीं. कारण माझ्याप्रमाणें तूं अनीतीमान्, व्यसनी बनून ही स्थिती आपल्यावर आणून घेतली नाहींस. मनाच्या सद्भावनेसाठीं, परमथोर परोपकारासाठींच तुला घर सोडावें लागलें आहे. ह्यांत तुझा दोष नाहीं तर तुझ्या वडिलांचा दोष आहे. स्नेही ह्मणून यावेळीं तुला मदत करणें हें माझें कर्तव्य आहे. व ह्या कर्तव्याचें स्वरूप इतकें शुद्ध आहे कीं त्यांत उपकाराचा लवलेश देखील येणारा नाहीं. माझ्याजवळून मदत घेण्याचा, माझी मदत स्वीकारण्याचा तुझा हक्क आहे. आणि तो तूं योग्य तऱ्हेनें बजावावास येवढेंच माझें तुला सांगणें–एवढीच माझी तुला विनंति–आहे. "

याप्रमाणें माधव बोलल्यावर ते दोघेहि बराच वेळ स्तब्ध होते. खऱ्या प्रेमाचा उमाळा माधवाला आला असल्यानें ज्यास्ती बोलणें त्याला होण्यासारखें नव्हतें. त्याचे डोळे पाण्यानें भरले होते व त्याचा कंठ दाटून आला होता. तशीच थोडीबहुत स्थिति विनायकाची झाली होती. माधवाच्या मित्रप्रेमाची त्याला एवढी कल्पना नव्हती. पण त्याच्या बोलण्यानें ती पटल्यानंतर त्याचें त्यालाच चमत्कारीक वाटूं लागलें. आपल्या संकोचतेबद्दल त्याला पश्चात्ताप वाटूं लागला. आपण जी काय मदत पाहिजे ती अगोदरच मागितला असती तर माधवाला येवढें वाईट वाटलें नसतें, याबद्दल त्याला वाईट वाटूं लागलें. थोडा वेळ गेल्यानंतर तो ह्मणाला–

" माधव, तुझ्याच भरंवशावर, कोणाला कळविल्याशिवाय किंवा कोणाकडून पैसे मागून आणल्याशिवाय मी घर सोडलेलें आहे. तुझ्याकडून मला मदत होईल ही मला खात्री होतीच. परंतु अद्यापपर्यंत याचना करण्याचा प्रसंग आला नसल्यानें मला चमत्कारिक वाटत होतें. आणि ह्मणूनच तूं सांगितलेंस तरी मी तुजजवळ याचना करूं शकलों नाहीं. तूं माझा मित्र–नुसता मित्रच नव्हे तर सन्मित्र–आहेस, हें तुझ्या बोलण्यावरूनच उघड होत आहे. आणि तें मलाहि पटलेलें आहे. "

" मग सांग तर, मी तुला कोणती मदत करूं ती ? "

" मला फक्त पैशाची मदत पाहिजे आहे. "

" हात्तीच्या, एवढेंच ना ! आणि त्याच्यासाठीं का एवढा बाचकत होतास !" माधव हंसून ह्मणाला.

" कांहीं म्हण, पण....."

इतक्यांत पोष्टाचीं पत्रें घेऊन ' भुवनाचा ' मनुष्य तेथें आला.

पत्रें फोडून माधवानें वाचण्यास सुरुवात केली. पहिलें पत्र वाचीत असतां त्याच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा दिसूं लागली. परंतु तें वाचून झाल्यावर दुसरें जेव्हां तो वाचूं लागला तेव्हां तो तेथील आनंद पार मावळला ! तेथें तीव्रतर दुःखाची व नंतर विचारीपणाची, जिज्ञासेची छटा दिसूं लागली !

तो पत्रें वाचीत असतां विनायकाचें त्याचेकडे लक्ष नव्हतें. तो बाहेर ग्यालरींत गेला होता. परत खोलींत येऊन पहातो तों माधव स्वस्थ बसलेला त्याला दिसला, व तो कोणच्या तरी विचारांत गढल्याप्रमाणें दिसत होता. कदाचित् आपल्याबद्दल त्याला कांहीं पत्र आलें असेल व त्यामुळेंच तो विचारांत गर्क झाला असेल असें वाटून विनायकानें त्याला तसें विचारलें.

" होय. तुझ्याबद्दल पत्र आलें आहे; हें पहा. " असें म्हणून लक्ष्मीचें त्याला आलेलें पत्र त्यानें त्याच्यापुढें केलें.

त्यानें तें पत्र वाचलें. त्यांत म्हणण्यासारखें, माधवास सचिंत करण्यासारखें कांहीं नव्हतें. त्यापत्रांतील मजकूर लक्ष्मीनें आपल्या आईच्या व बहिणीच्या सांगण्यावरून लिहिला असावा असें त्याला वाटलें. असा त्याला त्या पत्राचा रोख दिसला. व ह्यावरून घरांतील मंडळीस त्याच्याबद्दल काळजी उत्पन्न

झाल्याचा त्यानें तर्क केला. पण ह्यावरून सुद्धां माधवास चिंताक्रांत होण्याचें त्यांला कारण दिसेना.

"माधव, ह्या पत्रावरून तूं सचिंत झालास कीं काय? मी येतांना घरीं कोणालाच कळवून आलों नाहीं ही गोष्ट खरी, पण एवढ्यास तूं सचिंत व्हावेंस हें मला बरोबर दिसत नाहीं."

माधवानें दुसरें पत्र त्याच्यापुढें केलें. तें तो वाचूं लागला.

"चिं. रा. माधवराव यांसीः—अनेक आशावाद. उपरी विशेष. आपण येथून कां निघून गेलांत हें मला समजलें. आपल्या थोरपणाला साजेसेंच वर्तन येथून निघून जाण्यानें आपण केलेंत, पण आपण गेल्यापासून आमच्यामुळें आपणांस जावें लागलें ह्याबद्दल मला सारखें वाईट वाटत आहे. काकांनीं आपल्या पश्चात् आपल्या सुखकल्याणाचा सर्व भार माझेवर टाकलेला आहे, व त्या जबाबदारींतून योग्य तऱ्हेनें पार पडण्याची माझी इच्छा आहे.

या बाबतींत मी आपणांस लिहिणें म्हणजे शिष्टाचारास सोडून आहे. परंतु लिहिणें भाग आहे. लक्ष्मीशीं लग्न करावें अशी आपली इच्छा आहे. पण ती इच्छा फलद्रूप होण्याचा रंग दिसेना, तेव्हां आपण येथून निघून गेलांत. आपण गेल्यानंतर या बाबतींत मी लक्ष्मीला योग्य उपदेश केला व तिचें मन वळविलें. आपल्याशीं लग्न करण्यास तिची तयारी आहे. तिनें आपली संमति दर्शविली, व त्याप्रमाणें मी हें पत्र लागलेंच आपणांस लिहिलें आहे.

एखाद्या क्षुल्लक गोष्टीस विशेष महत्व देऊन आपण घर सोडून जावें व परक्या ठिकाणीं जाऊन रहावें हें मला उचित दिसत नाहीं. याचा योग्य तो विचार व्हावा व लवकर घरीं येण्याचें करावें. कळावें, हे आशीर्वाद.

आपला—गोविंदराराव."

पत्र वाचून झाल्यावर पाकिटांत घालून तें त्यानें विनायकापुढें टाकलें व तोहि माधवाप्रमाणें सचिंत बसला. त्याच्या मनांत त्या पत्रानें विचारतरंग येऊं लागले पण ते माधवाच्या मनांतील विचारापेक्षां निराळे होते. आपल्या मुलीचें जाणून बुजून गोविंदराव माधवाशीं लग्न लावूं बघतो आहे हा व ह्याच्या अंगभूत असणारे विचार त्याच्या मनांत चालले होते.

" विनायक, त्याबाबतींत तुझी सल्ला घ्यावी असें मला वाटतें. ही आतांचीं दोन्ही पत्रें तूं वाचलींस. लक्ष्मी माझ्याशीं लग्न करावयास तयार आहे असें गोविंदराव आपल्या पत्रांत ह्मणतात, तर तशा तऱ्हेचा प्रकार लक्ष्मीच्या पत्रांत कांहींहि दिसत नाहीं. कदाचित् विनयानें पत्रांत तसें तिला लिहिणें इष्ट वाटलें नसेल असें गृहीत धरलें तर ती मला 'माधव दादा' ह्मणून लिहिते. यावरून आमचें नातें कोणच्या स्वरूपाचें असावें याबद्दलची तिची इच्छा स्पष्ट होत नाहीं का ? शिवाय दोन्हीं पत्रें एकाच वेळचीं दिसतात, यावरून गोविंदरावाच्या पत्रांतील मजकूर व तिच्या पत्राची भाषा ही विसंगत नाहीं का दिसत?"

" होय, दिसतें तर खरेंच. पण तुला खरोखरीच लक्ष्मीशीं लग्न करावें असें वाटतें का ? मी असें विचारूं नये, पण ओघानें गोष्ट आली ह्मणूनच विचारतों व शिवाय तुझ्याबद्दल मला एक तऱ्हेची काळजी वाटत असल्यामुळें तसें विचारणें भाग पडत आहे."

" लक्ष्मीशीं लग्न करावें असें मला वाटतें."

" आणि तुझ्याप्रमाणें तिलाहि वाटतें का ? "

" तें मी काय सांगूं ! निदान मागें मी माझा मनोदय तिला कळविला होता; त्यावेळीं तिनें आपली नापसंती दर्शविली होती. "

" माधव, लक्ष्मी कांहीं आतां लहान नाहीं. तिचें हिताहित थोड्याबहुत प्रमाणानें कळण्यासारखी तिची स्थिति आहे. तेव्हां तुझ्यासारख्या ऐश्वर्यसंपन्न तरुणाशीं ती लग्न करूं इच्छीत नाहीं, यावरून तिची खरी स्थिति तुझ्या ध्यानांत यावयास पाहिजे. मी काय ह्मणतों हें समजलेंना तुला ? "

माधवानें होकारार्थी मान हालविली.

" तेव्हां अशा स्थितींत अयोग्य तऱ्हेनें तिचें मन वळवून किंवहुना तिला आपल्या इच्छेप्रमाणें वागावयास लावून तिच्याशीं लग्न करणें तुला—तुझ्यासारख्या सुशिक्षितास उचित नाहीं. तुझ्या वडिलांच्या अन्नावर ती वाढलेली, तुझ्या वडिलांच्याचमुळें गोविंदरावाला व तिला आज हे दिवस आलेले आहेत. ह्या सर्व गोष्टी स्मरून आपली स्वतःची आवडनिवड बाजूला सारून आपल्या स्वतःच्या सुखावर केवळ तुझ्या सुखासाठीं, पाणी सोडून तिनें तुझ्याशीं लग्न करावयास तयार व्हावें हें तिला योग्यच आहे. यांत तिच्या मनाचा मोठेपणा

दिसतो. तिनें जशी आपली कृतज्ञता बुद्धी जागविली, तशी तिच्या सुखाची काळजी घेऊन ती तुलाहि जागविली पाहिजे. तिच्या सुखावर धगधगीत निखारे ठेवून तिच्याशीं लग्न-लग्न कसलें राक्षसी विवाह-करणें तुला शोभत नाहीं ! तिच्या सौंदर्यानें वेडावून जाऊन उन्मत्त विकाराधीन होऊन असा विषम विवाह करणें केव्हांहि अनिष्टच असतो. विकाराधीनतेनें मनुष्याच्या ज्ञानदृष्टीला अंधत्व येतें. त्याप्रमाणें तुझी ज्ञानदृष्टि आंधळी झाली असून अशा तऱ्हेच्या लग्नापासून आपल्याला सुख होईल असें तुला वाटत असेल, पण हें वाटणें पुढें टिकावयाचें नाहीं. किती झालें तरी जबरीचाच हा प्रकार असल्यानें त्यापासून तुला किंवा तिला सुख लागणें कठीण आहे. शिवाय..."

थोडा वेळ थांबल्यावर तो पुनः म्हणाला—

"माझ्याप्रमाणेंच भालचंद्रहि तुझा मित्र आहे. त्याची ठेव म्हणून ठाऊक असणाऱ्या वस्तूचा अपहार करून मित्रद्रोही बनूं नकोस ! "

त्याचें बोलणें ऐकून माधव स्तंभितच झाला. आपल्या स्थितीचें त्यानें रेखाटलेलें चित्र पाहून तो लाजला. त्याला उत्तर देण्यास त्याचें धैर्य होईना.

त्याची स्थिति ओळखून विनायक म्हणाला—

" माधव, मला जें खरें वाटलें तें मीं बोललों. व ह्याप्रमाणें खऱ्या मित्रांत अशा गोष्टीची वाटाघाट होत असतां लाजून तूं मौनव्रत स्वीकारावेंस हें मला योग्य दिसत नाहीं. माझें म्हणणें तुला पटलें ना ? "

माधवानें होकारार्थी मान हालविली.

" मग त्याप्रमाणें तूं गोविंदरावांना कळीव. पाहिजे असल्यास तेथें जाऊन त्यांना सर्व नीट समजावून सांग. "

" विनायक, प्रियमित्रा ! आज तूं पुन्हां उपदेशामृत पाजून मला जागें केलेंस ! " सद्गदित स्वरानें माधव म्हणाला.

ह्या दोघांना वाटत होतें, आपण एकांतांत बोलत आहोंत म्हणून. खरें पाहिलें असतां बोलतांना ते एकांतांत होते, पण त्यांचें बोलणें मात्र एकांतांत राहिलें नव्हतें. तें तिसऱ्याच्या कानीं गेलें होतें.

हेंच योग्य !

प्रकरण २४ वें.

कमलेची शंका.

माधवाचें पत्र आज येण्याची वेळ होती. पत्राची वाट पहात कमला उत्सुकतेनें लक्ष्मीकडे येऊन बसली होती. ह्या दोघी जशा माधवाच्या पत्राची वाट पहात होत्या तसेच गोविंदरावहि त्याच्या पत्राची वाट पहात होते.

माधवाला आपण विनायकावद्दल पत्र पाठविल्याचें जेव्हां लक्ष्मीनें कमलेला सांगितलें तेव्हां तिच्या चेहऱ्यावर त्याचा झालेला परिणाम पाहून तिच्या मनांत कमलेवरून निराळाच संशय आलेला होता, व त्या संशयास दुजोरा देणाऱ्या गोष्टीच त्या वेळेपासून तिच्या नजरेस येऊं लागल्या होत्या. ह्या सर्वांवरून कमला माधवावर अनुरक्त झाली असल्याचें तिनें अनुमान काढलें होतें. पण हें अनुमान खरें होतें कीं खोटें होतें हें मात्र निश्चयात्मक तिला अद्याप समजलें नव्हतें.

तें समजून घेण्याचा आज तिचा विचार होता. कारण तिच्या मनाला रुखरुख लागली होती.

त्या दिवशींच्या डाकेनें माधवाचें पत्र आलें. तें खालील प्रमाणें होतें.

"प्रियभगिनी लक्ष्मीताई, हीस अनेक आशीर्वाद. तुझें पत्र पावलें. रा. विनायक हा येथेंच आलेला आहे. त्याच्याबद्दल कांहीं काळजी करूं नये. तूं पत्रांत लिहिल्याप्रमाणें मी त्याला सर्व मदत करीन. अशा तऱ्हेनें त्याला मदत करणें हें माझें कर्तव्य आहे, व तें मी कधींहि विसरणार नाहीं. वरकड सर्व मजकूर ठीक आहे. ती. रा. गोविंदरावांना लिहिलेल्या पत्रावरून विशेष खुलासा समजेल, कळावें. आपली सर्वमंडळीची खुशाली वरचेवर कळवीत असावें. हे आशीर्वाद.

तुझा भाऊ,
माधवदादा."

पत्र वाचल्यावर तें तिनें कमलेस दिलें, व तें मोठ्यानें वाचावयास सांगितलें. पत्र मोठ्यानें वाचावयास सांगण्यांस तिचा कांहीं निराळाच हेतु होता; परंतु ह्यावेळीं तरी निदान तो सफल झाला नाहीं.

त्या पत्रावरून दृष्टि फिरवितांच तिला भावाची माहिती मिळाली. ही माहिती आईला केव्हां सांगेन असें तिला झालें व त्या नादानें तें पत्र घेऊन ती आपल्या घराकडे येण्यास निघाली.

' पत्र घेऊन कोठें चाललीस ?' लक्ष्मीनें तिला विचारलें.

" घरीं आईला जाऊन वाचून दाखवितें " असें ह्मणून ती बाहेर पडली.

थोडक्याच वेळांत ती परत आली. ती आल्यानंतर देखील लक्ष्मीनें तिला तें पत्र वाचून दाखविण्यास सांगितलें. कमला आनंदाच्या भरांत होती. लक्ष्मी आपल्याला पत्र वाचून दाखविण्यास कां सांगते, हें तिच्या लक्षांत आलें नाहीं. ती तिला पत्र वाचून दाखवूं लागली, तिनें बहुतेक सर्व पत्र वाचून दाखविलें. परंतु पत्रांतील सही वाचून दाखविण्यापूर्वी ती थबकली ! तिची चर्या एकदम बदलली. आनंदाची पहिली छटा मावळली व तिचें मुखकमलावर लज्जाविकार दिसूं लागला. परंतु आपली स्थिति लक्ष्मीच्या लक्षांत यावी अशी तिची इच्छा नव्हती ह्मणून तिनें अडखळत कशींतरी ती सही वाचली.

लक्ष्मीचा संशय खरा ठरला ! निदान तिच्या दृष्टीनें तरी तो खरा आहे असें तिनें स्त्रीस्वभावानुरूप ठरविलें। आणि तो खरा होता. कमलेचें अंतःकरण माधवाच्या ठिकाणीं जडलें होतें. ती त्याच्यावर प्रेमासक्त झाली होती.

एन्हवींच्या स्थितींत ह्या गोष्टीपासून लक्ष्मीला आनंद झाला असता. पण सध्यांची तिची स्थिति आनंद मानण्यासारखी नव्हती. माधवाशीं लग्न करण्यानें तिला एकटीलाच वाइट वाटणारें होतें. परंतु आतां तशी स्थिति नव्हती. कमलेच्या सुखांत तिच्या बळजबरीच्या कबूलीनें माती कालविण्यासारखें होतें. ह्या विचारानें ती हताश झाली. कमलेच्या तोंडाकडे पहात ती निस्तब्ध होती. पुढें येणारी स्थिति बदलण्याचें तिच्या अंगीं सामर्थ्य होतें, पण त्याचा उपयोग करण्याचें तिच्या हातांत नव्हतें.

आपली गुजगोष्ट तिला कळली असावी ह्याच विचारानें कमला लाजली होती. आपलें मुखकमल सालीं घालून ती बसली होती. लक्ष्मीच्या तोंडाकडे

पहाण्याचें तिला धैर्य होत नव्हतें. अशा स्थितींत तेथें बसण्यापेक्षां घरीं जावें असें वाटून ती घरीं जाण्यासाठीं उठली. व त्याच लाजाळू स्थितींत आपली खरी स्थिति न दर्शविण्याच्या हेतु-मूळ उलट्या अवसानानें तिनें लक्ष्मीजवळ आपल्या जाण्याची प्रस्तावना केली.

ती माधवावर अनुरक्त झाली अशी जरी खात्री लक्ष्मीला वाटत होती, तरी तिच्याबद्दल वाटणाऱ्या प्रेमानें, त्या प्रेमाच्या कळवळ्यानें त्या गोष्टींची शहानिशा करून घ्यावी असें लक्ष्मीला वाटूं लागलें. व त्याप्रमाणें तिनें तिला विचारलेंही.

" कमले, माधवाशीं लग्न करावें अशी तुझी इच्छा आहे काय ? "

हा तिचा प्रश्न अगदीं उघड होता. खरें पाहूं गेलें असतां लक्ष्मी शुद्धीवर असती, तर त्या सर्व भानगडीच्या विचारानीं तिचें डोकें संतप्त झालें नसतें. कमलेच्या भावी हिरमोडाबद्दल तिला एवढें वाईट वाटलें नसतें, तर तिनें तिला असा प्रश्नहि केला नसता. परंतु हें समजण्याइतकी तिची मानसिक स्थिति होती कोठें !

तिचा अगदीं उघड प्रश्न ऐकून कमला जास्तीच लाजली. तिनें तिला उत्तर दिलें नाहीं. ती जाण्यासाठीं दाराकडे वळली.

" मी काय विचारतें तें अगोदर सांग आणि मग जा. " तिचा हात धरून लक्ष्मी म्हणाली.

ही आपली थट्टा करीत आहे असेंच कमला समजत होती. तिला आनंद देणारी ही थट्टा होती, म्हणून जाण्याचा खोटा आविर्भाव करीत ती तेथेंच उभी राहिली.

" काय कमलाताई ! माझें बोलणें आपल्याला ऐकूं येत नाहीं वाटतें ? "

इतका वेळपर्यंत खालीं असलेली आपली दृष्टि कमलेनें फिरविली. सलज्जतेच्या वांकड्या दृष्टीनें मनांत होत असणाऱ्या आनंदाच्या उकळ्या आपल्या मुद्रेवर न दिसूं देण्याचा प्रयत्न करीत तिनें लक्ष्मीकडे पाहिलें. लक्ष्मीच्या तोंडाकडे पाहतांच ती चपापली. हा प्रकार थट्टेचा दिसत नाहीं हें तिनें तेव्हांच ओळखलें. तिच्या मनांत भलताच विचार आला व त्यासरशीं तिनें

हा प्रश्न तूं मला कां केलास ? " असें तिच्या दृष्टीला दृष्टि मिळवून तिला विचारलें.

" कां म्हणजे ? तुझ्या सुखासाठीं ! " भानरहित झालेली लक्ष्मी उद्गारली.

" माझ्या सुखासाठीं ? "

कमलेची दृष्टि व स्वर दोन्हीही तीक्ष्ण होते. त्यांच्यांत जिज्ञासा भरलेली दिसत होती. सत्य बाहेर काढण्याचाच त्यांचा उद्देश होता.

लक्ष्मी एकदम भानावर आल्यासारखी झाली. आपण भलतेंच बोललों असें तिला वाटूं लागलें. खरें कमलेला कळूं नये अशी तिची इच्छा होती. कारण खऱ्यांत दुःख भरलेलें होतें. तिचा प्रश्न ऐकून ती घाबरली. काय उत्तर द्यावें हें तिला सुचेना. परंतु वेळ कशी तरी मारून न्यावयास पाहिजे होती.

" तुझ्या मनांतील खरें बाहेर काढण्यासाठीं मला ही युक्ति करावी लागली. समजलीस, हंसत हंसत तिचें तोंड हनवटिला धरून वर करीत ती म्हणाली.

लक्ष्मीनें प्रेमळपणाचा आव सपाटून घातला व एकंदरींत सर्व गोष्ट थट्टेवारीच नेली. यानंतर इकडल्या तिकडल्या गोष्टी काढून ती कमलेशीं बोलूं लागली. इतक्यांत गोविंदरावांची स्वारी तेथें आली. लक्ष्मीला हांक मारून त्यांनीं तिला आपल्या दिवाणखान्यांत तावडतोब येण्यास सांगितलें.

त्यांनीं येवढ्या त्वरेनें आपल्यास कां बोलावलें याचा विचार करीतच लक्ष्मीनें कमलेला निरोप दिला. कमलेचें मनहि साशंक झालें.

प्रकरण २५ वें.

गोविंदरावांचा विरस.



लक्ष्मीचें माधवाशीं लग्न जमविण्यांत गोविंदरावांचा अंतस्थ हेतु होता, व तो फार निराळ्या स्वरूपाचा होता. आपलें स्वतःचें लग्न व्हावें असें त्यांच्या मनानें घेतलें होतें, व योग्य पत्नीचीहि त्यानीं निवड करून ठेविली होती. ही कोण ? तर आपली कमला !

श्रीनिवासराव जिवंत असतांना त्यांना नाखुष करूं नये म्हणून ते दुसऱ्या लग्नाच्या भानगडींत पडले नव्हते; परंतु त्यांच्या मृत्यूनंतर जसे गोविंदराव इतर बाबतींत स्वतंत्र बनले, तसे याहि बाबतींत स्वतंत्र बनूं लागले व आपण लग्न आणि तेंहि ठराविक मुलीबरोबर करावयाचें असें त्यांनीं ठरविलें. ह्या त्यांच्या लग्नाच्या मार्गांत बऱ्याच अडचणी येणाऱ्या होत्या, परंतु त्या दूर करावयाच्याच अशा तऱ्हेनें ते वागत होते व म्हणून माधवासंबधानें जेव्हां कमलेचद्दल चिंतामणरावांनीं मागणी घातली, तेव्हां माधवाच्या मनांतील हेतू-प्रमाणें त्याचें लक्ष्मीशीं लग्न जमविण्याच्या खटपटीला ते जारीनें लागले होते. माधव व लक्ष्मी यांच्याशीं असलेल्या त्यांच्या नात्याच्या दृष्टीनें हें लग्न जमविण्यांत त्यांचा कांहीं अस्पष्ट व स्वार्थाचा हेतु असेल, अशी कोणास कल्पना देखील येण्यासारखी नव्हती.

लक्ष्मी आल्याबरोबर माधवाचें आलेलें पत्र त्यांनीं तिच्यापुढें टाकलें. ह्यापत्रांत लक्ष्मीशीं लग्न करण्याचें माधवानें नाकारलें होतें. पत्र वाचून लक्ष्मीला आश्चर्य वाटलें. तिला आनंद झाला, व त्या आनंदाची छटा तिच्या तोंडावर दिसूं लागली. ती पाहून गोविंदराव जास्तच संतापले, व रागाच्या आवेशांत तिच्या हातांतील पत्राकडे बोट दाखवून " ह्याचा अर्थ काय ? " असा त्यांनीं तिला छद्मी स्वरानें प्रश्न केला.

लक्ष्मी कांहींच बोलली नाहीं.

" असें करावयाचें होतें तर मलातरी तोंडघशीं पाडावयाचें नव्हतेंस्. "

" मी काय केलें. बाबा ! "

" काय केलें ह्मणून वरतीं तोंड करून मला आणखीं विचारतेस ? निर्लज्ज ! तूं माधवाला पत्र लिहिलें नाहींस ? "

" होय लिहिलें. पण तें ह्यासंबंधांत नव्हतें. "

" मग कशाच्या संबंधांत होतें ? "

" कमलेच्या भावाच्या बाबतींत. "

" आणि तुला लिहिण्याचें कारण ? ",

" लक्ष्मी स्तब्ध राहिली. ह्या प्रश्नाचें तिनें उत्तर दिलें नाहीं. "

" पण हें तूं खरें सांगतेस का ? "

" बाबा ! मी कधीं तुमच्याजवळ खोटें बोललें आहे का ? कधीं तुमच्या सांगण्याबाहेर गेलें आहें का ? मर्यादेच्या पण छद्मी स्वरानें ती बोलली.

" मग हें असें कां व्हावें ! तूं आपल्याशीं लग्न लावावेंस असें माधवाच्या मनांत सारखें घोळत असतां तुझी संमति दिल्यानंतर त्यानें त्यापासून पराङ्मुख कां व्हावें ! ह्या त्याच्या वागणूकीचा अर्थ काय ध्यावयाचा ? त्याचें तुझ्यावर प्रेम होतें. त्या प्रेमाचा मोबदला तुझ्या कडून मिळण्याचा रंग दिसेना. तेव्हां त्यानें घर सोडलें. आणि आतां त्याला त्यानें दूर करावें हें आश्चर्य नव्हे का ! लक्ष्मी, तूं किती जरी सांगितलेंस तरी ह्याला कारण तूंच असली पाहिजेस असें मला अजूनहि वाटत आहे. माधवाचा स्वभाव तुला ठाऊक आहे. तो मनाचा थोर असल्यानें केवळ आपल्या थोरपणा साठीं, आपलें जीवन सर्वस्व असणारी आपली इच्छा तुझा प्रत्यक्ष नकार दिसला असल्यानेंच त्यानें दाबून ठेविली असेल परंतु त्याला अशा तऱ्हेनें त्रास देणें तुला शोभतें का ? आपल्या शिरावर असणाऱ्या त्यांच्या उपकार ऋणाचा कांहीं तरी विचार करावयास नको काय ? अशी कृतघ्न होऊं नकोस !

" बाबा ! पुरे करा. मी कृतघ्न होत नाहीं किंवा होऊंहि इच्छीत नाहीं. सांगा मी काय करूं तें ! "

" माधवाच्या मनांत तुझ्या विषयींची असलेली प्रेमाची ज्योत पुन्हां प्रज्वलीत होईल असें कर. "

"बाबा ! प्रत्यक्ष आपल्या लेकीलाच आपण हें सांगत आहां का ?"

"होय आणि तें तिच्या कल्याणासाठीं आणि तें तिच्या सुखा साठींच सांगत आहें ! "

"म्हांत माझें असें कोणतें कल्याण आणि सुख आपल्याला दिसत आहे?"

"म्हणजे ! माधवावर तुझें प्रेम नाहीं का ? त्याच्याशीं लग्न करण्यांत तुझें कल्याण नाहीं का ? त्यापासून तुला सुख मिळणारें नाहीं का ? "

हे प्रश्न ऐकून लक्ष्मीच्या डोक्यांत लख्खन प्रकाश पडला. ह्या प्रश्नाचें नकारार्थी उत्तर दिल्यानें आपल्या वडिलांचे पुढील प्रश्न तिच्या एकदम ध्यानांत आले. ते प्रश्न त्यांनीं विचारावेत अशी तिची इच्छा नव्हती.

"बाबा, माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नाहीं. बंधुभगिनीचें जुनें नातें माधवाशीं असावें असें मला अगोदर वाटत होतें. पण तुमच्या उपदेशानें माझें खरें हित मला कळून आलें व तुम्हीं म्हणतां त्याप्रमाणें वागावें असें मी ठरविलें. पण आपल्या—माझ्या किंवा तुमच्या-म्हणण्याप्रमाणें वागण्याची माधवरावांची इच्छा नसतां तसें घडवून आणण्यांत माझें कोणतें कल्याण किंवा सुख आपण बघतां, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ होता. यांत माधवरावांवर प्रेम नसण्याचा किंवा त्यांच्याशीं लग्न करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. माझ्याशीं लग्न करण्याचें माधवरावांनीं नाकारलें, या एकाच गोष्टीवरून माझ्याविषयीं त्यांच्या मनांत तुम्हीं म्हणतां तसें प्रेम वसत नाहीं ही गोष्ट उघड नाहीं का होत ? "

तिचें वरपंगी बोलणें गोविंदरावांनीं ओळखलें. पण त्यांनीं त्याची तिला ओळख दिली नाहीं. त्यांना तिच्या मनांतील गुपीत बाहेर काढावयाचें होतें.

"बरें तें असो म्हणा. पण विनायकाच्या बाबतींत तूं त्याला काय लिहिलें—होतेंस ? "

"कांहीं विशेष लिहिलें नव्हतें. कमलेच्या सांगण्यावरून ते तेथें आले किंवा नाहीं वगैरे विचारलें होतें. "

"मग तो तेथेंच गेला आहे ? "

"होय."

गोविंदरावांच्या डोक्यांत निराळाच विचार आला. कदाचित् आपल्या बहिणीसाठीं त्यानें माधवाचें मन वळविलें असेल असें त्यांना वाटूं लागलें, व ही गोष्ट शक्यहि होती; कारण चिंतामणरावांनीं कमलेसाठीं माधवाची मागणी त्यांच्याचजवळ घातली होती. लक्ष्मीला त्याबद्दल माहिती असावी असें वाटून ते ह्मणालेः—


" मला वाटतें, विनायकानें आपल्या बहिणीसाठीं माधवाचें मन वळविलें असेल, कारण माझें पत्र गेलें त्यावेळीं तो तेथें असल्यानें तें पत्र त्यानें पाहिलें असेल."

"मला नाहीं वाटत तसें झालें असेलसें. पण कदाचित् झालें असेल. कारण, आपल्या बहिणीचा विचार विऽऽनायकरावांस माहीत असावा."

"काय ? काय ह्मणालीस ?" बहिणीचा विचार विनायकरावांस माहीत असावा ! ह्मणजे ?"

"तिचें मन माधवावर बसलें आहे."

अनेच्छित व अनपेक्षित गोष्ट गोविंदरावांचे कानीं पडली. ते स्तंभीतच झाले !



प्रकरण २६ वें.

नानासाहेबांचें कपटजाल.



"माधवराव चलतांना मग गाण्याला. "

" नाहीं माझी कांहीं येण्याची इच्छा नाहीं. "

" कां ? गाण्याचा शोक नाहीं वाटतें तुम्हांला ? "

" गाणें मला आवडत नाहीं असें नाहीं. आवडतें. परंतु नायकिणीच्या गाण्याला जावें असें मला वाटत नाहीं. "

" गाणें जर तुम्हांला आवडतें, तर तें ऐकावयाला न जाणें याला काय म्हणावें ! म्हणे नायकिणीच्या गाण्याला जावेसें मला वाटत नाहीं. गाणें ऐकण्याच्याच नुसत्या हेतूनें जर तुम्ही तेथें जाणार तर त्यांत दोष कसला ? त्याबद्दल कांहीं कोणी तुम्हांला नावें ठेवणार नाहींत ! आणि कोणी ठेवलींच तर त्याला माझ्याकडे आणा म्हणजे मी त्याला उत्तर द्यावयाचें तें देईन. "

" तें कांहीं असलें तरी माझी गाण्याला येण्याची इच्छा नाहीं. "

" तुम्हीं येत नसाल तर आपलीहि जाण्याची इच्छा नाहीं. "

असें म्हणून नानासाहेबांनीं अंगावरील कपडे उतरतां उरतां ते माधवाला म्हणाले.

" तुम्हीं गाण्याला येत नाहीं व मीहि जात नाहीं. परंतु गाण्याला न येण्याचा तुमचा उद्देश काय तो तर सांगा. "

" उद्देश कसला आला आहे त्यांत ! नायकिणींच्या गाण्याला जाऊं नये असें आपलें मला वाटतें. "

आपल्यामुळें नानासाहेबांचा हिरमोड होत आहे याबद्दल माधवरावाला वाईट वाटूं लागलें होतें.

" नायकिणींच्या गाण्याला जाऊं नये असें वाटतें तें तरी कां ? सर्व नाय-

किंणी म्हणजे येथून तेथून अनीतीच्या पुतळ्या असें आपण समजतां का? आणि कदाचित् त्या तशा असें जरी आपण धरून चाललों तरी आपल्या स्वतःवर आपलाच ताबा असतोना ! त्या तुह्मांला पुष्कळ बिघडवूं पहातील, परंतु तुमचें मन जर खंबीर आहे तर त्या काय करूं शकतील? आह्मी नुसतें गाण्यासाठीं तेथें जाणार ! मला स्वतःला गाण्याचा नाद अतिशय आहे: कोठेंहि चांगलें गाणें असलें कीं मी आपला तेथें जावयाचाच. पण मी अद्याप कोठें बिघडलों नाहीं? मग त्यांत तुम्हालांच एवढी घास्ती ती कसली वाटावी? यावरून तुमच्यावर तुमच्या, मनावर....."

"तुह्मीं समजतां तसा माझ्या म्हण याचा अर्थ नाहीं. लोकनिंदेस्तव मी गाण्याला येऊं इच्छीत नाहीं एवढाच त्याचा मतितार्थ."

"यांत कसली लोकनिंदा ! गाणें ऐकणें म्हणजे कांहीं अनीति नव्हे ! आणि येवढ्यासाठींच तुम्हीं येत नसाल तर आपण तुम्हांला आज नेणार ! अशा तऱ्हेनें लोकांना भिऊन जर तुम्हीं वागूं लागलां तर तुमचें कसें चालेल ! तें कांहीं नाहीं. तुम्हांला गाण्याला आलेंच पाहिजे. चला, उठा. कपडे करा."

तरी माधव जागचा हालला नाहीं.

"शिवाय आजचें गाणें कांहीं नायकिणीच्या घरीं नाहीं. थिएटरमध्यें आहे. चांगले मोठमोठे संभावित लोक गाण्यासाठीं येणार आहेत. चला, नाहीं तर उशीर होईल."

नानासाहेबांनीं इतकें सांगितलें तरी देखील त्याचा जाण्याचा विचार दिसेना.

"माधवराव तुमच्या स्वभावाची कमाल आहे ह्मणावयाची. हें पहा आजच्या गाण्याचें हँडबिल. उत्तर हिंदुस्थानांतील एका प्रख्यात गाणारीचें आज गाणें आहे आणि ह्या गाण्याची सर्व व्यवस्था एका कोटांतील कंपनीनें आपल्याकडे घेतलेली आहे. व येथील बहुतेक मोठमोठे सर्व लोक तिच्या गाण्यासाठीं येणार आहेत. गाण्याचीं तिकीटें सुद्धां मिळणें दुरापास्त झालेलें होतें. आणि ह्मणीं तर तीं मिळतहि नसतील. मी आठ दिवसांपूर्वीच तिकीटें काढून ठेविलेलीं आहेत."

माधवानें मी येतों असें सांगितलें व थोडक्यांच बेळांत ते भुवनांतून बाहेर पडले. माधव खजील झाला असल्यानें तो मुकाच होता. परंतु नानासाहे-

बांस त्यानें तसें असावें हें बरोबर वाटत नव्हतें. व्हिक्टोरीयांत बसल्यानंतर त्यांनीं बोलण्यास सुरवात केली. ते ह्मणाले:-

" माधवराव. अशा तऱ्हेनें वागून तुमचें जगांत कसें चालेल ? लोक अमूक ह्मणतील. लोक तमूक ह्मणतील. ह्मणून स्वतःच्या इच्छा दाबून ठेवण्यापासून तुम्हांला काय फायदा होणार आहे ? अशा तऱ्हेनें मनाला मारून तुमची आनंदीवृत्ति तरी टिकेल काय ! तुम्हांला आनंद नसला ह्मणजे तुह्मीं नेहमीं उदासीन रहाणार आणि उदासिन राहिलांत ह्मणजे तुह्मीं सुखाला पारखे झालांत ! सुख मिळत असून सुख जर ध्यावयाचें नाहीं तर जगांत राहून तरी काय फायदा ! तुमच्या एवढ्या संपत्तीचा, ह्या तारुण्याचा, ह्या विद्वतेचा तुह्मांला काय उपयोग ! जनतेला आपल्या वागणुकीचे परीक्षक नेमण्यापेक्षां आपण स्वतः सर्से करणें फार चांगलें. स्वतःची सदसद विवेक बुद्धि नेहेमीं जागृत ठेऊन आपल्या आचरणावर तिचें वर्चस्व असलें ह्मणजे झालें. स्वतःचें मन जर शुद्ध असल तर लोकनिंदेची पर्वा करणें मला तर योग्य दिसत नाहीं. निदान माझ्या बाबतींत तरी मी असा वागतों. "

नानासाहेबांचें बोलणें संपतें न संपतें तोंच व्हिक्टोरिया थिएटर जवळ येऊन उभी राहिली, व दोघेहि, उतरून थिएटरामध्यें शिरले.

त्या दिवसाचें गाणें खरोखरीच अप्रतिम झालें. माधवाला त्यापासून फार आनंद झाला. त्याची उदासीनता व खजिलवृत्ति पार मावळली; गाणें संपल्यानंतर दोघेहि परत येण्यास निघाले. वाटेंत गाण्याची माधवानें फारच प्रशंसा केली, व आपल्याला गाण्याला आणल्याबद्दल त्यानें नानासाहेबांचे आभार मानले. त्याच्यावर आपली व्यवहारज्ञतेची छाप बसविण्याचा हा प्रसंग नानासाहेबांनीं वायां जाऊं दिला नाहीं.

" आणि तुमच्या इच्छाप्रमाणें तुह्मीं आलां नसतां तर आतां झालेला आनंद तुह्मांला झाला असता का ? खोट्या लोकानिंदेला भिऊन घरींच स्वस्थ पडलां असतां तर असें बहारीचें गायन तुह्मांला ऐकावयाला मिळालें असतें का ? माधवराव तुह्मीं अतांशीं जगामध्यें वावरावयाला निघालां अहांत ! यावेळीं बालपणीं मनावर ठसलेल्या चांगण्या वाईटाचा परिणाम तुमच्या मनावर असणें योग्यच आहे ! परंतु व्यवहारांत हा परिणाम उपयोगी पडत

नसतो हें नीट लक्षांत ठेवा ! पुस्तकांत सांगितलेली नीतीअनीतिची व्याख्या जर तुम्हीं पुस्तकांतच राहूं द्याल, तर ह्या जगांतील खरी मजा तुम्हांला कळेल. तुमच्या वयांत व तुमच्यासारख्या मनुष्यानें वागतांना खालील खूण जर लक्षांत ठेवली व त्याप्रमाणें जर आपलें आचरण ठेविलें, तरच तुम्हांला जगांतील खरें सुख चाखावयास मिळेल. आणि ती खूण कोणती म्हणाल तर ही. " पाणी तेरा रंग कैसा ? जिसमें मिलाया वैसा ! " वाटेल त्या रंगाचा जसा पाण्यांत समावेश होतो, तसें वाटेल त्या समाजांत तुम्हांला वावरतां आलें पाहिजे. आणि त्यांतून तुम्ही तर देशकार्याची मंडळी ! तुम्हांला अमक्याच तऱ्हेनें वागूं म्हणून चालावयाचें नाहीं. सर्व ठिकाणीं तुमचा प्रवेश असला पाहिजे, त्याशिवाय तुमच्याकार्याची महती वाढावयाची नाहीं कीं तें फलद्रूपहि व्हावयाचें नाहीं.

लौकरच दोघेजण भुवनांत येऊन पोहाचले, व निद्रा देवीची आराधना करूं लागले.

माधवाच्या भोंवतीं या तऱ्हेनें नानासाहेबांनीं आपलें जाळें विणण्यास सुरुवात केली. त्याच्या पूर्वेतिहासाची त्यांस म्हणण्यासारखी माहिती नव्हती व ती असती तर आज तो गाण्याला येण्यास बाचकत कां होता हें त्यांस समजलें असतें व त्यांनीं त्याभोंवतीं आपलें जाळें कसें टाकावें हेंहि लवकर ठरविलें असतें. परंतु त्याची पूर्वस्थिति जरी त्यांस तितक्या बारीक प्रमाणानें माहीत नव्हती तरी त्याला आपल्या फांसांत कसें अडकवावें, हें त्यांस त्याच्या आजच्या वर्तनावरून समजलें होतें. त्याचा स्वभाव चैनी आहे हें त्यांनीं पुरतें ओळखलें होतें. त्याच्या ह्या स्वभावावर विनायकासारख्या मित्राच्या सदुपदेशाचें पांघरूण पडलें असावें, हें त्या दोघांच्या एकांतांतील भाषणावरून त्यांनीं ताडलें होतें. हें पांघरूण काढून टाकणें त्यांच्यासारख्यास कांहीं अवघड नव्हतें.

प्रकरण २७ वें.

भालचंद्राचा निश्चय.

इंग्लंडांत राहण्याचें भालचंद्राचें कार्य जवळजवळ संपलें होतें. हिंदुस्थानच्या व त्याचप्रमाणें इतर जुन्या राष्ट्रांच्या इतिहासाचा त्यानें चांगला अभ्यास केला होता. ह्या राष्ट्रांतील लोकांचे निरनिराळ्या वेळीं विचार कसे बदलत गेले व त्यामुळें त्यांची उन्नति अगर अवनती कशी होत गेली ह्याचें त्यानें बारकाईनें निरीक्षण केलें होतें. प्राचीनकाळीं हिंदुस्थानची जी भौतिक भरभराट होती ती कशामुळें झाली व सध्यांची भौतिक अवनती कां झाली याच्या कारणांचा त्यानें चांगला विचार केला होता. पुरातन काळचें हिंदुस्थान व्यापारांत पुढें होतें. येथील माल नेण्यासाठीं परकी व्यापारी येथें येऊन रहात असत. नौकानयनाची त्यावेळीं चांगलीच वाढ झालेली होती. व्यापारासाठीं हिंदी लोक त्याचा उपयोग करीत होते असें नव्हतें, तर परमुलखांत धर्मप्रसार व वसाहती करण्यासाठीं त्याचा उपयोग होत असे. जुन्या हिंदुलोकांनीं जाव्हा, सुमात्रा, लंका वगैरे ठिकाणीं वसाहती स्थापल्या व राज्येंहि केलीं. हिंदुस्थानांत जन्मास आलेल्या बौद्ध धर्माच्या पताका, समुद्र व हिमालयासारखा प्रचंड गिरिराज ओलांडून ब्रह्मदेश, मलाया, चीन, जपानसारख्या दूर दूरच्या प्रदेशांत फडकूं लागल्या. असें असतां त्याच हिंदुस्थानची एवढी अवनती कां व्हावी ? ह्या प्रश्नाचाच अहोरात्र त्यानें विचार केला होता.

हिंदुस्थानास रसातळास नेणाऱ्या अनेक कारणांचा उगम, त्याला एकांगी शिक्षण व बहुजनसमाजाचा अक्षरशत्रुत्व यांत दिसूं लागला. बहुंगी शिक्षणानें होणारी प्रगति हिंदुस्थानास पारखी झाली व त्याच्या अवनतीस प्रारंभ झाला, हें तो जसजसा जास्ती विचार करीत असे तसतसें त्याला पटूं लागलें. आणि आतां हिंदुस्थानास जर त्याची पहिली स्थिति लाभून याव-

याची असेल तर जनसमाज सुशिक्षित करण्याशिवायचा दुसरा मार्ग .ला दिसेनासा झाला.

जनसमाज सुशिक्षित करण्याशिवाय साक्षरतेचा प्रसार करून आपल्या-बद्दल विचार करण्याची शक्ति जनतेंत आणल्याशिवाय, उपदेशादि मार्गांनीं हिंदुस्थानची उन्नति करतां येईल का ? हा विचार देखील त्याच्या मनांत वरचेवर येत असे. परंतु हे मार्ग फलद्रूप होतील असें त्यास वाटत नसे. कारण सध्यां हिंदुस्थानला जरूर असणाऱ्या भौतिक उन्नतीचें बीज मानवी आकांक्षेंत असल्यानें ती मानवी आकांक्षा शिक्षणाच्या सुसंस्कृतीशिवाय प्रज्वलीत होणारी नाहीं हें त्यांस पक्कें समजलेलें होतें. हें तत्व त्याच्या मनावर पुरें बिंबलें होतें. हिंदुस्थानच्या उन्नतीसाठीं त्याला शिक्षणानें सुसंस्कृतच केला पाहिजे, असें त्यानें ठाम ठरविलें असून त्या कार्यास लागण्याचाहि त्यानें संकल्प केला होता. एके दिवशीं हा आपला बेत त्यानें डॉक्टरांस बोलून दाखविला.

"भालचंद्रराव तुम्हीं म्हणतां तें खरें. पण जनतेस शिक्षण देणें शक्य आहे काय! ह्याचा तुम्हीं विचार केला आहे काय ? हिंदुस्थान लहान देश नाहीं. त्यांतून तेथें सतरा भाषा व अठरा लिप्या ! लोक अडाणी ! शिवाय ह्या अवाढव्य कार्यास पैशाचें व माणसाचें पाठबळ किती मोठें लागेल याची तुम्हांला कल्पना आहे काय ! "

" डाक्टर, या सर्व पुढच्या गोष्टी. अहो सतरा भाषा आणि अठरा लिप्या जरी असल्या, तरी त्यांतून आपल्याला मार्ग काढला पाहिजेना ! "

" यावेळीं विमलाबाई येथें आल्या तर....."

याप्रमाणें डॉक्टर बोलत आहेत इतक्यांत तिच्याच नांवाचें कार्ड घेऊन डाक्टरांचा मनुष्य तेथें आला.

" ह्या पहा विमलाबाईच आल्या. जा. त्यांना आंत घेऊन ये." नोकराकडे वळून त्यांनीं सांगितलें. विमलादेवीचें योग्य प्रकारें स्वागत केल्यानंतर डॉक्टर तिच्याकडे वळून म्हणाले.

" विमलाबाई, हिंदी स्त्रीसमाजांत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून तुम्ही खटपट करीत आहां. या बाबतींत तुमचा अनुभव काय आहे तो आमच्या भालचंद्ररावांना सांगा. "

" कां ! त्या विषयावर तुमचा वादविवाद चालला आहे वाटतें. " विमलादेवी म्हणाली.

" असेंच कांहीं म्हणतां यावयाचें नाहीं. हिंदुस्थानची उन्नति शिक्षणाच्या संस्कृतीशिवाय व्हावयाची नाहीं, असें माझें मत असून तें डाक्टरांसहि कबूल आहे. परंतु सर्व हिंदुस्थान सुशिक्षित करण्याचें काम सध्यांच्या स्थितींत अशक्य आहे असें डाक्टरांचें मत आहे, व म्हणून ते तुम्हांला आपला अनुभव सांगावयास सांगताहेत. "

" या बाबतींतला माझा अनुभव फार चमत्कारिक असून तो विशेष आशाजनक आहे असें नाहीं. निरानिराळे आचार विचार, निरनिराळ्या रहाण्या व निरनिराळ्या भाषा यांनीं मला माझ्या कार्यांत चांगलेच अडथळे केले आहेत व करीतहि आहेत. स्पर्शास्पर्शाची भावना समाजांत चांगली दृढमूल झालेली आहे, व या भावनेमुळें एकाच देशाच्या फारतर काय पण एकाच खेड्याच्या लोकांत शिक्षणासारखे पवित्र व्यवहार एके ठिकाणीं होऊं शकत नाहींत. यामुळें प्रत्येक स्पर्शास्पर्श जातीच्या स्त्रियांसाठीं निरानिराळी व्यवस्था करणें मला कांहीं ठिकाणीं जरूर झालें आहे. यानंतर लोकांतील शिक्षणासंबंधाची अनास्था. त्यांच्या दाराशीं जाऊन आम्हीं त्यांस मोफत शिकविण्यास तयार असतां शिक्षणासाठीं स्त्रिया व मुली पुढें येत नाहींत. आपल्या देशाची लोकसंख्या इकडल्याप्रमाणें मोठमोठ्या शहरांतून वांटली गेलेली नाहीं. तीस कोटी प्रजेच्या देशांत लाखाच्यावर लोकसंख्या असलेलीं शहरें तीसापेक्षां अधिक नाहींत. साधारणपणें एकंदर लोकसंख्येपैकीं $\frac{1}{6}$ शहरांत, $\frac{5}{6}$ शहरेतर भागांत, म्हणजे खेड्यापाड्यांत व लहान मोठ्या गांवांत अशी वांटलेली आहे. शिक्षण देण्यास वस्ति एका ठिकाणीं असली, म्हणजे तितका त्रास पडत नाहीं व खर्चहि येत नाहीं. लोकांकडून—सुशिक्षित व संपन्न जनतेकडून अशा कृत्यास मिळावें तितकें पाठबळ मिळत नाहीं. अशा मंडळीची नुसती शाब्दिक सहानुभूति मिळून कार्यभाग होत नाहीं. अशा एक ना अनेक अडचणी असल्यानें खासगी प्रयत्नांनीं हें कार्य कष्टसाध्यहि होईलसें मला वाटत नाहीं. "

" विमलाबाई, मी देखील त्यांना तेंच सांगत होतों, परंतु तें कांहीं त्यांच्या मनांत भरेना. "

" जगांतील कोणतीच गोष्ट कष्टसाध्य नाहीं असें मला वाटत नाहीं. हें मी कबूल करणार नाहीं. युक्ति, शक्ति व हिंमत असल्यावर सर्व कांहीं साधतें.

भगीरथानें भागीरथी मृत्युलोकावर आणून अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली आहे. तिला येथें आणण्यासाठीं एकट्या भगीरथानेंच प्रयत्न केला, त्याला कोणी साहाय्यकर्ता नव्हता. तशी आज आपली स्थिति नाहीं. हिंदुस्थानासाठीं खटपट करणारे आज पुष्कळ लोक आहेत. ह्या लोकांच्या मदतीनें हें कार्य तडीस नेण्याची आपण खटपट करूं. विमलाबाई, परिस्थिति घडविण्यांतच पुरुषार्थ असतो; तिचें दास्यत्व पत्करण्यांत तो नसतो ! "

" कोणच्या बाजूंनीं प्रयत्न केला असतां हें साधेलसें तुह्मांला वाटतें ! "

" अमक्याच बाजूंनीं प्रयत्न केला असतां हें काम साधेल असें आजच मला निश्चयात्मक सांगतां यावयाचें नाहीं. कारण हिंदुस्थानांत एक अशी परिस्थिति नाहीं. तरीपण अशीं कार्यें मन लावून करण्यास योग्य अशी शांतता हल्लीं सर्वत्र नांदत आहे. देशांतील थोड्याच लोकांत का होईना पण हल्लीं देशोन्नतीचें वारें खेळत आहे, व त्याची कमान चढती आहे. देश अगदींच कंगाल बनलेला नाहीं. अजून थोडीबहुत तरी श्रीमंती तेथें आहे. या सर्व गोष्टींची सांगड घालून हें कार्य करावें असें मला वाटत आहे. प्रत्यक्ष परिस्थिति पाहिल्यानंतर जेथें जो मार्ग फायदेशीर होईल, तेथें त्याप्रमाणें चालावें असें सध्यां मी ठरविलें आहे. व यासाठीं लौकरच येथून निघण्याचा माझा विचार आहे. "

" भालचंद्रराव, तरमग माझ्याच संस्थेला येऊन मिळाना ! आपण दोघेंहि मोठ्या हिमतीनें एकमेकांच्या विचारानें काम करूं. " विमलादेवी ह्मणाली.

" विमलादेवी, तुमच्या ह्मणण्याप्रमाणें मी येऊन मिळेन, पण तो सध्यां मात्र नाहीं. या तऱ्हेच्या इकडील शिक्षणवियषक संस्था पाहून नंतर मी हिंदुस्थानांत येणार आहें. तेथें देशांतील परिस्थिति प्रत्यक्ष पाहण्यांत माझा बराच काल जाईल, व नंतर मी तुमच्या संस्थेला येऊन मिळेन. व तेथें काम करून स्वप्नवत् भासणारी गोष्ट तुह्मांला शक्य करून दाखवीन. "

" मला देखील तुह्मी ह्मणतां त्याच दृष्टीनें इकडील शिक्षणविषयक संस्था पहावयाच्या आहेत, तेव्हां आपण दोघेंहि बरोबरच निघूं ह्मणजे झालें. "

आजचा मेलडे होता. आजच्या बोटीनें प्रभाकररावांचें पत्र यावयाचें होतें, व त्याप्रमाणें ही मंडळी बोलत बसली असतां तें आलेंहि.

प्रकरण २८ वें.

गोविंद रावांचें वजन.

माधवाचा व कमलेचा विवाह जमून यावा ह्या सद्धेतूनेंच कमलेचें मन माधवावर बसलेलें आहे हें लक्ष्मीनें गोविंदरावास सांगितलें होतें. परंतु तसा योग जमून यावा अशी गोविंदरावांची इच्छा नव्हती.

माधवानें आपल्या पत्रांत यवतमाळ येथें तो लवकरच येणार असल्याचें कळविलें होतें. त्याच्याशीं झालेल्या लक्ष्मीच्या भाषणांत कदाचित् विनायकानें माधवाचें लग्नाचे बाबतींत मन वळविलें असेल असें तिनें ध्वनित केलें होतें, व त्यावरून माधवाचा यवतमाळला येण्यांत काय हेतु असावा याचा त्यांनीं तर्क बांधला होता. माधव यवतमाळास आला व लग्नाची त्यानें गोष्ट काढली तर तें जुळून येण्यासारखींच परिस्थिति होती. चिंतामणरावांच्या मनांतून माधवाला आपला जांवई करावयाचें होतें. कमलेचें मन त्याच्यावर बसलेलें होतें व विनायकाच्या सांगण्यावरून तोहि कमलेशीं लग्न करावयास तयार झालेला ! अशा स्थितींत तो यवतमाळास आला तर आपले हेतू विफल होणार व कमला दुसऱ्याची पत्नि होणार हा परिणाम त्यांना स्पष्ट दिसूं लागला, व ह्मणून त्यानें यवतमाळला येऊं नये ह्मणून खालील प्रमाणें त्यांनीं त्याला पत्र लिहिलें.

" अनेक आशीर्वाद उपरी आपलें पत्र पावलें. आपलें असें पत्र येईल अशी कल्पना नव्हती. माझा समज चुकीचा झाला असल्यानें हा सर्व प्रकार घडला, त्याबद्दल फार वाईट वाटत आहे. मला वाईट वाटतें त्याचें मला विशेष वाटत नाहीं. परंतु चिं. लक्ष्मीचें दुःख पाहून माझ्या चुकीचें मिळालेलें प्रायश्चित्त पाहून मनाला फार त्रास होतो. आपली जुनी चालरीत सोडून कुमारिकेला अयोग्य असें आपण वागलों असें वाटून चि. लक्ष्मी नेहमीं काळजींत चूर असते. असो; झाल्या गोष्टीस इलाज नाहीं.

"आपण इकडे येणार ह्मणून लिहिलेंत तरी त्रावेळेस येण्याचें न झाल्यास चांगलें. कारण त्यापासून आपणांस, मला व सौ. लक्ष्मीला मानसिक स्थतेचा त्रास होणारा आहे. कांहीं कालानें झालेला प्रकार आपोआप होईल व त्यापासून त्रासहि होणार नाहीं. अधिक काय लिहूं. कळावें हे आशिर्वाद. आपला—गोविंदराव."

पत्र त्यांनीं मोठ्या धोरणानें लिहिलें होतें. माधवाचा स्वभाव ते चांगला जाणत होते. विनायकाच्या सांगण्यानें तात्पुरतें बजावलेलें माधवाचें लक्ष्मीवरील प्रेम पुन्हां वाढावें, त्याच्या मनांतील तिच्यावरील प्रेमानें दुप्पट जोरानें उसळी मारावी, आपल्या लिहिण्याचा त्याला पश्चात्ताप व्हावा, ह्याहि हेतूनें त्यांनीं वरील पत्र लिहिलें होतें. त्यांच्या पत्राप्रमाणें माधव यवतमाळास आला नाहीं. असो.

ह्याप्रमाणें माधवाचें येणें लांबणीवर ढकलल्यावर ते दुसऱ्या खटपटीला लागले. माधवाबद्दल चिंतामणरावांचा असलेला इष्ट ग्रह त्यांना अनिष्ट करावयाचा होता; तो तसा करण्याची त्यांना संधीहि चांगली आली होती, व ती त्यांनीं वायां जाऊं दिली नाहीं.

"विनायकाची बातमी आपल्याला कळली असेलच." चिंतामणराव खुषींत आहेत असें पाहून ते ह्मणाले.

"त्याची बातमी कळून मला काय करावयाचें आहे? माझा त्याचा कांहीं संबंध नाहीं!" तिरसट स्वरानें ते ह्मणाले.

"असें कसें ह्मणतां रावसाहेब! कितीझालें तरी तो आपला मुलगाना? आपल्या मताप्रमाणें तो वागला नाही, ह्मणून आपणांस त्याचा संबंध तोडणें योग्य आहेका?"

"हो. योग्य नसावयास काय झालें?"

"तो येथून मुंबईस माधवाकडे गेला व माधवानें त्याला पैशाची मदत केली आहे."

"कोणी माधवानें? त्याला पैसे दिले आणि ते कोणाच्या सांगण्यावरून?"

"तो करतो तें बरें असें त्याला वाटलें, ह्मणून त्यानें त्याला पैसे दिले. यांत त्याला कांहीं कोणी सांगितलें नाहीं. मलादेखील त्याचें पत्र येईपर्यंत

या गोष्टीची बातमी नव्हती. झटलें तुह्मांला माहित नसेल तर सांगावें, झणजे तुमचा जीव तेवढा खालीं पडेल. ”

“ जेथें नात्याचाच संबंध तुटला तेथें मला काय वाटावयाचें ? पण माधवानें त्या कार्य्याला मदत करावी हें कांहीं चांगलें नव्हे. ”

“ कां बरें ? कदाचित् भावी नात्याचा संबंध लक्षांत घेऊन त्यानें त्याला मदत केली असेल. ”

“ असें असेल तर माझी मुलगी मी त्याला कधींहि देणार नाहीं. ज्या गाढवानें माझ्या अब्रूला धक्का बसविला; ज्याच्यामुळें मला चार मंडळींत मान खालीं घालावयास लागते; त्याला ताळ्यावर आणण्याऐवजीं ज्यानें उलटी मदत केली त्याला मी आपली मुलगी देईन असें तुह्मांला वाटतें काय ? आणि ह्या उद्देशानेंच जर माधवानें त्या कार्य्याला मदत केली असेल तर त्याची इच्छा पूर्ण व्हावयाची नाहीं असें तुह्मीं त्याला कळवा, व याउप्पर त्याचेकडून मदत होणार नाहीं याची काळजी घ्या. ”

गोविंदरावांची युक्ति बरोबर साधली. दिवसेंदिवस ते या बाबतींत चिंतामणरावांच्या कानावर नव्या नव्याच बातम्या घालूं लागले, व याचा त्यांना पाहिजे होता तसा इष्ट परिणामहि घडूं लागला.

लोकांनीं आपल्याला चांगलें ह्मणावें, जगांत आपली मानमान्यता असावी याची आवड गोविंदरावांना पूर्वीपासून होतीच. परंतु आतां ती जास्ती वाढली, याचें कारण कमलेचें व चिंतामणरावांचें मन आपल्याकडे वेधावें हें होतें.

नवीन सुशिक्षित कुमारिकांचें प्रेम कशांत असतें, त्या प्रेमाचा उगम कशापासून होतो व कोणत्या कारणांनीं तें प्रेम वाढत जास्त असतें याचा जगांतील नेहेमीं दिसणाऱ्या प्रकारावरून त्यांनीं आपल्या मनाशीं ठोकताळा बांधला होता व त्याच्या अनुरोधानें चालून कमलेच्या प्रेमाचा ओघ त्यांनीं आपल्याकडे वळविण्याचा बेत ठरविला होता. ह्या हेतूला धरूनच जगांतील आपली मानमान्यता वाढविण्याच्या मार्गाला ते लागले.

यवतमाळसारख्या लहानशा गांवांत पैसा व इच्छा असल्यावर लोकांत पुढें येणें फारसें कठीण होतें असें नाहीं, त्यांतून गोविंदरावासारख्या धूर्त मनु-

व्यास तर तें अगदींच सोपें होतें. गांवांतील शिष्ट व व्यापारी मंडळींत 'माधव श्रीनिवासराव' ह्या दुकानचे कुलमुखत्यार ह्मणून त्यांचें वजन चांगलें होतें. पण हें वजन एकांगी होतें. कमलेसारख्या कुमारिकांच्या अंतःकरणांत त्यांनें प्रेमोद्भव होणारा नव्हता. ह्या वजनाला मानमान्यतेचें किंवा चांगुलपणाचें शेंपुट लागलेलें नव्हतें. तें लावण्यासाठीं जनतेच्या हालचालींत पडणें त्यांना जरूर होतें. व त्याप्रमाणें पडण्याची त्यांना लवकर संधि आलीहि.

तेथील म्युनिसिपालीटीचे एक लोकनियुक्त सभासद नुकेच वारले अस-ल्यानें त्याजागीं उमेदवार ह्मणून गोविंदराव पुढें आले. या जागेसाठीं त्यांना एक प्रतिस्वर्धी होता, व तो तेथील एक वकील होता. ह्या गृहस्थाचें गांवांत चरेंच वजन होतें व त्याच्या कर्तृत्वाविषयीं तेथील लोकांची खात्री होती. गोविंदराव उभे राहिले नसते तर हा गृहस्थ निवडून आला असता. परंतु गोविंदरावांच्या स्थितीमुळें ह्या चांगल्या मनुष्यास मागें रहावयास लागून ते बहुमतानें निवडून आले व म्युनसिपालीटीचे सभासद बनले.

यानंतर येथील व्यापारी मंडळीस हातीं धरून धार्मिक स्वरूपाचा गुरांसाठीं पांजरपोळ त्यांनीं तेथें स्थापन केला. ह्यासंस्थेसाठीं वर्गणी - जमवितांना परभारें माधवाच्या नांवावर त्यांनीं चांगलीच रक्कम घालून नंतर गांवांत वर्गणी जमविण्यास सुरवात केली. त्यांच्या वजनामुळें त्यांना वर्गणी जमविणें फार जड गेलें नाहीं. पैशाची सुस्थिती असल्यानें ही पांजरपोळाची संस्था चांगल्यापैकीं जमली, व गोविंदरावांच्या लौकिकांत त्यामुळें हळू हळू भर पडूं लागली.

यावेळीं सुधारलेलें ह्मणून यवतमाळच्या गांवाचा बराच डंका झालेला होता. तसेंच नाटक मंडळीच्या मुक्कामावरून हें गांव चांगलेंच श्रीमंत असावें असें बाहेरगांवच्या लोकांस वाटत असे. ह्मणून लोकांच्या मदतीवर चालणारी कोणतीहि नवीन संस्था निघाली कीं त्या संस्थेचे हितचिंतक द्रव्याच्या मदतीसाठीं तेथें येत असत, व यवतमाळकरांकडून त्यास थोडीबहुत मदतहि मिळत असे. अगदीं हात हालवीत असें कोणालाहि परत जावें लागत नसे. यावेळीं मुंबईस एक नवीन शिक्षणविषयक संस्था स्थापन झाली होती. ह्या संस्थेचा उद्देश आपल्या देशांतील उद्योग व व्यापार यांस ऊर्जिता-

वस्था आणण्यासाठीं परदेशांत धंदेशिक्षण घेण्यास विद्यार्थी पाठविण्याचा होता. या संस्थेचें प्रवर्तक व कार्यकारी मंडळ फार उत्साही व कार्यतत्पर असल्यानें पैशाच्या मदतीसाठीं जेव्हां ह्या मंडळीनें आपला मोर्चा वऱ्हाडकडे वळविला तेव्हां ह्या मंडळाचीं एक दोन माणसें यवतमाळास आलीं. आपलें नांव वाढविण्याची ही संधी गोविंदरावांनानीं फुकट जाऊं दिली नाहीं. पहिल्यांदा माधवाच्या नांवानें पांचहज़ार व आपल्या नांवानें पांचशेंचा आंकडा घालून नंतर त्या मनुष्यांना इतर मंडळीकडे फिरवून मंडळाला चांगली वीस पंचवीस हजारांची मिळकत करून दिली. सबंध वऱ्हाडांत एका ठिकाणीं अशी एवढी मदत या मंडळांला कोठेंही झाली नव्हती. अर्थात् याबद्दलचे गोविंदरावांचे गुणवाद मंडळानें वर्तमानपत्रांतून गाइले व त्याचा परिणाम गोविंदरावांस इष्ट असाच झाला. बाहेरगांवीं गोविंदरावांची कीर्ति तर गेलीच, पण त्याशिवाय खुद्द यवतमाळांत गोविंदरावांची योग्यता जास्त वाढली. यापुढें सभा किंवा कांहीं होवो, त्यांत गोविंदराव हे असावयाचे व त्यांच्याच मतास अगर इच्छेस प्राधान्य हें मिळावयाचेंच.

येवढ्यावरच गोविंदरावाच्या वाढत्या लौकिकाची गति थांबली नाहीं. त्यांच्या नशींबानें गांवांतील गरीब लोकांच्या वस्तींत आग लागून पन्नास पाऊणशें झोंपड्या जळाल्या व जवळजवळ शेंदीडशें लोक अगदीं उघडे पडले! ह्यावेळींहि पुढाकार घेऊन गोविंदरावांनीं स्थानिक फंड उभारला व ह्या गरीब लोकांस मदत केली.

ह्याप्रमाणें श्रीमंत व गरीब, सुशिक्षित व अशिक्षित ह्या दोन्हीं समाजांत गोविंदराव आपली बोलबाला करून घेत होते. ही करून घेण्यांत त्यांचा हेतु जरी निन्द्य होता तरी त्यापासून जनतेचा फायदाच झाला.

प्रकरण २९ वें.

विनायकाची कामगिरी.

विनायक हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून फिरत होता त्याला औद्योगिक समाजाची एकंदर स्थिति कशी आहे हें पहावयाचें होतें.

हिंदुस्थानची औद्योगिक उन्नति कां होऊं नये? हा प्रश्न त्याला सोडवावयाचा होता. भौतिक जगांत संपत्ति हेंच ध्येय! हाच देव! भौतिक संपत्ति वाढविण्यास लागणारीं सर्व नैसर्गिक साधनें जवळ असतां हिंदुस्थानच्या औद्योगिक संपन्नतेस दिवसें दिवस उतरती कळा कां लागत असावी, याचा त्याला बारकाईनें शोध करावयाचा होता. अखिल जगांत इंग्लड हेंच राष्ट्र अप्रतिबंधक व्यापारपद्धतीस कवटाळणारें असून त्याबरोबर हिंदुस्थानालाहि तीच पद्धति अंगीकारावी लागत असल्यानें राजसत्तेच्या मदतीच्या संरक्षण पद्धतीनें हिंदुस्थानचे उद्योगधंदे मांवरूं शकत नाहींत हा मुद्दा जरि विशेष महत्वाचा असला, ह्याच संरक्षक पद्धतीला कवटाळून पुष्कळ राष्ट्रांनीं आपल्या देशांतील उद्योग धंद्यास कृत्रिम सजीवता आणलेली असली, तरी ह्या राष्ट्राप्रमाणें हिंदुस्थानची स्थिति नसल्यानें येथें कच्चें द्रव्य व मनुष्यबळ मुबलक असल्यानें, हिंदुस्थानच्या ह्या औद्योगिक ऱ्हासास दुसरींहि अनेक कारणें कारणीभूत असलीं पाहिजेत असें त्यांस वाटत असे, व साधारणतः हीं कारणें कोणतीं यांचा निर्णय करणें हाच त्याच्या ह्या प्रवासाचा प्रधान हेतु होता.

कॉलेजमध्यें असतांना ह्या व्यापारविषयक तत्वांचा त्यानें बराच अभ्यास केला होता. आपल्या प्राचीन व्यापारी सुस्थितीचीं कारणें त्यानें काढलीं होतीं त्याच प्रमाणें वाचनानें मिळणाऱ्या ज्ञानानें सध्याच्या अवनतीचाहि त्यानें थोडाबहुत अंदाज बांधलेला होता. जोंपर्यंत मनुष्य शक्तीनें व्यापारा मा-

लाची उपज होत होती. तोंपर्यंत आपल्या देशांत पिकणाऱ्या कच्या द्रव्यांपासून तयार होणाऱ्या पक्क्या मालाच्या निपजेंत हिंदुस्थानचा हात धरणारें कोणी नव्हतें कीं त्याच्या मालाच्या सामान्यासहि व्यापारी पेठांत कोणी टिकूं शकत नव्हतें. परंतु उत्पादक शक्तींची जेव्हां घडामोड झाली, मानवी शक्तीच्या सामन्याला यांत्रिक शक्ति जेव्हां येऊन बसली, व्यापार हें राजनीतीचें एक अंग अशी समजूत जेव्हां प्रचारांत येऊं लागली, तेव्हां अगोदरच्याच आपसांतील राजकीय घडामोडीनें निसत्व झालेलें व्यापारी जुनें पुराणें हिंदुस्थान ताज्या दमाच्या पाश्चिमात्य राष्ट्रांच्या सामन्यांत हार खाऊं लागलें; त्याचा व्यापार बुडूं लागला. त्याच्या कारागीरांची निकृष्टावस्था होऊं लागली. यानंतर शिक्षण व व्यापार, शास्त्रीय ज्ञान व मालाची निपज यांत्रिक कलेची प्रगति व माल तयार करावयास लागणाऱ्या खर्चाची काटकसर व संरक्षक जकात पद्धति वगैरे व्यापारवृद्धीच्या पाश्चिमात्य आयुधांचा जसा सुकाळ होऊं लागला तसें ह्या स्थितीस पारखें असणारें व्यापारी हिंदुस्थान अगदीं खालावलें. त्याच्या कारागिरीची अवहेलना होऊं लागली व कारागीरांस आपल्या उदरनिर्वाहासाठीं दुसरीकडे मुख्यत्वें करून शेतीकडे–जो एकच धंदा पाश्चिमात्यांच्या व्यापारी उदयामुळें व हिंदुस्थानांतील शांततेमुळें भरभराटीवर येत होता–वळणें भाग पडूं लागलें. यामुळें शेतकरी वर्गाची गैरवाजवी वाढ होऊन ह्या सर्व मंडळीच्या पालनपोषणाचा भार शेतकीवरच पडूं लागल्यानें शेतकीची व ह्या वर्गाचीहि स्थिति खालावली, व वाढत्या खर्चामुळें भाऊबंदकी व सावकाराचें कर्ज ह्याचा या वर्गामध्यें झपाट्यानें प्रसार झाला.

हिंदुस्थानच्या व्यापाराची अवनती होण्याचीं अशा तऱ्हेचीं कारणें जरी त्याला माहीत होतीं तरी तीं पुस्तकी ज्ञानाचीं होतीं; प्रत्यक्ष अवलोकन केलेलीं नव्हतीं. ह्या व्यापारी समाजाची प्रत्यक्ष स्थिति पाहून सध्याची स्थिति सुधारतां येईल कीं नाहीं, सुधारतां येणार असल्यास कोणत्या मार्गानें खटपट करावयास पाहिजे वगैरे माहिती काढण्याचा त्याचा सध्याच्या प्रवासास निघण्याचा हेतु होता. कारागीर वर्गाची स्थिति कितपत खालावलेली आहे हें पाहण्यासाठीं जुन्या नांवाजलेल्या व सध्यां नामशेष झालेल्या किंवा थोड्या बहुत प्रमाणानें सजीव असलेल्या कारागिरीच्या गांवांतून व्यापारी

पेटांतून तो प्रवास करीत होता व तेथील माहिती गोळा करीत होता. अशा तऱ्हेनें माहिती मिळवीत असतां समाजाच्या इतर स्थितीकडेही तो लक्ष पुरवीत असे. समाजाचें एकंदर अज्ञान, चालीरीतींचीं अंधपरंपरा ही ठिकठिकाणीं त्याच्या नजरेस येत असे. अशा ठिकाणीं तो लोकांस उपदेश करीत असे. पण जनतेच्या अक्षरशत्रुत्वामुळें ह्या उपदेशाचा व्हावा तसा परिणाम होत नसे. कारण उपदेश ग्रहण करून त्याप्रमाणें वागण्याची धमक, इच्छा वगैरेंचा या मंडळीच्या ठिकाणीं पुरा लोप झालेला होता. या स्थितीला पालट देण्यास एकंदर जनसमूहाला अक्षराची–लिहीण्यावाचण्याची ओळख करून देऊन त्यांचें बुद्धिवैभवक्षेत्र सचेतन व विस्तृत करण्याशिवाय इलाज नव्हता.

ह्या प्रवासांत दिसणाऱ्या गोष्टींवरून हिंदुस्थानच्या व्यापाराच्या अवनतीचीं ह्मणून जीं कारणें त्यानें वाचलीं होतीं तीं त्याच्या हळूहळू प्रत्ययास येऊं लागलीं. जनतेची पुराणप्रियता–धंदेविषयक पुराणप्रियता–त्याच्या स्पष्ट दृष्टोत्पत्तीस येऊं लागली. आज हजारों वर्षांपासून माल तयार करण्याचे जुने मार्ग बदलले नव्हते. लोहाराची लोखंड गाळण्याची, पोलाद करण्याची किंवा कोष्ट्याची कापड विणण्याची रूति होती तशीच होती. कापड विणण्याच्या मागाची रचना होती तशीच होती. कालमानाप्रमाणें तिच्यांत फरक झाला नव्हता, किंवा लागणाऱ्या वेळेपेक्षां थोड्या वेळांत माल तयार करतां येण्यासारखा त्या रचनेंत फेरबदलहि झाला नव्हता. कांहींकांहीं ठिकाणीं कामकरी व व्यापारी त्याला एकच दिसले.

ही सर्व स्थिति सुशिक्षित जनतेपुढें मांडून तिच्या उन्नतीची चळवळ सुरु करणें त्याला जरूर दिसूं लागलें. ह्यासाठीं त्यानें लेखकाचा पेशा पत्करला. आपले लेख विशेष चित्ताकर्षक व्हावेत ह्मणून तो ते सचित्र देऊं लागला. ज्याज्या ठिकाणीं तो जाई त्यात्याठिकाणची उपलब्ध जुनी माहिती व सध्यांची स्थिति देऊन ही स्थिति ज्या ज्या प्रकाराची असे, त्यात्याप्रकारानें तो आपल्या लेखांत तिचें विवेचन करित असे. अशा तऱ्हेनें लेखकाचा धंदा पत्करण्यांत त्याचा दुहेरी हेतु होता. लेखांवर भालचंद्रास चांगले पैसे मिळतात हें त्याला ठाऊक होतें. त्याप्रमाणें आपल्या लेखांवर पैसे मिळवून ते एखाद्या

चांगल्या उपयुक्त लोकसंस्थेला देण्याचें त्यानें ठरविलें व त्या दृष्टीनें तो आपल्या लेखांबद्दल आतां प्रकाशकांजवळ मोबदला मागूं लागला. परंतु मोबदल्याची गोष्ट जेव्हां आली तेव्हां प्रकाशक मागें घेऊं लागले, व आमची सांपत्तिक स्थिति तशी नाहीं असा त्याला जबाब देंऊ लागले. परंतु ह्या जबाबांत सत्यांशाचा असावा तेवढा भाग नव्हता हें त्याला ठाऊक होतें. अशा तऱ्हेनें स्वार्थबुद्धीनें चालविल्या जाणाऱ्या पत्रांच्या संपादकांस व मालकांस त्यानें आपला पैसे मागण्याचा स्पष्ट हेतु कळविला व पुन्हां त्यानें त्यांच्याकडे लेख पाठविले. परंतु त्याच्या लेखांची पोंच किंवा त्याच्या पत्रांचीं उत्तरें त्याला मिळेनाशीं झालीं. तरी सुद्धां लोकहिताच्या दृष्टीनें तो त्यांस लेख पाठवीत असे. परंतु ते प्रसिद्ध होण्याचें लांबणीवर पडून लेखक ह्मणजे ह्यांचे बंदे गुलाम किंवा ह्यांच्याकडे योग्यतेशिवाय याचना करणारा भिक्षुकवर्ग अशा तऱ्हेची वागणूक त्याला मिळूं लागली. ह्या मंडळींची अशातऱ्हेचे पैसे मागणारे लेखक पुढें आणण्याची इच्छा नव्हती. कारण एकदां कां अशा तऱ्हेच्या लेखकांच्या लेखांची त्यांच्या वाचकांस गोडी लागली, म्हणजे त्यांचे लेख पैसे दिल्याशिवाय मिळणार नाहींत, या धास्तीनें आपण होऊन आपल्या उत्पन्नांत दुसऱ्यास वांटेकरी करण्याची त्यांची इच्छा नव्हती.

स्वभावेंतील अशा तऱ्हेच्या संपादकांच्या संभावनेनें विनायक खचून गेला नाहीं. त्यानें इंग्रजींत निघणाऱ्या पत्रांकडे धांव घेतली थोडाबहुत मोबदला देऊन त्याचें लेख ह्या पत्रांतून येऊं लागले. त्याचा इच्छित हेतू सिद्धीस जाऊं लागला, व थोड्या कालानें मार्मिक लेखक ह्मणून त्याच्या लेखांला महत्त्व येऊं लागलें.

प्रवासांत असताना भालचंद्र, माधव व कमला यांच्याशीं त्याचा पत्रव्यवहार चालत असे. घरीं पाठविण्याचीं कमलेचीं पत्रें वडिलांच्या धास्तीनें तो लक्ष्मीच्या नांवावर पाठवीत असे. लक्ष्मीच्या नांवावर कमलेचीं पत्रें येतात ही गोष्ट गोविंदरावांस ठाऊक होती, पण कमलेला नाखुष न करण्याच्या हेतूनें त्यांनीं ती गोष्ट चिंतामणरावांच्या कानांवर घातली नव्हती.

त्यानें आरंभिलेलें कार्य तडीस नेण्यास भालचंद्र त्याला वरचेवर धीर देत असे, व त्यानें हताश होऊं नये ह्मणून आपली बातमी त्याला वरचेवर

देऊन मदत पाहिजे असल्यास मला कळीव ह्मणून त्याला वरचेवर कळवीत असे. माधवालाहि भालचंद्रानें दोनतीन पत्रें पाठविलीं होतीं. परंतु त्यानें त्याला उत्तर दिलें नव्हतें. 'त्याच्याकडून पत्र कां येत नाहीं.' असें भालचंद्रानें विनायकाला विचारलें होतें. लक्ष्मीमुळें माधव पत्र पाठवीत नसावा असें विनायकाला वाटत होतें. परंतु हें कारण त्यानें भालचंद्रास कळविलें नव्हतें व तें कळविण्यांत त्याच्या समजुतीप्रमाणें त्याचा हेतुहि होता. असो.

विनायकाचें सर्व वर्तमान लक्ष्मीस कळत असे. माधवहि तिच्याशीं लग्न करण्यास तयार नाहीं, ही गोष्ट जवळंजवळ ठरल्यासारखीच झाली होती. व ह्यामुळें तिचें मुग्ध प्रेम पुन्हां तिला आनंदवूं लागलें. विनायकाच्या वाढत्या तेजस्वितेमुळें तिचें त्याच्यावरील प्रेमहि वाढूं लागलें, व त्या प्रेमाला आतां माधव वांटेकरी नसल्यानें त्याच्याच सतत चिंतनानें तें विकास पावूं लागलें.

इकडे लक्ष्मीचें प्रेम व तिकडे विनायकाची कार्यनिष्ठा हीं दोन्हींहि मनसोक्त विहार करूं लागलीं !

प्रकरण ३० वें.

दिल-जान.



"माधवराव, कालचें गाणें आवडलें का तुह्मांला ? दिल-जान ह्मणजे उत्तर हिंदुस्थानांतील एक रत्न आहे !"

" नानासाहेब, कालच्या गाण्याचे कर्णमधुर स्वर अजून माझ्या कानांत गुणगुणत आहेत. तुमच्या दिलजानचें पुन्हां आपल्याला गाणें ऐकावेंसें वाटतें ! इतकें मोहक गायन मी अद्याप ऐकिलें नव्हतें ! "

" ऐकाल कोठून ? लोक काय ह्मणतील, माझे मित्र काय ह्मणतील ही धास्ती आहेना मागें ! "

नानासाहेबांनीं माधवाच्या भोंवतीं आपले पाश चांगलेच टाकले होते. थोडेंसें सुसंस्कृत झालेलें त्याचें सुखलोलुप मन लक्ष्मीची आठवण देऊन ते अस्वस्थ करीत असंत व नंतर अशा मनास स्वस्थता आणण्यासाठीं ह्मणून ते त्यास गाणें, नाटकें वगैरे दाखवून आपल्या जाळ्यांत ओढीत असत. विनायक वगैरे मंडळींनीं उपदेश करून त्याची जी चैनीवृत्ती दाबून टाकली ती पुन्हां उसळावी येवढीच त्यांची इच्छा होती व तिला अनुसरूनच निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळे चैनीचे मार्ग त्याला दाखवून त्याची चैमी वृत्ति उसळावी म्हणून ते प्रयत्न करीत असत. ह्या त्यांच्या प्रयत्नांत त्यांना यश येणार असें दिसूं लागलें होतें.

आज त्यांच्या मनांतून त्यांना अमेरिकन कॉमेडी नाटक मंडळीच्या नाटकाला न्यावयाचें होतें व आपल्या इच्छेला अनुसरून त्यांनीं गोष्ट काढली.

" माधवराव, आज अमेरिकन कॉमेडीच्या नाटकाला चलतां का ? मंडळी फार चांगली आहे असें म्हणतात. "

" चला मलाहि आज करमत नाही. "

थोडे वेळानें दोघेहि नाटकगृहांत येऊन दाखल झाले.

दिलजानहि आज नाटक पहावयास आली होती. ती नाटक पहावयास आली होती, असें म्हणण्यापेक्षां आपल्या जाळ्यांत एखादी शिकार अडकली तर पहावी या उद्देशानें आली होती. ती जरी उत्कृष्ट गाणारीण होती व नसत्या

गाण्याच्या धंद्यावर तिला चांगला पैसा मिळत होता, तरी तेवढ्यावरच ती संतुष्ट रहाणारी नव्हती. तारुण्य व सौंदर्य आहे तोंवरच आपल्या गाण्याची किंमत असून हीं दोन्हीं जोंपर्यंत कोमेजलीं नाहींत तोंपर्यंत मिळेल तेवढा पैसा मिळवून घेणें शहाणपणाचें आहे हें ती जाणून होती; व ह्यामुळें गाण्याच्या धंद्याशिवाय श्रीमंत गुलहौशी लोकांस आपल्या नादीं लावून त्यांजवळून ती पैसा उकळीत असे. अशा तऱ्हेची एखादी शिकार मिळाल्यास पहावें, या हेतूनें आज ती नाटकाला आली होती.

ती आली त्या वेळेला नाटक सुरू झालें होतें. माधव व नानासाहेब यांचें लक्ष नाटकाकडे असल्यानें त्यांनीं तिला प्रथम पाहिलें नाहीं. पण थोड्याच वेळांत त्यांचें लक्ष तिच्याकडे गेलें.

" माधवराव, आज दिलजानदेखील नाटकाला आली आहे; पण तिला बिचारीला हें पाश्चात्य गायन कुठलं आवडावयाला ! "

" आणि आपल्याला तरी कोठें आवडतें ! आपण जसे आलों तशीच तीहि आली असेल. पण अशानें तरी कंपनीला पंधरावीस रुपये मिळालेना ? "

इतक्यांत दुसरा अंक सुरू झाला.

माधवाच्या मनाची चलाविचल झाली होती. तो मधून मधून स्टेजकडे पाही व मध्येंच आपली दृष्टि वळवून दिलजानकडे पाही. नानासाहेबांच्या लक्षांत ही गोष्ट आली, पण त्यांनीं मुद्दाम आपलें तिकडे लक्षच नाहीं असें त्यास भासविलें.

नाटकाचा पहिला अंक पहात असतांना माधवाच्या हातीं ऑपेरा ग्लास होता, पण तो घेऊन त्याला दिलजानकडे मधूनमधून पहाणें शक्य नव्हतें. कारण, आपलें करणें लोकांच्या नजरेस येईल अशी त्याला धास्ती वाटत असल्यानें त्यानें तो खुर्चीवर ठेविला, व नुसत्या चर्मदृष्टीनेंच तो चोरून तिच्याकडे पाहूं लागला; परंतु अधुनमधून चोरून पाहाण्यानें त्याच्या मनाची शांति होईनाशी झाली. दिलजानच्या सौंदर्यामृताचें प्राशन करून तो आपली दृष्टि वळवितो न वळवितो, तोंच पुन्हां तिच्याकडे पहावें असें त्याला वाटावें ! परंतु इतक्यांत लोकलज्जेची धास्ती वाटावी. असें होतां होतां हळू हळू लोकलज्जेचें त्याच्या मनावरील दडपण कमी झालें, व अधाशी नयनांनीं-

साऱ्या दोनच डोळ्यांनीं–तो दिलजानचें सौंदर्यामृत प्राशन करूं लागला. मनांत होत असणाऱ्या विचारांच्या प्रेरणेनें योग्यायोग्यतेविषयीं अंध बनून उत्कंठेनें तो तिच्याकडे टक लावून पाहूं लागला.

माधवाकडे दिलजानचें लक्ष होतेंच. गाणारीण झाली तरी ती धंदेवालीच होती. आपल्या जाळ्यांत अडकूं पहाणाऱ्यांना सपशेल कसें अडकवावें हें तिला पूर्ण अवगत होतें. मनोहर नेत्रकटाक्ष, सलज्ज व अर्थभरित स्मित हास्य, अंग-विक्षेप ह्या अस्त्रांचा ती माधवावर मधून मधून प्रयोग करीत होती. प्रणयार्चे दृष्टिमीलन व त्यार्चें सलज्ज छेदन ह्यानें ती माधवाच्या अंतःकरणांत तात्पुरत्या आनंदाच्या गुदगुल्या उत्पन्न करीत असून त्याला कामानलानें संतप्त करीत होती, व त्याला आपल्याकडे आकर्षण करून घेत होती.

ह्या तिच्या कामचेष्टांनीं माधव जास्तीच वहकूं लागला. कामविकार संतप्ततेनें त्याचे डोळे लाल झाले व गालांवर लाली आली.

नानासाहेब हा सर्वप्रकार शांत पण आनंदी वृत्तीनें पहात होते. माधव आतां पुरता आपल्या हातीं येणार ह्मणून त्यानां आनंद–नीच आनंद होत होता.

" माधवराव, चलतांना ? नाटक संपलें ! " नानासाहेबांनीं मुद्दाम त्याला ह्मटलें.

पण माधवार्चें लक्ष त्यांच्या बोलण्याकडे होतें कुठें ? तें सर्व दिलजानकडे होतें. ज्ञानतंतूची त्यार्ची सर्व शक्ति ह्यावेळीं नेत्रद्वयांत एकवटली होती. दिलजानच्या सौंदार्यावलोकनांत ती गुंग झाली असून त्यार्चें मन–बुद्धिप्रेरीत इच्छामूल त्यार्चें मन–भावी सुखकल्पनेचे डोलारे उभारण्यांत गढून गेलें होतें. अशा स्थितींत नानासाहेबांच्या शब्दोच्चाराचा प्रतिध्वनि कर्णेंद्रियांतील ज्ञानतंतूंनी त्याच्या मनाकडे कसा पोंचवावा, व यदाकदाचित् तो पोंहचला असता, तर त्याचा अर्थबोध तरी त्या मनास कसा व्हावा ! हें सर्व अशक्य होतें.

अखेरीस खरोखरीच नाटक संपलें. सर्व मंडळी जाऊं लागली. दिलजानहि जाण्यासाठीं उठली. तिच्या सावलीप्रमाणें माधवहि जागचा उठला. इतक्यांत नानासाहेबांनीं त्याच्या हाताला हिसका देऊन त्याला मागें ओढलें.

" एवढ्या गर्दीत कशाला जावयाचें ? जरा थांबूं ह्मणजे गर्दी आपोआप कमी होईल आणि मग जाऊं. "

त्याची स्थिति आपणाला समजली आहे, असें कोणत्याही तऱ्हेनें त्यांनीं त्यास दर्शविलें नाहीं.

त्यांनीं हाताला दिलेला हिसका व त्यांचें बोलणें हें ऐकून माधव स्तंभीतच झाला. बहकलेलें त्याचें मन--त्याची विचारशक्ति एकदम खडबडून जागी झाली व त्याबरोबर तो प्रथम थिजला.

नानासाहेबांनीं त्याला कोणच्याहि प्रकारें ओळख दिली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हातांत टाइम्सचा अंक घेऊन ते त्याच्या खोलींत शिरले.

" आज सकाळींच टाइम्स हातांत ! "

" आज रेसकोर्सवर जावयाचें आहे, तेव्हां आजचा प्रोग्राम पाहतों. "

" मी देखील येईन म्हणतों. "

नानासाहेबांचें कार्य झालें. ठरलेल्या वेळीं ते त्याला घेऊन रेसकोर्सवर आले.

प्रकरण ३१ वें.

चिंतामणराव शांत झाले.

आपणांस मोठेपणा आणल्यानंतर कमलेच्या मनांत आपल्याबद्दल स्नेहभाव कसा उत्पन्न करतां येईल याचा गोविंदराव विचार करूं लागले. त्यावेळीं त्यांचें नशीब जोरावर असल्यानें त्यांना भराभर सुलभ मार्ग सांपडत होते.

विनायकास घरीं आणून त्याचें व त्याच्या वडिलांचें चांगलें करून द्यावें हा विचार त्यांच्या मनांत आला. हा विचार खरोखरीच चांगला होता. असें घडून आलें तर ह्या कुटुंबाच्या सर्व मंडळीच्या मनांत आपणाबद्दल खरोखरीच एकतऱ्हेचा कनवाळूपणाचा स्नेहभाव उत्पन्न होईल याची त्यांना खात्री वाटूं लागली. त्यांनीं मनांत आणल्याप्रमाणें विनायकास पत्र लिहिलें. आपल्या कार्यांत जरी विनायक गढून गेला होता तरी घरीं जावें, व वडिलांचे मनांतील राग घालवावा असें त्यास वाटत होतें. त्यानें आलेली—गोविंदरावांनीं आणलेली-संधि वायां जाऊं दिली नाहीं. त्यांच्या पत्रासरशीं तो तावडतोब यवतमाळास आला.

तो येणार असल्याचें त्यांनीं त्याच्या घरांत अगोदरच सांगून ठेविलें होतें. त्याचप्रमाणें त्याला बोलाविण्याचा आपला हेतूहि त्यांनीं गोदावरबाई व चिंतामणराव यांस अगोदरच कळविला होता. तो घरीं आल्यानंतर चिंतामणरावांच्या मनांतील बराच राग गोविंदरावांनीं घालविला. विनायकानेंही आपल्या कार्याचा थोडासा इतिहास चिंतामणरावांस सांगितला. लेखक या दृष्टीनें त्याची थोडीबहुत वाढलेली योग्यता त्यांना ठाऊक होती. आपल्याप्रमाणें मुलगाहि जगांत दुसऱ्या मार्गानें नांव काढीत आहे, हें पाहून त्यांना थोडेसें समाधान वाटूं लागलें.

ह्या व अशा अनेक प्रकारांनीं त्यांचा त्याचेवरील राग थोडाबहूत-कां बराचसा शांत झाला होता.

गोविंदरावांनीं नवीन स्वीकारलेल्या पेशाप्रमाणें त्याच्या व्याख्यानाची तेथें व्यवस्था केली. व त्यास व्याख्यान देण्याचद्दल सांगितलें. व्याख्यान देण्याइतकी आपली योग्यता नाहीं असें विनायकानें त्यांना पुष्कळ सांगितलें पण ते ऐकेनात. लेख लिहिण्याची जर तुझी योग्यता आहे, तर व्याख्यान देण्यासाठीं ती कां असूं नये? 'तें कांहीं नाहीं, ' तुला व्याख्यान दिलेंच पाहिजे असें सांगून त्यांनीं त्यास व्याख्यान द्यावयास लावलें.

अखेरीस विनायकाचें व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय ' जनतेचें अज्ञान ' हा होता. ह्या बाबतींत प्रवासांत आलेला आपला अनुभव त्यानें सांगितला. अज्ञानामुळें आलेल्या व आणखी येऊं पहाणाऱ्या वाईट स्थितीचें त्यानें प्रामाणिकपणें विवेचन केलें.

त्याचें व्याख्यान खरोखरच सुश्राव्य झालें. त्यानें प्रतिपादन केलेले मुद्दे विचार करण्यासारखे होते. त्याच्या व्याख्यानास गांवांतील इतर सुशिक्षित मंडळीबरोबर तेथील युरोपियन मंडळीहि आलेली होती. त्यांत ज्या साहेबांजवळ विनायकाच्या नोकरीसंबधानें चिंतामणरावांनीं गोष्ट काढली होती ते साहेबहि होते. हे सहज शिकारीसाठीं ह्मणून तेथें आलेले होते. विनायकाचें व्याख्यान ऐकून ते फार खुष झाले होते. व्याख्याता कोण ह्मणून त्यांनीं विचारपूस केली. तेव्हां चिंतामणरावांचा तो मुलगा असें समजतांच त्यांस फार आनंद झाला. चिंतामणराव तेथें होतेच. व्याख्यान संपल्यावर मंडळी जेव्हां जाऊं लागली, तेव्हां चिंतामणरावांस बोलावून ते त्यांना ह्मणाले:-

" चिंतामणराव, असा हुशार व कार्यदक्ष मुलगा तुह्मांला लाभला ह्मणून मला फार आनंद होत आहे. त्याच्यासाठींच का तुह्मीं मजजवळ नोकरीची गोष्ट काढली होती ?"

" होय साहेब. पण नोकरी करावयाची नाहीं असें तो म्हणतो. "

" त्याचा जिकडे कल आहे तिकडेच त्याला जाऊं देणें फार चांगलें. शिवाय नोकरीपेक्षां त्यानें सध्यां चालविलेलें कार्य किती तरी जास्ती योग्यतेचें आहे! "

" पण यांत पैसा मिळत नाहीं. स्वतःच्या पोटापाण्याची नको का त्याला सोय बघावयाला ? "

" आणि तुम्हीं येवढें मिळविलें आहे तें काय करावयाचें ? " साहेब हंसत हंसत म्हणाले. " तें कांहीं असो, तो ज्या धंद्यांत पडला आहे तोच धंदा एवढा श्रेष्ठतम उच्च दर्जाचा आहे कीं त्यापुढें पैशाची किंमत नाहीं. आणि ज्याला पैशाची हांव असते, ज्याची वृत्ति लोभी असते, स्वदेशभक्तीचें स्वर्गीय वारें ज्याच्या अंगांत खेळत नसतें, तोच पैशाच्या पाठीमागें लागतो. माझ्या बोलण्याचा राग मानूं नका, पण त्याला मदत करणें हें तुमचें कर्तव्य आहे. तसें न करतां तुम्हीं त्याला थोडाबहुत त्रास देण्यास कारणीभूत झालांत असें मला समजलें आहें. हें तुमचें करणें मला बिलकूल आवडलें नाहीं. " चिंतामणरावांना मंडळीपासून दूर काढून ते म्हणाले.

" तुमच्या मुलाची व माझी ओळख व्हावी अशी माझी फार इच्छा आहे. " त्यांनीं ती करून द्यावी अशा तऱ्हेच्या उत्सुक नजरेनें त्यांच्याकडे पहात साहेब पुढें म्हणाले.

साहेबांनीं देखील आपल्याला दोष द्यावा हें पाहून चिंतामणरावांना चमत्कारिक वाटलें. पण त्यांना उलटून बोलणें त्यांना शक्य नव्हतें, उलट त्यांनीं सांगितल्याप्रमाणें ते विनायकास बोलावण्यासाठीं गेले. विनायक आलेला पाहून साहेबांनीं आपण होऊनच अधीर मनानें त्याच्याशीं बोलणें सुरूं केलें.

"आपला परिचय करून घेण्यांत मला फार आनंद होत आहे. आपलें नांव...?"

" माझें नांव विनायक. "

"विनायकराव, आपण जो पेशा स्वीकारला तो खरोखरीच वंद्य आहे. हिंदुस्थानची दिवसेंदिवस भरभराट होत जावी असें इच्छिणाऱ्यांपैकीं मी एक आहें. तुमच्या देशाचा मी एक हितचिंतक आहें. तुमच्या कार्यांत तुम्हांला यश यावें असें मी इच्छितों. "

" साहेब, आपल्या या सहानुभूतीबद्दल मी खरोखरीच आपला फार आभारी आहें. माझ्या हातून जें कांहीं थोडेंबहुत होत आहे. तें आपल्यासारख्या थोर गृहस्थांस पसंत पडत आहे हें पाहून मला फार आनंद होत आहे. त्यापासून मला माझ्या कार्याविषयीं जास्ती आस्था उत्पन्न होणारी आहे. "

" ह्या कार्यांत पडल्यामुळें तुमच्या वडिलांपासून तुम्हांला थोडा त्रास झाला असें मला समजलें, परंतु तो लक्षांत घेऊं नका. मनाची भावना आहे तशीच उज्ज्वल ठेवा आणि यापुढें तुमचे वडील या तुमच्या अंगीकृत कार्यांत तुम्हांलां मनापासून मदत करतील अशी मला आशा आहे. कां चिंतामणराव असेंचना ? "

चिंतामणरावांनीं होकारार्थी मान हालविली. साहेबांनीं दोघांचा प्रेमानें निरोप घेतला.

यापुढें चिंतामणराव मुलाशीं विशेष प्रेमानें वागूं लागले. गांवांत त्याची मानमान्यता वाढत होती. देशासाठीं खटपट करणारा मनुष्य ह्मणून लोकांना विनायकाबद्दल एकतऱ्हेचा अभिमान वाटत असे. गांवांतील शिष्ट संभावित मंडळी त्याच्याशीं बसून देशहिताच्या दोन चार गोष्टी बोलत, त्याला आदरानें आपल्याकडे बोलावीत, व त्यानें अंगिकारलेल्या कार्याबद्दल वारंवार त्याची स्तुति करीत असत.

अशातऱ्हेनें कांहीं दिवस गेल्यानंतर विनायकानें पुन्हां बाहेर पडण्याची आपली इच्छा दर्शविली. त्यानें जाऊं नये असें प्रेमामुळें सर्वत्रांस वाटत होतें. पण तसें उघड सांगणें त्यांना शक्य नव्हतें. ज्या प्रेमामुळें त्यानें घरीं रहावें असें त्याच्या घरच्या मंडळीला वाटत असे, त्याच प्रेमामुळें त्याच्या इच्छेला नाहीं ह्मणण्याचें त्यांच्या जिवावर येत होतें. स्पष्टपणें " जा " असेंहि ते त्यास ह्मणत नसत किंवा ' रहा ' असेंहि ह्मणत नसत.

शेवटीं विनायकानें आपल्या जाण्याचा दिवस मुक्कर केला व त्याप्रमाणें त्यानें घरांतल्या मंडळीस सांगितलें.

" आला आहेस तसा आणखीं महिना पंधरा दिवस राहिलास तर नाहीं क चालायचें ? " त्याच्या आईनें विचारलें.

" दादा, राहीनास आणखीं महिनाभर ! रहांच गडे ! " कमलाहि ह्मणाली

"आई, कमले, मला देखील रहावेसें वाटतें. घरीं राहूं नये असें कोणाला वाटत असेल का ? पण मी राहिलों तर मी स्वीकारलेलें कार्य तडीस कसें जावें ! भालचंद्र परत येण्याच्या आंत मला हा प्रवास संपविला पाहिजे. शिवाय आतां माझी पहिल्यासारखी स्थिति नाहीं. बाबांचा माझ्यावरील राग अगदीं नाहींसा झाला असून खर्चासाठीं कायं पाहिजे तें मागून घे असें त्यांनीं मला

कालच सांगितलें आहे. तुम्हीं सांगाल, तुम्हीं बोलवाल त्यावेळीं मी परत येईन. मग तर झालेंना ! येथें काम सोडून रहाणें खरें म्हणाल तर माझ्या जिवावर आलें आहे.''

इतक्यांत गोविंदरावांची स्वारी तेथें आली.

'' बरे आलेत गोविंदराव. मी दोनचार दिवसांनीं जाणार म्हणतों. पण म्हा दोघी मला जाऊं नको असें म्हणतात. ''

''बाळ तसा नव्हे माझ्या बोलण्याचा अर्थ. मायेमुळें तूं जाऊं नयेस असें वाटतें, एवढेंच ! '' गोदावरीबाई म्हणाल्या.

'' आई, गोविंदरावांनीं मला बोलावलें नसतें आणि मी आलों नसतों तर ! मायामोह विलक्षण म्हणतात तें खरें ! तुझ्या प्रेमळ सहवासांतून जाऊं नये असें वाटतें. पण गेलें हें पाहिजेच.''

'' गोदावरीकाकू, विनायक नोकरीवर असता तर ! मग तुम्हीं जाऊं नका असें त्याला म्हटलें असतें का ! ''

'' नोकरी ती नोकरी. तो नोकरीवर नाहीं म्हणून आम्हीं त्याला आणखीं चार दिवस रहा म्हणतों. '' कमला म्हणाली.

'' ताईमहाराज मी आणखीं चार दिवस रहातों म्हणा, पण आपलें लग्न झालें आणि सासरहून बोलावणें आलें म्हणजे आपल्या प्रश्नाचें उत्तर देईन. '' हंसत हंसत चेष्टा करण्यासाठींच तो म्हणाला.

'' हो, ठाऊक आहे. मोठा आला आहे सांगायला '' ! मानेचा हिसका देऊन रागाच्या-कृत्रिम रागाच्या-अविर्भावानें कमला बोलली आणिं तेथून चालती झाली.

'' कमलेच्या लग्नाचें ठरलें वाटतें ? '' गोविंदरावांनीं हलकेच पृच्छा केली.

'' नाहीं, अद्याप काहीं ठरलें नाहीं. पण माधवाला द्यायची असें म्हणतें. '' गोदावरीबाईनीं त्यांला उत्तर दिलें.

प्रकरण ३२ वें.

पाऊल भलतीकडे पडलें.



विनायकास जाऊन ३–४ महिने होत आले. तो तेथें होता, तोंपर्यंत लक्ष्मीचें मन नेहेमीं आनंदांत असे. तो गेल्यानंतरदेखील तें आनंदात असावयाचें, पण दुसऱ्याच कांहीं गोष्टींमुळें तें पहिल्या प्रमाणें नेहेमीं आनंदांत रहात नसे. ह्या दुसऱ्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे माधवाविषयींच्या होत.

नाटकाहून आल्यापासून माधवाची वृत्ति दिवसेंदिवस जास्तच बेताल होत चालली. नाटकाच्या दुसऱ्या दिवशीं तो नानासाहेबांबरोबर रेसकोर्सवर गेला होता. तेथें तो जुगारी बनला. दहाहजार रुपये त्यानें तेथें गमावले. रुपये गेल्याबद्दल त्याला वाईट वाटलें, पण त्याची हळहळ त्याला वाटली नाहीं. आपण अयोग्य तऱ्हेनें पैसे घालविले याबद्दल त्याला पश्चाताप–उपरती वाटावयास लावणारा पश्चाताप—वाटला नाहीं, कीं त्यानें त्याच्या मनाला खंतीहि आली नाहीं.

ज्या दिवशीं तो रेसफार्सवर दहाहजार रुपये हरला, त्याच दिवशीं रात्रीं नानासाहेब पुण्याला निघून गेले. माधव हरलेले रुपये त्यांनीं जिंकले होते. परंतु एवढ्या गुरुदक्षिणेवरच त्याला सोडण्याची त्यांची इच्छा नव्हती व ह्मणूनच त्या रात्रीं ते पुण्यास गेले.

माधव आतां वाहवणार याची त्यांना पुरी खात्री वाटत होती. नाटकाच्या दिवसाच्या त्याच्या वागणुकीवर त्यांची सर्व मदार होती. कच्या दिलाच्या युवकांवर, श्रीसंपन्न युवकांवर, कामाचा प्रभाव कायकाय परिणाम घडवितो, याची त्यांना पूर्ण माहिती होती. दिलजानच्या मायावी मोहक सौंदर्यानें माधव जितका अल्लड बनला होता, तितकीच आपल्या एका हस्तकांमार्फत माधवाच्या

संपत्तीची माहिती देऊन दिलजानला त्यांनीं अलग बनविलें होतें. या पायाला इमारतीचें स्वरूप येईपर्यंत आपण दूर रहावें या हेतूनेंच ते माधवाला आपण टाकून ठेविलेल्या जाळ्यांत अडकविण्यासाठीं तेथून दूर झाले.

त्यांच्या धोरणाप्रमाणें माधव जाळ्यांत फसला. दिलजानला घेऊन माधव निराळ्या ठिकाणीं, एका स्वतंत्र बंगल्यांत राहूं लागला.

आतां माधवाला पैशाची अडचण वरचेवर भासूं लागली. त्याच्याजवळ असलेले दोन तीन हजार रुपये व विनायकानें परत केलेले रुपये सर्व संपले. त्यानें घरून पैसे मागविले परंतु ते आलेले पैसेहि खर्च झाले. इकडे दिलजानचा त्याचा नाद तर दिवसेंदिवस वाढतच होता. तिला सोडावें असें त्याला वाटत नव्हतें. ती पाहिजे होती तर वाढता खर्चहि त्याला ठेवावयास पाहिजे होता.

गोविंदरावांची त्याला धास्ती वाटत होती. त्यांच्याकडून आतां पैसे कसे मागवावेत याची त्याला काळजी वाटत होती. इतके पैसे कसे संपले असें त्यांनीं विचारलें तर त्यांस काय उत्तर द्यावें हें तो अजमावून पहात होता. परंतु योग्य उत्तर असें त्यास सांपडेना. तो हताश झाला पण ह्या हताश स्थितींतच तो जास्ती धीट फॉटिंग बनला.

पैसा माझा ! मी त्या पैशाचा मालक ! गोविंदराव माझा नोकर ! तो कोण मला विचारणार ? माझ्या स्वतःचा मी मुखत्यार असून माझ्या इच्छेप्रमाणें वागण्याचा किंवा माझी संपत्ति खर्च करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे ! या अनिष्ट भावनेनें—त्याच्या नीतीमत्तेची सपशेल राखरांगोळी करणाऱ्या ह्या दुष्ट अहंकारानें—त्याला पछाडलें. नीचवासनांचा त्याच्यावर पूर्ण अमंल बसला, त्याची दृष्टि धुंद झाली, त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें वागण्याचें ठरविलें. एकदम पन्न दर्शनीं पन्नास हजार रुपये पाठवून देण्यासाठीं त्यानें गोविंदरावांस हुकुमवजा पत्र लिहिलें.

गोविंदरावांकडून पैसे आले व त्यांच्या इच्छेप्रमाणें तो वागूं लागला.

वऱ्हाडांतील मंडळी मुंबईस येतजात असत. त्यांच्याकडून माधवाची वागणूक कशाप्रकारची आहे, तो मुंबईस काय करीत असतो, वगैरे बातम्या हां हां म्हणतां यवतमाळला येऊन पोहोंचल्या. मंडळी त्याच्याविषयीं बोलावयास लागली. त्यांपैकीं कित्येकांनीं तर गोविंदरावांसहि विचारलें.

इतकें झाल्यानंतर एके दिवशीं हळूच गोविंदरावांनीं चिंतामणरावांजवळ माधवाबद्दल गोष्ट काढली. मात्र ही काढण्याच्या अगोदर त्यांनीं माधवास एक उपदेशपर पत्र लिहिलें होतें. त्या पत्रांची नक्कल व माधवाचें त्या पत्रांला आलेलें उत्तर हीं त्यांनीं आपल्याबरोबर नेलीं होतीं.

" रावसाहेब, माधवाच्या बाबतींत आपली सल्ला घेण्यासाठीं मी आज मुद्दाम आलों आहें." गोविंदराव ह्मणाले.

" अलीकडे तर तो फारच बेताल झाला आहे ह्मणतात." बरें झालें या मूर्खाला मी कमला दिली नाहीं ती. "

" पण आतां मी काय करावें? मला तर कांहीं सुचत नाहीं. हें पहा त्याला लिहिलेलें मीं पत्र व हें त्याचें उत्तर. "

चिंतामणरावांनीं दोन्हीं पत्रें वाचलीं.

" रावसाहेब, माधवाबद्दल माझ्यावर केवढी जबाबदारी आहे, हें आपण ओळखतांच. माझ्याप्रमाणें आपल्यावरहि स्नेहाखातर येणारी थोडीबहुत जबाबदारी आहेच. श्रीनिवासरावांचा व आपला स्नेह....."

" गोविंदराव ह्या सर्व गोष्टी मला कबूल आहेत. माधवाबद्दल मला खरोखरच वाईट वाटतें. पण त्याचा काय उपयोग ? तो कांहीं आतां लहान नाहीं. त्याचें बरें वाईट त्याला सर्व समजतें. "

" समजतें तर अशी स्थिति कां होती ! त्याच्या सध्यांच्या स्थितीवरून त्याला समजतें असें मला तरी ह्मणवत नाहीं. मीं त्याला अशीं किती तरी पत्रें लिहिलीं. पण त्यांचीं उत्तरें नाहींत. फक्त पैसे पाहिजे असले ह्मणजेच त्याचें पत्र येतें. "

" असें पैशांचें पत्र आलें ह्मणजे त्याला पैसे पाठवूं नका. "

" मी पाठविलें नाहीं तर तो कर्ज काढील किंवा येथें येऊन घेऊन जाईल. आतां पहिल्यासारखा तो अज्ञान नाहीं व मी त्याच्या कायद्याच्या दृष्टीचा पालनकर्ता नाहीं. तो सज्ञान आहे. स्वतःचा पालक आहे. "

" मला वाटतें त्याला येथें आणावें. म्हणजे त्याची ती दुष्ट संगत दूर होईल व ती संगत तुटली कीं तो आपोआप मिळेल. "

" रावसाहेब आपल्याला तसें वाटतें पण मला वाटत नाहीं. नागपुराहून आपण त्याला येथें आणलें, त्या स्थितींत आणि सध्यांच्या स्थितींत फार फरक झालेला आहे. त्यावेळेला तो परतंत्र होता. आतां तो स्वतंत्र आहे. मला वाटेल तसें मी वागणार असें त्यानें सांगितलें तर काय करावयाचें ? आणि तो असें म्हणेल याची मला खात्री वाटूं लागली आहे. येवढा तो बनला असावा असें म्हणावयास हरकत नाहीं. "

" मग विनायकाला लिहून बघा ! तो त्याला दोन हिताच्या गोष्टी सांगेल."

"त्याला अगोदर आणण्याची खटपट करतों. आला तर ठीकच झालें. नाहींतर मग विनायकाला लिहितों. पण त्याहीपासून कांहीं फायदा होईलशी मला आशा नाहीं. "

आणि हीच माधवाची वागणूक लक्ष्मीच्या आनंदांत व्यत्यय आणीत असे ! आपण पहिल्यानंदांच त्याच्या प्रेमाचा स्वीकार केला असता, तर तो इतका बिघडला नसता असें तिला वाटत असे ! आपण चुक केली असें तिला वाटत असे ! परंतु दुसराहि विचार लागलाच तिच्या मनांत येई ! त्याचें तितकेंच उज्ज्वल-प्रेम आपल्यावर असतें, तर त्याच प्रेमाचें चिंतन करीत त्यानें आपला वेळ घालविला असता ! अशा वाईट आचरणांत, व्यसनासक्तींत तो त्यानें घालविला नसता असें तिला वाटत असे ! परंतु ह्या विचारानें, ह्या कल्पनेनें तिचें समाधान होत नसे. तिच्या मनाची रुखरुख जात नसे !

तिनेंही माधवला घरीं आणण्याबद्दल गोविंदरावांजवळ एकदां गोष्ट काढली. गोविंदरावांनीं आणण्याचें कबूल केलें, परंतु त्यासमयीं तिला खालील प्रमाणें टोपणा दिल्याशिवाय सोडलें नाहीं.

" तुझ्याच मूर्खपणामुळें हा प्रसंग आलाना ? तुझ्या पोरींना स्वतंत्रता मिळाली म्हणजे असेंच व्हावयाचें ! "

गोविंदरावांनीं अखेर माधवाला यवतमाळास आणलें. त्याच्याबरोबर नानासाहेबहि आले होते.

प्रकरण ३३ वें.

भालचन्द्राचें पत्र.



बंगालच्या फाळणीमुळें उडालेल्या चळवळीची लाट नुसत्या बंगालभरच खेळत होती असें नाहीं तर सर्व हिंदुस्थानभर ती पसरूं लागली होती.

ह्याच संधीस बंगभंगानंतरच्या कांग्रेसची धामधूम सुरू झाली. अध्यक्ष निवडण्याची, तिचें धोरण ठरविण्याची, यंदांच्या विषयमालेची रचना वेगैर ठरविण्यांत कांग्रेसभक्त मंडळी आपसांत व वर्तमान पत्रांतून वादविवाद करीत होती. आमचे प्रभाकरराव कांग्रेसचे फार चहाते होते. त्यांची मूळ वृत्ति बाणेदारपणाची असल्यानें देशांतील सध्यांची जागृतावस्था त्यांस पसंत होती. त्याप्रमाणें ही जागृतावस्था टिकेल अशा तऱ्हेचेंच धोरण कांग्रेसनें स्वीकारावें, असें त्यांचें मत असून त्याप्रमाणें तें त्यांनीं वर्तमानपत्रांतून जाहीरहि केलें होतें.

ह्याचवेळेस ' हिंदी ' ह्या सहीनें एका प्रसिद्ध दैनिकांत ' हिंदुस्थान प्राचीन व अर्वाचीन ' ही लेखमाला सुरु झालेली होती. ह्या मालेचे सहा सात लेख झाले असून, त्या लेखांत हिंदुस्थानच्या प्राचीन उन्नतीचें शोधक व मार्मिक बुद्धीनें केलेलें वर्णन आलें होतें. आपल्या मित्रमंडळीजवळ गोडवे गावयास देखील ते कमी करीत नसत.

" बाबासाहेब ह्या ' हिंदीचे ' लेख खरोखर वाचनीय असतात ! हा पहा त्याचा आजचा लेख. वैभवशिखरावर चढल्यानंतरच्या हिंदुस्थानच्या स्थिर स्थितचिें चित्र त्यानें किती मजेशीर रेखाटलें आहे. चांगुलपणाचे गोडवे गाऊन त्या कालीं बीजरूपानें वावरत असलेल्या अनिष्ट गोष्टींची फोड त्यानें किती मार्मिकपणानें केली आहे ? "

" आणा पाहूं तो अंक. "

बाबासाहेबांनीं अंक घेऊन वाचण्यास सुरवात केली. बाबासाहेब हे डॉक्टर विश्वनाथरावांचे वडील बंधु असून कांहीं कामासाठीं ते नागपुराहून तेथें आले होते. प्रभाकररावांचा व त्यांचा चांगला स्नेह होता.

बाबासाहेब वर्तमानपत्र वाचीत असतां सकाळचें टपाल घेऊन गडी आला. आज शनीवार होता. त्या टपालामध्यें विलायतेहून आलेलें एक पत्र होतें.

"बाबासाहेब, डॉक्टरांचें पत्र आलें वाटतें" तें पत्र फोडतां फोडतां ते ह्मणाले.

पत्र वाचीत असतां त्यांच्या चेहऱ्यावर राग, खिन्नता, उद्वेग वगैरे विचार उमटत होते. एखादे वेळेस रागाचा, तर एखादे वेळेस खिन्नतेचा विकार तेथें तीव्रतर होई. पत्र वाचल्यावर त्यांनीं एक दीर्घ श्वास सोडला व त्या पत्राकडे पहात ते बसले.

"प्रभाकरराव लेख खरोखर चांगला आहे. कोण वरें हा 'हिंदी' असावा?" लेख वाचून झाल्यावर बाबासाहेब ह्मणाले.

"हिंदीना ! आपल्या चांगल्या माहितींतला आहे. हें पत्र वाचा म्हणजे समजेल. असें ह्मणून त्यांनीं हातांतलें पत्र त्यांच्या अंगावर टाकलें व आपण जागचे उठून इकडे तिकडे येरझार करूं लागले.

"वडिलांचे सेवेसी विज्ञापना विशेष– माझ्या प्रकृतीमुळें कदाचित् मला आय्. सी. एस् चा कोर्स झेंपणार नाहीं, ह्मणून मागें डॉक्टरांनीं आपणांस कळविलें होतें. त्याचें आपलें आलेलें उत्तर मिळालें. त्यांत आपण मला सिव्हीलीयन नाहीं तर बॅरिस्टर होऊन ये ह्मणून लिहिलें आहे, परंतु त्याप्रमाणें बॅरिस्टर व्हावें असें मला वाटत नाहीं.

"आपण मला सिव्हिलीयन करण्यासाठीं येथें पाठविलें होतें. परंतु तसें होणें मला आवडत नव्हतें. आपण जसें कांहीं विशिष्ट हेतूनेच मला येथें पाठविलें होतें, त्याप्रमाणें मीहि विशिष्ट हेतु धरूनच येथें आलों होतों. आपल्या व माझ्या हेतूंत फार फरक होता. त्यांत जमीनअस्मानाचें अंतर होतें व अजूनहि आहे. त्यांचें स्वरूप परस्पर विरोधी असें आहे. ह्या बाबतींत मी आपणांस अद्यापपर्यंत अज्ञानांत ठेविलें होतें, त्यावरून आपणांस माझा राग येईल, कदाचित्

माझा हेतु समजल्यानंतर आपणांस वाईटहि वाटेल. पण त्यास माझा इलाज नव्हता व नाहीं. ह्या मनःसिद्ध स्फूर्तीवर माझा ताबा चालण्यासारखा नव्हता. मन जिकडे नेईल तिकडेच जावें असें मला वाटत असे. त्यापासून मला एक तऱ्हेचा आनंद होऊं लागला. त्या आनंदापासून, पारखें होणें मला अशक्य होत होतें. असो.

"आपण माझ्यापेक्षां वयानें थोर आहांत, आपण ज्ञानी आहांत. तेव्हां मी आपणांस सागांवें असें नाहीं. परंतु सागितल्याशिवाय आतां गत्यंतरच नाहीं. माझ्या शिक्षणविषयक बाबतींत तरी आपण चालत आलेल्या चालीरीतींस बळी पडलां. माझ्या आवडीकडे, आपणांस महत्व वाटत नसल्यानें, आपण दुर्लक्ष केलेंत. मला कोणचा पेशा स्वीकारावेसें वाटतें. याची आपण कधींहि विचारपूस केली नाहीं. हें आपण योग्य केलें नाहीं. तेथेंच 'तुला पुढें काय करावेसें वाटतें?' असें आपण मला विचारलें असतेंत तर आजचा पत्र लिहिण्याचा प्रसंगच आला नसता.

"आय. सी. एस करण्यासाठीं आपण मला येथें पाठविल्यानंतर माझ्या इच्छित कार्यांत मन घालण्यास मला चांगलीच संधि मिळाली. माझ्या दृष्टीनें शिक्षणाचें ध्येय, एकंदर समाजाची अवनती झाली असतां व्यक्तिविषयक उन्नतीचें अगर फायद्याचें नसून, तें समाजाच्या, राष्ट्राच्या उन्नतीचें अगर फायद्याचें आहे. सिव्हिलीयन् झाल्यानें माझी भौतिक उन्नति झाली असती, पैशाच्या दृष्टीनें माझा फायदा झाला असता ! परंतु त्यापासून समाजाचें अगर देशाचें कोणतें कल्याण झालें असतें ? मी सिव्हिलियन होण्यानें त्याची उन्नत्ति झाली नसती कीं तो श्रीमंत झाला नसता कीं त्याला सुधारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तीला बसतां आलें नसतें ! देशहित हेंच आमच्या सध्याच्या स्थितींत आमचें शिक्षणाचें ध्येय ! ही माझी भावना–ही माझ्या हृदयांतील ईश्वरीप्रेरणा जागृत असल्यानें येथें आल्यानंतर मी माझ्या कार्याच्या पूर्वतयारीला लागलों ! या कामीं डाक्तरांनीं मला मनोभावें मदत केली असून मला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे.

येथें आल्यानंतर हिंदुस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचा अभ्यास करण्यांत मीं गेलीं दीड दोन वर्षें घालविलीं. जगांतलि जुनीं मागसलेलीं

राष्ट्रें पुढें कशीं गेलीं व पुढें गेलेलीं मागें येऊन हल्लीं आपत्तींत खिचपत कां पडलीं आहेत, याचा इतिहासाच्या सहाय्यानें अभ्यास केला व ह्या अभ्यासाचा उपयोग हिंदुस्थानची ऊर्जितावस्था करण्याकडे करावयाचा असें मी ठरविलें आहे. हिंदुस्थानच्या बहुजनसमाजांत साक्षरतेचा जर प्रसार केला, तर हिंदुस्थानचें डोकें लवकर व कायमचें वर निघेल, असें माझें मत झालें असून त्याप्रीत्यर्थ आपलें सर्व आयुष्य घालवावयाचें मी ठरविलें आहे. या कामीं मला यश येईल कीं नाहीं हें मी आजच सांगूं शकत नाहीं. परन्तु माझी हिंमत व कर्तव्यनिष्ठा या दोघींच्या जोरावर हें कार्य तडीस न्यावयाचें असा माझा कृतसंकल्प आहे. ह्याकामीं मदत करणारी एक व्यक्ति मला मिळाली आहे. माझ्याप्रमाणेंच तिनेंहि—श्रीमती विमलादेवी भट्टाचार्य—(ह्या आपल्या ऐकिंव माहितींतील असतीलच.) ह्या कार्यास गाड्याहि अगोदर आपणास वाहून घेतलें आहे.

"आपणांकडून मला पैशाची मदत फार करून मागावयास लागणार नाहीं. लेखनद्वारें मला थोडीबहूत प्राप्ति होत असते. माझे लेख 'हिंदी' ह्या टोपण नांवाखालीं प्रसिद्ध झाले आहेत व होतहि आहेत. आपल्या तिकडील एका दैनिकांत सध्यां हिंदुस्थानाविषयीं ह्या टोपण नांवानें जे लेख येत असतात तें माझेच आहेत.

"ह्या आठवड्यांत मी येथून इकडील प्रवासास निघणार आहें, अमेरिका जपान, चीन वगैरेवरून तेथें परत येईन असें ह्मणतों.

"मी आपल्या इच्छे बाहेर दुसराच पेशा पत्करला, याबद्दल आलेला राग पुत्रस्नेहानें—पुत्रस्नेहाच्या थोर मनानें दूर करून या बालकावर आपलें नेहमीं प्रेम असूं देत जा ! यापेक्षां जास्ती काय मागूं ?

"माझी प्रकृति चांगली आहे. आपणांकडील खुशाली कळवावी. उत्तर डॉक्तरांच्याच पत्त्यावर पाठविणें, म्हणजे मी असेन तेथें तें मला मिळेल. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

"लंडन ५ आगष्ट १९०५ बालक—भालचंद्र."

याच पत्राबरोबर खालील मजकुराचें डॉक्तरांचें पत्र होतें.

"छ. सा. न. वि. वि. सोबतचे चि. रा. भालचंद्ररावांच्या पत्रावरून सर्व ध्यानीं येईलच. त्यांची सकारण व वाजवी इच्छा सफल करण्यासाठीं मला अर्से वागावें लागलें. त्यास माझा नाइलाज होता. चि. रा. भालचंद्ररावांची बुद्धिमत्ता व विलक्षण मनोधैर्य पाहून मी त्यांना त्याप्रमाणें वागूं दिलें. ह्याबद्दल आपला मजवर रोष होईल हें मी जाणून होतों; पण आपल्या रोषाकडे बघून देशाची सुधारणा करणारा एक सुपुत्र, त्यास पारखा करणें मला योग्य दिसलें नाहीं. व आपणसुद्धां थोड्या शांत मनानें जर या गोष्टीचा विचार कराल तर मीं केलें तें योग्यच केलें अशी आपली खात्री होईल. चि. रा. भालचंद्ररावांच्या कर्तव्यनिष्ठेबद्दल मला अनुभव आला असून अंगीकृत कार्यांत ते चांगलेच नांव मिळवून हिंदुस्थानच्या सत्पुत्रांत आपलें नांव अजरामर करून ठेवतील, अशी मला उमेद आहे. माझें म्हणणें विचारांत घेऊन आपण आपल्या मनास राग येऊं देणार नाहीं अशी इच्छा धरून हें पत्र पुरें करतों. कळावें, लोभ असावा ही विनंति.

आपला स्नेहांकित.

लंडन ५–८–१९०५. विश्वनाथराव."

डाक्तर, भालचंद्र व विमलादेवी बोलत बसली असतां प्रभाकररावांच्या आलेल्या पत्रांस वरील दोन्हीं पत्रें उत्तर म्हणून पाठविलीं होतीं.

बाबासाहेबांनीं दोन्हीं पत्रें वाचलीं ! तरी प्रभाकरराव फिरतच होते. त्यांचें मन अस्वस्थ झालें होतें.

"तुमच्या भालचंद्रानें चांगलेंच चकविलें म्हणावयाचें ? पण त्याचें करणें तुम्हांला आवडलें नाहींसें दिसतें."

"अहो आवडणार कसें ? ह्या मूर्खाला मीं तेथें पाठविलें कशासाठीं आणि त्यानें केलें काय !"

"म्हणजे ! त्यानें उचललेलें पूज्यकार्य तुम्हांला पसंत नाहीं का ?"

"कार्य पसंत काय ! पण सिव्हिलीयनीपेक्षां त्याचें विशेष महत्व आहेसें मला वाटत नाहीं."

"शाबास ! प्रभाकरराव ! तुमचें बोलणें ऐकून हंसावें कीं रडावें हेंच मला समजत नाहीं."

" अहो, आज सिव्हिलीयन झाला असता तर कोठेंहि जिल्ह्याचा अधिकारी झाला असता. "

" झाला असता, आम्ही कोठें नाहीं म्हणतों. पण जिल्हाधिपतीची व निर्व्याज भक्तीनें देशाची सेवा करणाऱ्या देशभक्ताची स्थिति यांत केवढा तरी फरक ! दोघांच्या ध्येयांत किती तरी उच्चनीचता ! पहिल्यांत स्वार्थ तर दुसऱ्यांत परोपकार ! मी म्हणतों त्यानें केलें तेंच योग्य केलें ! तुम्हांला मानमान्यतेची आवड आहे हें मला ठाऊक आहे. अंतःकरणापासून मिळालेली मानमान्यताच खऱ्या योग्यतेची असते. ताबेदार किंवा गरजवंताकडून ती मिळते पण ती कृत्रिम असते. आज तुमच्या हातांत सत्ता आहे, तुम्हांला या बसा म्हणतील, तुमच्या गळ्यांत हार तुरे घालतील. परंतु उद्यां तीच सत्ता गेली म्हणजे ही दिखाऊ मानमान्यताहि गेली. थोड्यावेळापूर्वीच ह्या लेखक 'हिंदीचे' तुम्हीं स्तुतिपाठ गात होतांना ? त्याच्या अधिकाराच्या-सरकारी अधिकाराच्या-खुर्चीमुळें तुम्हीं हा गात नव्हतां, तर त्याच्या अधिकारयुक्त विद्वत्तेमुळेंच गात होतां. त्याला देशभक्त समजत होतांना. तो तुमच्या येथें आला असता तर तुम्हीं त्याचा योग्य गौरव केला असता ना ! झालें तर मग. ही आपली भ्रामक समजूत सोडून द्या व भालचंद्रावर राग धरूं नका. खऱ्या प्रेमाच्या कळकळीनें त्याच्या कार्यांत त्याला मदत करा. कां कराल ना ? "

प्रभाकररावांनीं यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. परंतु त्यांच्या चेहऱ्यावरील पहिली खिन्नता गेली व तेथें गंभीरता आली.

" कां ? माझ्या बोलण्याचा राग..."

" राग कसला यावयाचा. उलटें तुमच्या बोलण्यानें माझें मन स्थिर झालें. "

प्रकरण ३४ वें.

पुनः प्रेम-जागृति.

माधव यवतमाळला आला तो नानासाहेबांच्या खटपटीमुळें आला, नुसत्या गोविंदरावांच्या पत्रानें दिलजानचा मोह सोडून त्याला यवतमाळला येणें शक्य नव्हतें. परंतु आपल्या हेतूसाठीं नानासाहेबांनीं त्याचा दिलजानचा मोह दूर केला. कांहीं कारवाई करून त्यांनीं दिलजानला त्याला सोडावयास लावलें.

असें करण्यांत त्यांचा हेतु होता. माधवावर एक तऱ्हेचें संभावीतपणाचें वर्चस्व त्यांना ठेवावयाचें होतें. त्याचप्रमाणें त्याच्या आप्तेष्टांच्या मनांत आपल्या-विषयीं त्यांना चांगला ग्रह उत्पन्न करावयाचा होता, ही त्यांची दृष्टि दूरदर्शी-त्वाची होती. माधवापासून त्यांना सतत टिकणारा अर्थलाभ करून घ्यावयाचा होता. त्याच्याकडून नेहेमीं पैसे मिळत असावे ही त्यांची इच्छा होती.

त्याला घेऊन यवतमाळला आल्यानंतर, अर्थात् नानासाहेबांबद्दल सर्वांचा ग्रह चांगला बनला. बयेच्या तडाख्यांतून त्याला काढल्याबद्दल सर्वजण त्यांना दुवा देऊं लागले, व माधवाच्या हितचिंतकांपैकीं एक असें त्यांना समजूं लागले. माधवाला सुधारण्याचें त्यांनीं आपल्याकडे घेतलें व ह्या बाबतींत इतरांनीं त्याला उपदेश करूं नये कीं त्याच्या अनीतिमान वर्तनाची त्याला ओळख देखील देऊं नये असें त्यांनीं सर्वत्रांस बजावून ठेविलें.

नानासाहेबांनीं ठरविल्याप्रमाणें माधवाचे बाबतींत सर्व कांहीं नीट चाललें. ते त्यास नेहेमीं उपदेश करीत. तसेंच यवतमाळच्या गांवढळ व एकलकोंड्या रहाणीची हेटाळणी करीत; व मुंबईच्या किंवा शहरांतील चैतन्यपूर्ण राहणीची तेथील सुख साधनांची, करमणुकीची वगैरे नेहमीं तारीफ करीत असत. एकी-

कडे त्यांचें मन स्थिर ठेवण्याचा खोटा प्रयत्न ते करीत, तर दुसरीकडे त्यांचें मन अस्थिर कसें होईल याची तें तरतूद करीत. असें करण्यांत त्यानें लवकर येथून निघून पुन्हां आपल्या जाळ्यांत अडकावें हा त्यांचा हेतु होता.

माधव घरीं आल्यापासून लक्ष्मीचें मन जरा स्थिर झालें होतें. त्याबद्दल तिला पहिल्यासारखी काळजी वाटत नव्हती, तो घरीं आल्यानंतर त्याच्या लग्नाचा प्रश्न निघाला नव्हता कीं तो निघून पुन्हां लग्नाबद्दल तिला विचारतील असाहि संभव दिसत नव्हता. ह्यावरून व माधवाच्या एकंदर आचरणावरून त्याच्या मनांतील आपल्या विषयींचा प्रेमविकार मावळला असें ती समजत होती. ह्या समजुतीनें तिचें निसर्ग प्रेम पुन्हां वाढीला लागलें. आपलें प्रेम. सर्वस्व ह्मणून विनायक पुन्हां तिच्या मनांत खेळूं लागला.

आपल्या प्रेमाचें कौतुक करीत, प्रेमतरंगानें उत्पन्न होणाऱ्या मनोराज्याच्या सुखाचा अनुभव घेत लक्ष्मी बगीच्यांत बसली होती. ही दुपारची वेळ होती. माधव आपल्या माडीच्या खिडकींत शून्य अंत:करणानें बाहेर बघत उभा होता. त्याची दृष्टि लक्ष्मीकडे गेली.

प्रथम शून्य अंत:करणानें तो तिच्याकडे पहात होता. इतर मानवी प्राण्यांप्रमाणें ही एक अशीच भावशून्य भावना त्याच्या मनांत होती. मंतर तिच्या व आपल्या स्थितीचा विचार त्याच्या मनांत उभा राहिला. तिचें व आपलें निर्विकार बालपण त्याला आठवलें. त्यानंतर तिच्या सौंदर्याचा मोह, त्याची कामी वागणूक, त्याची प्रेमयाचना, तिचा अव्हेर वगैरे सर्व हळूहळू त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. आपणास घर सोडावयास लावणारा प्रसंग, नंतरचें गोविंदरावांचें पत्र, आपलें मुंबईचें बदफैली आचरण त्याला आठवूं लागलें. नंतर तो लक्ष्मीविषयीं आपल्या मनांत असणाऱ्या प्रेमाची विचक्षणा करूं लागला सद्बुद्धीच्या चिकित्सेनें तें उदात्त स्वरूपाचें नव्हतें हें त्याच्या लक्षांत आलें. तें तसें असतें तर त्या प्रेमानें त्याला मोहावून टाकलें असतें. त्याला लक्ष्मीस्वरूपी बनाविलें असतें. लक्ष्मीशिवाय इतर स्त्रीकडे त्यानें वांकड्या नजरेनें बघितल नसतें, लक्ष्मीच्या सुखानेंच त्याला सुख झालें असतें. तिच्या आनंदानेंच त्याला आनंद वाटला असता !

तिच्या सौंदर्यमोहांतच त्याच्या प्रेमाचा उदय होता. तें प्रेम नव्हतें. ती एक नीचतम भावना–उश्रृंखल स्वरूपाची जाज्वल्यभावना होती. तिला प्रेम ह्रें नांव देखील देतां येत नव्हतें।

ह्या विचारानें, ह्या कल्पनेनें त्याच्या अंतःकरणास हात घातला. लक्ष्मी संबंधाच्या त्याच्या विकाराचें स्वरूप बदललें. तेथें प्रेमाचा उदय होऊं लागला. हें प्रेम नीच आसक्तीपेक्षां जरी वरच्या पायरीचें होतें तरी तें स्वार्थमूलच होतें. लक्ष्मी आपली असावी ह्या इच्छेच्या प्रादुर्भावाचेंच तें होतें.

आंब्याच्या गर्द छायेंत बांकावर वसलेली लक्ष्मी ह्यावेळीं फारच रमणीय दिसत होती. लज्जा उत्पन्न करणाऱ्या मुग्ध सुखद कल्पनातरंगानीं तिच्या मोहक मुखकमलावर आरक्तता आली होती, व ती तिच्या सौंदर्यास जास्तीच खुलवीत होती. तिचा मुखचंद्र माधवास स्पष्ट दिसत होता. तिच्या डोळ्यांत जादूची मोहनी भरली होती. बाह्य जगाची मनांत कल्पनादेखील नसल्यानें ती अव्यवस्थित बसली होती. तरुणांस मोहनी पाडणारा तिचा शरीरसौंदर्याचा काहीं भाग–तिचें उन्नत वक्षस्थल–थोडाबहुत दृग्गोचर होत होता.

माधव तिच्याकडे येण्यासाठीं निघाला. तो तिच्याजवळ मंदपावलांनीं आला. त्याच्याकडे तिचें लक्ष गेलें नव्हतें. तो जागच्याजागीं थबकला व सतृष्ण अचल नेत्रांनीं तिचें सौंदर्यामृत प्राशन करूं लागला. सर्वव्यापी अनंगाची बाधा त्याला होऊं लागली. त्याच्या शरीरांत एक तऱ्हेचें वारें शिरूं लागलें.

इतक्यांत लक्ष्मीची दृष्टि त्याचेकडे गेली. त्या स्थितींत त्याला तेथें पहातांच ती दचकली. स्त्रीजात ! लज्जेनें तिच्यावर अंमल बसविला. तिनें आपला पदर सांवरला व चटकन उठून ती तेथून चालती झाली. तिनें माधवाकडे वर डोळा करून पाहिलें सुद्धा नाहीं.

हें तिचें करणें माधवाला चमत्कारिक वाटलें. अशा तऱ्हेनें हिनें आपणांला वागवावें अशीच आपली योग्यता आहे का ? आपल्या अनीतिमान् आचरणाची एकदम आठवण होऊन त्याचें शरीर थरारलें. लक्ष्मीसारख्या सुंदर व सद्गुणी कुमारिकेची आपण इच्छा कां धरावी असें त्याला वाटूं लागलें. आपल्या-

सारख्याच्या अनिष्ट, विषारी संगतीनें तिला दूषित करणें अत्यंत नीचपणाचें असें त्याच्या मनानें घेतलें. तिच्या दिव्य प्रेमाला आपण लायक नाहीं. तेव्हां त्या प्रेमाची इच्छा धरणें सत्याचें होणार नाहीं, असें वाटल्यानें तो तेथून पळाला व घराकडे येऊं लागला.

परत येत असतां भालचंद्राबद्दल त्याच्या मनांत विचार आल्याशिवाय राहिला नाहीं. भालचंद्राच्या अनुकरणीय आयुष्याबद्दल त्याला हेवा वाटूं लागला. लक्ष्मीनें आपलें प्रेमधन त्याला अर्पण केलें म्हणूनच हा त्याला हेवा वाटत होता असें नाहीं; तर तो प्रशंसनीय व मी त्याज्य, त्याच्या सद्गुणांवर मोहित होऊन लक्ष्मीनें आपलें प्रेम त्याला अर्पण करावें व मीं आपलें प्रेम तिला अर्पण करित असतां, अर्पण केलें असतां, माझ्या दुर्गुणांनी आड येऊन माझ्या त्या प्रेमाचा अव्हेर व्हावा, तिच्यासारख्या उपवर कुमारिकेचें प्रेम मिळण्यास माझ्या संपत्तीचा मला कांहीं उपयोग होऊं नये, ह्या अहंभावाच्या—तमोगुणी अहंभावाच्या—अस्पष्ट संचारानेंहि त्याला त्याचा हेवा वाटूं लागला. आपण तसें त्याच्यासारखें व्हावें अशी अंधुक जाणीव त्या विचार-तरंगांत पुन्हां त्याच्या मनांत डोकावूं लागली.

हा सर्व प्रकार नानासाहेबांनीं पाहिला होता. लक्ष्मीबद्दलची माधवाच्या मनांतील आसक्तीची ठिणगी अद्याप विझालेली नव्हती हें त्यांस उघड दिसत होतें. माधवाच्या मनाची चलबिचल उडवून देण्यास ती पुरेशी होती. मात्र तिला थोडासा फुंकारा घालावयास पाहिजे होता. ते खालीं उतरून त्याच्या-जवळ आले.

" माधवराव, प्रेमयाचना करण्याचा हा प्रकार पाश्चात्य आहे. अशानें आपल्याइकडील पौर्वात्य कुमारिकांचीं मनें वळत नसतात. " सर्वस्वीं थट्टेच्याच पण मोठ्या लडिवाळपणाच्या स्वरानें त्याच्या पाठीवर एकदम हात टाकून ते म्हणाले.

माधव अगोदर दचकला. नंतर चपापला व ओशाळला. आपलें हें हृद्गत नानासाहेबांस समजलें हें चांगलें नाहीं असें त्याला वाटत होतें. ह्या वाटण्यांत लज्जेचा व अपमानाचाहि भाग होता.

"माझें म्हणणें पटतें ना ?" पुन्हां त्याच स्वरांत नानासाहेब म्हणाले.

"तुम्हीं काय म्हणतां तेंच मला समजत नाहीं."

"बरोबर आहे. समजणारच नाहीं. लक्ष्मीशीं लग्न होईपर्यंत समजणार नाहीं."

यावर माधव कांहींच बोलला नाहीं. तो खिन्न दिसूं लागला.

"माझ्या थट्टेच्या बोलण्याप्रमाणें लक्ष्मीनें खरोखरीच तुमच्या प्रेमाचा अव्हेर केला वाटतें. आणि तो खरा असावा असें तुम्हांला वाटतें का ? आपल्या समाजांत प्रौढविवाह प्रचलित नसल्यानें आपल्या प्रेमाचा प्रेमी मनुष्याजवळ देखील अशा प्रौढ कुमारिका परिस्फोट होऊं देत नाहींत. त्यांच्या वाचेवर लज्जेचें अवाजवी व अयोग्य दडपण बसलेलें असतें. मनांतील गोष्ट, मनापासून आवडत असलेली गोष्ट बोलून दाखवावयास त्या कचरतात आणि शेवटीं पस्तावतात. असे मी कितीतरी दाखले बघितले आहेत."

तरीहि माधव कांहींच बोलला नाहीं.

"या बाबतींत मजजवळ बोलावयाचें नसेल तर बोलूं नका. माझा कांहीं आग्रह नाहीं. पण मी काय बोललों तेवढें मात्र लक्षांत ठेवा."

"पण माझ्यावर तिचें प्रेमच नाहीं."

"कशावरून ?"

"कशावरून म्हणजे ! तिनें मला स्वतः सांगितलें."

"केव्हां ?"

लक्ष्मीनें माधवाला अद्यापपर्यंत तसें सांगितलें नव्हतें. पहिल्या प्रेमकथनाचा प्रसंग त्यानें नानासाहेबांस सांगितला. त्याचप्रमाणें तिचें भालचंद्रावर प्रेम बसलें आहे म्हणूनहि सांगितलें.

"मला नाहीं हें खरें वाटत. चवदा पंधरा वर्षें वयाच्या सुमारास आपल्या इकडील कुमारिकांस प्रेमाची कल्पना आलेली नसेल हें गृहीत धरणें मला तर योग्य दिसत नाहीं. अहो या वयांत आपल्या इकडील किती तरी मुली मातृपदाला जाऊन पोहोंचलेल्या असतात ! लक्ष्मीनें तुम्हांला सांगितलें आणि तें तुम्हीं खरें धरलेंत त्याचप्रमाणें भालचंद्रावर तिचें प्रेम असेलसेंहि मला शक्य

वाटत नाहीं. तुमच्यासारखा नवकोट। नारायण मिळणारा नवरा टाकून ती भालचंद्राकडे धांवेल, ही गोष्ट—कल्पना देखील—अशक्य ! मग वस्तुस्थिति तर अशक्य असेलच असेल !"

झालें या चिथावणीनें माधवाचें प्रेम पुन्हां उसळूं लागलें. त्याला गोविंद-रावाच्या पत्राची आठवण झाली. त्यानें तर त्याच्या आशेंत भरच पडली, ह्या बाबतींत त्याचे विचारतरंग सुरू झाले, व ते त्याला सुखदच करूं लागले.

. पुष्कळ विचार केल्यानंतर लक्ष्मीचें आपल्यावर प्रेम आहे असेंच त्यानें ठरविलें. प्रेमी मनुष्याप्रमाणेंच तो तिच्याशीं वागूं लागला. त्याच्या वृत्तींत फरक पडूं लागला. आपला डाव फंसतो कीं काय याची नानासाहेबांस धास्ती वाटूं लागली.

प्रकरण ३५ वें.

प्रवास.



भालचंद्र व विमला हीं युरोपखंडांत प्रवास करीत होतीं. तिकडच्या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था कशा चालविल्या जातात हें त्यांना पहावयाचें होतें.

बहुतेक सर्व युरोपियन राष्ट्रांत प्राथमिक शिक्षण हें सक्तीचें असल्यानें, व सरकारच अशा शिक्षण-विषयक बाबतींत पुढाकार घेत असल्यानें त्यांची शिक्षणाची तऱ्हा योग्य अशीच त्यांना आढळली. जशी परिस्थिति जेथें असेल तेथें तशी व्यवस्था केलेली होती. ह्या शिक्षणाशिवाय जनतेस जास्ती ज्ञानाचा लाभ देण्यासाठीं नाइटस्कुल्स–रात्रीच्या शाळा, मोफत वाचनालयें वगैरे अनेक प्रकार त्यांच्या पहाण्यांत आले.

युरोपांतील आपला बहुतेक प्रवास आटोपून तीं इंग्लंडला परत यावयास निघालीं होतीं. तीं ह्यावेळीं इटलींत असल्यानें इटलीहून फ्रान्सला बोटींतून येऊन नंतर आगगाडीनें इंग्लडला जावें असें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें तीं दोघें बोटीवरहि चढलीं. ह्याच बोटीवर हिंदुस्थानांतील कांहीं युरोपियन मंडळी होती.

दोघांचा स्वभाव गोड असल्यानें परकीयांबरोबर तीं फारच मिळून मिसळून वागत असत. ह्यामुळें युरोपीयन लोक हिंदुस्थानाला कोणच्या दृष्टीनें लेखतात हें त्यांस नेहेमीं समजत असे. अशा मंडळींत वापरतांना हिंदुस्थानाविषयीं तीं मुद्दाम बोलणें काढून ह्या लोकांचे विचार समजून घेत असत.

ह्या त्यांच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें त्यांनीं बोलणें काढलें. त्यावेळीं हिंदुस्थानांत असणारी तीनचार युरोपियन मंडळी तेथें होती. ह्यांत एक मिशनरी होता, एक पोलीस कामगार होता व बाकीचे दोघे व्यापारी होते. गोष्टी चालल्या असतां त्यांना एक मळेवाला येऊन मिळाला. फक्त तो पोलीसचा मनुष्यखेरीज

करून ह्या सर्व मंडळींनीं हिंदुस्थानची हेटाळणी करण्यास सुरवात केली. मिशनऱ्यानें धार्मिक बाबतींत यथेच्छ तोंडसुख घेतलें. व्यापाऱ्यांनीं व्यापार विषयक बाबतींत, तर मळेवाल्यानें आपल्या धंद्यांत येणाऱ्या प्रकारांवरून हिंदुस्थानला अगदीं क्षुद्र, रानटी ठरविलें ! नाहीं ह्मणावयास पोलीसचे साहेब मात्र हिंदुस्थानची बाजू आपल्याकडून शक्य तितक्या प्रकारांनीं पुढें मांडीत होते. परंतु त्यांचा अनुभव एकांगी होता. आपल्या कामांत येणाऱ्या संबंधापासून ते हिंदुस्थान चांगलें असें ह्मणत होते. इतर सुधारलेल्या देशांप्रमाणें येथील चोर, भामटे सुधारलेले नव्हते. पोलीसांना जेरीस आणण्याचें त्यांच्या अंगांत सामर्थ्य नव्हतें. लोकांस फसविण्याचे किंवा लुबाडण्याचे त्यांचे मार्ग ठराविक असल्यानें ते पोलीसांस तेव्हांच उमगत. ह्याशिवाय एकंदर जनसमाजांतील सत्याविषयींची प्रीति, श्रेष्ठतम राजनिष्ठा ह्यांचा गुन्ह्याचा तपास लावतांना त्यांना मेहेमीं अनुभव येत असे. ह्या सर्व व इतर गोष्टींवरून ते हिंदुस्थान चांगलें असें ह्मणत असत. पण हें त्यांचें ह्मणणें कोणीहि कबूल करीना.

ह्याच सुमारास स्वदेशी चळवळीची लाट निघालेली होती. स्वदेशी चळवळीमुळें वरील व्यापारी साहेबांच्या व्यापाराचें बरेंच धाबें दणाणलें होतें. विलायती कापडाच्या पूर्वीप्रमाणें त्यांच्याकडे मागण्या येत नव्हत्या, कीं गोदींत येऊन पडलेला त्यांचा मालहि उठत नव्हता ! ह्याच चवळीमुळें मळेवाल्यांचें डोकें संतापलें होतें. त्यांस मजूर मिळेनासे झाले होते. लोकांत आपलेपणाचा भाव उत्पन्न झाल्यानें मिशनरी साहेबांचा धंदाहि थंडावला होता. एवढेंच नव्हे तर त्यांच्या कळपांतील कांहीं मंडळीस आर्यसमाजानें पावन करून घेऊन पुन्हां हिंदु बनविलें होतें. ह्यामुळें ही सर्व मंडळी हिंदुस्थानावर यथेच्छ तोंडसुख घेत होती. वांकड्या तिकड्या कोट्यांनीं जॉलीसाहेबांस निरुत्तर करून त्यांस आपलें म्हणणें कबूल करावयास लावीत होती.

"ह्या भालचंद्ररावांसदेखील आमचें म्हणणें खोडतां यावयाचें नाहीं." आपल्या मोडक्या मराठी भाषेंत मिशनरी साहेब गर्वानें म्हणाले.

"त्याप्रमाणें हल्लीं चालू झालेली स्वदेशी चळवळ हिंदुस्थानच्या व्यापारावर गदा आणील हेंहि त्यांस कबूल करावें लागेल" व्यापारी साहेब म्हणाले.

"ओसाड डोंगराळ प्रदेशांत आम्हीं मोठमोठे मळे करून हिंदुस्थान पुढें आणलें. तेथल्या गरीब व भिकारी लोकांस मजूरीचा मार्ग लावून दिला. हे

आमचे उपकार विसरून, तुमचे कृतघ्न लोक उलटे आमच्यावरच मजुरांस चांगल्या तऱ्हेनें वागवीत नाहीं, म्हणून उलटत आहेत!" भालचंद्राकडे पहात मळेवाले साहेब म्हणाले.

"मला हें तुमचें म्हणणें अगदींच पसंत नाहीं."

"कां?"

"तुह्मीं स्वच्या भावानें बोलत नाहीं ह्मणून. ज्यांस आपल्या धर्मांत पुन्हां यावें असें वाटलें व त्याप्रमाणें त्यांना हिंदु बनाविलें. यांत ह्या मिशनरी वर्गाचें काय गेलें? धर्मांतराची बाब ज्याच्या त्याच्या आवडीवरच ठेवलेली चांगली, असें तुह्मींच ह्मणतांना? मग तुमच्या कळपांत सांपडलेले कांहीं हिंदु परत हिंदु झाले तर त्यामुळें तुमच्या पवित्र कार्याला कोणचा कमीपणा आला?"

"पण पतितोद्धारांचें तत्व तुमच्या धर्मांत आहे कोठें? अनार्याला तुमचे पूर्वज आर्य होऊं देत होते का?"

"हो. देत होते तर काय झालें. रामायणासारखें महाकाव्य रचणारा थोर वाल्मिकी ऋषि मूळचा अनार्य वाल्याकोळी होता, हें तर तुह्मांस माहीत आहेना. आमच्या धर्माची वृत्ति एवढी संकुचित असती, तर आर्यांच्या धर्मांत अनार्यांचा समावेशच झाला नसता. तुमची माहिती अगदीं कोंती असते. पण त्या माहितीवरच तुमच्या साऱ्या उड्या असतात व अजाण, अशिक्षित लोकांना त्या माहितीवरच तुह्मी धर्मांतर करावयास लावतां. मी तुह्मांला विचारतों आमच्या धर्माची तुह्मी व्याख्या काय करतां? हिंदूधर्माचें स्वरूप केवढें प्रचंड आहे याची तुम्हांला कल्पना आहे काय? हिंदुधर्म वेळोवेळीं कसा सुधारत गेला याची तुह्मांला माहिती आहे काय?"

त्याला उत्तर देणें मिशनरी साहेबांस शक्य नव्हतें. ते स्तब्ध राहिले.

"तीच स्थिति तुमची. आपल्या फायद्यासाठीं तुह्मीं हिंदुस्थानचें वाटेल तें नुकसान करावयास तयार असतां. स्वदेशी चळवळीमुळें हिंदुस्थानच्या व्यापाराचें नुकसान कसें होईल तेवढें मेहेरबानी करून मला सांगतां कां?"

"स्वदेशीमुळें आयात व्यापार बुडाला कीं जकातींचें, त्याचप्रमाणें ह्या व्यापारावर पोट भरणाऱ्या हजारों लोकांच्या पोटावर नाहीं का पाय यावयाचा! अदलाबदलीच्या तत्वावर वाढणारी देशांतील संपत्ति देशांतच कुजत पडेल व

तिची होणारी वाढ खुंटेल. मांडवल स्थिर राहूं लागलें म्हणजे त्याच्यांतील चैतन्य नाहींसें होऊन त्याची उत्पादक शक्ति जागचे जागीं जिरेल. "

" आपण व्यापारी आहांत. व्यापाराचीं व संपत्तीचीं सर्व तत्वें आपणांस ठाऊक आहेत. आमच्या जागीं आपण आहां असें समजा व त्याचदृष्टीनें आपण पुढें आणलेल्या लंगड्या मुद्यांचा विचार करा. व्यापारासाठीं तुम्हीं जसा आपला फायदा बघतां तसा तो आमचा आम्हांला बघावयास नको का ? हिंदुस्थान सरकारच्या जकातीच्या उत्पन्नाची जर तुम्हांला येवढी काळजी वाटत आहे, आमचें नुकसान होईल म्हणून जर तुम्हांला येवढी कळकळ वाटत आहे, तर जेव्हां लँकाशयरच्या कपड्यावर पांच टक्के जकात बसविली होती, तेव्हां तुम्हीं येवढी हाकाटी कां केलीत व आमच्या हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या कापडावर जकात कां बसवावयास लावलीत ? संपत्तिविकासाचें तत्व आम्हांला चांगलें समजतें; त्याचप्रमाणें देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास कोणचा व्यापार चांगला हेंहि आम्हांला चांगलें समजतें. इतके दिवस समजत नव्हतें. आतां समजावयाला लागलें आणि त्याचाच परिणाम म्हणजे सध्यांची सुरुं असलेली स्वदेशी चळवळ हें होय. "

" तुमच्या देशाचा व्यापारधंदा वाढविणें हें तुमचें कर्तव्य होय. पण त्या साठीं योजीत असलेले मार्ग मात्र श्रेयस्कर नाहींत. "

" असें पाहिजे असेल तर तुम्ही म्हणा. मी म्हणावयाचा नाहीं. ज्यांनीं ह्या मार्गाला चलन दिलें असेल, जे ह्या मार्गाचे प्रवर्तक बनले असतील त्यांना तुमच्यापेक्षां वस्तुस्थितीची माहिती अधिक असली पाहिजे. "

ह्यानंतर या विषयावर बोलणें येथेंच थांबलें. भालचंद्राजवळ आपला युक्तिवाद चालावयाचा नाहीं हें ही मंडळी पुरतेपणीं समजली. हळूहळू त्यांनीं आपला तेथून पाय काढला. राहतां राहतां जॉलीसाहेबच तेथें राहिले. त्यांच्या व भालचंद्र व विमला यांच्या बऱ्याच वेळपर्यंत गोष्टी चालल्या होत्या व त्या हिंदुस्थानसंबंधींच्याच होत्या. जॉलीसाहेबांचें एकंदर वागण्याचें धोरण हिंदुस्थानला सहानुभूतीपर असेंच असे. ह्या देशासंबंधीं जास्ती माहिती मिळावी असें त्यांस नेहमीं वाटत असे, व तशी संधि आली असतां ते ती वायां जाऊं देत नसत. ह्या दोघांशीं चालू असलेल्या भाषणानें त्यांच्या पहिल्या ज्ञानांत चांगली भर पडली. ह्यामुळें त्यांची व ह्या दोघांची ओळख त्या प्रवासांत चांगलीच वाढून तिला मैत्रीचें स्वरूप आलें.

प्रकरण ३६ वें.

चिंतामणरावांचा मृत्यु.



लो कनायक झालेले गोविंदराव यंदांच्या कांग्रेसला आले होते. त्याप्रमाणें विनायकही आला होता. मात्र तो यवतमाळाहून आला नव्हता. गोविंदराव येणार आहेत हें त्याला ठाऊक होतें. त्याप्रमाणें ते आल्या-बरोबर तो त्यांच्याकडे आला. माधवाची स्थिति कशी आहे हें जाणण्याची त्याला फार उत्कंठा लागलेली होती.

"माधव पुन्हां पूर्वपदावर गेला म्हणावयाचा तर?"

"गेला होता, पण सध्यां बरा आहे. त्याला यवतमाळला आणलें आहे."

"नुसतें यवतमाळला आणून काय उपयोग? त्याला ताळ्यावर आणावयाला दुसरा कांहीं उपाय नाहीं का?"

"उपाय आहे. पण तो अमलांत येईल तेव्हां खरें. मात्र तूं जर मनावर घेशील तर....."

"माझ्याकडून होण्यासारखें असेल तर मी खात्रीनें करीन. माधव चांगला असावा एवढीच माझी इच्छा आहे."

"विनायक, तुला सांगण्यास देखील लाज वाटते. पण माधवासाठीं सांगितलें हें पाहिजेच. लक्ष्मीवर माधवाचें प्रेम बसलेलें आहे. तिच्याशीं जर त्याचें लग्न होईल तर तो खात्रीनें सुधारेल."

"गोविंदराव, लक्ष्मीनें माधवाशीं लग्न केलें तर तो सुधारेल अशी तुमची खात्री आहे?"

"खात्री कशी देतां येईल. पण तो सुधारेल-चांगला सुधारेल असें मला वाटतें."

"समजा. हें लग्न झालें तर माधवाला सुधारण्याची तुम्हीं खटपट कराल."

विनायकाचा प्रश्न खुचीदार होता. त्यानें गोविंदरावांचें खरें स्वरूप प्रगट

होणारें होतें. गोविंदराव देखील बावचळले; पण लागलीच मन ताळ्यावर आणून ते झणालेः—

" मी माझ्याकडून शक्य तेवढी खटपट करीन. त्याला चांगल्या स्थितींत आणावयास मी वाटेल ती झीज देखील सोसावयास तयार आहें."

बोलत बोलत ते गोविंदरावांच्या उतरण्याच्या जागेपर्यंत आले. त्यांनां यवतमाळची कांहीं मंडळी दिसली. त्यांना पाहतांच विनायकानें आपल्या बोलण्याचा रोंख फिरविला.

" भाऊसाहेब, आपणहि आलांत वाटतें कांग्रेसला."

" कां आह्मीं नये येऊं वाटतें. देशोद्धाराचें काम तुमच्याकडेच संपविलें आहे अरें तुह्मीं समजतां काय ? हंसत हंसत भाऊसाहेब झणाले.

असें कोण झणतो. हें कार्य सर्वत्रांचें आहे व तें योग्य रीतीनें करण्याचा सर्वत्रांना सारखा हक्क आहे. " विनायक झणाला.

" हक्क सर्वत्रांनां आहे पण योग्यता मात्र नाहीं, तर त्या हक्काला काय करावयाचें" अण्णासाहेब बोलले.

" असें असें म्हणतां ? " शामराव बोलले.

" कसें तें मी सांगतों. भाऊसाहेब किंवा तुह्मीं शामराव, कोणीहि घ्या. वर्षभर कज्जेदलाली करावी. केस खरी असो, खोटी असो, आपली मिळकत मिळवावी. अजाण कुळास नाहींनाहीं त्या थापा माराव्यात. खालच्या नाहीं तर वरच्या कोर्टांत दावा जिंकूं असें खोटेंच आश्वासन देऊन आपले खिसे भरीत असावें हा तुमचा सारखा उद्योग ! देश म्हणजे काय, त्याच्यासाठीं काय केलें पाहिजे, ह्याचा नुसता विचार करण्यास देखील ह्या स्वार्थपरायण धंद्यापुढें तुम्हांला फुरसत होत नाहीं. यदाकदाचित् झालीच, तर तिचा खरा उपयोग करण्याची तुमची इच्छा नसावयाची. कारण, तेवढी कळकळ वाटत नाहीं, वेळ मिळेल तेव्हां मात्र व्यास पीठावर चढण्याची किंवा या वार्षिक मजलसीस येण्याची संधी तुम्हीं केव्हांहि रिकामी जाऊं देत नाहीं. खऱ्या कळकळीच्या अभावामुळें देशोद्धारांचें तुमचें काम कृतीऐवजीं वाणींत येऊन बसलेलें आहे. अजाण जनतेच्या डोळ्यांत अद्याप हा फरक येत नसल्यानें तुमच्यासारख्या

बोलघेवड्या देशभक्तांची ठाकुरकी राहिली आहे समजलांत ! " अण्णासाहेब म्हणाले.

त्यांचें बोलणें तेथील मंडळीस थोडेंबहूत लागलें.

" अण्णासाहेब तुमच्यासारखे सर्वच कोठें घरचे श्रीमंत आहेत. पोटाचा धंदा सोडून देशोद्धाराचें काम जर आम्हीं करूं लागलों, तर आपल्या बायकापोरांना पोट भरण्यासाठीं हातांत चौपदरीच घेतली पाहिजे. "

" येवढें बोलतां येतें तर तुम्ही कां नाहीं या कार्यास स्वतःला वाहून घेत. तुम्हांला तर पोटाचा उद्योग करणें भागच नाहींना ? अण्णासाहेब, लोकांना सांगतां येतें. फुकटचें सांगावयाला काय जातें ह्या दृष्टीनें बघितलें तर तुमच्यापेक्षां आम्ही कितीतरी चांगले इकडे पोटाचा धंदाहि करतो आणि इकडे देशसेवाहि करतो. "

" हो. खरेंच. कज्जेदलाली वाढवून पोटाची आणि देशाचीहि सेवा करतां खरें ! "

" कायद्याच्या ज्ञानासाठीं कुळें आमच्याकडे येतात आणि आम्हीं त्यांस योग्य ती सल्ला देतों. यांत कसली कज्जेदलाली ! "

" ही सशास्त्र कज्जेदलाली !

वाद विकोपाला जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां विनायक म्हणाला.

" जाऊं द्या हो. या शुष्क वादांत काय फायदा आहे. वकिली काय किंवा इतर धंदा काय ? तो करणारा जो तो आपापल्या फायद्याकडे बघणारच. त्याबद्दल त्याला दोष देणें कधींहि समंजसपणाचें होणार नाहीं. त्याच्या धंदेविषयक वागणुकीकडे बघण्यापेक्षां त्याच्या देशहितविषयक वागणूकीकडे बघणें ज्यास्त चांगलें. व त्या दृष्टीनें बघितलें म्हणजे इतर मंडळीपेक्षां ही मंडळी पुष्कळ बरी असेंच म्हणावें लागतें. दुसऱ्या चांगल्या संपन्न लोकांकडे पहा. ते देशाच्या नुसत्या गोष्टी देखील तोंडांतून कधीं काढीत नाहींत. त्यांच्यापेक्षां तर हे बरेना ? " अण्णासाहेबांकडे पहात त्यानें भाषण संपविलें.

इतक्यात गोविंदरावांच्या नावाची तार घेऊन त्यांचा गडी आला. तार वाचून विनायकाचे हातीं दिली.

"गोविंदराव, तुम्ही येणारना मग ?" तार वाचल्यावर तो खिन्नतेनें म्हणाला.

"चिंतामणराव अतिशय आजारी आहेत. ताबडतोब निघून या. विनायक रावांस कळविलें आहे." हा तारेंतील मजकूर होता. ती लक्ष्मीनें केलेली होती.

"हो."

"चला तर मग बांधाबांधी करा. मी माझें सामान घेऊन येतों. एक तासानें गाडी आहे."

विनायक शांततेनें वोलत होता. पण ही त्याची शांतता कृत्रिम होती. नैसर्सिक सुख समाधाची नव्हती, तर सुजाणतेनें दुःखित मनोविकार दाबण्याची कृत्रिम होती. निर्दुःख शांततेचा सतेजपणा त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता तर दुसऱ्या प्रकारच्या शांततेचा निस्तेजपणा तेथें दिसत होता.

विनायक व गोविंदराव तांतडीनें येण्यास निघाले. घरची सर्व मंडळी त्यांची वाट पहात होती. चिंतामणरावांनीं तर विनायकाच्या वाटेकडे डोळे लावले होते. ह्या दुखण्यांतून आपण जगूं अशी त्यांस आशा वाटत नव्हती. चिंतामणरावांचा स्वभाव जरी निष्ठुर होता तरी तो मायारहित नव्हता. त्यांच्या स्वभावांत निष्ठुरता येण्याचें कारण त्यांची अहंमन्यता ही होती. मृत्युसानिध्यानें आपलें या जगांतील अवतार कृत्य संपलें, असें जेव्हां त्यांस उघड उघड दिसूं लागलें तेव्हां या मर्त्य जगांतील अनिष्ट भावनाहि त्यांस सोडून जाऊं लागल्या. त्यांचा अहंकार मावळला, त्यांचा क्रोध लोपला व त्यांचा तो निष्ठुरपणाहि गेला. तेथें ईश्वरस्वरूपी शांतीमय प्रेमाचा विकास होऊं लागला. सर्वत्र सुख असावें, आनंदाचें, शांतीचें जिकडेतिकडे साम्राज्य असावें असें त्यांस वाटूं लागले.

माधवाला ते वरचेवर बोलावित, त्याच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवित त्याला सदुपदेश करीत.

"माधव, तुला सांगावें असें नाहीं. पण सांगितल्याशिवाय रहावत नाहीं. तूं माझ्या प्रिय मित्राचा श्रीनिवासरावांचा मुलगा. तुझी स्थिति कशी असा वयास पाहिजे ! पण आहे कशी ? तुझ्या वडिलांनीं किती त्रास भोगला ! तुला

कोणच्याहि तऱ्हेचा त्रास दिला नाहीं. तूं चांगला लौकिक करावास, अशी त्यांची किती तरी इच्छा होती....."

ह्याताऱ्याच्यानें जास्ती बोलवेना. त्याचा कंठ दाटून आला. प्रेमानें त्याच्या पाठीवरून ते हात फिरवीतच होते. थोड्या वेळानें ते पुन्हां खेदजनक पण द्रमण स्वरानें ह्मणालेः-

" माधवा, मग तूं आहेस तसाच का रहाणार ! "

माधवाच्या अंगांत विद्युत संचार झाल्याप्रमाणें झालें. तो एकदम उठला व त्यांच्या पायावर मस्तक ठेवून ह्मणालाः-

" काका, अद्यापपर्यंत झालें तें झालें. यापुढें मात्र वडिलांच्या पुण्याईनें व आपल्या आशीर्वादानें श्रीनिवासरावांच्या नांवास साजेल असेंच वर्तन माझ्या-हातून घडेल. "

त्याच्या उद्गारांत जोम दिसत होता.

" माधवा, तुझें ह्मणणें खरें होवो ! " सद्गदित अंतःकरणानें ते ह्मणाले.

थोड्या वेळानें विनायकाचा टांगा दारांत येऊन उभा राहिला. टांग्यांतून उतरल्याबरोबर गोविंदराव व तो चिंतामणरावांच्या खोलींत आले.

" या, गोविंदराव, ये, बाळ विनायक ये, मला कडकडून भेट पाहूं. मी फारवेळ काढीन असें मला वाटत नाहीं."

" बाबा ! "

" बाळा, मी तुला सुख दिलें नाहीं. तुझ्या इच्छितकार्याला तुला मनो-भावें मदत केली नाहीं ह्मणून मला फार वाईट वाटत आहे. माझ्या मनाला टोंचणी होत आहे "

" बाबा ! गतगोष्टींवरून कशाला आपल्या मनाला वाईट वाटून घेतां ! ही वेळ आहे का ! बाबा. तुमच्या ह्या बोलण्यानें मला वाईट वाटावयास लागलें आहे. मीच तुमच्या इच्छेप्रमाणें वागलों असतों, तर यावेळीं तुह्मांला कशाला त्रास झाला असता ! "

" छत् ! वेडा कुठला- यांत त्रास कसला ? उलटा मला आनंद होत आहे. तुझ्याकडे पाहून धन्यता वाटत आहे. मी आपल्या पितृपदावरून तुला सत्कृत्य

परांङ्मुख करीत असतां जर तूं आपल्या अचल श्रद्धेनें त्या सत्कृत्याची कांस सोडली नाहींस तर त्यांत मला वाईट वाटेल असें कधीं होईल का ! कधींच नाहीं. माझ्या जुन्या वागणूकीबद्दल मला वाईट वाटत आहे, तर तुझ्या वागणूकीनें शतपट आनंद होत आहे. आतां मात्र माझी मरणकालची इच्छा समजून आरंभिलेलें कार्य मनोभावें तडीस नेण्याची खटपट कर व आपल्या धर्माचें सार्थक कर !"

बोलण्याच्या श्रमानें त्यांनां बरीच ग्लानी आली होती. बराच वेळ ते स्वस्थ बसले होते.

"बाळ, ये इकडे. मला तुझ्या तोंडावरून हात फिरवूं दे."

त्यांच्या तोंडावर एक तऱ्हेचा तजेला दिसूं लागला. त्यांची दृष्टि चंचल झाली. त्यांनीं कमलेस जवळ बोलाविलें.

"बाळे मला नाहीं वाटत मी फार वेळ जगेनसा." तिच्या तोंडावरून हात फिरवीत ते म्हणाले. "माझ्या देहांत अनुभूत प्रकार होत आहेतसें वाटतें. माझ्या दृष्टीसमोर हें काय दिसावयास लागलें ? ही निर्वाणीच्या वेळची प्रभा तर नसेलना. माझी जीभ आंत ओढावयास लागली. बाळ. विनायक ! कमले ! मी चाललों. मी यऽतों आऽऽऽतां ! गोदा.....दो–घां–चा संभाळ क...र... ये.....तों.....

चिंतामणरावांची इहलोकींची यात्रा संपली.

प्रकरण ३७ वें.

कमलेच्या लग्नाचा विचार.

चिंतामणरावांच्या मृत्यूनें कुटुंबाची जबाबदारी विनायकावर येऊन पडली. तो आतां आपल्या कार्यांत पडण्यास पहिल्यासारखा स्वतंत्र राहिला नव्हता. कमलेच्या लग्नाची जोखीम त्याच्यावर येऊन पडली होती. त्याच्या स्वतंत्रतेंत आडकाठी आणणारी गोष्ट येवढीच होती. तिचें लग्न करून देऊन नंतर आपण आपल्या कार्यांत मोकळेपणानें पडावें असें त्यानें ठरविलें. कमलेला योग्य असें स्थळ तो पाहूं लागला.

आपला विचार त्यानें आपल्या आईजवळ व गोविंदरावांजवळ सांगितला. कमलेच्या लग्नाबरोबर त्यानेंहि आपलें लग्न उरकून घ्यावें असें गोदावरीबाईनीं त्याला सांगितलें. पण तें त्याला पसंत नव्हतें. लग्नाची बिडी आपल्या पायांत अडकवून घेण्यास व आपली स्वतंत्रता गमाविण्यास तो तयार नव्हता. व त्याप्रमाणें त्यानें आपल्या आईची कशीबशी समजूतहि केली.

याप्रमाणें कमलेच्या लग्नाच्या खटपटींत असतां त्याला खालील पत्र आलें. तें कोणाकडून आलें हें समजण्यास त्याला मार्ग नव्हता. त्याच्यावर गांवाचा किंवा पाठविणाऱ्याच्या नांवाचा पत्ता नव्हता.

" सा. न. वि. वि. कमलेच्या लग्नाच्या खटपटींत आपण आहां असें समजतें. तिचें मन माधवावर बसलेलें आहे ह्या गोष्टीचा विचार तिचें लग्नाचें जमवितांना आपण अवश्य करावा म्हणून हें पत्र लिहिलें आहे. तरी त्याचा योग्य उपयोग होईल अशी आशा आहे. खरी स्थिति माहिती असणाऱ्यानेंच हें पत्र लिहिलें आहे. त्याच्या खरेपणाबद्दल पाहिजे असल्यास आपल्या बहिणीजवळ गोष्ट काढून खात्री करून घ्यावी. कळावें. "

हें पत्र आल्यावर तो बुचकळ्यांत पडला माधवावर–फंदी माधवावर– आपल्या बहिणीचें प्रेम असेल याची त्याला कल्पनादेखील नव्हती. माधव सध्यां चांगला सुधारला होता. पणही त्याची वृत्ति कायम राहील याचा त्याला भरंवसा नव्हता. काय करावें हे त्याला समजेना. कमलेचें त्याच्यावर प्रेम असेल पण उलट तसें त्याचें तिच्यावर कोठें होतें ? माधवाच्या मनांत खरा प्रेमविकार असेल कीं नाहीं याचीच त्याला शंका होती. त्याच्या मनांत लक्ष्मी-बद्दल लालसा होती हें त्याला ठाऊक होतें. एकेकालीं तिच्याशीं विवाह करण्यास तो हपापला होता. पण आतां तसें असल्याचें दिसत नव्हतें. नुसत्या स्वतःच्या कल्पनेनें किंवा विचारानें त्याला निश्चयात्मक असें कांहींच ठरवितां येईना. ह्मणून या बाबतींत त्यानें माधवाजवळ गोष्ट काढण्याचें ठरविलें. त्याचा रागरंग पाहून नंतर आपल्या बहिणीच्या लग्नाचा विचार ठरवावा असें त्यानें योजिलें. योग्य संधि साधून त्यानें माधवाजवळ त्याच्या लग्नाची गोष्ट काढली व त्याचें मत विचारलें.

" विनायक तुझें ह्मणणें बरोबर आहे पण तशी बायको मिळाली पाहिजेना. "

"काय झालें न मिळायला ! तुमची लक्ष्मी काय वाईट आहे. "

" कोण, लक्ष्मी ? माझें मन पाहण्यासाठीं बोलतोस वाटतें ! ते कांहीं असलें तरी तिच्याशीं लग्न करावयाचें नाहीं, हा मीं कधींच निश्चय केला आहे. तिचें प्रेम जर माझ्यावर नाहीं तर... पण असो तीं गोष्ट. तिच्याशीं लग्न करण्याची माझी योग्यताच नाहीं. शिवाय तिच्या सुखांत व्यत्यय आणून तिच्याशीं लग्न करणें माझ्या हातून कधींच होणार नाहीं. "

" पण तशी तिची इच्छा असेल तर ? "

" तिची इच्छा ! छे. तिची इच्छा असणें शक्यच नाहीं. ती इच्छा बनवीत असेल. माझ्या सुखासाठीं ती आपलें सुख थोर मनानें झुगारून देत असेल. असें जरी असलें, तरी मी तिला तें तसें उगारूं देणार नाहीं. विनायक, मी देखील मनुष्यच आहें. मला थोडीबहुत माणुसकी आहे "

" बरें तें असो. लक्ष्मीशीं नाहीं तरी दुसऱ्या कोणाशीं तरी तुला लग्न हें केलेंच पाहिजे. कारण त्याशिवाय तूं कायमचा सुधारशील असें मला वाटत नाहीं. "

माधव यावर कांहींच बोलला नाहीं.

"माधव, प्रेमाशिवाय प्रेम समजत नाहीं. त्याची गोडी लागत नाहीं. किंवा त्याचा विकासहि होत नाहीं. प्रेमानेंच मनुष्याचा जन्म स्थिर होतो व त्याला योग्य दिशा मिळते. "

" विनायक तूं प्रेम कशाला ह्मणतोस. "

" प्रेम ! प्रेम ह्मणजे आवड. लालसा, स्नेह सर्व कांहीं. परंतु तुझ्या-सारख्या मनुष्याला प्रेमाचा अर्थ काय सांगावा हेंच मला समजत नाहीं. तारुण्याच्या कामीं प्रेमाला तुह्मीं प्रेम समजतां. व त्या प्रेमाचा उगम जरी कामचाधेपासून असतो, तरी त्याचें स्वरूप चांगलें अगर वाईट बनविणें आपल्या हातीं असतें. ह्या प्रेमांतील कामविकाराला फाजील महत्व मिळालें ह्मणजे त्या प्रेमाला हिडीस स्वरूप येतें. परंतु कामविकाराला गौणत्व मिळालें ह्मणजे त्या प्रेमाचें उज्वल स्वरूप दृष्टीस पडतें. प्रेम उत्पन्न करणाऱ्या आपल्या प्रिय मूर्तीचें तो प्रेममूढ प्राणी चिंतन करूं लागतो. आपल्या चिंतनानें, आपल्या आचारानें, आपल्या विचारानें तो प्राणी तन्मय बनतो. त्याचा आपलेपणा जातो. त्याचें सुख तेंच आपलें सुख. त्याचा आनंद तोच आपला आनंद असें तो समजूं लागतो.सारांश काय, तर आपलेपणा विसरून आपल्या उत्कट प्रेमानें तो त्याचें प्रेम आळवूं लागतो. ह्याप्रमाणें प्रेमाचा विकास होतो व दोन्ही जिवांची एकतानता होते. ह्या एक तानतेनें बद्ध झालेलीं अंतःकरणें लौकिक दृष्टीच्या विवाहबंधनानें जोडलीं गेल्यावर या प्रेमी युग्याचा आयुष्य-क्रम कितीतरी आनंदात व सुखांत जातो। संसाराचें खरें सुख त्यांस मिळतें. माधव, अशा तऱ्हेचें लक्ष्मीबद्दलचें तुझें प्रेम होतें का ? नव्हतें. कारण तसें तें असतें तर तिच्या प्रेमाची अवहेलना करणारें निंद्य आचरण तुझ्याहातून घडलेंच नसतें. "

" विनायक, तूं ह्मणतोस तें खरें. असें प्रेम मी अद्यापपर्यंत अनुभविलें नाहीं व पुढेंहि अनुभवावयास मिळेल असें वाटत नाहीं. "

" कां योग्य पत्नि मिळाली तर ? "

" माझ्या मागील आयुष्याकडे पाहिलें तर अशी पत्नि, तूं म्हणतोस तशा प्रेमानें मजवर प्रेम करीत असलेली तरुणी मला लाभेल हें मला तरी संभवनीय वाटत नाहीं. "

"संभवनीय आहे किंवा नाहीं हें आजच सांगता येत नाहीं. पण समज अशा तऱ्हेची तरुणी मिळूं लागली तर तिच्याशीं लग्न करावयास तूं तयार आहेस का ? "

" हो मोठ्या आनंदानें करीन. पण आज हें बोलणें कां ? "

त्याच्या मनांत शंका आली होती, पण ती त्यानें उघड बोलून दाखविली नाहीं.

"कमलेच्या लग्नाचा विचार माझ्या मनांत घोळतो आहे. " त्यानें मोघम उत्तर दिलें.

कमला ! माधवाच्या मनांत नवीन विचार येऊं लागले. तो आतां पूर्वीचा माधव नव्हता. मृत्युशय्येवरील चिंतामणरावांचे शब्द त्याच्या कानांत दुमदुमत होते. अखेरचें श्रीनिवासरावांनीं त्याला लिहून ठेविलेलें पत्र त्याच्या डोळ्यांपुढें दिसत होतें. आपलें स्वतःचें निंद्य वर्तन त्याला खात होतें. त्याच्यांत सर्व बाजूंनीं क्रांति होत होती. त्याचें अंतःकरण त्याला उपदेश करीत होतें. आपण सुधारावें असें त्याला वाटत नव्हतें, तर आपण सुधारलें पाहिजे अशी त्यानें आपल्या मनाशीं खुणगांठ बांधली होती.

वरील संभाषणानें त्याच्या मनांत खऱ्या प्रेमाचा उदय व्हावयास लागला होता. लागला होता नव्हे झाला होता. कमला ! कमलेकडे त्याचें मन ओढ घेऊं लागलें. प्रेम गुणलुब्ध असतें. कांहीं गुण सौंदर्यासारखे—दृश्य असतात, चर्मचक्षुला ते रिझवितात. कांहीं गुण अदृश्य असतात. ते ज्ञानचक्षूला रिझवितात. या दोन्ही प्रकारांच्या गुणांनीं कमला संपन्न होती. माधवास त्यांची मोहनी पडली. प्रेमाच्या जादूनें त्याला भारलें. लक्ष्मीपेक्षां दुप्पट वेगानें त्याचें प्रेम कमलेच्या प्रेमाकडे पाहूं लागलें.

आपल्या प्रेमौधाला कमलेचा प्रेमौघ मिळेल, तिच्या प्रेमौघाला आपला प्रेमौघ आंवरील असें त्याला खात्रीनें वाटूं लागलें.

माधवाचा रुकार दिसतांच वेळ पाहून विनायकानें कमलेजवळ तिच्या

लग्नाचा प्रश्न काढला. त्याला आलेलें पत्र त्यानें तिच्यापुढें टाकलें. तें तिनें वाचल्यावर तो म्हणाला.

" ताई, या पत्रांतील मजकूर सर्व समजायचाना ! "

कमला कांहींच बोलली नाहीं. ती तेथून जाऊं लागली.

" कमले, जरा थांब मी सांगतों तेवढें ऐकून घे, आणि मग जा पाहिजे तर. माधव तुझ्याशीं लग्न करावयास तयार आहे. मग हें लग्न ठरवावयाचें ना ? "

कमला लाजली. पण ती लज्जा आनंदाची होती. तिचा तिच्या मुखकमलावर ठसा उमटलेला दिसत होता. उत्तर देण्याऐवजीं तिनें जाण्याचा रस्ता धरला.

विनायकानें तिला थांबवून धरिलें.

" मी काय विचारतों तें सांग; नाहींतर लागशील मागून धुसपुस करावयाला ! "

" हें कायरे दादा, जाऊंदे मला आपली कशी ती " असें म्हणून त्याच्या हाताला हिसका देऊन ती निघून गेली.

विनायकाला जें पाहिजे होतें तें समजलें. आपला विचार त्यानें गोदावरीबाईस कळविला व एकंदर स्थितीही त्यांना सांगितली ! माधव अशातऱ्हेचा त्याला कमला कशी द्यावी ही शंका त्यांनीं घेतली; पण विनायकानें त्यांचें समाधान केलें. माधव पुढें बिघडावयाचा नाहीं याची आपल्याला पूर्ण खात्री आहे असें त्यानें आश्वासन दिलें व अखेरीस त्यांची संमति मिळविली.

माधव व कमला यांचा लवकच विवाह होणार ही गोष्ट जगजाहीर झाली. कमलेला व माधवाला यापासून आनंद झालाच, पण त्यांच्यापेक्षां लक्ष्मीला जास्ती झाला. आपल्या मैत्रीणीचें मनोराज्य आतां मनोराज्य रहाणार नाहीं. तिच्या प्रेमळ सहवासानें माधव चांगला होईल या खात्रीमुळें तिला आनंद होत होता. तिचा काल आनंदांत जाऊं लागला. कमलेच्या भावी स्थितीबद्दल ती तिची थट्टा करूं लागली. याप्रमाणें एक दिवशीं थट्टा करीत असतां ती तिला म्हणाली:—

" कमलाताई, या तुझ्या सर्व आनंदाचें कारण मी आहें. मी नसतें तर तुझें हें लग्नच जमलें नसतें. ह्मणून ह्मणतें आतांपासून बजावून ठेवतें कीं लग्न झाल्यावर मला विसरूं नकोस. "

" हो, ठाऊक आहे. ह्मणे मी लग्न जमविलें ! "

" माधवदादावर तुझें आहे हें जर मी तुझ्या दादांना कळविलें नसतें. "

" ह्मणजे ! तें तुझें पत्र होतें काय ? "

" हो. तुझ्यासाठीं मीच तें लिहिलें होतें. "

" माझ्यासाठीं का आपल्यासाठीं ? कोणाला ठाऊक कोणासाठीं लिहिलें होतेंस तें ! "

" माझ्यासाठीं ? माझाग त्यांत काय फायदा ? "

" ते बिलायतला गेले आहेत ते. त्याचसाठीं बरें का. "

"घरें तसें कां समजेनास. कांहीं असलें तरी तुझ्या मनाजोगतं झालंना ? "

कमला कांहींच बोलली नाहीं.

" आतां पहा बोलते का ती. "

याप्रमाणें सर्वत्रांना आनंद झाला होता. परंतु गोविंदराव व नानासाहेब या दोघांना मात्र हें लग्नाचें ठरल्यापासून चैन पडत नव्हतें.

प्रकरण ३८ वें.

रहस्य स्फोट.



लग्नाचें ठरल्यापासून, माधवाच्या व आपल्या प्रेमाला लौकरच लौकिकाच्या विवाहाचें स्वरूप येणार हें नक्की झाल्यापासून कांहींना कांहीं तरी निमित्त काढून कमला लक्ष्मीकडे येऊन माधवाला पाहून आपल्या प्रेमाचें कौतुक करूं लागली. ती आली असें समजलें कीं, माधवहि लक्ष्मीकडे जावयाचा व तेथें ह्या मुग्ध प्रेमबद्ध प्रेमीयांचें प्रेममीलन व्हावयाचें. दोघांनीं एकमेकांची दृष्टि चुकवून एकमेकांकडे पहात रहावें. एकमेकांना उद्देशून कांहीं तरी बोलावें. व अशातऱ्हेच्या सहवासांत एकमेकांला आनंदवावें. लज्जेमुळें हीं दोघेंहि अद्याप एकमेकांशीं मोकळेपणानें बोलत नसत कीं एकांतांत एकमेकांची गांठहि घेत नसत. त्यांना तसें करण्याचें धैर्यच होत नसे. लक्ष्मीनें असें प्रसंग पुष्कळदां आणले, पण ती गेली कीं तिच्या पाठोपाठ कमलेनें जावें.

ह्या दोघांच्या प्रेमाचा दिवसेंदिवस विकास होत होता. परंतु हा विकास होणें नानासाहेबांस व गोविंदरावांस आपापल्या फायद्यासाठीं इष्ट नव्हता. कमला दुसऱ्याची होईल ही धास्ती गोविंदरावास होती, तर माधव आपल्या हातचा जाईल ही धास्ती नानासाहेबांस होती. या दोघांच्या प्रेमांत व्यत्यय कसा आणावा, याचा हे दोघेजण आपापल्यापरी आपापल्याजवळ विचार करीत होते. त्यांना पुष्कळ मार्ग सुचले पण ते अमलांत आणणें त्यांना शक्य नव्हतें. दिलजानचें लफडें पुन्हां माधवाच्या मागें लावावें असें नानासाहेबांस कितीदांतरी वाटलें. पण सध्यांच्या स्थितींत तें साधेल कीं नाहीं याची त्यांना शंका वाटत होती. माधवाला पुन्हां आपल्या तावडींत घेणें त्यांना अशक्य वाटूं लागलें. लक्ष्मीबद्दल माधवाच्या मनांत पुन्हां प्रेमभाव उत्पन्न करावा असें गोविंदरावांस वाटे. पण तें देखील त्यांना साधण्यासारखें नव्हतें. काय करावें हें दोघांसहि सुचेना.

ह्याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यानंतर नानासाहेबांस युक्ति सुचली. गोविंद-रावांची अस्वस्थता त्यांच्या ध्यानांत येऊं लागली. पण यावावतींत त्यांच्या-जवळ आपण होऊन गोष्ट काढण्याचें त्यांना धैर्य होईना. आपण होऊन गोष्ट काढणें चांगलें नाहीं असेंहि त्यांस वाटत होतें. योग्य संधीची वाट पहात ते बसले.

गोविंदरावांची अस्वस्थता दिवसेंदिवस जास्त वाढत चालली. त्या दोघांच्या प्रेमचेष्टा पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड होई. कसेंहि करून त्यांच्या प्रेमांत बिघाड आणावा असें त्यांस वाटे. पण तो कसा आणावा, आपला कार्यभाग साधण्याच्या रंगानें हें कसें साधावें, हें मात्र त्याला सम-जेना. ह्यामुळें दिवसें दिवस त्याची वृत्ति जास्तीच अस्थिर होऊं लागली. ही त्याची अस्वस्थता लक्ष्मीच्या ध्यानांत आली, पण तिचें कारण तिच्या लक्षांत आलें नव्हतें.

संध्याकाळची वेळ. लक्ष्मी, माधव व कमला बंगल्यांत बसलीं होतीं. नेहेमीं प्रमाणें त्यांचें बोलणें चालूं होतें. त्या बोलण्यांत विनोद—आनंदी विनोद—पूर्ण भरलेला होता. त्या आनंदाचा भाव त्यांच्या हास्यादि प्रकारांवरून स्पष्ट होत होता. माधव व कमला यांच्या मुग्ध प्रेमचेष्टा चालल्या होत्या. कौतुकानें लक्ष्मी त्यांच्याकडे मुद्दाम कानाडोळा करीत होती. लक्ष्मी मुद्दाम कानाडोळा करीत होती, पण आपल्या दालनांत खिडकीच्या आड उभे असलेले गोविंदराव —मत्सरानें पेटलेले गोविंदराव त्या प्रेमचेष्टांकडे मुद्दाम पहात होते. त्याचा गूढ अर्थ ते आपल्या मनास पटवून घेत होते. आपल्या कामबाधेस ते असह्य बनवीत होते.

खरें झटलें असतां तिकडे त्यांनीं लक्ष द्यावयास नको होतें. पण ते तर मुद्दाम लक्ष घालीत होते. त्यांची आसक्ती त्यांना लक्ष द्यावयास लावीत होती. ज्या वस्तूची आपण इच्छा करतों, जी वस्तु आपली असावी असें आपणास वाटतें. ज्या वस्तूवर आपलें सर्वस्व अवलंबून आहे अशी मनाची दृढ समजूत झालेली असते, ती वस्तु दुसऱ्यास जवळ करतांना—आपल्याला लाथाडून दुसऱ्याला जवळ करतांना—पाहून होणारी मनाची स्थिति असह्य असते! समंजस मनुष्याच्या मनाची स्थिति आपली शांतता सोडते, तर गोविंदरावां-

प्रकरण ३८ वें.

सारख्या मनुष्याच्या मनाची स्थिति बेताल झाली. क्रोधाच्या पूर्ण आधीन झाला. मत्सरानें त्याला [illegible] बनविलें. त्याच्या मनावरचा त्याचा ताबा नाहींसा झाला.

" काय वाटेल तें होवो. पण कमलेला तुझी पत्नी होऊं द्यावयाची नाहीं. " त्वेषाचे उद्गार त्याच्या तोंडांतून बाहेर पडले. त्यानें आपली पाठ फिरविली तों नानासाहेब त्याच्यापुढें दत्त म्हणून उभे राहिले.

" काय म्हणालेत गोविंदराव ? "

गोविंदराव एकदम थिजले. त्यांचा तो क्रोध गेला व तो त्वेषहि गेला.

" अशाच तऱ्हेनें माधवाचें कल्याण चिंतता वाटतें ? "

नानासाहेबांचा आव माधवाच्या कळकळीचा होता. व त्यांचें बोलणें छद्मी होतें. पण गोविंदराव कांहीं कच्चे नव्हते. त्यांनींहि संभावितीचें पांघरूण घेतलें.

" कमलेला माधवाची पत्नी होऊं द्यावयाचें नाहीं हेंच मी म्हटलें आणि तें मी तुम्हांला पुन्हां सांगतों. माझ्या मुलीच्या कल्याणाची मला काळजी आहे. तिच्याशीं लग्न करावयाचें त्यानें पहिल्यानदां कबूल केलें होतें. तिच्यावर त्याचें प्रेम होतें. तीहि लग्न करावयास तयार झाली होती. परंतु ह्या कवटाळणीनें मध्येंच आपलें जाळें फेकलें, तें मला सहन कसें व्हावें ! "

" कसें व्हावें म्हणजे सहन करून घेतलें पाहिजे. माधव तुमचा मालक आहे. तुमच्या अन्नदात्याचा तो मुलगा आहे. त्याचें सुख पहाणें हें तुमचें कर्तव्य आहे. "

" नानासाहेब, माझें कर्तव्य मला समजतें. "

" आणि म्हणून अशा तऱ्हेनें वागतां. " नानासाहेब खोंचून बोलले.

त्यांचें बोलणें दुहेरी होतें. गोविंदराव बुचकळ्यांत पडले. आपलें गुपीत नानां समजले आहें कीं काय याची त्यांना भीती वाटूं लागली. त्या भीतीचा स्फोट त्यांच्या चेहऱ्यावर दिसूं लागला.

" तुम्ही जसें सांगाल तसें मी तुम्हांला विचारतों कीं लक्ष्मीचें तरी माधवावर प्रेम आहेका ? "

" प्रेम असल्याशिवाय का ती माधवाशीं लग्न करावयास तयार झाली ! "

" ती तयार झाली का तुह्मीं तिला तयार केलें. तिचें माधवाशीं लग्न व्हावें अशी तिची इच्छा होती का तुमची होती ? "

" समजा तिची इच्छा नसली. पण तिचें हितानहित त्याचप्रमाणें माधवाचें हितानहित बघणें माझें कर्तव्य असल्यानें मी तयार केली यांत तुमचें काय गेलें ! "

" गोविंदराव हे लपंडाव मला समजतात. तुमच्या गुपीताचा बभ्रा केला तर आतां समजेल माझें काय गेलें तें ! पण मला बभ्रा करून काय करावयाचें आहे. तुमचा चेहरा, त्यावर उमटलेले विकार हेंच सांगतात कीं, माधवाचें लग्न कमलेशीं होऊं नये, अशी तुमची इच्छा कां असावी ? गोविंदराव माधवाशींहि कर्तव्य नाहीं कीं तुमच्याशींहि नाहीं. मात्र माझा येवढा उपदेश लक्षांत ठेवा, कीं आपला हेतु साधण्य साठीं भलत्याच रानवट मार्गाचें अवलंबन करूं नका नाहींतर सगळेंच फसावयाचें. "

आपल्या बोलण्याचा पहिला स्वर त्यांनीं बदलला होता.

" तुमच्याप्रमाणेंच माधवाचें कमलेशीं लग्न होऊं नये अशी माझी इच्छा आहे. " जास्ती रहस्य वाढविण्याच्या हेतूनेंच ते ह्मणाले.

त्यांच्या हेतुप्रमाणें त्यांचें रहस्य वाढलें.

प्रकरण ३९ वें.

चोर खण.



काय झालें असेल तें असो. माधव व कमला यांच्या वर्तणुकींत लक्ष्मीला चमत्कारिकपणा दिसूं लागला. ती तिच्याकडे पहिल्यासारखी येईनाशी झाली. किंवा यदाकदाचित् आलीच, तर माधव तेथें यावयाचा नाहीं. ती नेहमीं चिंतेंत चूर असल्यासारखी दिसावयाची. तिचा पहिला आनंद नाहींसा झाला. फूल पांखरांची किंवा स्वच्छंदानें विहार करीत असणाऱ्या नदीची तिची उल्हासित वृत्ति मावळली. तिच्या सतेज मुराच्या चेहऱ्यांत फरक दिसूं लागला. एकतऱ्हेची विलक्षण धास्ती घेतल्यासारखी ती लक्ष्मीकडे आली म्हणजे वागूं लागे.

अशीच जरी नव्हे, तरी पस्तावा करणाऱ्या मनुष्याप्रमाणें माधव दिसूं लागला. तो नेहमीं कांहींतरी विचारांत दिसावयाचा. एखादेवेळेस अंतस्थक्रोधानें संतप्त झाल्याप्रमाणें तो हिरवानिळा व्हावयाचा. कधीं रागांत, तर कधीं विचारांत, कधीं असें होणें शक्य आहे काय? या शोधक वृत्तींत तर कधीं पस्ताव्यांत, कधीं आशेंत तर कधीं घोर निराशेंत असलेला तो नेहमीं दिसावयाचा.त्याचा एकलकोंडेपणा दिवसेंदिवस वाढूं लागला. घरांतील कोणत्याहि मनुष्याचा सहवास होईल म्हणून तो टाळूं लागला.

हें असें कां व्हावें हें लक्ष्मीला समजेना. दोघांच्याहि प्रेमांत बिघाड आलेला आहे एवढें ती समजली. पण तो बिघाड कां यावा याचें तिला कारण समजेना. स्वभावामुळें माधवास तिला विचारणें शक्य नव्हतें. तसेंच कममेला विचारणेंहि तिला अवघड वाटत होतें. गर्भित प्रश्नांनीं तिनें चारपाच वेळां कमलेजवळ ह्याचा छडा लावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांत तिला म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. लक्ष्मीप्रमाणें विनायकाच्या ध्यानांत

देखील ही गोष्ट आली. त्यानें आपल्या बहिणीजवळ विचारपूस केली, परंतु त्याला देखील थांग लागेना. माधवाजवळ गोष्ट काढली असतां तो उडवाउडवीची उत्तरें देत असे. आपल्या मनांतील स्पष्टभाव ह्या दोघांपैकीं कोणीहि बोलून दाखवीत नव्हतें. लग्नाला अद्यापपर्यंत तीनचार महिन्याचा अवकाश असल्यानें तोंपर्यंत सर्व कांहीं समजेल या आशेवर विनायक बसला.

परंतु या समजुतीनें लक्ष्मी समाधान करून घेणारी नव्हती. या एकदंर भानगडींत कांहीं तरी गूढ प्रकार असावा व त्याचे परिणामहि भयंकर होणारे असावेत असें तिला वाटूं लागलें होतें. पण हें गूढ काय असावें, याचा तिला उमज पडेना.

माधव व कमला यांच्याप्रमाणें हें गूढ तिला गूढ होऊं लागल्यानें तिचीहि वृत्ति अस्वस्थ होऊं लागली. व या अस्वस्थतेंण जसजसें हें प्रकरण लांबणीवर जाऊं लागलें तसतशी भर पडूं लागली. ह्या अस्वस्थतेंतच तिनें एकेदिवशीं आपलें टेबल उघडलें. इकडले कागद तिकडे व तिकडले कागद इकडे ठेव यापलीकडे टेबल उघडण्याचा तिचा दुसरा हेतू दिसत नव्हता.

टेबलाचे सर्व खण काढून तिनें बाहेर ठेविले होते. व तिची कागदाची विचकाविचक चालली होती. हा कागद वाचून पहा, तो वाचून पहा. हा इकडे टाक, तो तिकडे ठेव ह्याप्रमाणें अस्वस्थ असलेल्या मनास कसें तरी रिझवतां झिजवतां अखेरीस ती कंटाळली. बाहेर पडलेले कागद पुन्हां त्या खणांत भरून तिनें ते भगभर टेबलांत बसविले. सर्व खण बसले पण एक कांहीं बसेना. त्याच्या आंत कांहीं तरी अडकलें असावें ह्मणून ती पाहूं लागली, तो एक लहानशी किल्ली तिच्या हाताला लागली. ती किल्ली त्या टेबलाच्या किल्यांपैकीं नव्हती. ती अतिशय लहान होती व बरेच दिवसांची जुनाट दिसत होती. तो खण बसविल्यानंतर ती आपल्या बिछान्यावर जाऊन पडली.

ती बिछान्यावर जाऊन पडली पण तिला झोंप कांहीं येईना. त्यावेळीं रात्रीचे बारा वाजून गेले होते. तिचें मन विचार तरंगावर सारखें तरंगत होतें. नानातऱ्हेचे विचार, नानातऱ्हेच्या कल्पना तिच्या डोक्यांत एकामागून-एक येत होत्या व त्याप्रमाणें त्या मावळतहि होत्या. कांहीं वेळानें तिच्या

डोक्यांत नवीन कल्पना आली व त्यासरशी ती उठून टेबलाजवळ आली. टेबलाच्या खणांतून ती नवीन सांपडलेली किल्ली तिनें बाहेर काढली व ती निरखून पाहूं लागली.

" ही एवढी लहान किल्ली कशाची बरें असावी व ती आजच मला कां सांपडावी ? " तिनें आपल्या मनाशींच प्रश्न केला.

ज्या खणांत तिला ती किल्ली सांपडली होती तो खण तिनें बाहेर काढला. त्यांतील सर्व कागद तिनें बाहेर काढले. ती किल्ली त्यांत कोठून आली असावी हें ती पाहूं लागली. ती किल्ली ठेवण्याची चोरजागा तिला ताबडतोब सांपडली. ती चोरजागा पहातांच ती किल्ली महत्वाची असावी, कोणच्या-तरी चोरखणाची असावी असा तिच्या मनाचा ग्रह झाला व तो चोरखण ती शोधूं लागली.

हें टेबल श्रीनिवासरावांचें होतें व ते मेल्यानंतर तें लक्ष्मीच्या वापरण्यांत होतें.

पुष्कळ वेळपर्यंत तिनें ती चोर जागा धुंडाळली. पण ती कांहीं तिला सांपडेना. दिवा घेऊन खालून परतून तिनें तें सर्व टेबल बारकाईनें पाहिलें, पण चोरखणाचा पत्ता लागेना ! ज्या अर्थी किल्ली त्याच टेबलांत अशा तऱ्हेनें ठेवलेली होती, त्याअर्थी त्या किल्लीनें उघडणारा चोरखण त्याच टेबलांत असावा अशी तर तिची पक्की खातरी होती. पण चोरखण तर सांपडत नव्हता. अखेरीस चोरखण शोधून काढण्याचा तिनें निराळा उपक्रम चालविला. त्या टेबलाची जागा ती टिचक्या मारून तपासूं लागली ! ही तिची युक्ती अखेरीस साधली व चोरखणाची जागा तिला सांपडली !

चोरखणांतले कागद वगैरे तिनें बाहेर काडले. एक वही, थोडेबहूत कागद व श्रीनिवासराव, माधव व त्याची आई या तिघांचा एक फोटो एवढेंच काय तें त्या खणांत होतें. बराच वेळ ती त्या फोटोकडे पहात बसली होती. जुन्या आठवणी व निरनिराळे विचार त्या फोटोमुळें तिच्या डोक्यांत खेळूं लागले होते. श्रीनिवासराव व त्यांची बायको यांच्या प्रेमळपणाची आठवण तिच्यापुढें दत्त म्हणून उभी राहिली ! तिला गहिंवर आला. तिचे डोळे प्रेमाश्रूंनीं डबडबून आले. तिचें कोमल मन सद्गदीत झालें.

माधवाचे आईबाप दोघेंहि सध्यां जिवंत असतीं तर ! हाहि विचार तिच्या मनांत आला. हे दोघे जिवंत असते तर माधवाची आज काय स्थिति असती ? तो आजच्यासारखा दुःखार्णवांत बुडालेला असता काय ? त्याचें दुःख नाहींसें करण्याची त्यांनीं केवढी खटपट केली असती ; असे एकना अनेक विचार तिच्या मनांत खेळत होते.

कांहीं वेळानें हे कागद पत्र काय आहेत तें पहावें असें तिला वाटलें. तिनें नाजुक हातानें डोळे भरून पहात पहात आपल्या हातांतील फोटो खालीं ठेवला व ते कागद पत्र उचललें. पहिलें मलपृष्ठ उघडलें व आतां ती वाचावयास सुरवात करणार इतक्यांत तिच्या मनांत पुन्हां विचार आला व तिनें ती वही बाजूला सारली.

चोरखणांत असलेले हे कागद आपण वाचणें योग्य आहे का ? हा उदात्त विचार तिच्या मनांत आला होता. दुसऱ्याचें रहस्य आपण समजून घेणें योग्य नव्हे, हें कागदपत्र वाचण्याचा अधिकार आपणांस नाहीं. तो माधवास आहे अशी तिच्या मनाची भावना झाली म्हणूनच ते कागदपत्र तिनें बाजूला सारले व खालीं ठेवलेला फोटो घेऊन अचल दृष्टीनें पुन्हां त्याच्याकडे पाहूं लागली. यावेळीं तिच्या दृष्टींत पूज्यभाव व्यक्त होत होता.

थोड्यावेळानें तिनें तो फोटो खालीं ठेवला. सर्व कागदपत्र धुढारलें, तो फोटो व तें होतें त्या ठिकाणीं ठेवलें व निश्चिन्त मनानें बिछान्यावर जाऊन पडली. तिच्या मनांत ह्यावेळीं कसलाहि विचार नव्हता, असें तिच्या मुद्रेवरून दिसत होतें विचार नव्हता किंवा विचार करण्याची शक्ति नव्हती. काय वाटेल ते झणा ती बिछान्यावर निश्चिन्त पडली व एक बाजून गेला होता तरी तिचा डोळा कांहीं लागत नव्हता. क्षुब्ध समुद्राच्या लाटेप्रमाणें तिच्या विचारतरंगाची लाट जोरानें उसळून वाटल तिकडे वहावत चालली होती. अखेरीस अनपेक्षित प्रकाररूपी खडकावर ती जाऊन आपटली व तिचें शतशः लहान लहान तुकडे होऊन त्यारूपानें ती पुन्हां समुद्राच्या खोल पाण्यांत मिसळली. तिची उग्रता मावळली व शांत झाली. पुन्हां समुद्राला खोल पहाणारी शक्ति संचार करीत असल्यानें ती लाट जशी पुन्हां उसळते, तशी लक्ष्मीच्या विचार तरंगाची पुन्हां उसळी. ती तेव्हां इतस्ततः नाचावयास लागली.

दोन वाजले तरी लक्ष्मीला झोंप येईना. पुन्हां एकवार तिनें तो चोरखण उघडला व त्यांतील सामान बाहेर काढलें. पुन्हां एकवार तिनें तो फोटो आपल्या दृष्टीसमोर धरला. त्याच्याकडे पाहून आपल्या अस्थिर मनास स्थिर करण्याचा तिनें प्रयत्न केला; पण यावेळेस तो साधला नाहीं. या चोरखणांतल्या कागदांत काय आहे तें पहावें, असें तिला उत्कंठतेनें वाटं लागलें. आपल्या वडिलांस किंवा घरांतील कोणत्याहि माणसांस न कळवि-ण्याइतकें या कागदांत काय असावें म्हणून श्रीनिवासरावांनीं येवढ्या व्यवस्थेनें तें लपवून ठेविलें होतें,हें जाणण्याची तिला जिज्ञासा–अनावर जिज्ञासा–झाली. आपण करतों हें चांगलें किंवा वाईट याचा विचारहि तिच्या मनांत आला नाहीं. तिनें त्या कागदपत्रांना बांधलेली दोरी सोडली, त्यांत असलेली वही तिनें हातांत उचलून घेतली व आतां तिचें मलपृष्ठ ती उघडून वाचा-वयास सुरवात करणार, इतक्यांत त्या वहींतून एक पाकीट खालीं पडलें. त्यावर लाल पेन्सलीनें खालील शब्द लिहिलेले होते.

" नवीन मृत्युपत्राचा मसुदा. "

या अक्षरांखालीं स्मरणार्थ जी तारीख घातली होती, ती श्रीनिवासराव वाघीच्या तडाख्यांत सांपडले त्या दिवसाच्या आदल्या दिवसाची होती.

लक्ष्मीच्या डोक्यांत भयंकर कल्पना आली, व क्षणभर तिचें देहभान गेल्यासारखें झालें !

प्रकरण ४० वें.

बिघाड कोणी पाडला ?



सा च्या रात्रींत लक्ष्मीचा डोळ्याला डोळा लागला नाहीं. विचारांनीं, अनेक भयंकर विचारांनीं तिचें डोकें जास्त त्रस्त झालेलें होतेंच. पण सकाळ केव्हां होते, याचीहि ती वाट पाहत होती. सकाळ झाल्याबरोबर प्रातर्विधि आटोपून ती अगोदर कमलेकडे आली. इतक्या लौकर तिला आलेली, त्याचप्रमाणें तिची चर्या बदललेली पाहून कमलेच्या पोटांत धस्स झालें ! कांहींतरी जास्तीकमी झालेलें असावें, अशी ताबडतोब कल्पना कमलेच्या डोक्यांत आली व त्यासरशीं तिनें तिला विचारलें–

" लक्ष्मी इतक्या पहाटेस कोणीकडे आलीस ? "

" तुझ्याचकडे, माझें तुझ्याशीं काम आहे. तर चल तुझ्या खोलींत. " असें म्हणून लक्ष्मीनें तिला हाताला धरून तिच्या खोलींत नेलें व आपल्यामागून दार बंद करून घेतलें.

कमला जास्तीच घाबरली व तिच्या तोंडाकडे बघूं लागली.

" कमले मी विचारतें तेवढ्या प्रश्नांचीं सरळ उत्तरें दे. अगदीं कांहीं देखील चोरून ठेवूं नकोस. "

घोगऱ्या आवाजांत लक्ष्मी म्हणाली. थोडा वेळ ती स्तब्ध राहिली व पुन्हां तिला अर्धवट आर्जवयुक्त म्हणाली–

" मला सरळ उत्तरें देशीलना ? अगदीं अगदीं कांहीं देखील लपवून ठेवूं नकोस बघ. "

अगोदरच घाबरून गेलेली कमला ह्या तिच्या बोलण्यानें जास्तीच घाबरली. ती काय, कशासंबंधीं विचारणार, याची अंधुक कल्पना तिच्या डोक्यांत आली

होती. तिनें होकारार्थी मान हालविली, पण ती जाणून बुजून समजुतीनें हालविलेली नव्हती.

" आतांशी तूं आमच्याकडे कां येत नाहींस ? "

कमलेनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

" माधवाच्या व तुझ्या प्रेमांत बिघाड आला म्हणून तूं येत नाहींस का ? "

तरीहि कमला स्तब्धच ! तिनें आपलें तोंड कसें तें उघडलें नाहीं.

" कमले, तूं अशी मुकी कां ? बोलत कां नाहींस ! मला सांगितल्यापासून कांहीं वाईट होईल असें का तुला वाटतें ? असें तूं समजत असशील तर ती तुझी चूक आहे ! तुमचा तुह्मां-दोघांचा नाश व्हावा, म्हणूनच कोणी चांडाळानें तुमच्या ह्या प्रेमांत बिब्बा घातला असावा. काय झालें तें मला सांग ! मीचना तुझें लग्न जमवून आणलें ? लग्न जसें जमवून आणलें तसें तें पार पाडणें मला नको का बघायाला ? अशी आंतल्या गांठीची होऊं नकोस ! " अगदीं काकुळतीच्या स्वरानें लक्ष्मी म्हणाली.

" लक्ष्मी तुला सांगावेसें वाटतें पण...नको. " तिच्या त्या स्वरानें भांबावून कमला उद्गारली.

" नको कां म्हणतेस ! सांग, गडे सांग, माझा जीव कसा टांगल्यासारखा झाला आहे ! "

कमलेनें आपलें तोंड बंद करून घेतलें तें घेतलें !

"कमले, मी तुझी इतकी काकुळती करत्यें, तरी तुला माझी दया येत नाहीं का ? तुझ्यासाठीं, माधवदादासाठीं माझा जीव इतका तुटत असतां तुला त्याचें कांहींच का वाटत नाहीं ? आणि हो. बरोबर. तुला कां वाटावें ? "

"लक्ष्मी असें मात्र म्हणूं नकोस. "

"कां ? मी असेंच म्हणणार. तूं जोंपर्यंत मला सांगावयाची नाहींस, तोंपर्यंत मी अस्सेंच म्हणणार, समजलीस. "

"म्हण तू पाहिजे असेल तर बापडी. तुझ्या म्हणण्याकडे मी लक्ष देणार नाहीं. "

"यापेक्षां असेंच सांगना, कीं तूं माझी मैत्रीण नाहींस म्हणून; वैरीण आहेस असें सांग. "

"लक्ष्मी मीं असें कसें म्हणूं? असें म्हणावयास माझी जीभ कशी धजेल? तूं वाटेल तें म्हण, पण तूं माझी जिव्हाळ्याची मैत्रीण आहेस व मी तुला आजपर्यंत तशीच समजत आलें आहें."

"हो. इकडे जिव्हाळ्याची मैत्रीण म्हणून वेल्हाळायचें आणि इकडे अशा तऱ्हेनें वागवायचं ! असंच कीं नाहीं ?"

"लक्ष्मी मी तुला सर्व सांगत्यें. तुला–माझ्या जिव्हाळ्याच्या मैत्रीणीला– वाईट वाटेल म्हणून सांगत नव्हत्यें. ',

" सांग तर मग. "

" पहा सांगूं ना ? "

" हो पहायचं काय त्यांत सांग, खुशाल सांग. '

" आमच्या प्रेमांत गोविंदरावांनीं विघाड आणला ! '

बराच वेळ दोघीहि स्तब्ध होत्या. थोड्या वेळानें लक्ष्मी म्हणाली–

" आणि तो कसा ? "

" एकांतांत मला गांठून मजजवळ प्रेमालाप काढले. मला टाकून द्या... यांना कां स्वीकारल्येस असें खोटेंच मला विचारलें, तें त्यांच्या कानावर पडलें. मी घाबरून बाहेर आलें तों हे मला तेथें दिसलें. झालें. त्या दिवसापासून ..... "

" आणि हें सर्व कोठें घडलें ?

" तुमच्याच घरीं. "

लक्ष्मी हें उत्तर ऐकून तावडतोब घरीं येण्यास निघाली. " उद्यां तुला सर्व सांगत्यें असें म्हणून ती जागची उठली. हें कोणाजवळ उद्यांपर्यंत, मी सांगे-पर्यंत सागूं नकोस एवढें तिला वजावून ती खोलीबाहेर पडली.

भ्रमिष्टाप्रमाणें ती घरीं आली.

खेद, आश्चर्य, तिरस्कार, संताप वगैरे अनेक विकारांनीं तिच्या डोक्यांत काहूर करून सोडलें होतें. ती येऊन आपल्या खोलींत पडली होती. परंतु ती कसला विचार करीत होती, तिच्या मनांत काय घोळत होतें, हें तिला देखील

सविस्तर सांगतां आलें नसतें. ती विचार करीत होती, एवढी गोष्ट खरी; त्या विचाराचें कारण तिच्या हृत्पटलावर खोदले गेलें होतें. तिच्या ज्ञानचक्षूंपुढें तें सारखें दिसत होतें, तरीपण तो विचार कसला याची जाणीव तिला नव्हती.

ह्याप्रमाणें बराच वेळ गेल्यावर तिच्या डोक्यांतील विचारांचें काहूर कमी झालें. तें अजिबात मावळलें. निर्विकार व निश्चळ दृष्टीनें ती वरतीं आढ्याकडे पहात स्वस्थ पडली होती.

जेवणाची वेळ झाली, ती मुकाट्यानें जाऊन जेऊन आली व पुन्हां आपल्या खोलींत येऊन पडली. या वेळेला तिचें डोकें शांत झालें होतें. विचारांचा घोटाळा किंवा शून्यता आतां तेथें नव्हती. त्याचा त्रस्तपणा व बधिरता हीं दोन्हीं गेलीं होतीं.

'आतां कसें करावें' याचा ती शांतपणें विचार करीत होती. प्रसंग तर चमत्कारिक होता. माधवाच्या प्रेमांत, फार तर काय, पण त्याच्या अद्यापपर्यंतच्या आयुष्यांत आपल्या बापानेंच बिघाड केला आहे, हें तिच्या पूर्णपणें प्रत्ययास आलें होतें. हें सर्व निस्तारावें कसें हाच आतां ती विचार करीत होती. एकीकडे बापाचें नातें, त्याचें दुष्ट आचरण, तर दुसरीकडे आपलें कर्तव्य, माधवाचा भावी आयुष्यक्रम, कमलेचें प्रेम यांतून तिला मार्ग काढावयाचा होता. एकीकडे पितृजन्य प्रेमानें होत असणारी अंतस्थ मानसिक विटंबना, तर दुसरीकडे त्याच प्रेमानें पुढें होणारी जगजाहीर लौकिकाची विटंबना. ह्या कातरींत ती सांपडली होती. कसें करावें हें तिला समजत नव्हतें.

तिची सत्याची प्रीति जागृत होती. आपल्या बापाला वाईट वाटलें तरी हरकत नाहीं, याच्या दृष्टीनें आपल्याजवळ त्याची विटंबना झाली तरी चालेल, पण माधवाचें नुकसान, त्याच्या सर्व आयुष्याची माती होऊं नये. आपल्यावर डोईजड उपकार करून ठेवणाऱ्याच्या एकुलत्या एक मुलाची अधोगती होऊं नये ही तिची सात्विक बुद्धि, तिला सत्याच्या मार्गालाच जा म्हणून नेटानें सांगत होती.

गेल्या रात्रीं सांपडलेला मृत्युपत्राचा मसुदा घेऊन ती आपल्या बापाच्या खोलीकडे गेली. गोविंदराव यावेळीं एकटेच होते.

वापाजवळ बोलण्यासाठीं म्हणून ती आली खरी, परंतु तिच्या तोंडांतून शब्द निघेना. ती आंत जाऊन नुसती उभी राहिली.

" काय काम आहे लक्ष्मी ! " गोविंदरावांनीं तिला विचारलें.

" श्रीनिवासरावांच्या मृत्युपत्राबद्दल मला आपल्याजवळ कांहीं बोलावयाचें आहे " अंगांत शक्तिसंचार झाल्याप्रमाणें ती एकदम उद्गारली.

गोविंदरावांच्या चेहऱ्यांत चलबिचल झाली. ती लक्ष्मीनें पाहिली.

" बाबा, ज्या मृत्युपत्रानें तुम्ही माधवाचे पालककर्ते बनलां, तें खरें होतें का ? "

लक्ष्मीच्या सबळ व मुद्याच्या प्रश्नानें गोविंदरावांच्या तोंडचें पाणी पळालें. !

" रद्द केलेलें मृत्युपत्र पुढें करून तुम्ही माधवाचे पालनकर्ते बनलां तें कशासाठीं ? त्याच्या कीं तुमच्या फायद्यासाठीं ? त्याच्याशीं लग्न करावयाचा मला जो आग्रह करीत होतां तो कशासाठीं ! त्याच्या सुखासाठीं कीं तुमच्या सुखासाठीं ! त्याच्या व कमलेच्या प्रेमांत जो बिघाड आणलात, जें नीचपणाचें कृत्य केलेंत, तें कोणाच्या त्याच्याच सुखासाठीं ! नाहीं का ? "

त्वेषानें लक्ष्मी अगदीं फणफणली होती.

"लक्ष्मी, तूं काय बोलतेस याची तुला शुद्धि आहे का ? "

"मला शुद्धि आहे, सर्व कांहीं आहे. तुम्ही आपली वागणूक सुधारावी हें तुम्हांला सांगण्यासाठींच मी आज येथें आलें आहें."

"तुला खात्रीनें वेड लागलेलें दिसतें."

"आपली कुकर्में झांकण्यासाठीं मला पाहिजे असेल तर वेड लागलें आहे असें म्हणा. पण मी वेडी आहें कीं चांगली आहें याची तुम्हांला आतांच खात्री करून देत्यें. हा पहा कागद."

गोविंदराव घाबरले तर होतेच. पण तो कागद पहातांच त्यांच्या छातींत धडकी भरल्यासारखें झालें ! श्रीनिवासरावांचें अक्षर त्यांनीं तेव्हांच ओळखलें होतें. इतक्यांत लक्ष्मीनें त्यांना त्यांतून कांहीं मजकूर वाचून दाखविला. तो मजकूर असा—

" ह्या मसुद्याप्रमाणेंच केलेलें मृत्युपत्र माझ्या लिहिण्याच्या पेटींत ठेविलें आहे. चिंतामणराव वगैरेंच्या साक्षी घेतल्यानंतर तें कायद्याप्रमाणें राजिस्टर करावयाचें आहे. "

" तुमचा भ्रमाचा भोंपळा फोडावयास मला उशीर लागणार नाहीं, हें समजलें का आतां तुह्मांला ? आतां वेडी....."

कर्कश किंकाळी फोडून गोविंदराव धाडकन जमीनीवर पडले ! लक्ष्मी घाबरली. त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्या डोक्यावर हात ठेऊन तिनें त्यांना हांक मारली.

" बाबा "

" बाबा ! कोण बाबा ? "

गोविंदरावांचे डोळे उघडले व आश्चर्यानें ते तिच्याकडे पाहूं लागले. ती जास्तच घाबरली.

" मुली तूं कोणाची कोणीकडे, माझ्या लक्ष्मीकडे आलीस होय ! '

" बाबा, मी तुमची लक्ष्मीना ! "

गोविंदराव निरखून तिच्याकडे पाहूं लागले. त्यांनीं टाळी वाजविली. मोठ्यानें हसून ते ह्मणाले.

" मला फंसवतेस होय ! "

लक्ष्मीच्या मनांत भयंकर कल्पना आली ! तिची भीति दुणावली. ती घाबरली. हातांतून अगोदरच गळून पडलेला कागद तेथेंच पडला होता. कोणास तरी बोलवावें ह्मणून ती तडक तशीच खोलीच्या बाहेर पडली.


ती गेल्याबरोबर गोविंदरावांच्या वेडाची लहर गेली. चांगल्या शुद्धींतल्या मनुष्याप्रमाणें त्यांनीं तो कागद उचलून घेतला.

इतक्यांत बाहेर पावलें वाजल्याचा आवाज झाला. त्यानीं त्या कागदाची कशीबशी घडी करून पोटकुळीं खोंवली व घाईघाईनें बिछाना गांठला.

दार उघडून नानासाहेब व लक्ष्मी आंत आलीं.

प्रकरण ४१ वें.

कारस्थान–परिस्फोट.



घेतलेल्या सोंगाची वतावणी गोविंदरावांनीं चांगली केली होती. आपला कार्यभागहि त्यांनीं साधून घेतला होता. यापुढें सोंगाची जरी त्यांना विशेष जरूरी नव्हती, तरी लक्ष्मी किंवा इतर कोणाला आपला संशय येऊं नये हें पाहणें त्यांना इष्ट होतें.

" कोण आहे ? " बिछान्यावर पडलेले गोविंदराव कण्हत म्हणाले.

" मी लक्ष्मी आहें बाबा. "

" आणि दुसरें कोण नानासाहेब आहेत वाटतें ? "

" होय. "

" बाळे, माझें कपाळ अतिशय दुखतें आहे. थोडीशी सुंठ उगाळून आण बरें. " ते शुद्धीवर असल्याप्रमाणें बोलत होते. तरीपण खात्री करून घेण्यासाठीं लक्ष्मीनें त्यांच्या जवळ येऊन पुन्हां विचारलें–

" बाबा आतां तुह्मांला बरें दाटतेंना. मघांसारखें आतां वाटत नाहींना. "

" मघांसारखें ! मघांसारखें काय म्हणतेस. "

" म्हणजे मघां तुह्मीं वेड्यासारखें बरळत होतां, ओरडले होतां. "

" छत् असें मीं कांहींच केलें नाहीं.

" कदाचित् पित्तक्षोभानें आपण बरळलों असाल गोविंदराव. तें आपल्याला कसें समजणार ? शिवाय आतां डोकें अतिशय दुखतें आहे, म्हणून म्हणतच आहांत. "

" असेल कदाचित. पण लक्ष्मी सुंठ आणतेसना. माझें कपाळ फार दुखतें आहे. "

सुंठ आणण्यासाठीं लगबगीनें लक्ष्मी खालीं आली. त्या कागदाची तिला अद्याप आठवणच नव्हती.

लक्ष्मी गेल्यावर नानासाहेब जवळ येऊन बसले. सहज त्यांनीं गोविंदरावांच्या कपाळावर हात ठेऊन पाहिला तों तें गार ! कपाळदुखीच्या कपाळासारखें तें गरम झालेलें नव्हतें. त्यांच्या डोक्यांत कल्पना आली. गोविंदरावांची नजर चुकवून ते त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागले. पण तेथें त्यांना काय दिसणार होतें ?

लक्ष्मी सुंठ घेऊन आली व तिनें ती गोविंदरावांच्या डोक्यावर घातली.

" लक्ष्मी मला आतां स्वस्थ पडावेंसें वाटतें. थोंडी झोंप लागली तर बरें वाटेलसें वाटतें. तेवढ्या खिडक्या वगैरे बंद करून घे.

" बाबा, पडा तुम्ही. मीहि तुमच्या पायाला थोडेंसें तूप चोळतें, म्हणजे लवकर झोंप येईल. "

" गोविंदराव जरा झोंप लागली तर खरोखरच तुम्हांला बरें वाटेल. " नानासाहेब म्हणाले.

आपल्या मनांत आलेला संशय त्यांनीं कोणत्याहि तऱ्हेनें बाहेर दिसूं दिला नाहीं.

"नानासाहेब, जा तुम्हीं कशाला बसतां उगीच. उगीच या पोरीनें घाबरून तुम्हांस बोलाविलें. "

नानासाहेब गेले. लक्ष्मी त्यांच्या पायाला तूप चोळीत होती. पितृप्रेमानें विव्हळ झालेलें तिचें मन आतां शांत झालें होतें. घडलेल्या सर्व गोष्टींचा ती हळू हळू विचार करूं लागली. आपण करावयास गेलों काय आणि झालें काय, हा विचार तिच्या मनांत आला. हा विचार येतांच तिला त्या मृत्युपत्राच्या मसुद्याची आठवण झाली. या गडबडींत आपण तो कोठें तरी टाकला ! कोठें टाकला याची तिला आठवण होईना. तो दुसऱ्याच्या हातांत पडणें इष्ट नव्हतें. त्याच्यांतील मजकूर बाहेर आल्यास तिच्या बापाची अब्रू जाऊन एखादे बेळेस त्याच्यावर भयंकर प्रसंग गुजरणारा होता.

तिचें मन अस्वस्थ झालें. तिनें उठून सर्व खोली धुंडाळली. ती कावरी-बावरी झाली. गोविंदरावांस हें सर्व कळत होतें पण त्यांनीं डोळ्यांचें मीष घेतलें होतें. ते घोरत होते.

कागद गोविंदरावांच्या हातीं लागला असल्यास तिला विशेष काळजी वाटण्याचें कारण नव्हतें; पण तो त्यांच्या हातीं लागला असेल असें तिला वाटेना. घडलेला सर्व प्रसंग ती पुनः पुन्हां आठवूं लागली. आपले बाबा वेड्या-सारखे ओरडले व चरळावयास लागले तेव्हां आपण त्यांच्याजवळ आलों. त्यांच्याजवळ येईपर्यंत तो कागद आपल्या हातांत होता. पण नंतर तो काय झाला ?

आपल्या बापाच्या हातीं तो कागद पडला असेल, अशी नुसती शंका घेण्यास देखील तिचें मन तयार नव्हतें. मग तो त्याच्या हातीं पडला असेल, अशी कल्पना तरी तिला कोठून यावी ? त्या धांदलींत आपल्याच हातून तो खालीं जा-तांना पडला असेल, अशा समजुतीनें ती खालीं जाऊन शोधून आली. पण तो तिला सांपडला नाहीं.

कदाचित् नानासाहेबांस तर तो सांपडला नसेलना ! आणि त्यांनीं तो वाचून पाहिला असेल तर ! ह्या नुसत्या कल्पनेनेंच तिचें काळीज थरारलें ! त्यांना वि-चारण्यासाठीं ती खोलींतून बाहेर पडली. त्यांचा तपास करीत करीत ती खालीं बगीच्यांत लगबगीनें गेली. जाईच्या मंडपाखालीं सिगारेटच्या धुराचे भप-कारे सोडीत नानासाहेब बसले होते.

" नानासाहेब, मघांच्या गडबडींत मी माझ्या हातांतला कागद कुठें ठेवला तो पाहिलात का ? " घाबरलेल्या आवाजांत लक्ष्मीनें विचारलें.

" नाहीं. मी कांहीं पाहिला नाहीं. " त्यांनीं शांतपणानें उत्तर दिलें.

कागदाचा पत्ता कसा लावावा हें तिला समजेना. तिची मती कुंठित झाली. काय करावें हें तिला समजेना. जड पायांनें ती तेथून घराकडे वळली.

नानासाहेबांच्या अगोदरच्या संशयांत भर पडली. गोविंदराव एकाकी वेडे होतात काय ! लक्ष्मी धावरून आपणांस बोलावूं येते काय ! आपण गेल्याबरोबर गोविंदरावांचें वेड अजिबात नाहींसें होतें काय ! लक्ष्मी कागदाचा तपास करते काय ! हें सर्व त्यांना सरळपणाचें दिसेना.

गोविंदरावांचें ढोंग आणि लक्ष्मीचा कागद यांचा ते विचार करूं लागले. गोविंदरावांच्या खऱ्या स्वभावाची त्यांना ओळख झालेली होती. ह्या सर्व प्रकारांत कांहींतरी काळेंबेरें असावें असें त्यांना उघड दिसूं लागलें. ते आपल्या जागेवरून उठले व घराकडे जावयास निघाले.

लक्ष्मीला जाऊन बराच वेळ झालेला पाहून त्या कागदाचा बेपत्ता किंवहुना नाश करावा, ह्मणून गोविंदराव जाग्यावरून उठले. कनवटीची कागदाची गुंडाळी काढली, इतक्यांत दरवाजा उघडा पाहून तो लावून घेण्यासाठीं ते दाराजवळ आले. दार लावण्यासाठीं त्यांनीं दोन्ही फळ्या लोटल्या, तों नानासाहेबांनीं त्या उलट लोटून त्यांचेपुढें दत्त ह्मणून ते आंत येऊन उभे राहिले !

गोविंदरावांच्या एका हातांत कागदाची गुंडाळी होतीच. ती नानासाहेबांनीं चटकन् त्यांच्या हातांतून हिसकावून घेतली व दरवाजाकडे वळून त्यांनीं तो बंद केला.

" गोविंदराव....."

पण गोविंदरावांनीं त्यांना जास्ती बोलूंच दिलें नाहीं. कागदासाठीं ते त्यांच्या हाताला झोंबूं लागले.

" गोविंदराव, हा कागद कसला आहे हें पाहिल्याशिवाय मी तो तुह्मांला घेऊं देणार नाहीं. " हातांतली गुंडाळी घट्ट मुठींत धरून नानासाहेब ह्मणाले.

पण ही गोष्ट गोविंदरावांना कबूल नव्हती. त्यांची त्यांच्या हाताशीं झोंबाझोंबी चाललीच होती.

" गोविंदराव, माझ्याप्रमाणेंच इतर पुष्कळ मंडळींची दृष्टि या कागदावरून जावी असें जर तुह्माला वाटत असेल तर दंगा मस्ती करा. आणि हें जर तुह्मांला नको असेल तर जरा स्वस्थ बसा. कां ? माझें ह्मणणें लक्षांत येत नाहीं. माधवरावांना बोलावूं का ? "

माधवाचें नांव ऐकतांच गोविंदराव नरमले.

" नानासाहेब, तुह्मांला त्या कागदाशीं काय करावयाचें आहे ?' सामदाम करण्याच्या हेतूनें गोविंदराव ह्मणाले.

" मला त्या कागदाशीं कांहींएक कर्तव्य नाहीं. फक्त त्यांतील मजकुराशीं करावयाचें आहे. त्याच्यासाठीं तुह्मी जो एवढा जीव टाकीत आहां, तें त्यांत काय आहे तें पहावें एवढीच माझी इच्छा आहे. "

" मी तुम्हांला सांगतों. "

" अंहं, तुम्हीं सांगितलेलें ऐकण्यापेक्षां मी वाचलेलें बरें. "

" नानासाहेब,— "

" काय बोला ! काय बोलावयाचें असेल तें खुशाल बोला. असे मध्येंच थांबता कां ? "

" बोलण्यापासून काम होणार असेल तर बोलावयाचें. "

" काम कां व्हावयाचें नाहीं ? "

" अगदीं खात्रीनें ! "

" तें मी काय सांगूं ? "

"तुमच्याकडून होणारें आहे म्हणून म्हणतों."

हातांत असलेल्या शिकारीप्रमाणें नानासाहेब त्याला खेळवीत होते. ते म्हणाले—

"माझ्याकडून होणारें जरी असलें, तरी समजल्याशिवाय मी तें होईल म्हणून कसें सांगूं ! "

"ह्या कागदाबद्दल मी तुम्हांला पन्नास हजार रुपये देतों ! तो तुम्हीं मला परत करा. माझी गुप्त गोष्ट, माझी सर्व अब्रू त्यांत भरलेली आहे."

गोविंदराव अगदीं जिवावरच्या प्रसंगांत सांपडले होते आणि म्हणूनच बेभान होऊन आशाळूपणानें ते त्याला म्हणाले.

"आणि म्हणूनच तो मी वाचल्याशिवाय तुम्हांला देऊं इच्छित नाहीं."

एवढें बोलून नानासाहेब दरवाजा उघडून बाहेर पडले. जातांजातां 'शहाणे असाल तर जास्ती बभ्रा करूं नका' असें त्यांनीं त्यांस बजावलें. गोविंदराव जागच्या जागींच उभे राहिले. नानासाहेब बाहेर पडल्यानंतर लागलीच लक्ष्मी तेथें आली.

प्रकरण ४२ वें.

कागद काय झाला ?



नानासाहेबांनीं तो कागद शांतपणानें वाचला. गोविंदरावांचें खरें स्वरूप त्यांच्या लक्षांत आलें. ह्या मसुद्याप्रमाणें झालेलें नवीन मृत्युपत्र बेपत्ता करून ते माधवाचे पालनकर्ते बनले होते. ही गोष्ट त्यांच्या खऱ्या स्वभावाची ओळख पटविण्यास पुरेशी होती.

ह्याशिवाय त्यांना आणखीं एक गोष्ट त्या कागदांत आढळली. श्रीनिवासरावांनीं आपल्या बदललेल्या मृत्युपत्रानें लक्ष्मीला आपल्या इस्टेटींतून पांच लाख रुपये बक्षीस दिलेले होते.

ह्या पांच लाखांनीं नानासाहेबांच्या तोंडास पाणी सुटलें. लक्ष्मीवर त्यांचें प्रेम बसलें. पैशासाठीं तिला आपली पत्नि करावी असें त्यांना वाटूं लागलें.

प्रेमाचें उदात्त स्वरूप बाजूला ठेवलें, निर्मल प्रेमाची स्वार्थत्यागी भावना विचारांत घेतली नाहीं व प्रेमाचा उगम नैसर्गिक स्फूर्तीनें झाला नाहीं, तर त्या प्रेमाचें तितकेंच हिडीस स्वरूप नजरेस येतें. कित्येक वेळां प्रेमाचा उगम उन्मत्त यौवनाच्या रानटी विकारवशतेनें होतो, तर कित्येक ठिकाणीं त्याचा उगम जड देहाच्या सौंदर्यमोहानें झालेला असतो. ह्या दोन्ही प्रेमांत आपल्या प्रेमाच्या वस्तूच्या सुखापेक्षां स्वतःच्याच सुखाचा प्रश्न प्रधान असतो. प्रेमाचे हे दोन्ही प्रकार जसे अयोग्य तसाच संपत्तिमोहामुळें होणारा प्रेमोद्भव व तें प्रेमहि अयोग्य. ह्या तऱ्हेच्या सर्व प्रेमांत अयोग्यतेपेक्षां अनिष्टतेचा व अनिष्टतेपेक्षां घातुकपणाचा भाग जास्ती असतो. ह्यांचें प्रत्यंतर धनलुब्ध वारांगनांच्या घातकी प्रेमास व सौंदर्य वा यौवन यांच्या पासून उद्भवणाऱ्या अनिष्ट प्रेमास बळी पडत असणाऱ्या हतभागी प्राण्यांवरून नेहेमीं दृष्टोत्पत्तीस येत असतें.

नानासाहेबांच्या मनांत लक्ष्मीबद्दल प्रेमविकार उत्पन्न झाला होता, तो खरें पाहिलें असतां तिच्या यौवनावर किंवा सौंदर्यावर लुब्ध होऊन किंवा स्वतःच्या

उत्छृंखल कामुकवृत्तीस बळी पडून झालेला नव्हता. तर ती पांच लक्षांची मालकीण आहे व तिची संपत्ति आपणांस सहज मिळवितां येण्यासारखी आहे, या समजुतीच्या खात्रीनेंच झाला होता. ह्या त्यांच्या प्रेमाची योग्यता वारांगनेच्या प्रेमाइतकीच होती.

आपल्या इच्छेप्रमाणें घडवून कसें आणावें, याचा विचार करण्यांत ते गढून गेले होते. त्यांच्याप्रमाणें गोविंदरावहि विचार करण्यांत गढून गेले होते. नवीन नाटक कसें रंगवावें हा नानासाहेबांचा विचार होता, तर झालेल्या नाटकांतून आपण कसें पार पडावें हा गोविंदरावांचा विचार होता. समोर उभ्या असलेल्या लक्ष्मीकडेदेखील त्यांचें लक्ष नव्हतें.

" बाबा ! " बराच वेळ थांबून कंटाळल्यानें लक्ष्मी ह्मणाली.

गोविंदरावांनीं आपला विचार ग्रस्त झालेला चेहरा तिच्याकडे वळविला. शून्य दृष्टीनें त्यांनीं तिच्याकडे पाहिलें.

" बाबा, तुह्मीं मघांपासून येथें उभे कां ? तुह्मांला पुन्हां पहिल्यासारखें वाटत होतें का ? "

" नाहीं. आतां मला तसें वाटत नाहीं, पण तूं येवढा वेळ होतीस कोठें ? "

" बाबा, मघांचा कागद तुह्मीं घेतलात का ? "

" कसला कागद ? "

" श्रीनिवासरावांनीं केलेल्या मृत्युपत्राच्या मसुद्याचा. "

" नाहीं. " फसगतीनें ते ह्मणाले. पण लागलेंच त्यांनीं आपलें बोलणें सांवरलें.

" नाहीं. तूं कशाबद्दल बोलतेस तेंच मला समजत नाहीं. "

ह्यावेळची त्यांची फसगत लक्ष्मीच्या लक्षांत आली.

" बाबा, माझ्याशीं असें आडपडद्यानें कां वागतां ! तो तुमच्याजवळ आहे एवढें मला समजलें ह्मणजे माझा जीव खालीं पडेल. तो कागद तुमच्या नांवाला तुमच्या लौकिकाला काळोखी लावणारा आहे. तुमच्या अब्रूवर गदा यावी, असें मला कधीं तरी वाटेल का ! "

गोविंदराव कांहींच बोलले नाहींत.

" बाबा, तुमच्या अंतःकरणांत अपत्यस्नेह नसेल, पण माझ्या अंतःकरणांत पितृप्रेम आहे ! त्या कागदाचा मला काय फायदा ! मजजवळ काय किंवा तुमच्या-

जवळ काय, तो असला तर त्याप सून नुकसान नाहीं. पण जर का एसाद्या तिसऱ्याच्या हातांत तो पडला असला, तर मात्र ....'

तिच्याच्यानें पुढें बोलवेना. भरलेल्या डोळ्यांनीं ती आपल्या बापाकडे पहात होती. तिच्या मनांत जशी कल्पनेनें भीति उत्पन्न झाली होती, तशीच तिच्या बोलण्यानें खऱ्या प्रकारच्या माहितीनें त्यांच्याहि मनांत भीतीनें आपलें ठाणें बसविलें. त्यांनीं तिला कांहींच उत्तर दिलें नाहीं.

" बाबा, तुम्ही बोलत नाहीं, त्यावरून तो तुमच्याजवळ आहे असेंचना समजावयाचें. तो नीट ठेवा किंवा त्याचा नाश करा, नाहींतर कोणाच्या हातीं सांपडावयाचा; किंवा ह्याहिपेक्षां उत्तम मार्ग म्हणजे माधवास सर्व सांगून त्याची क्षमा मागावी हा. माधवाचें मन उदार आहे, त्याची तुमच्यावर, माझ्यावर माया आहे. तुमचा अपराध तो चवाठ्यावर आणणार नाहीं. "

अजूनहि गोविंदराव स्तब्धच होते.

" बाबा, तुम्हांला त्याच्याशीं बोलण्याचें धैर्य होत नसेल तर मी बोलतें. त्याच्यापुढें पदर पसरतें. मगतर झालेंना,

आतां मात्र गोविंदरावांच्यानें रहावेना.

" बाळे ! "

एवढींच अक्षरें त्यांच्या तोंडांतून बाहेर आलीं. त्यांनीं तिला हृदयाशीं घट्ट आवळून धरिलें व त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले. त्यांनीं केसांवरून व पाठीवरून हात फिरवून तिला कुरवाळलें. स्नेहभरानें तिच्या मस्तकाचें चुंबन घेतलें. पश्चात्तापानें होणाऱ्या अस्वस्थ स्थितींत त्यांनीं आपलें तोंड वर केलें; तों त्यांना समोर कोण दिसलें ?

नानासाहेब.

त्यांना पहातांच ते दचकले! पश्चात्तापानें मिळणारी पूर्ण शुद्धता त्यांनां अद्याप आली नव्हती.

प्रकरण ४३ वें.

पुन्हां जाळ्यांत !

"माधवराव, अशा खंतींत तुम्हीं किती दिवस घालविणार ? जवळ पैसा आहे. वय आहे, त्याचा कांहींतरी उपयोग करून घ्यावयाचा, तें दिलें सोडून आणि बसलेत दुःखांत दिवस घालवीत."

नानासाहेब म्हणाले.

"दुःख ! मला कसलें दुःख ?"

"दुःख नाहीं म्हणतां तर असें का वागतां ?"

"कसा वागतों ?"

"कसा ह्याचा आपल्या मनाशींच विचार करा म्हणजे झालें. माधवराव स्त्रियांच्या चरित्राचा व्यर्थ विचार करणें चांगलें नाहीं. त्याचप्रमाणें त्यांच्या चांगल्या वाईट गोष्टींचा आपल्यावर, आपल्या आयुष्यावर परिणाम घडूं देणेंहि चांगलें नाहीं."

माधव चपापला.

"ज्या गोष्टीनें तुम्हांला येवढें अस्वस्थ करून सोडलें आहे, ती मला माहीत आहे. आणि म्हणूनच तुम्हांला हिताचें सांगणें मला भाग पडत आहे. यःकश्चित मुलगी ती काय, तिचें प्रेम तें काय आणि त्या प्रेमाला तुम्ही महत्व देतां तें काय ? प्रत्येक क्षुल्लक गोष्टीला असें महत्व द्यावयास लागाल, तर तुम्हांला काडींचें देखील सुख लागावयाचें नाहीं."

"नानासाहेब, असें कसें म्हणतां ? पण ही गोष्ट तुम्हांला समजली कशी ?"

"तुमच्या वागणुकीवरून कमला तुम्हांला अगोदर जीव कीं प्राण वाटत होती. तिचें सुंदर मुख पहावयास मिळावें, तिचें कर्णमधुर भाषण कानीं पडावें

म्हणून तुम्हींचना अगोदर नुसते वेडावले होतां. पण आतां, तीहि तुमच्याकडे येत नाहीं, कीं तुम्हींहि तिच्याकडे जात नाहीं. असें कां व्हावें याचा कोणीं विचार केला, तर माझ्याप्रमाणें नाहींका त्यालाहि खऱ्या स्थितीचा अदमास बांधतां यावयाचा ? ज्या प्रेमानें तुम्ही दोघेंहि एकजीव होऊं पहात होतां, जें प्रेम तुम्हां दोघांना एकेठिकाणीं ओढून आणीत होतें, त्या प्रेमाचा आतां नाश झाला असला पाहिजे, असें तुमच्या वर्तनावरून उघड दिसूं लागलें. अशा प्रेमाचा इतक्या लवकर व इतक्या तीव्रतेनें नाश कसा होतो, हें मला जगाच्या अनुभवावरून माहीत असल्यानें मी अंदाज बांधला व तुमच्या आतांच्या बोलण्यावरून अखेरीस तोच खरा ठरला असें म्हणावयास हरकत दिसत नाहीं. एकंदर स्थितीचा विचार करतां तुम्हांला सध्यां कोणी प्रतिस्पर्धी असावासें वाटत नाहीं. कदाचित् तुमचा व कमलेचा प्रेमयोग जमण्याच्या अगोदर..."

"बस्स, नानासाहेब तो विषय जास्ती लांववावा असें मला वाटत नाहीं." माधव उद्वेगानें एकदम म्हणाला.

नानासाहेब स्वस्थ बसले. तोहि स्वस्थ बसला. मात्र त्याचें मन अगदीं अस्वस्थ झालेलें होतें.

"ह्या स्त्रियांच्या जातीला कपटी म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. मला प्रत्यक्ष अनुभव आला." थोड्या वेळानें त्याच उद्वेगाच्या भरांत माधव म्हणाला.

"माधवराव, झाली गोष्ट होऊन गेली. आतां त्याबद्दल वाईट वाटून घेण्यांत काय फायदा ?"

इतक्यांत सकाळचीं पत्रें घेऊन गडी आला.

नानासाहेबांनीं आपलें आलेलें पत्र वाचण्यास सुरवात केली. माधव तसाच बसला होता.

" काणाचें पत्र आहे ? " त्यांचें पत्र वाचून झाल्यावर माधवानें सहज विचारलें.

"आमच्या एका मित्राचें आहे. दिलजान मुंबईला आली असून तिच्या गाण्याचे जलसे सुरू आहेत; तेव्हां यावयाचें असेल तर यावें म्हणून त्यानें लिहिलें आहे."

"चला तर, नानासाहेब, मीहि येतों.....

"कोण तुह्मीं, आणि कशाला ते ? त्या बयेच्या कवटाळ्यांत पुन्हां सांपडावयाला ?"

" नानासाहेब आतां तें विसरा. येथें मला कंटाळा आला आहे, शिवाय येथें रहावेसेंहि मला वाटत नाहीं तेव्हां ह्मणतों तुमच्याबरोबर यावें अनायासें तिचें गाणेंहि ऐकावयाला मिळेल. "

" अंहं हें कांहीं आपल्याला पसंत नाहीं. "

" तर मग तिला येथें बोलवा. "

" कशाला ! या गांवांत तुमचा, तुमच्या वडिलांच्या नांवलौकिक आहे. त्याकडे वघून तरी या बाबतींत मी तुह्मांला सल्ला देणार नाहीं. दुसरी कोणी गाणारीस असती तर हरकत नव्हती, पण दिलजानच्या बाबतींत तरी तुह्मीं असें न वागणें हेंच चांगलें. पाहिजे असल्यास तुमच्या खेड्यावर आपण तिचें गाणें करूं. "

" तेंहि कांहीं वाईट नाहीं. तिचें एकदां गाणें ऐकावें एवढीच इच्छा आहे."

" मग आज तसें पत्र लिहितों. आपण अगोदर जाऊन सर्व व्यवस्था करूं ह्मणजे झालें. पाहिजे असल्यास मुंबईला जातों असें सांगून खेड्यावर जाऊं, ह्मणजे उगीच गांवांत बभ्रा होणार नाहीं. माधवराव, तुमच्यासाठीं ह्मणून मी हें करतों आहें. सध्यांच्या तुमच्या स्थितीची मला कींव येते आहे आणि ह्मणूनच तुह्मांला थोडें बरें वाटण्यासाठीं हा सारा द्राविडी प्राणायाम करावयाचा.

नानासाहेबांनीं आपलें जाळें टाकलें.

प्रकरण ४४ वें.

तार आली.

भालचंद्र व विमलादेवी हीं अमेरिकेंत तिकडील परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करीत प्रवास करीत होतीं. इतक्यांत विनायकाचें त्यांस हिंदुस्थानांत येण्याविषयीं पत्र गेल्यावरून तीं लवकरच कलकत्त्यास येऊन उतरलीं.

भालचंद्र विमलादेवीप्रमाणें अद्याप जनकार्यांत पडला नव्हता, कीं नुसत्या लेखांपलीकडे त्याचें जनकार्य गेलें नव्हतें. तरी त्याच्याबद्दल लोकांत प्रीति उत्पन्न झाली होती. त्याची विद्वत्ता व कळकळ लोकांस समजली होती. व ह्यावरून पुढें त्याच्या हातून चांगलीं कार्यें होतील अशी जनतेस आशा होती.

भालचंद्रापेक्षां विमलादेवीची स्थिति निराळी होती. तिनें कार्यास आरंभ केलेला होता. स्त्री असून तिनें आपणांवर घेतलेली जबाबदारी लोकाच्या डोळ्यापुढें होती. सुशिक्षित स्त्रीसमाजानें तिचें उदाहरण घेण्यासारखें होतें.

यामुळें या दोघांचा कलकत्त्याचा जनतेनें सार्वजनिक रितीनें गौरव केला होता. त्यांना बोटीवरून उतरवून घेण्यास तेथील मोठमोठी मंडळी आलेली होती. ह्या मंडळींत सर्व पंथांची, दर्जाची व पेशाची मंडळी होती. ह्यापैकीं कांहीं कांहीं मंडळी त्यांना त्यांच्या बिऱ्हाडापर्यंत पोंहचविण्यास आली होती.

ते बिऱ्हाडीं जाऊन पोंचतात, इतक्यांत त्यांनीं तेथील पत्त्यावर मागविलेलीं त्यांचीं पत्रें आलीं. भालचंद्रानें आपलीं पत्रें उचललीं. त्यांत त्याच्या नांवाची एक अर्जंट तार होती. ती त्यानें अगोदर फोडली. तार वाचतां वाचतां त्याचा चेहरा काळवंडला. त्याचें सुप्रसन्न मन दुःखी झालें. ' किती वाजले असावेत ' ह्मणून त्यानें एकदम विमलादेवीस विचारलें.

" मला आतांच्या आतां गेलें पाहिजे. " असें ह्मणून तार त्यानें विमलादेवीच्या हातांत दिली.

"मी देखील येतें " तार वाचल्यावर विमलादेवी ह्मणाली.

इतक्यांत घरमालक तेथें आले.

" भाईजी मला नागपुराकडे जाणाऱ्या पहिल्या गाडीनें गेलें पाहिजे. कारण माझा एक मित्र अतिबिकट संकटांत सांपडला आहे. ही तार पहा. "

" आपल्या मित्रावरील संकट दूर करण्यांत माझा कांहीं उपयोग होण्यासारखा असेल तर....."

" एखादा हुशार जासूद–डिटेक्टिव–आपण सांगाल, तर आपले फार उपकार होतील. मात्र आमच्या जाण्याच्या वेळेपर्यंत तो मिळेल तर फारच चांगलें होईल. "

" आपल्याला अद्याप दोन तासांचा अवकाश आहे, तोंपर्यंत मी सर्व व्यवस्था करतों. "

दोन तासांनीं भालचंद्र, विमलादेवी व बाबू राधाचरण डिटेक्टिव हीं गाडींत बसलीं. निघण्याचे पूर्वी भालचंद्रानें खालीलप्रमाणें कमलेस तार केली.

"तार पोहोंचली. डिटेक्टिव बरोबर घेऊन येण्यास निघालों. घाबरूं नये. बाबा आलेच असतील "

ज्या तारेवरून ही मंडळी एवढ्या घाईनें यवतमाळास जाण्यासाठीं निघाली, ती कमलेची असून तींत खालील मजकूर होता.

" आज पहाटेस पोलिसांनीं घराची झडती घेतली. झडतींत कांहीं पुस्तकें व बाबांच्या वेळचीं हत्यारें नेलीं. लागलीच दादाला कैद करून नेलें. आरोपाचें स्वरूप फार भयंकर दिसतें. आपण आजच आलां असाल तरी असाल तसे निघा. उमरावतीस कळविलें आहे आपण यालच. "

' भप ' 'भप' आवाजाबरोबर धुराचे भपकारे सोडीत गाडी स्टेशनाचे बाहेर पडली. आपली सर्व मंडळी रिझर्व्हड फर्स्ट क्लासमध्यें होती.

गाडी चालू झाल्यावर आपल्या खिशांतील तार काढून भालचंद्रानें बापूजीचे हातीं दिली.

" केसचें स्वरूप काय असावें हें यावरून उघड होत आहे" बाबुजी म्हणाले.

" सध्यांच्या परिस्थितीला तें सोडून आहेसें मला वाटत नाहीं " भालचंद्रानें उत्तर दिलें.

" पण हा मनुष्य तशा तऱ्हेचा आहे काय ? "

" नाहीं. "

" मग हें झालें कसें. "

" तें मी काय सांगूं ? "

" बरें तर मला या मनुष्याची थोडक्यांत माहिती सांगा पाहूं. "

" हा मनुष्य माझा एक मित्र आहे. त्याचें नांव विनायक असून तो मुंबई युनिव्हरसिटीचा ग्रॅजुएट आहे. त्याचे वडील तिकडल्या प्रांतांत मोठ्या हुद्याच्या जागेवर नोकर होते. त्यांना सरकारनें रावसाहेब ही पदवी दिलेली होती. माझ्याप्रमाणेंच देशाची सुस्थिति असावी असें समजून तत्प्री-त्यर्थ खटपट करणाऱ्यांपैकीं तो एक आहे. यापेक्षां जास्ती माहिती मला देणें शक्य नाहीं. कारण त्याला सोडून मला जवळ जवळ अडीच तीन वर्षें झालेलीं आहेत. असें जरी आहे तरी तारेंत ध्वनित केलेल्या प्रकारासारखा प्रकार त्याच्या हातून होईल अशी मला शंका देखील यावयाची नाहीं. तसा प्रकार त्याच्या हातून होणार नाहीं याची मला खात्री आहे. "

" खात्री आहे असें कशावरून ह्मणतां ?

"बाबूजी, देशाची खरी कळकळ बाळगणारा समंजस माणूस अशा फंदांत पडेल असें तुह्मांला वाटतें का ? निदान मला तरी वाटत नाहीं. "

"बरें तें असूं द्या, त्याच्या घरची स्थिति कशी आहे ! "

"घरची स्थिति त्याची चांगली आहे. सात आठ महिन्याखालीं त्याचे वडील वारले. त्याला आई व एक बहीण असून तिचीच ही तार आहे."

"तुमचा मित्र आपण होऊन किंवा दुसऱ्याच्या संगतीनें असल्या घाणेरड्या प्रकारांत पडावयाचा नाहीं अशी तुमची खात्री आहे ह्मणतां तर ? "

"हो. "

"असें असेल. दुसरें कोणी त्याच्यावर हें किटाळ आणलें असलें पाहिजे."

"असें मलाहि वाटतें."

"त्याच्यावर किटाळ आणणारा असा हा मनुष्य कोण असावा ? तुम्हांला कोणावद्दल संशय आहे का ? "

"तें मी कांहींच सांगूं शकणार नाहीं."

"तेथें जाऊन पोंहचेपर्यंत आपणांला स्वस्थ बसलें पाहिजे. उगीच तर्कवितर्क काढून मन शंकित करून घेणें चांगलें नाहीं." राधाचरण बाबू म्हणाले.

दुसरे दिवशीं रात्रीं ही मंडळी यवतमाळाला येऊन पोंहचली. प्रभाकरराव आलेले होते. विनायक अद्यापपर्यंत कच्च्या कैदेंतच होता.

प्रवासांत भेटलेले जॉलीसाहेब येथें पोलीस अंमलदार आहेत, असें समजतांच भालचंद्र त्यांना भेटण्यासाठीं लागलीच त्यांच्या बंगल्यावर गेला.

यावेळीं रात्रीचे दहा वाजले होते. तरी भालचंद्राचें कार्ड पहातांच हातांतील काम बाजूला ठेवून जॉलीसाहेब त्याचें स्वागत करण्यासाठीं वऱ्हांड्यांत आले व त्याला घेऊन आंत गेले.

प्रकरण ४५ वें.

कृष्णस्वरूप बाहेर आलें.

ना

नासाहेब! खात्रीनें त्याच भामट्याचें, दुष्टाचें हें काम असलें पाहिजे! हाय! माझी अब्रू जाणार! माझें खरें स्वरूप जगाच्या निदर्शनास येणार! तुरुंगांत माझें राहिलेलें आयुष्य जाणार!"

आपली खोली बंद करून घेऊन गोविंदराव उद्वेगानें पुटपुटत होते. ते हिकडून तिकडे येरझार घालीत होते. काय करावें हें त्यांस सुचत नव्हतें.

विनायकावर आणलेली घोरपड नानासाहेबांनींच आणली असली पाहिजे अशी त्यांची खात्री होत चालली होती. त्यांचा स्वभाव गोविंदरावांना समजला होता. पण विनायकास त्रास देण्याचा त्यांचा हेतु काय असावा? हें अद्याप त्यांच्या ध्यानांत येत नव्हतें. इतक्यांत त्यांच्या एका गड्यानें येऊन त्यांचा दरवाजा हालविला.

"रावसाहेब, मी आलों आहें."

"मी कोण?"

"रामा."

गोविंदरावांनीं दार उघडलें.

"रावसाहेब, धाकटेसाहेब आणि ते पाहुणे खेड्यावर गेलेत, 'मी आतांच खेड्यावरून आलों."

"बरें जा. जेवण करून घे आणि लौकर पुन्हां ये."

इतक्यांत लक्ष्मी तेथें आली. रामा हुकुमाप्रमाणें निघून गेला.

लक्ष्मीला पाहतांच गोविंदरावांना कोडें सुटल्यासारखें वाटलें. नानासाहेबांनीं विनायकावर प्रसंग कां आणला असावा हें चटदिशीं त्यांच्या ध्यानांत आलें. विनायकावरील तिचें प्रेम, खऱ्या मृत्युपत्रावरून तिला मिळणारी संपत्ति व नानासाहेबांची खरी सांपत्तिक स्थिति ह्या सर्व गोष्टी त्यांच्यापुढें एकदम उभ्या राहिल्या व नानासाहेबांचा हेतु त्यांच्या ध्यानांत आला.

" बाबा, ही भानगड तरी काय आहे ? " दीनस्वरानें लक्ष्मीनें विचारलें.

" बाळे, ही भानगड काय आहे याचा आतां मला उलगडा झाला. असल्या दुष्ट, नीच, कृतघ्न मनुष्याशीं गांठ पडेल अशी मला कल्पनाहि नव्हती. "

" बाबा, तुम्हीं कोणावद्दल बोलतां ? "

" नानासाहेबांवद्दल.

"म्हणजे त्यांनींच हें सर्व केलें !",

" होय, अशी माझी पुरी खात्री झाली आहे. परंतु त्याच्या दुष्टपणाबद्दल त्याला शासन देण्याचें माझ्या अंगांत सामर्थ्य नाहीं. "

गोविंदरावांचा चेहरा व आवाज बदलला होता. ते दीन झाले होते.

"बाबा, तुम्हीं काय म्हणतां हें मला कांहींच समजत नाहीं."

"लक्ष्मी, तुझें विनायकावरील प्रेम व खऱ्या मृत्युपत्रावरून तुला मिळणारी संपत्ति हीं ह्या प्रसंगाला कारण आहेत. त्या दिवशींचा कागद नानासाहेबांजवळ आहे ! आतां माझें बोलणें आलें तुझ्या लक्षांत ?"

"आलें ! लक्ष्मीला पुरतें समजलें ! " ती ज्या हेतूनें आपल्या बापाकडे आली होती, तो हेतू जागच्याजागीं राहिला. ती बावरली. काय करावें हें तिला सुचेना. एकीकडे नवीन प्रेम, विनायकाबद्दल वाटणारें प्रेम. तर दुसरीकडे पितृभक्ती, पित्यावरील प्रेम या कात्रींत ती सांपडली.

बराच वेळपर्यंत दोघेंहि तेथेंच बसलीं होतीं. तेथें पूर्ण खेदकारक शांतता नांदत होती. दोघांचींहि अंतःकरणें दुःखानें विदीर्ण झालीं होतीं. पश्चात्तापानें गोविंदराव होरपळत होते, तर अनिर्वाच्य दुःखानलानें लक्ष्मी होरपळत होती.

त्यांच्या मनांत नानातऱ्हेचे विचार येत होते आपला गुन्हा कबूल करून विनायकावरील संकट काढावें अशी भावना गोविंदरावांच्या मनांत होऊं लागली होती, पण ह्या भावनेबरोबरच आपली होणारी भावी स्थिति त्यांच्या डोळ्यांपुढें खेळत होती. जनांचा उपहास, अपराधाची शिक्षा त्यांस भेवडावीत होती.

रात्रीचे बारा वाजून गेले, तरी हीं दोघें अद्याप तेथेंच होतीं. त्यांना किती वाजले यांचें देखील भान नव्हतें.

इतक्यांत भालचंद्र तेथें आला. त्याला पाहातांच गोविंदराव चपापले. त्याच्याबरोबर राधाचरण होते.

" गोविंदराव, माधव कोठें गेला आहे येवढें आपण सांगाल काय ? " भालचंद्रानें घाईघाईनें विचारलें.

" कां चरें ! तो तर मुंबईला गेला आहे. "

" तो तेथें नाहीं त्याच्याबरोबर नानासाहेबहि गेले आहेतना ? "

" होय. ते दोघेहि मुंबईला जातों म्हणून मला सांगून गेले आहेत. "

" बरें तें असो. पण माधवाचें व विनायकाचें हल्लीं भांडण वगैरे झालें होतें का ? " राधाचरणांनीं मध्येंच विचारलें.

" मला कांहीं माहीत नाहीं. पण तुम्हीं हा प्रश्न कां विचारतां ? "

" गोविंदराव, विनायक अराजक मंडळींतला आहे, अशी माधवानें सरकारला बातमी दिली आहे. "

" कोणी ! माधवानें ? तुम्हीं चुकत असाल. असें कधीं व्हावयाचें नाहीं. " आश्चर्यचकित होऊन गोविंदराव म्हणाले.

" मी सांगतों तीच खरी गोष्ट आहे " भालचंद्र म्हणाला.

गोविंदराव क्षणभरच स्तब्ध असतील. त्यांना कांहीं भयंकर कल्पना आली. ती खरी असावी असा त्यांचा चेहरा सांगूं लागला. ते त्या भरांत म्हणाले—

" ह्या नीचाचें जाळें फार सफाइनें टाकलेलें दिसतें. भालचंद्रराव तुम्हीं आतांच्या आतां जा आणि माधवाला वांचवा. तो खेड्यावर गेलेला आहे. "

इतक्यांत रामा तेथें आला.

" रामा, गाडी जुंप आणि आतांच्या आतां यांनां खेड्यावर घेऊन जा. तुला नेववेल तितक्या लवकर घेऊन जा, नाहींतर तुझें धाकटे साहेब मेलेच म्हणून समज. भालचंद्रराव जा. थांबलां काय ! जा. नाहींतर नानासाहेबांच्या हातून विष देऊन माधव मारला जाईल. हे कोण बरोबर आहेत ? पोलीस आहेत हो, त्यानांहि घेऊन जा. "

भालचंद्र वगैरे सर्व घाबरले. त्यांच्या बोलण्याचा त्यांना अर्थ कळत नव्हता. पण रामाला ते खेड्यावर गेले आहेत हें माहीत असल्यानें तो घाबरला. या मंडळीला हाताला धरून त्यानें खालीं नेलें व गाडी जुंपून त्यांनां घेऊन तो तडक निघाला.

लक्ष्मी तेथेंच होती. या त्यांच्या बोलण्याचा व करण्याचा तिला अर्थ कळेना. ती बावळटासारखी त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागली.

" लक्ष्मी, जा बाळ. माझा घोडा तयार करावयाला सांग. आणि कोणाला तरी बरोबर घेऊन कमलेकडे जा आणि प्रभाकररावांना मी बोलाविलें आहे असें सांगून त्यांना घेऊन ये. जा बाळ. लवकर जा. "

त्यांनीं तिच्या पाठीवरून हात फिरविला. तिला कुरवाळलें आणि प्रेमभरानें तिचा मुका घेतला. सप्रेम दृष्टीनें तिच्याकडे पाहून तिला जा ह्मणून खुणाविलें.

लक्ष्मी गेली. ह्यांनीं आपला दरवाजा बंद करून घेतला. टेबलावर बसून त्यांनीं कांहींसें बराच वेळ पर्यंत लिहिलें, पाकिटांत लिहिलेले कागद घालून त्यानीं ती बंद केली व त्यांवर खालीलप्रमाणें पत्ते लिहीले.

" चि. रा. माधव श्रीनिवासराव. " " मेहेरबान पोलीससुपरींटेंडट साहेब" हीं दोन्हीं पाकिटें तयार केल्यावर त्यांना समाधान वाटल्यासारखें झालें. त्यांचा चेहरा यावेळीं फार भयंकर दिसत होता. तो निस्तेज झाला होता, त्यावर प्रेतकळा आली होती. तरी दखील समाधानवृत्तीचें पाणी तेथें चमकत होतें.

पाकिटें तयार झाल्यावर ते टेबलाजवळून शांतपणानें उठले. समोरच्या कपाटातील पिस्तुल व काडतुसें त्यांनीं काढलीं. पिस्तुलांत काडतुसें भरून त्याच्याकडे थोडावेळ निश्चळ व कृतज्ञदृष्टीनें पाहिलें. यावेळीं त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची झांक दिसत होती.

हातांतलें पिस्तुल लपवून घेऊन ते खोलीबाहेर आले. मोठ्या दालनाकडे ते गेले. तेथें टांगलेल्या श्रीनिवासरावांच्या व त्यांच्या पत्नीच्या तसबिरीकडे क्षणभर पाहून ते परत वळले. जिन्यांत पावलांचा आवाज त्यांना ऐकूं आला. घाईघाईनें ते आपल्या खोलींत गेले. त्यांनीं दरवाजा बंद करून पाठ वळविली असतां इतक्यांत लक्ष्मीची ' बाचा ' ही प्रेमळ हांक त्यांनां ऐकूं आली.

ते खुर्चीवर बसले, पिस्तुल आपल्या कपाळवर टेंकून त्यांनीं चाप ओढला. धाड्, धाड्, धाड् पिस्तुलाचे बार झाले !

लक्ष्मीनें भयंकर किंकाळी फोडली व त्यांच्या खोलीच्या दाराजवळच ती बेशुद्ध होऊन पडली !

प्रकरण ४६ वें.

मृत्यू नंतर.

लक्ष्मीघरोवर प्रभाकरराव, विमलादेवी व कमला हीं सर्व आलीं होतीं.

बंदुकीचा आवाज व लक्ष्मीची किंकाळी ह्यांनीं तें सर्व घर दणाणून गेलें होतें. घरांतील इतर चाकरमाणसें भराभर तेथें जमा झालीं. त्यांच्या सहाय्यानें लक्ष्मीला उचलून तिच्या खोलींत नेऊन ठेविलें. विमलादेवी व कमला तिच्याजवळ बसल्या. प्रभाकररावांनीं तेथील एका गड्यास पोलिसाला व डाक्तरला बोलवून आणण्यास पाठविलें.

गोविंदरावांच्या खोलीचें दार उघडत नाहीं, हें पाहून गड्यांनीं तें बळजबरीनें उघडण्यास सुरवात केली. दाराला उलटा पाठीचा नेट देऊन त्यांनीं तें बिजागरीसकट उखळून टाकलें. दार उघडल्यावर प्रभाकररावांसकट ही सर्व मंडळी आंत जाऊन पहातात तों गोविंदरावांचा भेसूर चेहरा त्यांच्या दृष्टीस पडला. कपाळमोक्ष झाला असून सर्व अंगावर व खालीं रक्ताचे ओघळ आलेले होते. प्राणंज्योत विझल्यानें लुली पडलेली त्यांची मान खुर्चीवर मागें पडली असून ज्या हातानें पिस्तुल उडाविलें होतें, तो हात त्या पिस्तुलासकट टेबलावर पडलेला होता. टेबलावर असलेलीं दोन्हीं पत्रें तेथेंच असून त्यांवर रक्ताचे शिंतोडे उडालेले होते.

पोलीस व डाक्तर दोघेहि आले. लक्ष्मीला शुद्धीवर आणण्याची खटपट डाक्तर करूं लागले. विमलादेवी तेथून बाहेर पडली व गोविंदरावांच्या खोलीकडे आली.

पोलीस येतांच प्रभाकररावांनीं, गोविंदरावांनीं पोलीसचे साहेबाला लिहून ठेविलेलें पत्र त्यांच्या हातांत दिलें. व हें आतांच्या आतां साहेबाला नेऊन द्या म्हणून सांगितलें. पोलीस पत्र घेऊन गेला.

विमला देवीनें गोविंदरावांच्या खोलींत पाय ठेवला. तो देखावा पाहून तिच्या अंगावर शहारे आले. अशा तऱ्हेचे देखावे पहाण्याची संवय नसल्यानें तिला प्रथम भीति वाटली; आपण होतों कोणत्या स्थितींत व आहों कोणत्या स्थितींत या कल्पनेनें तिचें मन द्रवलें. ह्या कल्पनेची मीमांसा करतां करतां परिस्थितीचें दास होण्याऐवजीं कर्तबगारीनें तिला आपली दासी करण्याच्या खटपटींत असतां डाव फसतांच तिला धिःकारून तिचें दास्यत्व झिडकारण्यासाठीं दाखविण्यांत येणाऱ्या तेजस्वितेचा तो देखावा निदर्शक–मानवी प्राण्याच्या श्रेष्ठतम अहंकाराचा तो आदर्श आहे असें तिला वाटूं लागलें.

तिचा चेहरा गंभीर झाला. विचारांत तिचें मन गुरफटलें. तिच्या मनांत मानवी प्राण्याच्या श्रेष्ठत्वासंबंधींच्या विचारांचें सारखें आंदोलन सुरू होतें. मनुष्याच्या अहंकारपणांत त्याची सर्व उन्नति तिला दिसूं लागली, ह्या मानवी अहंकारांत सृष्टिनियमाला सुद्धां झिडकारण्याचें सामर्थ्य आहे असें तिला दिसूं लागलें. हा अहंकार आहे म्हणूनच इतर जीवकोटीपेक्षां मनुष्य कोटीची उन्नति झाली आहे हें हळू हळू तिच्या मनांत बिंबूं लागलें. खावयास–प्राणदीपाचें चैतन्य कायम ठेवावयास–मिळालें नाहीं म्हणजे इतर जीव तडफडतात, त्यांच्या जिवाचे हाल होतात. क्लेश व यातना भोगीत त्यांचा प्राणदीप विझतो, सृष्टिक्रमाच्या ताब्यांत त्यांचा जीव–त्यांचा अमर ईश्वरस्वरूपी आत्मा असतो. पण मानवजीवासंबंधीं तसें नाहीं. खावयास मिळालें नाहीं तर त्याचा आत्मा फार दिवस क्लेश भोगीत नाहीं. सृष्टिक्रमाचें वर्चस्व तो आपल्याबर चालूं देत नाहीं त्याच्या स्वामित्वास धिःकारून तो इच्छामरणी बनतो. व आपलें वर्चस्व सृष्टीक्रमावर गाजवतो.

सृष्टिक्रमास धिःकारणाऱ्या ह्याच अहंकारांत कर्तबगारीचा जन्म असतो. ह्याच अहंकारास उदात्त नीतिमत्तेची सांगड मिळाली, म्हणजे त्यापासून जन्म पावणारी कर्तबगारी बिनमोल बनते. तिचें क्षेत्र विस्तृत होऊं लागून कालांतरानें तिचें जगद्व्याळ स्वरूप दिसूं लागतें. कसल्याहि परिस्थितीस वाटेल तें रूप देतां येतें. गौतमबुद्ध, येशुख्रिस्त, महमद पैगंबर, शंकराचार्य, नानक, वगैरे धर्मवीरांच्या अजब कर्तृत्वाचा ह्या दृष्टीनें विचार केला म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचा उगम कळून येतो. धर्मक्षेत्र सोडून दुसरें वाटेल तें क्षेत्र घेतलें, तरी त्यांत ह्याच

अहंकार–आत्मविश्वासजनित कर्तबगारीची शक्ति स्पष्ट दिसते. भूतकाल सोडून वर्तमानकालाकडे जरी आपण दृष्टि वळविली तरी हाच प्रकार दिसतो. कांहीं थोड्या कालापूर्वी पाश्चात्य व पौर्वात्य ह्यांच्यामध्यें फार मोठा फरक होता. एकाचा मोठेपणा जितका मोठा होता. तितकाच दुसऱ्याचा लहानपणा लहान होता. अजूनहि हा फरक आहे, पण आतां पूर्वी सारखा तो नाहा. पाश्चात्यांच्या तोडीला लागणारें पौर्वात्य जपानी राष्ट्र उदयास आलें आहे. घोर निद्रेंत घोरत पडलेलें चिनी राष्ट्र जागें होत आहे. नवीन विचारांनीं हिंदुस्थानांत खळबळ उडवून दिली आहे. हा सर्व कशाचा प्रभाव ! तर अहंकाराचा !

मानवी स्वभावरचनेचें व मानवी प्रगतीचें एक गूढ प्रमेय सुटल्यासारखें तिला वाटलें. मूर्तिमंत दुःख वावरत असणाऱ्या त्या खोलींत तिला आनंद वाटूं लागला. आत्महत्त्येचा गौरव करणाऱ्या सगर्व दृष्टीनें, कौतुकानें ती त्या प्रेताकडे पाहूं लागली. त्याच भरांत ती त्या प्रेताजवळ गेली. अचल दृष्टीनें ती त्याच्याकडे पाहूं लागली.

ती ह्याप्रमाणें त्या प्रेताकडे पहात असतां, प्रभाकरराव व जॉली साहेब आंत आले.

' विमलादेवी ' प्रभाकररावांनीं हांक मारली.

तिचा विचारमग्नता एकदम दूर झाली. आपण कोठें आहों, काय करतों, याची तिला एकदम आठवण झाली.

" विमलादेवी, लक्ष्मीची प्रकृति कशी आहे. "

" कोण ? विमलादेवी ! आपण इकडे कोणीकडे ? " जॉली साहेबांनीं तिला ओळखलें.

" भालचंद्ररावाचरोबर येथें आलें आहें. "

" आपली भेट झाल्याचद्दल फार आनंद होत आहे. पण ती अशा प्रसंगीं व्हावी....." साहेब म्हणाले.

" त्याला काय कोणाचा थोडाच इलाज आहे? आपण येथेंच असतां वाटतें!"

" होय. गोविंदरावांनीं अशा प्रसंग आपल्यावर आणून घ्यावा, हें खरोखर मनाला उद्वेग आणणारें आहे. हा मनुष्य अशा तऱ्हेचा असेल अशी मला कल्पना देखील नव्हती "

" आपल्या ह्मणण्याचा मला अर्थ कळत नाहीं. विनायकरावांवर यांनीं प्रसंग आणला कीं काय ?

" तें अद्याप नक्की समजलें नाहीं. पण जगांत हा जसा दिसत होता, तसा कांहीं हा नव्हता. येवढें मात्र यावरून सिद्ध होत आहे. " आपल्या हातांतील पत्र पुढें करून साहेब ह्मणाले.

" मि. जॉली, आतां विनायकाला उद्यां जामिनीवर सोडण्यास..."

" हो. आतांदेखील त्याला सोडतां येण्यासारखें असतें तर मी सोडविलें असतें. त्याला मात्र विचाऱ्याला विनाकारण त्रास झाला. "

इतक्यांत लक्ष्मी जास्त घरळत आहे असें कमलेनें येऊन सांगितलें.

गोविंदरावांच्या खोलीशेजारीं पोलीसास बसवून साहेबासह सर्व मंडळी तिकडे गेली.

प्रकरण ४७ वें.

डाव फसला.



"माधवराव, घेतां का थोडीशी ? मला तर आज फारच थकल्यासारखें वाटत आहे. तुम्हांलाहि वाटत असेल; शिवाय दिलजानच्या ध्यासामुळें कदाचित् झोंपही यावयाची नाहीं."

रात्रीचें दोन वाजून गेले होते. खेड्यावरील माधवाच्या बंगल्यांत नानासाहेब व तो गोष्टी बोलत बसले होते.

"तुम्हीं घेत असाल तर मलाहि थोडीशी द्या."

नानासाहेबांनीं दारूची बाटली उघडली. आपण घेऊन नंतर पेला विसळण्यासाठीं म्हणून ते बाजूला झाले. हातांत असलेली कसलीशी पूड त्यांनीं पेल्यांत टाकली व त्यांत दारू व पाणी यांचें योग्य मिश्रण करून त्यांनीं तो पेला माधवाचे हातीं दिला.

"मला वाटतें दिलजान बहुतेक उद्यां दुपारला येईल."

"पण यावयाचें कोणत्या रस्त्यानें वगैरे माहिती तुमच्या मनुष्याला तुम्हीं बरोबर दिली आहे ना ?"

"अगदीं बरोबर दिली आहे. हं. घ्या तर ती लवकर. मला पेला पाहिजे आहे."

माधवानें पेला उचलला. इतक्यांत धाडदीशीं दरवाजा उघडून भालचंद्र वगैरे मंडळी आंत आली.

"माधवराव, हातांतला पेला खालीं ठेवा. त्यांत विष आहे."

भालचंद्र ओरडून म्हणाला—

"बाबूजी, हेच ते नानासाहेब." रागानें राधाचरण बाबूनीं सांगितलें. घाबरलेल्या माधवाच्या हातातून भालचंद्रानें पेला काढून घेतला व बाबू नानासाहेबांजवळ जाऊन उभे राहिले.

नानासाहेब व माधव दोघेहि घाबरून गेले होते. नानासाहेबांचें हरवलेलें प्रसंगावधान एका क्षणांतच परत आलें. ते ताड्कन् उभे राहिले व " कोण तुह्मीं ? " असें त्यांनीं दरडावून विचारलें.

" मी डिटेक्टीव आहें. माझें नांव राधाचरण " त्यांचा हात आपल्या बळकट मुठींत दाबून ठेवून बाबू ह्मणाले.

" आणि माझें नांव भालचंद्र. माधवराव मला चांगले ओळखतात. नाना-साहेब, आपले सर्व बेत फसले. "

नानासाहेबांनीं बाबूंच्या हाताला जोराचा हिसडा दिला. ते सुटण्यासाठीं धडपड करूं लागले. त्यांच्या पायांवर लाथ मारून बाबूनीं त्यांना खालीं पाडलें व रामाकडे वळून ते म्हणाले—

" रामा तें समोरचें उपरणें घे पाहूं. नानासाहेब आपली ही धडपड बंद करा. या बाबूच्या हातून तुम्हीं सुटाल ही कल्पनासुद्धां मनांत आणूं नका समजलेत. "

रामा व भालचंद्र यांच्या मदतीनें त्यांनीं नानासाहेबांना करकचून बांधलें.

हें सर्व होईपर्यंत माधव नुसता टकमक बघत होता. त्याकडे वळून भाल-चंद्र म्हणाला—

" माधवराव, विनायकाचें व तुझें वाकडें आहे काय ? त्याच्यावर धडधडीत खोटा आरोप घेऊन त्याला जेलमध्यें..... "

" कोण ! विनायक ! आणि तो जेलमध्यें ! आणि ह्या प्रकरणांत माझा संबंध ! शक्यच नाहीं. मी कशाला त्याच्यावर आरोप घेऊं ? "

" तुह्मीं त्याच्यावर आरोप घेणार नाहीं हें मला माहीत आहे. मीं काय सांगतों तें ऐका आणि मग काय तें बोला "

" काल सकाळीं मी कलकत्त्यास बोटीवरून उतरलों. तेथें मला कमलेची तार मिळाली. मी लागलीच निघून यवतमाळास आलों. तेथे आल्यानंतर ' विनायक हा राजद्रोही मंडळापैकीं एक आहे ' अशा अर्थाची बातमी देणारें आपलें पत्र, तपास करण्यासाठीं माहेवांकडे गेलों असतां त्यांनीं मला दाखविलें. आपली माहिती काढण्यासाठीं घरीं आलों तों गोविंदरावांनीं तांतडीनें आम्हांला इकडे पाठवून दिलें. नानासाहेबांच्या हातून विषप्रयोगानें आपण मराल, असें

ते म्हणाले. येथें येतों तों तोच प्रकार आम्हांला दिसला. तें त्या पेल्यांतलें मद्य पहा ! रंग बदललेला दिसतो. ही सर्व भानगड काय आहे ? शिवाय गोविंदरावांला त्याच्यांतली बरीच माहिती दिसते. अगदीं निकराची वेळ येईपर्यंत ते स्वस्थ कसे बसले हेंच मला समजत नाहीं.

माधवाच्या डोक्यांत भयंकर कल्पना आली ! कमलेचें प्रेम त्याला दिसूं लागलें. कमलेच्या प्राप्तीसाठीं तर गोविंदरावांनीं हें केलें नसेलना ! पेल्यांतील दारूचा रंग पालटलेला त्याला दिसत होता. समोर तोंडावर प्रेतकळा आलेले नानासाहेब उपरण्यानें–करकचून बांधलेले नानासाहेब गोविंदरावांना सामील झाले कसे ? ह्याचा उलगडा होईना. जिज्ञासेनें तो नानासाहेबांकडे पाहूं लागला. पण नानासाहेब त्याची दृष्टि चुकवूं लागले.

"नानासाहेब !" घोगऱ्या आवाजांत माधवाच्या तोंडांतून हलकेच उद्गार बाहेर पडला.

"हें कमलेचें प्रेम बरें माधवराव !" छद्मी स्वरानें नानासाहेब म्हणाले.

"तें मला समजतें पण तुम्हीं त्याला–त्या दुष्टाला–सामील कसे झालां ?" त्याच स्वरांत माधवानें उत्तर केलें.

"माधवा, मी सामील झालों नाहीं. त्याला मी सामील करून घेतलें. माझें रहस्य फोडलेंन् ! मला कायद्याच्या जबड्यांत लोटलेन् ! ह्याबद्दल त्या हरामखोराचा मी चांगला सूड घेईन ! माझ्याबरोबर त्यालाहि काळ्यापाण्याची हवा खावयाला लावीन ! जातो कोठें तो हरामखोर !" दांत ओंठ खात नानासाहेब म्हणाले.

त्यांच्या बोलण्याचा कोणाला उलगडा होईना.

माधव पुन्हां विचारणार, इतक्यांत एक पोलीस अंमलदार तेथें येऊन थडकला.

"नानासाहेब कुठें आहेत ?"

"हे आहेत. संभाळा आपलें सावज." चावू म्हणाले.

"आपण भालचंद्रराव वाटतें." लीनतेनें भालचंद्राकडे वळून तो म्हणाला.

"हो"

" आपल्याला साहेबांनीं बोलाविलें आहे. शिवाय ही चिठ्ठी त्यांनीं दिली आहे. "

' गोविंदरावांनीं आत्महत्या केली. माधवरावांस येतांना आणावें. बाकी सर्व व्यवस्था पाठविलेला कामगार करील. त्याला सांगितलें आहे.

जॉली, '

" नानासाहेब, हें दुष्कृत्य तुम्हीं कां केलें ? " बाबूनीं भालचंद्र पत्र वाचीत असतां त्यांना विचारलें.

" कां केलें ! तुम्ही कोण मला विचारणार ? मला वाटलें म्हणून केलें. आणि तें सर्व बरोबर जुळलें असतें. परंतु त्या गोंद्यानें आयत्या वेळेला धाण केली. फितुर झाला. नीच ! हरामखोर ! " चांगला लोळवीन...'

" नानासाहेब तें विसरा आतां. गोविंदराव तुमच्या आटोक्याचे बाहेर गेले. " भालचंद्र म्हणाला.

" काय पळून गेला ? कुठें जाईल पळून ! असेल तेथून त्याला खेंचून आणीन, समजलांत ! ह्या नानासाहेबाला..."

" नानासाहेब उगीच कां डोक्याला शीण देतां ? गोविंदरावांनीं आत्म-हत्या केली. "

" आत्महत्या ! " माधवाच्या तोंडांतून आश्चर्याचा उद्गार बाहेर पडला. नानासाहेबांचा चेहरा बघण्यासारखा होता.

" माधवराव, चला आपल्याला यवतमाळला गेलें पाहिजे. फौजदारसाहेब आहींत जातों. त्या दारूच्या पेल्याला नीट जपा. त्याच्यांत विष आहे. चल रामा गाडी जोड. "

भालचंद्र, बाबू व माधव तेथून निघाले. तास दीडतासांत ते घरीं आले. वाटेनें कोणी कोणाशीं विशेष बोलले नाहींत.

घरापुढें येऊन उतरतांच नोकराचाकरांची गडबड दिसली. त्यांनीं घरांत पाय ठेवला, तों लक्ष्मीचें किंचाळणें व बरळणें त्यांच्या कानांवर आलें.

"प्रेम ! प्रीति ! मोह ! याला, बाबा म्हणावें तरी काय ! तुमचें कमलेवर प्रेम होतें, कां प्रीति होती, कां मोह होता ! तें असो. तें राहिलें. पण तें

मृत्युपत्र ! तें लपवावयाचें तुह्मांला काय कारण होतें ? बोला ! सांगा; मला सांगा. मी तुमची मुलगी आहें, तरी तुह्मांला विचारण्याचा माझा अधिकार आहे । माझी बाजू सत्याची आहे !" लक्ष्मी बरळत होती.


थोडावेळ ती थांबली. पुन्हां तिची सुरवात झाली.

"माधवाच्या सुखासाठीं, श्रीनिवासरावांच्या आठवणीसाठीं, माझें प्रेम नव्हतें का मी बाजूला सारलें ? योग्य प्रेम-विकार अंतःकरणांत नसतां नव्हतें का त्याच्याशीं लग्न करावयाला तयार झालें ? आणि तुह्मीं ! त्याच्या सुखाचा बिघाड करावयास कारण झालांत ! कमलेवर खोटा आरोप घेतलात ! तिच्या पवित्रतेविषयीं माधवाला साशंक केलेंत ! धिःकार ! धिःकार असो तुह्मांला !"

तिचें बरळणें ऐकून माधव स्तंभीतच झाला. तिचे जास्ती शब्द कानीं पडूं नयेत ह्मणून तेथून तो उठला व भ्रमिष्टासारखा जात जात गोविंदरावांच्या खोलींत शिरला.

प्रकरण ४८ वें.

नानासाहेबांचा कबुली जबाब.



ते थील देखावा पाहून तर त्याची विचारशक्ति जास्तीच गुंग झाली. समोर दिसत असलेलें गोविंदरावांचेंच प्रेत आहे काय ? या संशयांत तो पडला. आपण जागे नसून झोपेंत स्वप्न पहात आहोंत, असा त्याला भास होऊं लागला. त्यानें आपल्या अंगाला चिमटे घेऊन पाहिल . आपण जागे आहोंत अशी त्याची खात्री झाली.

त्यानें प्रेताजवळ जाऊन नीट निरखून पाहिलें. त्या मृत शरीरास हात लावला. कालासारखें तें गार शरीर व तो देखावा, टेबलावरील पिस्तुल पाहून गोविंदराव खरोखरच मेले आहेत, त्यांनीं आत्महत्या करून घेतली आहे, अशी त्याच्या संशयचक्रांत सांपडलेल्या मनाची खात्री झाली. ही खात्री होतांच त्याला मागचे सर्व प्रसंग आठवले.

त्याच्या नांवाचें टेबलावर लिहून ठेविलेलें पत्र त्यानें उचललें. तें तो वाचूं लागला.

" चि. रा. माधवराव यांस— अनेक आशीर्वाद.

तुला सध्यां जी स्थिति आलेली आहे, त्याला सर्वस्वीं मी कारण आहें. श्रीनिवासरावांचें शेवटलें मृत्युपत्र दाबून ठेवून अन्यायानें माझ्या स्वतःच्या फायद्यासाठीं मी तुझा पालनकर्ता बनलों. तुझ्या आचरणांकडे मुद्दाम कानाडोळा करून तुला स्वच्छंदी बनूं दिलें. मी तुझें नुकसान कसें केलें, हें तुला सविस्तर येथें कटविण्यास मला वेळ नाहीं. मी पापी तर खराच, पण तो होतों. सध्यां नाहीं. नानासाहेबांच्या नादीं लागून तुझ्या व कमलेच्या विमल प्रेमांत मींच बिघाड आणला. कमलेनें माझें पाणी-ग्रहण करावें अशी माझी उत्कट इच्छा होती. पुढें ही गोष्ट लक्ष्मीला समजली. जें मृत्युपत्र मी बेपत्ता केलें होतें, त्याचा मसुदा तिला सांपडला. आपल्या बापाचें कृष्णकारस्थान तिच्या नजरेस आलें.

तिच्या हातांतून तो कागद मीं मोठ्या नीचपणाच्या शिताफीनें काढून घेतला; पण माझ्या पापाचा घडा भरत आला असल्याकारणानें तो कागद नानासाहेबाच्या हातीं गेला ! त्या कागदानें मी त्याच्या ताटाखालचें मांजर बनलों. त्या कागदान्वयें लक्ष्मी पांच लाखांची मालकीण होणारी होती. ह्या पैशाच्या लोभानेंच नानासाहेबानें सध्यांचा व्यूह रचला असावा. मला यांतील कांहींसुद्धां माहिती नाहीं किंवा यांत माझें अंगहि नाहीं; परंतु नानासाहेबानेंच हें कृत्य घडवून आणलें असावें अशी माझी पहिल्यापासून अटकळ होती व मुंबईला जातों असें सांगून तूं व तो जेव्हां खेड्यावर गेलांत असें समजलें, तेव्हां माझी पुरी खात्री झाली. तुझ्या जीविताबद्दल मला धोका वाटूं लागला. परंतु ही माझी धास्ती ईश्वर फोल ठरवील अशी माझी इच्छा आहे—अशी माझी खात्री आहे.

"तुला उपदेश करण्याचा मला पाप्याला अधिकार पोंहचत नाहीं. तितकी माझी योग्यता नाहीं. तरीपण तुझ्या कल्याणाचाच विचार माझ्या डोक्यांत घोळत आहे. विनायक, भालचंद्र वगैरे उत्तम मित्रांच्या संगतीनें वागून आपल्या जन्माचें सार्थक कर. कमलेचें तुझ्यावर निष्कलंक प्रेम आहे. तिच्या प्रेमाचा स्वीकार करून आपली संसार यात्रा सुखाची कर.

"आणखी काय लिहावयाचें. पण हो. लक्ष्मीला मी आतां तुझ्याच पदरांत घालतों. विनायकावर तिचें प्रेम बसलेलें आहे. तिचा योग्य संभाळ कर. तिच्या प्रेमांत मी व्यत्यय आणला होता. इच्छेविरुद्ध तुझ्याशीं लग्न करावयास तिचें मन तयार केलें होतें. परंतु तें झालें नाहीं हें एका अर्थी बरें झालें.

मी आतां आत्मघात करून घेणार ! तोच मार्ग मला तारणारा आहे ! त्या शिवाय मला गत्यंतर नाहीं !

ईश्वर तुह्मां सर्वांना सुखी ठेवो !

गोविंदराव "

याच पाकिटांत लक्ष्मीला त्यांनीं खालील प्रमाणें पत्र लिहून ठेविलें होतें.

" बाळे ! लक्ष्मी ! तुझी व माझी या लोकीं पुन्हां भेट होणें शक्य नाहीं. लहानपणीं मातृसुखास दैवकोपानें अंतरलीस. मोठेपणीं पितृसुखास म्यां तुला आंचविलें. असो. कृतकर्माचा मला पूर्ण पश्चाताप झालेला आहे. खोट्या मोहास

वळी पडून मी सर्वांस त्रास दिला आहे. त्याप्रमाणें असह्य क्लेश होतील अशाच तऱ्हेनें तुझ्याशीं वागलों आहें. माझ्या कर्तव्यास मी विसरलों. पण आपल्या कर्तव्यास तूं जागलीस. माझ्या कृतींत अपत्यस्नेह नव्हता, पण तुझ्या कृतींत पितृवासल्य ओतप्रोत भरलेलें होतें. ह्या नुसत्या आठवणीनें माझें मन विव्हल होत आहे. झाल्या गोष्टी गेल्या ! त्या आठवण्यांत अर्थ नाहीं. मागाहून सर्व प्रकार तुला कळेलच. आपल्या प्रिय विनायकाच्या सहवासांत त्याच्या संगतीनें देशोद्धाराचें काम करून चांगला नांवलौकिक मिळीव व माझ्यामुळें वडिलार्जित ठेवा झणून लागणारी काळोखी नाहिंशी कर ! बाळे, मी पतीत आहें खरा; पण पश्चातापानें पावन झालेला आहें. येवढें माझी आठवण होतांना लक्षांत ठेवीत जा ! पितृपदास अयोग्य ठरलेला तुझा अभागी पिता.

गोविंदराव.

"ताजाकलम—माझ्या पश्चात् माझ्या सर्व संपत्तीची कायदेशीर मालक तूं होशील. पण ही संपत्ति माझी नाहीं, अन्यायानें माधवाच्या संपत्तींतून ती मीं गिळंकृत केलेली आहे. ती त्याची त्याला परत कर. त्याच्या नांवाचें कायदेशीर बक्षीसपत्र करून ठेवण्यास मला आतां वेळ नाहीं. माधव ही संपत्ति कदाचित् स्वीकारणार नाहीं. त्यानें माझी शेवटली इच्छा झणून जर ती स्विकारली नाहीं, तर कोणच्याहि धर्मादाय संस्थेला ती त्याच्या नांवानें देण्यांत हयगय करूं नकोस.

गोविंदराव"

किती झालें तरी माधवास गोविंदरावांबद्दल प्रेम व आदर वाटत होता. लहानपणापासून तो त्यांच्या सहवासांत वाढला होता. अगोदरच कोमल झालेल्या त्याच्या अंतःकरणास पान्हा फुटून त्याला एकदम रडूं कोसळलें. विव्हल अंतःकरणानें तो तेथें अश्रुमोचन करूं लागला !

"माधवराव, साहेबांकडे चलावयाचें ना ? त्यांचें बोलावणें आलें आहे" भालचंद्र येऊन म्हणाला.

माधव सावकाश खोलीच्या बाहेर पडला.

सकाळचे सहा वाजून गेले होते, चहा वगैरे घेऊन भालचंद्राबरोबर माधव साहेबांकडे जाण्यास निघाला. साहेबाच्या बंगल्यावर पोहोंचतांच ताब्यांत असलेले नानासाहेब त्याच्या दृष्टीस पडले. खालीं मान घालून ते बसले होते.

औपचारिक प्रकार आटोपल्यावर माधवाकडे वळून साहेब–जॉलीसाहेब म्हणाले—

"माधवराव, ह्या प्रकारावद्दल तुम्हांला जी काय माहिती असेल, तेवढी कृपा करून मला सांगा."

"साहेब, मला ह्या बाबतींत कांहींच माहीत नाहीं. गोविंदरावांनीं हें पत्र मला लिहून ठेविलें आहे त्यावरून कांहीं उलगडा होत असल्यास पहा."

साहेबांनीं तें पत्र वाचून पाहिलें.

"माधवराव, मग तुम्हीं खेड्यावर कशासाठीं गेलां होतांत?"

"दिलजान म्हणून एक नायकीण मुंबईहून येणार होती. तिच्यासाठीं मी तेथें गेलों होतों."

"मग ती आली कां?"

"नाहीं, आज येणार आहे."

"बरें तें असो. पण आम्हांला माहिती देणारें हें पत्र तुम्हीं लिहिलें आहे कां?"

त्यांनीं पत्र माधवाच्या हातांत दिलें.

"नाहीं. हें मी लिहिलें नाहीं. पण ही सही मात्र माझी दिसते."

साहेबांनीं नानासाहेबांना आंत आणण्यास सांगितलें.

"नानासाहेब, तुम्हीं गुन्हा फार भयंकर केलेला आहे. विनायकरावावर खोटी तोहमत घेण्यांत तुम्हीं मोठी चूक केलीत."

"नाहीं, साहेब मी चूक केली नाहीं. सर्व कांहीं मी बरोबर जमविलें होतें आणि तें साधलें असतें तर..."

"पण एवढा खटाटोप करण्याचा तुमचा हेतु काय होता?"

"हेतु! हेतु काय असणार? या जगांत सर्व चालणाऱ्या खटाटोपीचा हेतु काय असतो! पैसा! धन, द्रव्य—पैशासाठींच ह्या मूर्खाला मी व्यसनी बनविलें! पैशासाठींच विनायकावर खोटा आरोप ह्या मूर्खाकडून घेवविला!"

"पण तो कां घेवविलात? गोविंदराव तुमच्या हातांत सांपडले होते, माधव तुमच्या तंत्रानें वागत होता....."

"नाहीं. माधव माझ्या तंत्रानें वागत नव्हता, म्हणून तर हा सर्व व्यूह रचावा लागला! त्याची सारासार बुद्धि एखादे वेळेस जागी होई. तो माझ्या तावडींतून निसटे. तसें न व्हावें म्हणून हें सर्व केलें. दिलजानची खोटी थाप

ह्याला मारली. तुम्हांला माहिती देणारें पत्र मी लिहून तें दिलजानचें असें भासवून त्यावर ह्याची सही घेतली. दिलजानच्या अभिलाषानेंच ह्याला गांवाबाहेर काढलें. तेथें विष देऊन याला मारून तो याचा आत्मघात म्हणून तुम्हांलाही चकविणार होतों; परंतु त्या दगलबाज गोविंदरावानें आयत्या वेळेला दगा दिला ! नाहींतर आज हाच नानासाहेब.....


"तें असो परंतु तुम्हीं विनायकावर प्रसंग कां आणलात ? "

"तो माझ्या कृत्यांत व्यत्यय आणील म्हणून. शिवाय त्याच्या बहिणीशीं मला गोविंदरावांचें लग्न करून द्यावयाचें होतें. लक्ष्मीशीं मी लग्न करणार होतों. गोविंदरावांच्या मनांत कमला फार भरलेली होती. तिच्याशीं त्यांचें लग्न लावून देऊन माझीं कृष्णकृत्यें तो बाहेर आणणार नाहीं अशा तऱ्हेनें मुस्कटदाबी करावयाची होती. परंतु आतां काय त्याचें ! माझे सर्व बेत फिसकटले ! मी कायद्याच्या तडाख्यांत सांपडलों ! मी घोर गुन्हेगार झालों ! "

"माझा एकट्याचा मूर्खपणा ! धिक्कार असो मला ! पश्चात्तापानें होरपळलेल्या माधवाचे तोंडांतून उद्गार बाहेर पडले. "

प्रकरण ४९ वें.

आनंदी आनंद.



वरील गोष्टीला तीन चार महिने होऊन गेले होते. आपल्या दुष्ट कृत्यांची फेड करण्यासाठीं नानासाहेब कारागृहवास भोगीत होते. त्यांनीं केलेल्या गुन्ह्यांचें भयंकर स्वरूप लक्षांत घेऊन न्यायमूर्तींनीं त्यांना भरपूर शिक्षा दिली होती.

कमला, विनायक, माधव व गोदावरीबाई यांच्या योग्य शुश्रूषेनें व डॉक्टरांच्या मेहनतीनें लक्ष्मीचा पुनर्जन्म होऊन ती आतां साधारण बरी झाली होती.

मानवी स्वभावाच्या नेहेमींच्या अनुभवाप्रमाणें चांगलीच अद्दल घडल्यानें माधवाच्या स्वभावांत अतर्क्य बदल झाला होता. आपल्या सध्याच्या वागणुकीनें आपल्या पूर्वायुष्यावर तो कायमचें पांघरूण घालीत होता. व पुन्हां पूर्वपदावर जाणार नाहीं अशाच तऱ्हेचे त्याचे एकंदर आचारविचार बनले होते. नानासाहेबांच्या पश्चात् त्यांच्या बायकापोरांची तो काळजी घेत असे.

त्याचें मन कमलेकडे आतां दुप्पट जोरानें ओढ घेऊं लागलें होतें. आपलें जीवनसर्वस्व तीच असें तो समजत असे. ह्या त्याच्या प्रेमांत तारुण्यांतील कामविकाराचा उच्छृंखलपणा नव्हता कीं प्रेम ह्मणजे निव्वळ कामबाधा असें आतां त्याला वाटत नव्हतें.

जन्मापासून मरणापर्यंतच्या आयुष्याच्या निरनिराळ्या पायऱ्यांत प्रेम भरलेलें असतें ! ह्या निरनिराळ्या स्थितींत आयुष्याला सुख देणारी अशी तीच एक दिव्यशक्ति होय ! तारुण्य ही आयुष्क्रमाची एक पायरी. कामबाधा ह्मणजे या पायरींत अनुभवावयास लागणारा एक शारिरीक विकार ! तारुण्य ही आयुष्यक्रमांतील महत्त्वाची पायरी आहे. ह्या वेळचें काममूल प्रेम

माध्यान्हींच्या प्रखर सूर्याप्रमाणें प्रखर असतें. प्रातर वा सायंकाळची रमणीयता जशी ह्या माध्यान्हींच्या सूर्यांत नसते, तशीच ती ह्या कामी प्रेमांत नसते. उपःकालची मनास आल्हाद देणारी तृप्ति जशी ह्या माध्यान्हींच्या सूर्यांत नसते, तशीच ती ह्या यौवनकालच्या काम-प्रमुख प्रेमांतहि नसते. ह्या प्रेमाची वृत्ति अधाशीपणाची असते, त्यांत स्वस्थता नसते. परंतु माध्यान्हींच्या सूर्याचा प्रखर ताप जसा वायू व मेघ कमी करूं शकतात, तसाच ह्या मेघाचा प्रखर ताप शुद्धता व विवेक कमी करूं शकतात. परंतु ह्या प्रेमाच्या तडाख्यांत सांपडणाऱ्या प्राण्यास ह्या दोहींचा लाभ होईल तरच्या ह्या गोष्टी !

माध्यान्हपदावरून ढळल्यावर सूर्याचें स्वरूप निवळून पूर्णकालची कोमलता जशी त्याच्यांत हळूहळू येऊं लागते तसें ह्या प्रेमाचें होतें. त्याचें काममूल प्रखर स्वरूप कमी होत जाऊन खरी प्रेमभावना वळावूं लागते. या प्रेमभावनेला विवेकाची जोड मिळते व तो प्राणी व त्याचें तेंच पहिलें प्रेम पुन्हां रमणीय होऊं लागतें.

" कमले, तुझ्या प्रेमानें प्रेमाची खरी गोडी, प्रेमाचें खरें स्वारस्य जसें मला कळूं लागलें आहे, तसेंच भालचंद्र, विनायक व विमलादेवी यांच्या सहवासानें जगांतील माझें कर्तव्य मला कळं लागलें आहे; तें मला उमजूं लागलें आहे. अद्यापपर्यंत झालेल्या आयुष्याचा अपव्यय भरून काढावा असें मला वाटूं लागलें आहे. कमले, . याला तूं आड नाहींना येणार ? " माधव गंभीर स्वरानें म्हणाला.

" मी कशाला आड येऊं ! स्वार्थी संसारापेक्षां लौकिकानें शोभणाऱ्या संसाराचीच मला जास्ती आवड आहे ! "

" कमले, नीट विचार कर आणि मग उत्तर दे. "

" यांत विचार तो काय करायाचा ! इकडच्या मनाला पटेल ती गोष्ट मला पटलीच पाहिजे. इकडे वाटत असेल कीं मी दिखाऊ शिक्षणानें पोसलेली असेन म्हणून; पण मी तशी नाहीं. थोरामोठ्याच्या श्रीमंत व घरंदाज मुलाशीं लग्न लावून ऐष आरामांत लोळत आयुष्याची माती करून घेणें मला आवडत नाहीं. एखाद्या रावसाहेब रावबहादुरांची पत्नि होऊन आपल्या खोट्या मोठेपणाच्या तोऱ्यांत मिरविण्यांत मला मजा वाटत नाहीं कीं कर्तबगारीशिवाय

आपली खोटी प्रतिष्ठा माजवून लोकांत मानमान्यता मिळवूं पहाणेंहि मला आवडत नाहीं. वर्षाच्या कांठीं ह्या खोट्या मानमान्यतेनें हुरळलेल्या बायकांनीं चारसहा सभा भरवाव्या, व्यासपीठ दणदणून सोडावें, वर्तमानपत्रांत लांबलचक हकिकत द्यावी व घरीं पहावें तर बोलण्यांत व चालण्यांत छतीसाचा आंकडा कायम ठेवावा, असल्या स्त्रीसमाजाच्या चळवळींत मी गुरफटणारी नाहीं.

" संसारोपयोगी शिक्षण माझ्या आईकडून मला मिळालें असून देशकार्याचें शिक्षण माझ्या भावाकडून मला मिळालें आहे. माझ्यावरील जबाबदारी मला कळत आहे. प्रेम, कर्तव्य व सुख ह्या तिहींची सांगड घालण्याची माझी इच्छा आहे आणि इकडच्या सहवासांत माझी ही इच्छा सफल होईल अशी माझी खात्री आहे.

" असें असतां यांत विचार तो कसला करावयाचा आणि आपणांस सांगावयाचें तें काय ! "

" कमले ! "

कौतुक, गर्व, आनंद वगैरे अनेक मनोविकारांनीं उंचबळलेल्या माधवाच्या तोंडांतून जास्ती शब्दच निघेनात.

" ज्यावेळीं माझ्या अल्लड मनानें इकडे ओढ घेतली, त्यावेळीं अशा स्थितीला येऊन आपण मला सुख द्याल अशी खात्री होती का ? आपण पूर्वीच्याच स्थितींत राहिलां असतां तर आजच्यासारखा सोन्याचा दिवस उगवला असता काय ! नसता. आणि तो तसा उगवला नसता, म्हणजे माझें आयुष्य किती वरें कष्टाचें व दुःखाचें गेलें असतें ? त्यापेक्षां इकडच्या मनांत आलेल्या विचाराप्रमाणें देशकार्याच्या दुःखांत व कष्टांत इकडच्या प्रेमळ संगतीचा... "

माधवानें तिला जास्ती बोलूंच दिलें नाहीं. प्रेमानें—कामुक नव्हे—तर स्नेह मूल उज्वल प्रेमानें त्यानें तिचें चुंबन घेतलें.

" कमले, तूंच माझी खरी देवता ! "

खऱ्या आनंदाचा आस्वाद घेत हीं दोघेंजणें तेथून बाहेर पडलीं. तों समोर त्यांना कोण दिसलें ?

विनायक व लक्ष्मी !

आज पांचसहा वर्षांनीं ज्या लतामंडपांत ज्या शिलातलावर लक्ष्मी बसली होती व जेव्हां आपण पहिल्यानदांच तिच्या सौंदर्यावर मोहित होऊन तिच्याशीं प्रेमयाचना केली, त्याच लतामंडपांत त्याच शिलातलावर बसून विनायकाशीं ती प्रेमाच्या गोष्टी करीत असलेली पाहून माधवाच्या मनांत काय बरें भावना उद्भवली असेल ? मत्सरानें त्याच्या अंतःकरणांत शिरणें आतां शक्यच नव्हतें !त्याच्या मनांत त्या दोघांना पाहून आनंदाचीच भावना उद्भवली.

समोरच्या गवतावर-हरळींवर विनायक पहूडला असून तिच्याशीं गोष्टी करण्यांत तो दंग झाला होता. ही सकाळची वेळ होती. आजारीपणांतून उठलेल्या लक्ष्मीबरोबर तो सकाळचा फिरावयास गेला होता. खरें पाहूं गेलें असतां लक्ष्मीची व त्याची आज गांठ पडण्याची संधि कमलेनेंच मुद्दाम आणून. दिली होती. ती लक्ष्मीबरोबर रोज सकाळीं फिरावयास जात असे. परंतु आज आपल्या ऐवजीं विनायकानें जाण्याचा तिनें मुद्दाम योग जमवून आणला होता.

विनायकाच्या मनांत पहिल्यानदां प्रेमविकार नव्हता. त्याच्या आयुष्याचें ध्येय नेहमीं त्याच्या डोळ्यांपुढें खेळत असल्याकारणानें प्रेमविकारास तेथें बागडतां येणें शक्यच नव्हतें. परंतु त्याच्यावर आलेल्या प्रसंगानें-लक्ष्मीच्या मनांतील गुजगोष्ट कळल्यानें त्याच्या मनांत प्रेमाचा उद्भव झाला होता.

ही सकाळची वेळ होती. बालरवीकिरणें आपल्या अजस्र बाहूंनीं प्रत्यक्ष सजीव वस्तूस कवटाळून तिला चैतन्य देत होतीं. प्रातःकालचा उल्हसित वायु प्रत्यक्ष प्राणीमात्राच्या प्राणवायूस आपल्याप्रमाणें उल्हासित करीत होता. पहाटेच्या दंवानें गारठलेल्या वृक्षलता आपला आळस झाडून तेजस्वी सूर्याच्या सान्निध्यानें आपला आनंद व्यक्त करीत होत्या. पक्षीगण आपल्या मंजुल रवांनीं आनंदानें नाचत बागडत होता. ह्या वृक्षलता, हा पक्षीगण जसा आनंदित दिसत होता, तशींच विनायक व लक्ष्मी हीं आनंदांत असलेलीं दिसत होतीं.

पहाटेचें फिरणें करून तीं दोघेंहि तेथें येऊन बसलीं होतीं. लक्ष्मी आतां बरी झाली होती. आजारीपणानंतरच्या शारीर प्रकृतीबरोबर तिच्या मनांतील विचारांचींहि वाढ होत होती. शरीर प्रकृति निकोप असली किंवा वाढीला लागलेली असली झणजे मन नेहेमीं आनंदात असतें. रक्तवृद्धीमुळें वृत्ति उल्हसित

असते. लक्ष्मीची स्थिति अशीच होती. फिरतांना याच आनंदाच्या भरांत विनायकाबरोबर तिचें प्रेमगुज, तिच्या प्रेमगुजाच्या गोष्टी चालल्या होत्या. बागेंत येऊन शिलातलावर बसल्यानंतरसुद्धां ह्याच गोष्टींत तिचें मन रममाण झालें होतें.

"तुमच्यावरोबर देशकार्य करण्यांत मला कितीतरी आनंद वाटेल. आज ह्या गांवाला, उद्यां त्या गांवाला; आज एका मंडळींत, तर उद्यां दुसऱ्या मंडळींत; ह्याप्रमाणें जनहितासाठीं खटपट करण्यांत मला कितीतरी धन्यता वाटेल."

"लक्ष्मी, देशहितकार्याच्या ह्या लखलखणाऱ्या बाजूकडे तूं बघूं नकोस. ह्या लकाकीपलिकडच्या त्याच्या काळ्या बाजूकडे पहा. देशहितार्थ बाहेर पडणाऱ्यांची व ऐष आरामाची, सुखसौख्याची कायमची फारकत झालेली असते. वेळप्रसंगीं जनापवाद, विटंबना त्यांना पदरांत घ्यावी लागते."

"असें कसें ह्मणतां. भालचंद्ररावांना कोणी नांवें..."

"होय; भालचंद्राला नांवें ठेवीत नाहींत ही गोष्ट खरी. पण हें कुठपर्यंत ? त्यानें व्यासपीठ अगर लेखणी सोडली नाहीं तोंपर्यंत ! ह्या दोहोंस सोडून एकदां कां त्यानें खऱ्या कार्यास आरंभ केला, ह्मणजे लोक काय ह्मणतात तें कळेल !"

"कळेना कां ? मला त्याच्याशीं काय करावयाचें आहे. तुम्हीं ज्या पेशांत हा देह झिजविणार, त्याच पेशांत पति धर्माला अनुसरून मी तुम्हांला मदत करणार। आणि ती मी करावी एवढेंच मला समजतें."

" लक्ष्मी हें तुझें पुस्तकी ज्ञान..."

" पुस्तकी नव्हे. प्रेमाचें-खऱ्या प्रेमाचें-दोन्ही जीव एकजीव करणाऱ्या ईश्वरी प्रेरणेचें-हें ज्ञान आहे. आणि ईश्वरी असल्यानें तें अक्षयीं टिकणारें आहे. "

माधव व कमला, लक्ष्मी व विनायक यांचीं गेल्या पंधरवड्यांत लग्नें झालीं असून, ह्या दोन्ही कुटुंबांत आनंदी आनंद नांदत होता. ह्या दोन्हीं जोडप्यांची बुद्धी धर्म-अर्थ-कामेच ह्या मंत्राची खरी योग्यता कळण्याइतकी प्रगल्भ झालेली होती. ह्या मंत्रोच्चारानें गृहस्थाश्रमाची-संसाराची दीक्षा घेत असतां, ह्या पवित्र मंत्रोच्चारानें तीं एकमेकांस बद्ध करून घेत असतां, बोलण्याप्रमाणें वागण्याचा निश्चय-करारीपणा त्यांच्या सतेज मुखकमलांवर ठशांप्रमाणें ठसठशीत उठलेला दिसत होता.

प्रकरण ५० वें.

भालचंद्राचें व्याख्यान.

"आ

मच्या देशाची संपत्ति " हा भालचंद्राच्या आजच्या व्याख्यानाचा विषय होता.

स्टेशन लगतच्या नेकोलेट पार्कच्या भव्य पटांगणांत श्रोतृसमुदायाचा घोळका जमूं लागला असून थोडक्याच वेळांत कांहीं नाहीं तरी पांच सहा हजार श्रोते मंडळी तेथें जमली. नेमल्या वेळीं व्याख्यानास सुरवात झाली.

" बंधु भगिनी ! "

अंतःस्फूर्तीनें भालचंद्रानें आपल्या व्याख्यानास सुरवात केली.

"देशाची संपत्ति या शब्दाची व्याख्या देशाच्या तत्कालीन स्थितीवरून करावयाची असते. संपत्ति कशाला म्हणावयाचें ? सोनें, रुपें, हिरे, मोतीं वगैरे अनेक मौल्यवान पदार्थ ही खरी संपत्ति नव्हे. देशाची संपत्ति निराळी असते. समाज ही देशाची खरी संपत्ति असते. निदान आपल्या देशाच्या बाबतींत तरी समाज हीच आपल्या देशाची खरी संपत्ति होय. समाजाची जशी स्थिति असते तशी देशाची स्थिति असते. समाज जर कार्यदक्ष असेल, समाजांत जर चैतन्य असेल, तरच त्या देशाचें महत्व असतें. पण समाज जर अनिष्ट असेल, तर त्या देशाच्या इतर संपत्तींचें खनिज, उद्भिज्ज, आर्थिक व औद्योगिक संपत्तींचें चीज होत नसतें. समाजाला कीड लागलेली असली म्हणजे ह्या इतर संपत्तीचें कांहीं चालत नाहीं. आपल्या किंवा इतर देशांचा जुना इतिहास ह्या गोष्टींचा–ह्या तत्वाची चांगली साक्ष पटवतो.

" प्राचीन भारतवर्षीय मोठमोठ्या राष्ट्रांचा किंवा इजिप्त, बॅक्टेरिया, ग्रीस रोम वगैरे अनेक जुन्या राष्टांचा इतिहास आपणांस हेंच नाहींका सांगत ? ज्या काळीं या राष्टांचा तेजोरवि तळपत होता, त्याकाळीं ह्या राष्ट्राच्या समाजाची स्थिति कशी होती ? समाजांत सर्व ठिकाणी उत्कृष्ट गुण नांदत होते. समाजांत

अनीति पसरली नव्हती कीं समाजाला अनिष्ट वासनांची कीडहि लागलेली नव्हती. समाजाचे नेते कार्यदक्ष होते. समाजाच्या कल्याणासाठीं ते आपला देह झिजविणारे होते. समाजाचें कल्याण तेंच आपलें कल्याण असें ते समजत होते.

"परंतु समाजाची ही स्थिति जेव्हां पालटली, समाजांत अयोग्य, अनीतिमान् व आत्मघातकी कल्पनांचा जेव्हां सुळसुळाट झाला, तेव्हां तो अधू होऊन हीं राष्टें डळमळूं लागलीं व अयोग्य परिस्थितीच्या मानानें कमकुवत होऊन नामशेष झालीं. ज्या समाजानें आपल्या हिमतीच्या बलावर या अवाढव्य राष्टांची उभारणी केली, त्याच समाजानें त्यांना रसातळाला पोंहचविलें.

"या तऱ्हेनें आपण विचार करूं लागलों, ह्मणजे सध्यांच्या आपल्या स्थितीचें कारण आपणच असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. ज्या आपल्या आर्यांच्या पूर्वजांनीं हिंदुस्थानांत मनगटाच्या जोरावर वसाहती करून मोठमोठीं राज्यें स्थापिलीं, त्याच आर्यांच्या आह्मीं वंशजांनीं तीं गमावलीं. आमच्या पूर्वजांनीं निरनिराळे शोध लावून, निरनिराळे धर्म स्थापन करून, वेळ येईल त्याप्रमाणें समाजाला मार्ग दाखवून, आपलें आयुष्य सुखानें व कर्तबगारीनें घालविलें; आपल्याबरोबर इतरांचा परामर्ष घेतला व जीवनकलहाची तीव्रता कमी केली; त्या आज आह्मांला-त्यांच्या वंशजाना-आपलें आयुष्य सुखानें घालवितां येत नाहीं कीं जीवनकलहाची तीव्रताहि कमी करतां येत नाहीं. समाजाचीं दुःखें हलकीं करतां येत नाहींत कीं समाजाला मार्गहि दाखवितां येत नाहीं. याचें कारण काय असावें?

"याचें कारण दुसरें काय असणार? आपल्या देशाची संपत्ति आपली जबाबदारी बरोबर ओळखत नाहीं! किंवा जबाबदारी बरोबर ओळखून त्याप्रमाणें वागण्याची इच्छा धरीत नाहीं!

"देशाची संपत्ति या शब्दाची व्याख्या देशाच्या तत्कालीन स्थितीवरून करावयाची असते, असें जें मी व्याख्यानाचे सुरवातीस सांगितलें, तें कसें तें आतां पहा. समाज ह्मणजे देशाची संपत्ति ही आमची संपत्ति भौतिकदृष्टीनें सध्या किती किमतीची आहे, याचा तुह्मी आपल्या मनाशीं विचार करा व आपल्या देशाच्या संपत्तीची अटकळ करा, देशाच्या संपत्तीचा आढावा काढा व हा

आढावा आपल्या देशापेक्षां क्षेत्रफळानें किंवा लोकसंख्येनें लहान असलेल्या सुधारलेल्या देशांशीं मांडून पहा. दोघांची स्थिति ताडून पहा. एकाची सुस्थिति तर दुसऱ्याची दुःस्थिति तुह्मांला तेव्हांच दिसेल असें कां व्हावें !

"तिकडला समाज सुशिक्षीत आहे. आपलें कर्तव्य कोणचें हें तो पुरतेपणीं ओळखतो. त्या समाजाचे नेते समंजस आहेत. त्यांची वृत्ति प्रगमनशील आहे व त्यांच्या कार्यांचाहि उगम ह्याच वृत्तीपासून होणारा आहे. बंधुप्रेम त्यांच्यामध्यें पुरतेपणीं नांदत आहे. पंतु तीच आपच्या इकडची स्थिति पहा. आमचा समाज अशिक्षीत, कर्तव्य कोणचें हें न जाणणारा, जुन्या मळलेल्या मार्गानेंच चालणारा असा आहे. आमच्या इकडे बहुजन समाज अशिक्षीत असल्यानें त्याच्या नेत्याची कामगिरी बरोबर होऊं शकत नाहीं. शिवाय ज्या वर्गांतून आमच्या समाजाला नेते मिळाले पाहिजेत, त्या वर्गांतून ते मिळत नाहींत.

"आमच्या समाजाचे हल्लींचे नेते पांढरपेशा मंडळींतील आहेत. हे बहुतेक सर्व द्रव्यहीन असे आहेत. त्यांच्या बोलण्याचा अर्थ न समजण्यासारखीच जर एकंदर अक्षरशत्रु समाजाची स्थिति आहे, तर या नेत्यांच्या कामगिरीपासून कोणता फायदा होणार ? ह्यांचे उपदेशाचे चार शब्द केवळ मौजेखातर ऐकण्यासाठीं चार लिहितांवाचतां येणारी मंडळी व्याख्यानाचे जागीं जमते. पण ह्यापासून व्हावा तेवढा कार्यभाग होतो काय ?

" नाहीं, असेंच मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें.. याचें कारण विचार करण्यासारखें आहे . उपदेशकांनीं सांगितलेलीं तत्वें या मुठभर लोकांच्या—समाजाच्या एका अती लहान भागाच्या—मनांत बिंबतात असेंच नाहीं. सर्वांच्याच मनांत ही तत्वें बिंबत नाहींत असें माझें ह्मणणें नाहीं. कांहीं थोडक्या मंडळीच्या मनांत हीं तत्वें बिंबतात. पण तेथून पुढें तीं तत्वें प्रसार पावत नाहींत. बहुजन समूहांत—समाजाच्या मोठ्या थोरल्या भागांत—ह्या तत्वांचा शिरकाव होत नाहीं याचें कारण ह्या समाजाचें साक्षरमूल अज्ञान.

" हें समाजांतील अज्ञान आह्मांला अगोदर घालविलें पाहिजे. देशहिताचें जर पहिलें कांहीं कार्य करावयाचें असेल तर तें हें. समाजास साक्षरतेचा लाभ करून देऊन त्याचें अज्ञान घालवून त्याची जिज्ञासा व त्याची महत्वाकांक्ष

वाढवून, नंतर देशोन्नतीचीं तत्वें त्यांच्या पुढें ठेविलीं, तरच देशकार्याचें खरें कार्य होणार ? तरच देशाची खरी प्रगति होणार ?

" पण समाजांतील हें अक्षरशत्रुत्व घालवावयाचें कसें ? हिंदुस्थान देश कांहीं लहान नाहीं कीं तेथील लोकसंख्या आटोपसर नाहीं ! अर्ध्या युरोप एवढा हा देश असून संबंध पृथ्वीच्या लोकसंख्येच्या पंचमांशा एवढी ह्या देशाची लोकसंख्या आहे. आमच्या खऱ्या उन्नतीसाठीं एवढ्या मोठ्या लोक समूहाला –आह्मांला–हिंदुस्थानच्या आह्मां हितचिंतकांना–साक्षरतेचा लाभ करून द्यावयाचा आहे.

" सकृद्दर्शनीं ही गोष्ट अशक्य दिसणारी आहे. पण ती अशक्य दिसते ह्मणून आह्मांला तिला सोडून चालावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें योग्य खटपटीच्या अभावीं ती अशक्य आहे ह्मणून वाटतें. सरकारच्या मदतीशिवाय ही गोष्ट साधणें शक्य नाहीं असें कित्येकांचें ह्मणणें आहे. पण ही गोष्ट सरकारला जर साध्य आहे, तर समाजाला ती गोष्ट साध्य कां असूं नये ? या बाबतींत सरकारावर समाजानें विसंबून कां रहावें ? देशांत शिक्षणाचा प्रसार करणें हें जसें सरकारचें एक पवित्र कर्तव्य आहे त्याचप्रमाणें तें समाजाचें नाहीं का ?

" आहे ! समाजाचें जर हें पवित्र कर्तव्यकर्म आहे. तर तें समाजानें करावयास नको काय ! आपल्या कर्तव्याच्या ऋणांतून समाजास मुक्त व्हावयास पाहिजे, व त्याप्रमाणें समाज ऋणमुक्त होतो आहे किंवा नाहीं हें पाहणें आमच्या समाज नेत्यांचें काम आहे.

" समाज जशी देशाची संपत्ति, सुशिक्षित समाज जशी एकंदर समाजाची संपत्ति, सुशिक्षित समाजांतील नेत्यांचा वर्ग–जशी या सुशिक्षित समाजाची संपत्ति, तशीच समाजांतील धनिक, श्रीमंत मंडळी ही ह्या सर्व समाजाची व देशाची संपत्ति असते. ह्या धनिक मंडळीची व सुशिक्षित समाजांतील नेत्यांची सांगड घालून सरकारी मदतीची अपेक्षा न करतां खऱ्या कळकळीनें आम्हांला हें कर्तव्य बजावलें पाहिजे. आपल्या शिरावरचा भार कमी केला पाहिजे.

" आतां एवढी गोष्ट येथें कबूल करणें भाग आहे, कीं ही सांगड घालणें जरा कष्टाचें काम आहे. आमच्यांतील धनिक वर्गाची स्थिति फार निराळी आहे. आहे तेथें दयेचें वारें अतिशय आहे व नाहीं तेथें कांहीं नाहीं.

एकीकडे वायफळ धर्मकृत्यें तर दुसरीकडे धर्मबाह्य अनीतीधर्मकृत्यें ह्यांत खो धनिक मंडळींच्या पैशाचा कल्पनातीत अपव्यय होत असतो. देशाला किंवा समाजाला कोणत्याही तऱ्हेचा खरा फायदा देत नसलेल्या अनेक कृत्यांत खर्च होणारा हा पैसा जर अशा खऱ्या सत्कार्यांस लागेल, तर ही अशक्य वाटणारी गोष्ट तेव्हांच शक्य झालेली दिसेल. परंतु आमच्या धनिक लोकांस याचा उमज पडेल तेव्हां हें सर्व साधणार ! ह्या धनिकांपैकीं वयातीतांच्या वांटणीस एका काळीं संमत असलेलीं पण सध्याच्या कालांत स्थित्यंतरानें संमत होत नसलेलीं रुढीबद्ध धर्मकृत्यें व तरुणांच्या वांटणीस काम, मोह व सुखासीनता हीं जोंपर्यंत मिळालेलीं आहेत, ह्यांची व ह्या धनिकांची जोंपर्यंत फारकत झालेली नाहीं, तोंपर्यंत ह्या धनिकांची स्वयंस्फूर्तीची मदत ह्या कामीं मिळणें शक्य नाहीं. येथेंच आमच्या समाजधुरीणांनीं–देशभक्तांनीं काम केलें पाहिजे. ह्या लोकांना त्यांच्यावरील जबाबदारीची ओळख करून दिली पाहिजे. इकडे कानाडोळा करून इतर बाजूंनीं जर त्यांनीं देशोद्धाराचें काम केलें तर तें व्हावें तितकें यशस्वी, श्रेयस्कर व भरभक्कम व्हावयाचें नाहीं. शिक्षण हा राष्ट्राचा पाया आहे. ह्या बाबतींत कोणाहि तत्ववेत्त्याचा मतभेद झालेला दिसत नाहीं. आधीं पायाच्या बळकटीकडे बघूनच नंतर वरची इमारत उभारावयाची असते. पाया जर कच्चा असेल तर त्या पायावर उभारलेली इमारतहि कच्चीच राहणार. तिच्या शाश्वतीबद्दल खात्री देतां यावयाची नाहीं-ती केव्हां कोसळेल हें सांगतां यावयाचें नाहीं.

" आमच्या पुढाऱ्यांना, धनिकांना जागृत करा म्हणून जसें माझें आग्रहाचें सांगणें आहे, तशींच माझ्या श्रीमंत व सुशिक्षित देशबांधवांना माझी कळकळीची विनंति आहे. जन्मसिद्ध वर्णश्रेष्ठत्वापेक्षां किंवा विद्वत्तेनें मिळणाऱ्या श्रेष्ठत्वापेक्षां श्रीमंतीनुळेंच समाजांत तुमचा दर्जा वरच्या प्रतीचा आहे. समाजांत तुम्हांला मान आहे व संपत्तीचाही तुम्हांला जोर आहे. अशा-स्थितींत हा सार्वत्रिक शिक्षणप्रसाराचा गाडा ओढण्यास जर तुम्हीं सुरवात केलींत, तर तो जागचा हालेल व वाजवी कालावधींत त्याला योग्य गती मिळेल. दुसरीकडे धर्मकृत्यांत वा व्यसनमूल सुखशोधांत अनाठायीं खर्च होणारी संपत्ति या परमपूज्य कार्यांत खर्च करा व आपल्या प्रशंसनीय वागणुकीनें इतर धनिकांस कित्ता घालून द्या !

"देशाची खरी संपत्ति समाज. हाच समाज देशाच्या उद्भिज व खनिज संपत्तीपासून संपत्ति करतो, परंतु आमच्या समाजाला तशी संपत्ति बनवितां येत नाहीं. समाज अज्ञान आहे व ह्मणून ह्या ईश्वरदत्त खनिज व उद्भिज संपत्तीपासून आपला चरितार्थ चालवितां येणारी संपत्ति त्याला करतां येत नाहीं. अज्ञानामुळें हा समाज दारिद्रांत व दुःखांत आपलें आयुष्य घालवितो आहे. त्याचें अज्ञान घालविलें कीं त्याचें दुःख विमोचन झालें. हें अज्ञान घालविण्यास त्याला ज्ञानाची जोड लाभवून दिली पाहिजे. ही ज्ञानाची जोड शिक्षणानें मिळणारी आहे. शिक्षणाची जोड मिळवून देण्यास पैसाबळ व मनुष्यबळ पाहिजे जागृत सुशिक्षित समाजांतून मनुष्यबळ ह्या चळवळीच्या कालांत सहज मिळण्यासारखें आहे. ज्या समाजाजवळ मनुष्यबळ आहे त्या समाजाजवळ पैसाबळ नाहीं. पैसाबळ हें ह्या श्रीमंत लोकांच्या हातीं अडकलेलें आहे. तें त्यांच्याजवळून मिळविण्याची खटपट केली पाहिजे.

" ती खटपट करणें हेंच आह्मां देशभक्तांचें आद्य कर्तव्य आहे. "

टाळ्यांच्या गजरांत भालचंद्र खालीं बसला. तो खालीं बसला असेल नसेल, इतक्यांत माधव जागेवरून उठला व व्याख्यात्यांच्या जवळ आला. त्यानें वर हात करतांच पुन्हां सर्वत्र शांतता झाली. तो ह्मणाला—

"व्याख्यात्यांनीं—भालचंद्ररावांनीं—माझ्या परमप्रिय मित्रांनीं-आतां सांगितलें तें आपण सर्वांनीं ऐकिलेंच आहे. ह्या समाजशिक्षणाची माझ्या हातून थोडी. बहुत कामगिरी घडावी अशी माझी इच्छा आहे. माझ्या सर्व संपत्तीसह ह्या सत्कार्यास वाहून घेण्याचें मी आजपासून ठरविलें आहे. ज्या कोणास ह्या कामीं मला सहाय्य करावयाचें असेल, त्यांनीं आपली तशी इच्छा मला कळवावी. अशा सन्मित्रांच्या मदतीनें ईश्वर मला याकामीं यश देईल अशी मला दृढ आशा आहे. "

त्याच्यानें जास्ती बोलवेना. तो खालीं बसला. टाळ्यांचा पुन्हां कडकडाट झाला !

प्रकरण ५१ वें.

उपसंहार.

भालचंद्र, विमलादेवी, माधव, विनायक, कमला, लक्ष्मी, प्रभाकरराव ही मंडळी दिवाणखान्यांत बोलत बसली होती. कालचें भालचंद्राचें व्याख्यान व माधवाची प्रतिज्ञा यांवर त्यांचें बोलणें चाललें होतें.

" भालचंद्रराव, आतां पुढें कसें काय करावयाचें ! "

" तें मी सर्व तुम्हांला सांगतों. विमलादेवींना या धावतींत थोडा बहुत अनुभव आहे, तर त्यांच्याच सल्ल्यानें आपण चालणें फायद्याचें होईल.

" मला वाटतें वऱ्हाडप्रांतापुरतेंच तुम्हीं आपलें कार्य क्षेत्र ठेवावें. " प्रभाकरराव म्हणाले.

इतक्यांत सी. राजरंग ह्यांच्या नांवाचें कार्ड गड्यानें आणून भालचंद्राचे हातीं दिलें.

भालचंद्र उठून त्यांना आंत घेऊन आला.

" आपण इकडे यावेळीं कोणीकडे ! "

" मी माझ्या धंद्यासाठीं आलों आहें; कालच्या आपल्या व्याख्यानास आलों होतों. तेथें आपणाला ओळखलें म्हणून मुद्दाम आज आपल्या भेटी साठीं आलों. "

" त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. "

भालचंद्रानें त्यांची सर्वांशी ओळख करून दिली. माधवाची ओळख करून देतांना तो म्हणाला:—

"शिक्षणाच्या कामाला कालच्या सभेंत ज्यांनीं आपणांस पैशानें, शरिराने व मनानें सर्वस्वीं वाहून घेतलें, ते हे गृहस्थ. यांचें नांव माधवराव. हे यवतमाळचे रहाणारे असून इकडल्या प्रमुख लक्षाधीशांपैकीं आहेत. '

" अशा सदगृहस्थांची ओळख झाली, हें मी माझें भाग्य समजतों. यांच्या सारखे वीर तयार होऊन जेव्हां आमच्या समाजाचा उद्धार करतील, तेव्हांच इतर सुधारलेल्या देशांतून होणारी आमची अवहेलना टळेल ! माधवराव, तुम्हीं आरंभिलेल्या सत्कृत्याच्या मदतीसाठीं या माझ्या लहानशा देणगीचा स्वीकार करा. "

असें म्हणून खिशांतून चेकबुक बाहेर काढून त्यांनीं दहाहजारांचा चेक लिहून माधवाच्या हातीं दिला.

"आपल्या मदतीबद्दल मला अतिशय आनंद होत आहे. तिचा मी साभार स्वीकार करतों. '

मंडळीच्या सहवासांत थोडावेळ घालवून सी. राजरंग गेले. त्याच बैठकींत वाटाघाट करून ह्या मंडळींनीं आपला पुढील बेत ठरविला. आठपंधरा दिवसांनीं वऱ्हाडांत एक ' शिक्षण प्रसार करणारें मंडळ ' अस्तित्वांत आलें.

माधव, विनायक, लक्ष्मी व कमला यांच्या कार्यास सुरवात झाली.

ईश्वर त्यांच्या कार्यास यश देवो !

भालचंद्र, विमलादेवी व विनायक ह्यांच्या बुद्धिमत्तेचा व माधवाच्या संपत्तीचा सुसंयोग घडून आल्यानें वऱ्हाडांतील अज्ञ समाज ज्ञानी होऊन त्या देशाची खरी संपत्ति प्रकाशमान होण्यास कितीसा वेळ लागणार! अगदीं थोडा जरी लागला नाहीं तरी तो पुष्कळहि लागणार नाहीं. अज्ञान देशाचा भाग्योदय कल्पनातीत कालाच्या आड जसा दडून बसतो, तसा तो सुज्ञान देशाचा घसत नाहीं.

एके दिवशीं विचार करीत बसला असतां माधवाला जुन्या गोष्टींची आठवण झाली. आपल्या मागील व सध्यांच्या आयुष्यक्रमाचा विचार त्याच्या डोक्यांत आला. आपल्या कामी प्रेमास लक्ष्मीनें झिडकारल्यानंतर पडलेल्या स्वप्नाची त्याला आठवण झाली. या आठवणीबरोबरच वडिलांनीं लिहून ठेविलेलें उपदे-


शानें भरलेलें पत्र त्याच्या डोळ्यांपुढें त्याला दिसूं लागलें. त्यांच्या इच्छेची त्याला आठवण झाली.

वडिलांची-श्रीनिवासरावांची-मूर्ति त्याला दिसूं लागली. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान वृत्तीचें आनंदमूल हास्य चमकत होतें. आपला पुण्यदायक आशीर्वाद कर त्यांनीं त्याच्या शिरावर ठेवल्याचा त्याला भास झाला. त्यांच्या मुखांतून निघाल्यासारखे वाटणारे दोनच शब्द त्याच्या कर्णरंध्रांत सारखे गुणगुणूं लागले. त्या शब्दांचा जणूं काय त्याचा जप चालला होता. तो ते वारंवार उच्चारीत होता. अखेरीस मोठ्यानें तेच शब्द पुन्हां उच्चारून तो आपल्या जागेवरून उठला.

वाचकहो, ते शब्द कोणते ?—

"हेंच योग्य !"

समाप्त.



मराठी वाङ्मयांतील अमूल्य ग्रंथ.

मोरोपंत

(चरित्र आणि काव्यविवेचन.)

कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, वामन दाजी ओक, परशुरामपंततात्या गडबोले, दादोबा पांडुरंग, हरीपंत पंडित, गणेशशास्त्री लेले, माधव चंद्रोबा वगैरे रसिक पंडितांनीं ज्या कवीचा अगाध महिमा वर्णन करण्यांत आपल्या आयुष्याचा बहुतेक भाग खर्च केला, त्या जगविख्यात कवीचें सर्वांग-सुंदर चरित्र प्रख्यात मराठी ग्रंथकार रा० लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए. संपादक 'मुमुक्षु,' यांनीं लिहिलें आहे. मराठी भाषेंत असा चरित्रग्रंथ आजपर्यंत एकही झाला नाहीं. प्रस्तुत ग्रंथाचे पूर्वार्धीत कवीचें साग्र चरित्र दिलें असून उत्तरार्धीत त्याच्या कावितेंतील भरपूर उतारे देऊन प्रेमळ व मार्मिक वाणीनें सुंदर काव्यविवेचन केलें आहे. असा हा अमूल्य ग्रंथ आपल्या संग्रहास ठेवून महाराष्ट्रीय लोक आमच्या कविकुलगुरूचें ऋण फेडतील अशी आशा आहे. पुस्तकाची किंमत अवधी २ रु. ट. व्ही. पी. खर्च निराळा.

याशिवाय सर्व प्रकारचीं पुस्तकें नाटकें, कादंबऱ्या वगैरे येथें विकत मिळतात.

हिंद एजन्सी-बुकसेलर्स अँड पब्लिशर्स,
माधववाग, मुंबई.

कै० पांडुरंग गोविंदशास्त्री पारखीकृत

बाणभट्ट.

लो० टिळक, रावसाहेब महाजनी वगैरे विद्वानांचे

उत्तम अभिप्राय.

संस्कृत जाणणाऱ्या विद्वानांच्या हृदयास चटका लावणारा अत्यंत मधुर व रसाळ ग्रंथ जो 'कादंबरी' त्याच्या जनकाचें हें मनोरंजक व विस्तृत चरित्र कै. पारखी यांनीं लिहिलें आहे. या पुस्तकांत प्रथम बाणभट्ट त्याचा आश्रयदाता श्रीहर्षराजा, व इतर तत्कालीन कवींची अश्रुतपूर्व माहिती आली असून पुढें बाणकवीचे अत्युत्तम ग्रंथ जे **'कादंबरी'** व **'हर्षचरित'** त्यांतील कथानक थोडक्यांत, एकही मुद्दा न सोडतां रसाळ भाषेंत सांगितलें आहे. यामुळें कालेजांतील विद्यार्थी, व इतर मनोरंजक वाचनप्रिय सामान्य वाचक यांची या पुस्तकानें फार उत्तम सोय झाली आहे. पुस्तकांत ग्रंथकार रा० पारखी शास्त्री यांचा सुंदर फोटो घातला असून सुंदर सोनेरी, कापडी बांधणी वगैरेच्या योगानें पुस्तकास फारच रमणीय स्वरूप प्राप्त झालें आहे. किंमत सव्वा रुपया ट. व्ही. पी. खर्च निराळा.

याशिवाय सर्व प्रकारचीं पुस्तकें नाटकें, कादंबऱ्या वगैरे येथें विकत मिळतात.

हिंद एजन्सी-बुकसेलर्स ॲन्ड पब्लिशर्स,
माधवबाग, मुंबई.

